अनुक्रमणिका.

कवि, विषय व पद्यसंख्या. — पृष्ठांक.

काव्यरत्नावलि.

अंक १ ला.

रत्नावलीचा वाढदिवस.

कविमंडलाची प्रियकन्या जी **काव्यरत्नावलि**, तिच्याविषयीं मनांत असलेलें उत्कट प्रेम शब्दांनीं व्यक्त करण्याचा हा प्रयत्न आहे; या प्रेमाच्या चार शब्दांस **रत्नावलीच्या** वाढदिवसाचे अंकांत मग ते गुणरूप अथवा दोषरूप कसे का असेनात– अवश्य स्थान मिळेल अशी आशा आहे.

मंगलाचरणम्.

श्लोक–माल्यभारा.

जय मंगलधाम **रामचंद्रा** ! । वरदा ! दातृवरा ! दयासमुद्रा !
रघुराय ! शरण्य ! सौख्यकंदा ! । नमितों मंद मुदा पदारविंदा. १
तुज आळविती किती रसानें; । जलने ! मी तव बाळ फार सानें,
न कळे स्तुतिचीहि रीति मातें; । भलतैसें स्तवितों क्षमस्व मातें ! २
तव मंगल नाम एकदाही– । स्मरतां, दुःखपरंपरास दाही;
रघुनाथ ! समर्थ ! **रामचंद्र** ! । मग दीना वितरील कां न भद्र ? ३
कमला चपला अतीव, तीही– । तव पादांबुरुहीं स्थिराच राही;
मम चित्त असे तसेंचि देवा ! । स्थिर या तेथ पण क्षणैक ठेवा. ४
मन चंचल साच **रामराया** ! । न कराया स्थिर साध्य पामरा या;

गुह्यार्थ– १ रलयोःसावर्ण्यात् लघुनाथ= दीनांचा स्वामी. २ धैर्य अथवा सारांश तूं मला पावणारच

पण हा गुण त्यांत एक आहे; । प्रिय वस्तूंत सदा विलीन राहे. ५
ह्मणुनी ह्मणतों तुला दयाला ! । स्थिरवीं त्वत्पदपंकजीं तयाला;
पदकंजमरंद सेवितां तें, । विनटो स्वीकरुनी निजव्रतातें. ६

\+ + + +

विभुजी ! तुझिया दयोदयें जी-- । प्रिय झाली रसिकांचिया समाजीं;
करि रंजन जी तदीय साचें; । नव लीलागृह जें नवांरसांचें;- ७
असली कविवर्गकन्यका जे, । जिस **रत्नावलि** हें सुनाम साजे;
तुज अर्पियली असेच मागें; । परि आतां वरदान एक मागें. ८
पळमात्र दिनांत देवदेवा ! । करवीं हीकरवीं त्वदंघ्रिसेवा;
स्तवसेवनतुष्ट देवराया ! । ‘ कुशलंतेऽस्तु ’ मुदें वदें वरा या. ९
बळतां प्रभु ! तूं दयासुधार्द्र, । फुलताती सुलता समूलदग्ध;
फळतां मग शुष्क वल्लिका ही, । नच कौतूहल हें विशेष कांहीं. १०
सदया ! स्वदयार्द्रदृष्टि--पातें- । क्षम **रत्नावलि** लोकरंजनातें-
बनुनी, रिझवील तज्ज्ञलोकां; । तरि हीतें क्षण **राघवा !** विलोका. ११
दिवसेंदिवस प्रकर्षयुक्ता, । नियमें सज्जनरंजनास शक्ता,
हरि ! हीस करीं कृपा करोनी; । वदणें काय **रघूत्तमा !** फिरोनी ? १२

\+ + + +

निजरूप निसर्गसुंदरीचें; । उपदेशामृतमेघ माधुरीचे;
वसतिस्थल तेंवि सन्मतीचें; । सुखसर्वस्वचि जे सरस्वतीचें; १३
जनिते सुरसां नवां रसां जे; । क्षिति यत्स्फूर्तिभरें अपार साजे;
जगीं ज्याविण मोघ सर्व वस्तु; । कविवर्यांस तया नमोनमोऽस्तु. १४
करि नष्ट समस्तही पदार्थ; । त्रिजगद्भक्षक जो सदा समर्थ;
नियमाल असाहि काल शेखीं; । कविराया ! बल आपुलें असें कीं. १५
स्वमनीं सुयशःस्पृहा धरोनी, । नृपतीही प्रणतीप्रती करोनी,

भजनीं सजतील छत्रधारी. । कविराया ! तुमची अशीच थोरी. १६
विपरीत परी प्रसंग आज. । रसिकत्वा मुकला बहु समाज;
जन निर्धन सर्व कार्यकारी; । गणिती लाभ धनी न सद्विचारीं. १७
असल्या स्थितिमाजि आजि कैंवि– । मग थोरी तुमची अह्मां गमावी ?
नच शाद्बिक मान तोहि कोणी– । वितरी;– धन्य कवे ! तुला ह्मणोनी ! १८
तरि मी करितों तुह्मां विनंती; । न तयाची धरितां मनांत खंती,–
जंव येइ पुढील योग्य काल,– । तव कर्तव्य सदा मुदा कराल. १९
असतील रसज्ञ आज कांहीं; । स्वसमाजाप्रति भूषिलें जयांहीं;
तुमच्या करितील गौरवा ते; । फल युष्मत्कृतिचेंचि तेधवां तें. २०
कविराज ! विराजिता, मनोज्ञा, । जनिं **रत्नावलि** जी प्रिया रसज्ञा;
महिता दुहिताच आपुली हे; । न भवत्कीर्तिच मूर्तिमंत आहे. २१
कुलशीलवती, मनोज्ञ, कन्या, । बुधमान्या जरि त्यांत होय धन्या;
जनकास न काय मोद त्याचा ? । सदपत्य त्रिदिव प्रसूपित्याचा. २२
स्वसुता रसिकस्तुता स्वतां ही,– । भरितांना स्वगुणें दिशांस दाही,--
पसरील भवद्यशा प्रकर्षें; । तरि पुष्टी वितरा इयेस हर्षें. २३

× × × ×

कविता दुहिता सदैव रक्षी; । प्रिय **नारायणराव** कार्यदर्शी;
रसिकांसि तया नमोनियां मी, । करितों अल्प विनंति ह्याच कामीं. २४
नसतां धनलाभ या सुकार्या-- । रसिकत्वें करितोसि कष्ट आर्या !
दृढनिश्चय हाच बाळगोनी, । करिं **रत्नावलि**पालना झटोनी. २५

× × × ×

अजि ! वाचकवृंद ! मोददाते ! । रसवेत्ते ! विनती असे तुह्मांतें;
धरुनी करिं **मासिकास** भावें, । कवि, संपादक यांस तोषवावें. २६
असलां जरि रंक वा धनेश, । महती त्यांत नसे मुळीं विशेष;

तनुचित्तधनें बलानुरूप-- । करणें साह्य धरोनियां हुरूप. २७

× × × ×

विनवीं **रघुराज !** दीनपाळां ! । कविसंपादकवाचकादिकांला--
सुख देउनिया सदैव देवा ! । चिरजीवी, निजकार्यदक्ष, ठेवा. २८
हरि ! तूं सुरवृक्ष सज्जनाचा; । पुरवीं काम असा नमज्जनाचा;
पदिं पद्ममयीचि **'माल्यभारा'**-- । नत अर्पी **रघुवीर !** अंगिकारा. २९

भृंग.

मेघनादवधकाव्य*.

सर्ग ६ वा.

लक्ष्मणास चंडीचें दर्शन. **लक्ष्मण** युद्धास जावयास परवानगी मागतो. **श्रीराम** बंधुप्रेमामुळें ती देत नाहीं. **बिभीषणा**कडून सांत्वन. आकाशवाणी होते. **श्रीराम** आकाशांत भावी जयसूचक सर्पमयूरांचें युद्ध पहातो. **श्रीराम लक्ष्मणास** परवानगी देतो. **लक्ष्मण** व **बिभीषण लंकेंत** शिरतात. **मायादेवी लंका**धिष्ठात्री देवीचा **लक्ष्मणास** वर घेते. मायाबळानें **लक्ष्मण** व **बिभीषण** यज्ञागारी जातात. **इंद्रजित् बिभीषणा**ची निर्भत्सना करितो. **इंद्रजिता**चा वध. **बिभीषणा**चा शोक व **रामा**कडून त्याचें सांत्वन.

आर्या.

व्याध वनीं सिंहातें बघुनी अस्त्रालयाकडे धांवे
प्रखर शरां आणाया, **लक्ष्मण** शिबिरास त्यापरी पावे १
श्रीरामचंद्रचरणा वंदुनि भावें तया ह्मणे " बंधो

---

* ह्या काव्याचा ५ वा सर्ग एप्रील १९०६ अंक ४ था यांत आलेला आहे. या अंकांत ६ वा सर्ग प्रसिद्ध केला असून हें काव्य या वर्षांत पुरें होईल.

कृतकार्य मी जहालों आशीर्वचनें तुझ्या दयासिंधो २
स्मरुनी तव पद शिरलों विपिनीं **चंडीस** पूजिली भावें
आलीं अनंत विघ्नें मार्गीं त्यां मी किती निवेदावें ! ३
धरुनी भीषण वेषा विपिनद्वारीं **शिव** स्वयें बसला
निश्चय पाहुनि माझा दे मजला मार्ग कौतुकें हंसला ४
आला गर्जत वेगें सिंह न जों टाकिलें वनद्वार
घोर समीरण सुटला दावानल भडकला सभोंवार ५
सिंह पळाला दमला मारुत दावाग्निही त्वरें शमला
नमिला सुरबालागण आला जो सत्य मोहण्यास मला ६
जातां वनांत दिसलें **चंडी**मंदिर सरस्तटीं मजला
करुनि स्नान यथाविधि माल्यें वाहूनि पूजिलें तिजला ७
' झालें प्रसन्न तुजवर ' वदली प्रत्यक्ष ती **उमा** राया
जाया उत्सुक झालों दे आज्ञा **रावणीस** माराया " ८
" साक्षात् दूत यमाचा पाहुनि ज्या शूर नरवरीं भ्यावें
त्या कालसर्पविवरीं तुजला म्यां **लक्ष्मणा** कसें द्यावें ! ९
सीतोद्धार नको, म्यां जलधीवर बांधिला वृथा सेतु
येउनि ससैन्य वधिले राक्षस मी काय साधिला हेतु ! १०
वर्षाकालीं सलिलें सकल तशी शोणितें धरा न्हाली
मातापिता सहोदर अंतरलों राज्यसंपदा गेली ११
घोरतमीं दीपासम होती माझी प्रिया सती भार्या
नेली दुर्दैवानें तीही मजपासुनी दुरी आर्या १२
पाहुनि जयास जावें दुःखें म्यां विसरुनी त्वरें सारीं
बंधो कोण तुझ्याविण अन्य मला सांत्ववील संसारीं ? १३
चल जाऊं फिरुनि वनीं नलगे हा आपणांस संग्राम
आशापाशीं फसलों आलों येथें वृथा " वदे **राम** १४

वदला **लक्ष्मण** " बंधो धरितां भीती मनांत काशाला
अनुकूल दैव असतां यमही नाहीं समर्थ नाशाला १५
शिवगिरिजावासवही साह्य तुला सोड सत्वरीं शंका
देवक्रोधाभ्रांहीं आवरिली भासते पहा **लंका** १६
देवस्मितें तेजानें शिबिर तुझें उजळलें दिसे बंधो !
जातों समर कराया दे आज्ञा सत्वरीं कृपासिंधो ! " १७
धर्मज्ञा **श्रीरामा** देवाज्ञा मोडिसी कशी हातें
वरिसी अधर्म कैसा मंगलघँट भंगिसी पदाघातें ? १८
मित्र **बिभीषण** वदला **सौमित्री**चा बघूनि निर्धार
" **राम** वदे सत्यचि तें, **रावण**सुत विक्रमी असे फार १९
भीतो **इंद्र** तयाला सत्य जरी काळजी नको आतां
रक्षःकुलराजश्री स्वप्नीं मज बोलली स्वयें, नाथा २०
" भ्राता **बिभीषणा** तव मत्त मदें जाहला महापापी
सरलें पुण्य तयाचें होइल तो नष्टराज्य सुरशापीं २१
पाप मला सहवेना पापपुरी वासयोग्य नच हाय
मलिन जलीं पद्म खुलें ? तारा मेघावृतीं नभीं काय ? २२
रक्षःकुलनाथपदीं तुजला अभिषेक बा करूं आह्मीं
मारील **मेघनादा सौमित्री** सत्य सत्य संग्रामीं २३
भावी कर्बुरराजा साह्य करीं ऊठ कष्ट तव सरले "
परिसुनि वच जों उठलों शिबिर स्वर्गीय सौरभें भरलें २४

---

१ आच्छादिली; यावरून देव रावणावर कोपले आहेत असें सूचित केलें. २ हंसणें; यावरून देव रामावर प्रसन्न आहेत असें सुचविलें. ३ मातीचे दोन घडे पाण्यानें भरून दरवाजाच्या दोन्ही बाजूस, हरएक मंगलप्रसंगीं ठेवण्याची बंगाल्यांत चाल आहे तिला उद्देशून मूळ काव्यांत कवीनें तशी शब्दयोजना केली आहे. ४ श्रीरामा. ५ राक्षस.

विस्मयलों मी बघुनी शिबिरद्वारीं उभी जगन्माता
मूर्तिमती सुंदरता, मुग्ध जहाला जिला **शिव** ध्यातां २५
गुप्त जहाली न दिसे फिरुनी बघतां सतृष्ण नयनांहीं
गेली दर्शन देउनि सुचवुनि कीं आपणास भय नाहीं २६
दाशरथे श्रीरामा मन देउनि ही करी कथा श्रवण
नरपाळा देवाज्ञा पाळीं समरीं करील तो अवन " २७
" पूर्वकथास्मरणानें व्याकुळ होती **बिभीषणा** प्राण
होईना धीर मला धाडाया **लक्ष्मणा** रणीं जाण २८
पितृवचना पाळाया झालों मी सिद्ध जैं वना जाया
प्रियकर बांधव माझा आला मजमागुनी जशी छाया २९
नवयौवनराज्यश्री हर्षें सोडूनि यांवरी पाणी
सोडुनि माता कांता आला **लक्ष्मण** वनास अनवाणी ३०
रडली माय **सुमित्रा** दुःखानें **उर्मिला**[1] मनीं कढली
पडली शोकसमुद्रीं विरहभयीं सकलही प्रजा गढली ३१
" **लक्ष्मण** वना न नेसी नेसी माझे हिरावुनी प्राण
आण तुला पायांची प्राणाधिक **राघवा** तया जाण " ३२
वदली शद्ब **सुमित्रा** अजुनी त्यांचें असे मला स्मरण
विसरुनि काय तयांतें धाडूं अनुजा करावयास रण ३३
सुग्रीव रणविशारदें[2] **अंगदही वायुपुत्र नलनील**
यांचा पाड न लागे अनुज कसा राक्षसांस जिंकील ? ३४
आशेच्या भरुनि भरीं आलों **लंकेस** सागरा तरुनी
श्रीराम साश्रुनयनीं वदला जाऊं वनीं सख्या फिरुनी " ३५
वदली मधुर निनादें[3] सहसा आकाशसंभवा वाणी
" आणीं शंका न मनीं **श्रीरामा** होय संशयें हानि ! ३६

---

१ लक्ष्मणाची स्त्री. २ युद्धांत निपुण. ३ स्वरानें.

विश्वास देववचनीं अढळ असों दे चळों न दे बुद्धि
विश्वास तोच तारक त्याविण कार्यें न पावती सिद्धि " ३७
ती वाणी शोधाया **रघुपति** निजदृष्टि अंबरीं फेंकी
विस्मय पावे पाहुनि अहिसंगें संगरा करी केकी ! ३८
श्वास भयंकर फणिचे कर्कश केकीस्वनासवें मिळुनी
उद्भवला भैरव रव परिसुनि ज्या लोक चालले पळुनी ३९
विस्तृत पक्षच्छाया मेघासम आवरी नभा सकल
कालानलसम भडके विष झाली भीतिनें धरा विकल ४०
पडला मयूर खालीं भूमीवर होउनी गतासु जधीं
करुनी नाद भयंकर गर्जे विजयी फणींद्र फार तधीं ४१
" तो अर्थहीन नाहीं व्योमीं ज्या पाहिलेंस संग्रामा
सर्पशिखीयुद्धमिषें सूचित केलें भविष्य तुज **रामा** " ४२
परिसुनि **बिभीषणा**तें शिरला शिबिरांत शीघ्र **दाशरथी**
सजवी निजानुजातें देवास्त्रें घालुनी तनूवरती ४३
वक्षीं कवच चकाके कटिदेशीं रत्नखचित असि झळके
रविमंडल लाजविलें दीप्तीनें पृष्ठभागधृतफलकें ! ४४
पार्श्वीं फलकासंगें चमके तूणीर पूर्ण बाणांहीं
वामकरीं सुदृढ धरी इंद्रायुध साम्य ज्या दुजें नाहीं ४५
शोभे मुकुट शिरावर वाटे जणुं घडविलाच सौरेंकरीं
ऐसा सज्ज जहाला **सौमित्री** शूर जावया समरीं ४६
वेगें निघे तुरंगम शृंगध्वनि परिसतां जसा घोर
शिबिरांतूनि निघाला **लक्ष्मण** घेउनि **बिभीषणा** शूर ४७

---

१ सर्प आणि मयूर यांच्या युद्धांत मयूर मृत झाला हा दाखला देऊन असें सुचविलें कीं लक्ष्मण आणि इंद्रजित् यांचा जरी नाश्यनाशक भाव आहे तरी लक्ष्मण इंद्रजिताला युद्धांत मारील. २ तलवार. ३ भाता. ४ सूर्यकिरणांनीं.

वाजति मंगल वाद्यें सुरसुमनें वर्षिती महामानें
गेलें त्रिभुवन सारें कोंदुनि ' जयजय ' महानिनादानें ४८
रघुवीर लक्ष्मणाग्रज भक्तीनें गगनमंडलीं पाहे
त्रिनवी जगदंबेतें जोडुनि निज हस्तयुग्म ल्वलाहें ४९
" मी दीन दास माते ! आलों तुझिया पदांबुजीं **शरण**
तार मला, क्षम[१] असती नाशाया विनतताप तव **चरण** ५०
सद्धर्मा रक्षाया दुःखांतें सोशिलें अनेकां मी
दे त्याचें फल मातें संरक्षीं **लक्ष्मणास** संग्रामीं " ५१
तो स्तव **रघुनाथाचा** कैलासीं शद्बवाहकें[२] नेला
परिसुनि तथास्तु ह्मणुनी दे आशीर्वाद **अंबिका** त्याला ५२
आशा दुःखनिहंत्री उजळितसे जेंवि शून्य हृदयास
प्राची दिशेस उजळी सविता येउनि नभांत उदयास ५३
खगवर कूजिति कुंजीं गुंजारव करिति रम्य अलिवृंद[३]
फुलती किती प्रसूनें[४] ने त्यांचा वायु चोरुनी गंध ५४
" मित्रा ! **बिभीषणा** ! बा ! जा समरा सावधान चित्तानें
प्राण बहिश्चर[५] माझे अर्पियले तव करीं सख्या ! जाणे ५५
जगणें मरणें माझें आहे त्वदधीन सौख्यही सकल "
वदला **बिभीषणा**तें दुःखें **रघुवीर** होउनी विकल ५६
देवकुलप्रिय असली चिंता वाहूं नको मनीं वायां
समरा निघे **बिभीषण** आश्वासुनि यापरी ह्मणी राया ५७
लंकेकडे निघाला **लक्ष्मण** मित्रास घेउनी संगें
आवरिती[६] मेघ तयां कुज्झटिका[७] ज्यापरी अचलशृंगें[८] ५८
रक्षःकुलराजश्री रक्षःस्त्रीरूपिणी सती **कमला**

---

१ समर्थ. २ वायु. ३ भुंग्यांचा समुदाय. ४ फुलें. ५ बाहेर फिरणारे. ६ आच्छादिती. ७ धुकें. ८ पर्वतशिखरें.

होती जेथें तेथें गेली **माया** शुचिव्रता विमला ५९
पाहुनि तिज करुनि स्मित वदली वचना **हरिप्रिया पद्मा**
आलीस कासया तूं सांग मला देवि ! माझिया सद्मा ? ६०
" सखये ! नीलांबुसुते ! घे निजतेजास संवरोनि क्षणी
दारुण कालानलवत् सहन करावें तयास सांग कुणी ? ६१
देवाकृति **सौमित्री लंकानगरींत मेघनादास**
मारायास निघाला, दे तूं वरदान **इंदिरे** ! त्यास ६२
निश्वासुनी विषादें वदली तिजला **हरिप्रिया कमला**
" अवहेला कोण तुझी विश्वाराध्ये ! करील सांग मला ? ६३
हाय ! परी सकल कथा स्मरतां मच्चित्त फार हळहळतें !
सेवक **दशास्य** माझा परि त्याचें पूर्वकर्म त्या छळतें ६४
संवरितें निज तेजा देतें मी **लक्ष्मणा**स वर आतां
मारील संगरीं तो **घननादा** कासया वृथा चिंता " ६५
वदुनि असें **माये**सह **लंके**तें सोडुनी **रमा** गेली
हृतमणि फणिनी तैशी श्रीभ्रष्टा रम्य ती पुरी झाली ६६
सुकलें वन कदलीचें मंगलघट सर्व सत्वरीं फुटले
अटले जलसंचयही **लंके**चें भाग्यसूत्र कीं तुटलें ६७
प्राचीरावर चढुनी **सौमित्री** वीर हेरिला त्यांहीं
अनलोसह अनिल तसा शूर **बिभीषण** तयासवें जाई ६८
पाहुनि दूर मृगातें व्याघ्रें मारावया जसें जावें
न कळत **लक्ष्मण** तैसा वधण्यातें **रावणी**प्रती धांवें ६९
निश्वसुनी दुःखानें पुसुनी **मायेस इंदिरा** जाय
आणी नयनीं पाणी स्मरुनी निजभक्त पापधी राय ७०

---

१ रावण. २ नागीण. ३ आठराव्या आर्येवरील टीप पहावी. ४ अग्नि. ५ वायू. ६ निरोप घेऊन.

मायासाह्यें लक्ष्मण शिरला **लंकापुरींत** लवलाहे
द्वारातें उघडी तों पुढती अरिसैन्यभार तो पाहे ७१
मायावरें परी ती रायाची अंध जाहली सेना
लक्ष्मण बिभीषणांची जोडी ह्मणुनी दिसे न त्या कोणा ! ७२
हेमगृहें उद्यानें जलसंचय देवमंदिरें नाना
पाहुनि गजाश्वशाला क्षण **लक्ष्मण** जाय विसरुनी भाना ७३
कवण शके वर्णाया **लंका** ती विभवशालिनी नगरी
तीच्या ऐश्वर्याचा करिते हेवा सदैव देवपुरी ७४
शिरुनी नगरीं पाहे **दशवदनाचें** सुवर्णमय सदन
तैसें विशाल सुंदर रक्षःप्रासाद चुंबिती गगन ७५
बोले सविस्मयें मग **लक्ष्मण लंकापुरीस** पाहून
मित्रा ! **बिभीषणा** ! तव अग्रज बहु धन्य येथ राहून ७६
वदला वचन **बिभीषण** मित्रा ! मद्बंधु खचित रे ! धन्य !
ऐशा ऐश्वर्याचा त्याविण भोक्ता न जन्मला अन्य ! ७७
परि हें वैभव सारें दोन दिसांचें अखेर जायाचें !
सागरतरंग जैसे क्षणजीवी स्थैर्य त्यापरी त्याचें ७८
बा ! मित्रा ! **सौमित्रे !** स्वीकृत कार्यास साध चाल ह्मणी
संपादीं अमरत्वा शूरा नाशूनि **मेघनाद** रणीं ७९
जातां जातां दिसलें त्यातें सन्निध निकुंभिलासदन
होता तेथें बसला एकांतीं **इन्द्रजित्** अधोवदन ८०
बसुनी कुशासनावर पूजी तो इष्ट देवता भावें
पूजेचीं उपकरणें बहुविध त्यांचीं किती कथूं नांवें ! ८१
शिरला यज्ञागारीं **लक्ष्मण मायेचिया** प्रसादानें

---

१ लौकर. २ वडील भाऊ रावण. ३ थोडा वेळ टिकणार. ४ निकुंभिला नांवाचा यज्ञ करण्याचें ठिकाण.

असि झणझणे पिधानीं कांपे गृह सर्व पदनिनादानें ८२
दचकुनि उठुनी उघडी निजनयना **मेघनाद** ल्वलाहें
सूर्यासम तेजस्वी देवाकृति वीर तों पुढें पाहे ८३
वदला जोडुनि करयुग **रावणसुत मेघनाद** नतवदन
देवा ! **विभावसो** ! त्वां केलें येउनि पवित्र मम सदन ८४
पूजा सफल जहाली आज मनीं धन्यता मला वाटे
परि रिपु**लक्ष्मण**रूपा कां धरिलें गूढ हें मला मोठें ! ८५
" नच मी **विभावसू** रे ! **लक्ष्मण** मी **रघुकुलांत** मज्जनन
निरखुनि बघ तूं मातें आलों तव मी करावया हनन " ८६
कांपे हृदय थरारा मार्गीं पन्नगें बघूनि पथिकाचें
पाहुनि **सौमित्री**तें गडबडला **रावणी** मनीं कोंचे ८७
ग्रासी राहु रवीतें, टाकी शोषूनि ग्रीष्म जलधीला;
तैसें अपूर्व झालें आश्चर्यीं मग्न **रावणी** झाला. ८८
रक्षोराजपुरीं या कवण मिषें सांग आज शिरलास
रामानुज असती जर, माझें सामर्थ्य का विसरलास ८९
रक्षिति नगरद्वारा राक्षस संतत असंख्य असिपाणि
उच्च तटावर फिरती योद्धे कैसें न देखिलें त्यांनीं ? ९०
मानवकुलसंभव तूं काय तुझा राक्षसांपुढें पाड
चाड जरी प्राणांची येथुनि तूं पाय आपुला काढ ९१
वैश्वानरा प्रभो या दासावर सुप्रसन्न तूं होईं
मग मी वधुनी **रामा** आणिन बांधुनि **बिभीषण** द्रोही ९२
परिसुनि **घननादाचें सौमित्री** वचन बोलला त्याला
आलों कृतांत तुज मी माराया पुण्यलोप तव झाला ९३
देवादेशें करितों नीचा ! तुजला रणास आव्हान

१ आच्छादन, म्यान. २ अग्नि. ३ साप. ४ भ्याला.

मदमत्त फार होसी समरीं संहारितों तुझे प्राण ९४
बोलुनि असें बली तो काढी सत्वर करालें करवालें
वज्रें **वासव** तैसा शोभे **सौमित्रि** केसरीबाल ९५
" सत्य जरी **लक्ष्मण** तूं समरेच्छा मी तुझी करीन पुरी
हा **इन्द्रजित्** सदोदित उत्सुक झगडावया बघूनि अरी ९६
निःशस्त्रा मारावें कोठेंही रथिकुलप्रैथा नाहीं
क्षत्रिय तूं तुज ठावें येतों मी सज्ज होउनी पाहीं " ९७
राक्षस तूं तुजसंगें पाळाया क्षात्रधर्म नच काज
साधेल त्या प्रयत्नें वध करितों पामरा तुझा आज " ९८
मेघासम गर्जुनिया बोले **सौमित्रि** तेधवा त्याशीं
सोडील व्याध कसा व्याघ्रातें गवसला जरी पाशीं ९९
वदला **वासवजेता** " निर्लज्जा **लक्ष्मणा** कुलांगारा
परिसुनि नाम तुझें रे ! क्षत्रियगण अवगणील तुज सारा १००
चोर जसा शिरतो रे ! तैसा शिरलास माझिया सदनीं
रे क्रूर काळसर्पा ! गरुडाच्या अडकलास तूं वदनीं " १०१
बोलुनि **घननाद्** असें क्रोधें **लक्ष्मण**शिरीं गदा हाणी
झंझावातें तरुवर तैसा खालीं पडे धनुःपाणि १०२
मूर्च्छित **लक्ष्मण** होतां हांसे जों **मेघनाद**, लवलाहें
निजतातबांधवातें द्वारीं भीषण **बिभीषणा** पाहे १०३
" आतां कळलें मजला **लक्ष्मण** कैसा पुरींत या आला
हें काय योग्य काका ! तूह्मांतें, घातिला तुह्मीं घाला १०४
चोरा निजसदनाचा मार्ग तुह्मीं दाविलात निःशंक
बैसविला आणुनिया सन्मानें नृपपदावरी रंक १०५
गुरुजन तुह्मीं तुह्मांतें लावावा दोष हें नसे उचित

---

१ तीक्ष्ण. २ तलवार. ३ शूरांची रीति.

जाऊं द्या, रण करुनी मारीन नराधमास मी खचित " १०६
बोले तदा **बिभीषण** परिसुनि **घननाद**वचन कानांहीं
रामाचा किंकर मी करणें तव साह्य योग्य बा ! नाहीं १०७
" काका ! वचन विचारी तुमचें नच हें मला श्रवण करवे
रामाचा दास असें ह्मणण्याहुनि वाटतें मरण बरवें १०८
जो स्थापिला ललाटीं **स्थाणूंच्या** चंद्रमा विधात्यानें
हाय ! कसें योग्य दिसे पडणें धूलींत सर्वदा त्यानें ! १०९
मानससरोवरीं जो फिरतो स्वच्छंद हंस, साचोर
त्यास रुचे काय कधीं चुकुनीही पंकपूर्ण कासार ? ११०
पाहुनि शृगाल त्याशीं काय करी केसरी कधीं स्नेह ?
तो क्षुद्रजीव **राघव** अपोत्रा काय हा तया देह ? १११
न कळे काका ! कैसा होई तूह्मांस सह्य अवमान !
त्या **राघवा**पुढें हो वांकवितां आपुली कशी मान ? " ११२
सामर्थ्यें मंत्राच्या होय फणी मूढ त्यापरी झालां
लज्जेनेंच **बिभीषण** प्रत्युत्तर यापरी करी त्याला ११३
माझा दोष न तिळही देसी दूषण मला वृथा हाय !
आपण बुडून बुडवी **लंके**तें पापकर्मपर रॉय ११४
व्हावें रक्षण माझें **राम**पदाश्रय ह्मणूनि म्यां केला
तारक तो दासाच्या ओ दे प्रेमें सदैव हांकेला ११५
जीमूतेन्द्रनिशीथीं शद्ब करी अंबरीं जसा घोर
वदला **बिभीषणा**तें तारस्वें क्रुद्ध **रावणी** शूर ११६
" हे **रावणा**नुजा ! तूं जर असती ख्यात धर्मपथगामी
ज्ञातित्वा भ्रातृत्वा सोडुनि झालास केंवि नत **रामीं** ११७

---

१ शंकराच्या. २ खरांखर. ३ चिखलाने भरलेलें डबकें. ४ कोल्हा. ५ सिंह.
६ साप. ७ रावण. ८ मेघ. ९ अर्धरात्रीं. १० आकाशांत. ११ उंच स्वरानें.

गुणहीन स्वजन असो, परजन झाला जरी सुगुणपूर्ण
गुणहीन स्वजन बरा पर तो पर त्याज्य तो बुधें तूर्ण ११८
विबुधाज्ञा[2] असुनि अशी सोडुनि रक्षोवरा दिली नीति
कैशी त्वां दुर्बुद्धे ! किंवा तुज कोठुनी अनयभीति " ११९
संलब्धसंज्ञ[3] **लक्ष्मण मायायत्नें**, पुन्हा धनू ओढी
खरतरशरें अरीतें विंधुनि भूमीवरी त्वरें पाडी १२०
वर्षाकालीं जैशा भूधरदेहांतुनी[4] पयोधारा[5]
तैशा **घननादा**च्या रुधिराच्या, सद्य हो न त्या मारा १२१
पडतां धरणीवर तो विव्हल रक्तार्क्तदेह[6] बाणांहीं
क्रोधें अरिवरि फेंकी उपकरणें भान त्या नुरे कांहीं १२२
सुप्तसुता[7] माय जशी मशकांपासूनि सर्वदा वारी
तैशी **माया**देवी पसरुनि बाहूंस **लक्ष्मणा** तारी १२३
पाहुनि पुढें प्रहारक त्याजवरी केसरी जसा धांवे
सौमित्रीवर तैसा **रावण**सुत कोप ना मनीं मावे १२४
सारें धैर्य गळालें झाला आश्चर्यमग्न शूरवर
बघतां सभोंवतालीं महिषारुढ शूलपाणि दंडधर १२५
मायेच्या मायेनें झाला **घननाद** तो कलाहीन[8]
राहुग्रासें शशधर[9] अथवा मंत्रें जसा फणी दीन १२६
टाकुनि धनु काढुनि असि **रामानुज रावणी**प्रती ताडी
खड्गाघातें तरुवर तैसा निमिषांत खालतीं पाडी १२७
वसुधा थरथर कांपे सिंधूचें नीर खवळुनी उठलें !
सहसा भरून गेलें घोर रवें विश्व वातही सुटले ! १२८
झाले भयभीत मनीं जन सारे स्वर्गमृत्युपातालीं

---

१ लौकर. २ विद्वानांची आज्ञा. ३ शुद्धीवर आलेला. ४ पर्वत. ५ पाण्याच्या धारा. ६ रक्तानें माखलेलें शरीर. ७ निजलेल्या ८ निस्तेज ९ चंद्र.

दशमुखशीर्षा जो दे शोभा तो कनकमुकुट ये खालीं १२९
लंकेशें शंकाहत होउनि केलें मनीं **शिवस्मरण**
प्रमिलेचा वामेतर नेत्र करी अशुभसूचक स्फुरण १३०
एकाएकीं पावे मूर्च्छा **मंदोदरी** महाराणी
हाहाःकार उडाला ये कानीं दुःखदायिनी वाणी १३१
" धिःकार तुज असो तूं वीरकुला लाविला कलंक खरा
अन्यायसमर करणें वीरा हा **लक्ष्मणा** न मार्ग बरा १३२
रावणनंदन मी मज भीती वाटे न अल्प मरणाची
मरतों तुझिया हातें हेंच परी शल्य मन्मना जाची १३३
मन्मरणाची वार्ता परिसुनि **लंकेश** खवळतां फार
रे ! पामरा ! तयाचा कोपानल का तुला सहवणार ? १३४
गिरिगर्भीं घोर वनीं सागरसलिलीं कुठेंहि दडलास
शोधुनि काढुनि तूतें नीचा ! मारील मत्पिता खास " १३५
वदुनि असें पितरांच्या चरणस्मरणास **मेघनाद** करी
रमणीय **प्रमिले**तें स्मरुनि बुडाला क्षणैक शोकसरीं १३६
होउनि निस्तेज झणी **लंका**बालार्क[1] जाय अस्ताला
मृत **मेघनाद** पाहुनि दुःख जहालें मनीं समस्तांला १३७
" वत्सा ! ऊठ असा कां धरणीवर पहुडसी गतप्राण
उचित न तुज ही शय्या वीरातें योग्य हें नसे स्थान ! १३८
पाहुनि तुझी अवस्था **दशमुख** हो शोकसागरीं मग्न
होतिल तव चिरविरहें **प्रमिला**शा सकल नंदना भग्न ! १३९
हे शंखनाद होती गज गर्जति अश्व हेषिती[2] नाना
करिती आव्हान तुला समरातें सज्ज जाहल्या सेना १४०
रक्षःकुलावतंसा[3] ऊठ झणीं सोडितों तुझी वाट

१ सूर्य. २ खिंकाळती. ३ राक्षसकुलभूषणा.

अस्त्रालयांत जाउनि समरोचित ये करूनिया थाट" १४१
इंद्रजिता मृत पाहुनि शूर **बिभीषण** करी विलापाला
पाहुनि मित्रवरातें दुःखी **सौमित्रि** सांत्ववी त्याला १४२
शोक पुरे कर मित्रा ! विधिनियमें मरण पातलें त्याला
नाहीं अपराध तुझा, **लक्ष्मण** वदता **बिभीषणा** झाला १४३
वाजति मंगल वाद्यें सत्वर जाऊं **बिभीषणा** आतां
सौमित्री वदुनि असें गेला **श्रीराम** ज्या स्थलीं होता १४४
रामपदांबुज नमुनी वदला **लक्ष्मण** तयास नतभावें
तुझिया वरप्रसादें दास तुझा हा रणांत जय पावे १४५
आलिंगुनि शिर चुंबुनि अनुजाचें **राम** बोलिला त्यातें
बंधो ! बाहुबलें तव **वैदेही** फिरुनि लाधली मातें १४६
तूं धन्य वीरवंशीं माय **सुमित्रा** सुवीरसू धन्या
धन्य पिता, धन्य तुझा अग्रज हा जन्मभू तुझी धन्या १४७
राहिल यश तव चिर परि बलदात्या ईश्वरा नको विसरूं
दुर्बल मानव आपण देवदयेनेंच भवनदी उतरूं १४८
" असती **बिभीषणा** तूं स्नेहाची हर्षवर्धिनी मूर्ति
केलें आम्हांस ऋणी राहिल शाश्वत जगीं तुझी कीर्ति १४९
आतां त्रिवर्ग पूजूं **दुर्गा** देवी नसे दुजा काम[1]
ऐसें **बिभीषणातें** हर्षभरें बोलला तदा **राम** १५०
वर्षति सुर सुमनांतें ' जयजय **रघुवीर** ' गर्जली सेना
झाली जागी **लंका** भीतीनें घोर नाद सहवेना १५१
' वध ' हा सर्ग सहावा रचिला **मधुसूदनें** सुकविरत्नें
वंगीं, रूप **मराठी** त्यास दिलें **माधवानुजें** यत्नें १५२

माधवानुज.

---

१ इच्छा.

ऋतुसौंदर्य.*

शिशिरर्तु.

श्लोक.

वाटे जो रमणीय फार पिकल्या साळींचिया कांतिनें,–
कोठें तेंवि तरूवरी बसलिया क्रौंचांचिया गायनें;
ज्यांची कां तरुणीस आवड बहू; जो चेतवी मन्मथा;
कांते ! या **शिशिराख्य** रम्य ऋतुची संपूर्ण ऐकें कथा– १

मोठा प्रज्वलिताग्नि, तेंवि रविची दैदीप्यकांती महा
तैशीं माजघरें निरोधवियलीं ज्यांचीं गवाक्षें पहा,
उन्मत्ता तरुणी, तशीं मृदुलशीं ऊर्णांबरें घट्ट तीं,
लोकांच्या बहु सेवनीं प्रियतमे ! येती पहा संप्रती. २

इंदुच्या किरणापरी अति शीत चंदन चर्चणें,
शुभ्र तें शरदिंदुनिर्मल सौधभूतल सेवणें,
त्यापरीच हिमें सुशीतल मंद मारुत संप्रती–
हीं न रंजविती मुळींच जनांचिया हृदयाप्रती. ३

आधीं जी सांद्र ऐसें दहिवर पडुनी थंड अत्यंत झाली,
कांतीनें चंद्रिकेच्या पुनरपि वरतीं शीतता जीस आली,
साजे जी तारकांच्या परम धवलशा भूषणीं चित्रकांती,
ती आतां शीत रात्री जन नच बहुधा सुंदरी ! आदरीती. ४

ज्यांच्या वक्त्रांबुजींचे सुखकर मदिरागंध ते लोभवीती;
घेती ज्या पुष्पमाला विविध, रुचिरसे लेप, तांबूल हातीं;

---

* गेल्या वर्षात चार ऋतूंचें वर्णन आलेलें असून या अंकात शिशिरर्तूचें वर्णन दिलें आहे.

औत्सुक्यें कामिनी त्या, झडकरि शिरती त्या स्वशय्यागृहांत;—
धूपें कृष्णागरूचा परिमळ सगळा कोंदलाहे जयांत. ५

झाले फार कृतापराध ह्मणुनी अत्यंत निर्भर्त्सिले,—
त्यानें कंपित होउनी, बहु भयें भ्रांतिष्ट जे जाहले;
ऐशा त्या सुरताभिलाषिरमणा वक्रेक्षणें पाहुनी,
झालेले अपराधही विसरती उन्मत्त त्या कामिनी. ६

होउनी विवश स्वयें मदनार्त त्या तरुणप्रियें,
भोगिल्या चिरकाल दीर्घ निशीमधें अतिनिर्दयें;
त्यामुळें विरमोनिया तरुणांगना हृदयीं अती,
संप्रती अरुणोदयीं श्रमुनी हळू हळु चालती. ७

कंचुकी दृढ रम्य लेवुनि— जीमुळें स्तन भागले,—
भर्जरी कसुनी सुरंग दुकूल— जें हृदयीं खुले,—
घाछुनी कुसुमें शिरीं, नटुनी मनोरम योषिता,
काय या **शिशिरास** भूषवितात सांप्रत तत्त्वतां. ८

ज्या स्तनीं सुखसेव्यशी नवयौवनप्रबलोष्णता,
तेंवि ती विलसे मनोहर लिप्तकेशरगौरता,
ऐशिया तरुणींचिया हृदयांगमर्दनसंगमें—
शीत सर्वहि जिंकुनी, निजतात कामुक संभ्रमें. ९

कर्णींचीं कमलें सुगंधिवदनश्वासें जिच्या कांपती,
त्या संतुष्ट विलासिनी सुवदना कांतासवें संप्रती—
जी भारी सुरतास चेतवितसे, दे मोह चित्ताप्रती,
ती उन्मादक लोभनीय मदिरा रात्रीं मुदें प्राशिती. १०

जातां सर्व मदानुराग विरुनी मुग्धा प्रभातीं कुणी,—
जीचें घट्ट कुचाग्र तें दडपुनी झालें प्रियालिंगनीं,—

कांतानें उपभोगिल्या स्वतनुला ती पाहुनी, लौकरी–
शय्या टाकुनि, मंद हांसत शिरे गेहीं दुज्या सुंदरी ! ११

ज्यांचीं आकुंचिताग्रें कुटिल, गळति त्या जेथुनी पुष्पमाला,
धूपें कृष्णागरूचा परम विखरला गंध जीच्या कचांला;
साजे जीचा सुमध्य प्रतनु; पृथुलशी गे ! नितंबप्रभा ती;
कोणी पर्यंकशय्या त्यजिति सुरुचिरा कामिनी त्या प्रभातीं. १२

तत्काळ क्षालनें यद्वदन खुलतसे हेमराजीवकांती;
जीच्या आकर्ण नेत्रीं मधुनि झळकते श्वेतरक्तप्रभा ती;
स्कंधीं ते केश जीच्या रुळति कुटिलसे; सुंदरी त्या प्रभातीं–
कांते ! लक्ष्मीपरी या विलसति बसुनी मंदिरीं पैं निवांतीं. १३

भारकष्टित ओटिनेंचि कटींत किंचित वांकल्या;
होउनी स्तनभारखिन्न पहा हळू हळु चालल्या;
रात्रिचा त्यजुनी झणीं रतिवेष सुंदर, संप्रती--
या कुणी तरुणी अशा दिनवेष मोहक सेविती. १४

कोणी कांतनखव्रणान्वित अशा स्वीयस्तनाग्राप्रती--
पाहाती, मृदुपल्लवाधरिंचिया दंतव्रणा स्पर्शिती,
शृंगारेष्ट मनोरथीं युवति त्या संतोषुनी अंतरीं,
हर्षें भूषविती मुखांबुज तदा सूर्योदयीं सत्वरीं. १५

ज्यामध्यें शर्करादि प्रचुर गुडसिता, रम्य शालीक्षुदंड;
उत्कर्षें संगलीला प्रबळ घडतसे; कामदर्प प्रचंड;
जो कामव्याप्त ऐशा प्रियरहित जना तापहेतूच सत्य;
देवो कांते ! तुह्मांला **शिशिर**समय हा पूर्ण मांगल्य नित्य. १६

काव्य **श्रीकालिदासें** विरचित **ऋतुसंहार** रम्य प्रसिद्ध;
तट्टीकेचा मराठी विबुधजनमनोरंजना श्लोकबद्ध--

विद्वद्विख्यातसिंदेकुलजनित नत **श्रीनिवासें** प्रमोदें--
ऐका हो ! गुंफियेला **शिशिर**समय हा सर्ग त्या श्रीप्रसादें. १७

---------- श्रीनिवास नारायण शिंदे.

संपादकास आलेलें पत्र.

गेल्या सालच्या मार्च महिन्यांत मराठीकविमंडळीचें एक लहानसें संमेलन जळगांव येथें भरलें होतें. त्या वेळीं संपादकाकडून सर्व कविमंडळीस आमंत्रणें गेलीं होतीं. यावेळीं कांहीं कारणानें रा. सा. आगाशे यांचें येणें झालें नाहीं. त्याबद्दल संपादकास त्याणीं एक पत्र पाठविलें तें पत्र खालीं दिलें आहे.

सा. न. वि. वि. आपलें ता. ११ चें पत्र पोंचलें मजकूर समजला, त्यास

श्लोक.

प्रकृती न बरी ह्मणूनि येणें । न घडे, उत्तर अन्यथा न देणें
मज खंति गमे, परी उपाय । न चले, केंवि करूं तुह्मां सहाय्य १
मनिं चिंतियलें असें तुह्मी जें । "कविसंमेलन" त्यास मी न साजे
अकवीस मला निमंत्रिलेंत । तुमचा हा मजठायिं पक्षपात २
"ट"स जुळतो कसा तरी "ट" । कवि तो मानिति **रामदास** "धीट"
"यमक्या" गणिलेंहि **वामनाला** । कवि व्हाया मज हाव ती कशाला ? ३
प्रतिभा स्फुरते न अंतरंगीं । नच बुद्धी अपरोक्ष मार्ग लंघी
नच निर्मि नवीन रम्यसृष्टी । दिधली ती विधिनें न दिव्यदृष्टी ४
न फुटे हृदयीं कधीं उमाळा । बघतां दुष्कृति जीव हो न गोळा
फुटती न अपाप शद्ब वाचे । बघतां कौतुक भूतलीं हरीचें ५
पडतें श्रवणीं न मंजुगीत । भरुनी जें उरलें असें क्षितींत
मन आत्मिक सौख्य तें न चाखी । जागिं "आनंदघना" न जें विलोकी ६

गतकालिक--वृत्त तें यथार्थ । पटु--वाक्चित्रपटीं करूनि मूर्त
हरि काल--कृतांतरा असें तें । नच आलेखनयुक्ति लेखनीतें ७
पुढतीं घडणार काय तेंही । अनुमानें वदण्यास शक्ति नाहीं
मन रंजविण्यास वाक्प्रसाद । नसतां, केंवि घडेल धन्यवाद ? ८
भवभूति कवी नगापगांतें । रडवी, बोलवि दंडकावनातें
अनुभाव तदीय त्यासि ठावा । मजला तो उपलब्ध केविं व्हावा ९
विहगां, कुसुमांसि भाग्यशाली । वदवीती कवि **बर्न्स--कीट्स--शेली**
कवि सृष्टिगतेंगितासि जाणें । कविचें स्वान्त न काय गूढ नेणें ? १०
कवि तो सुकृती मनासि वेधी । मनुजाभ्यंतरवृत्त जो निवेदी
ह्मणुनी कविमंडलावतंसा । भजती **शेक्स्पियरास कालिदासा** ११
तमसा, सरला, प्रियंवदा । अनसूया कवणासि वा कदा ?
हरिती न ? निसर्गसत्यता । हृदया आकळिं, हीच धन्यता १२
न जपें, न तपें, न वा श्रमानें । मिळते अध्ययनें, न वा धनानें !
हरिचाचि खरा महाप्रसाद । कविता--शक्ति गमे निसर्ग--सिद्ध १३
दिधली कविशक्ति ही जयाला । हरिनें, तो न गणी परिस्थितीला
सहज प्रकृतीच गोड गावें । इहलोकीं जंव, त्या जनें जगावें १४
कविमानस मारितें भरारी । क्षणमात्रीं त्रिदिवांत गूढचारी
अतला सुतलास भेदि वेगें । गगना आक्रमि शीघ्र एक वेंघे १५
कविच्या कृतिला नसेचि तोल । इहलोकीं न तयेस योग्य मोल
' ट ट टे ति ' मृदुंग काढि बोल । प्रतिभेवाचुनि सर्व अन्य फोल १६
कवि कोण जगीं धनाढ्य झाला ? । न सपत्नी खपते सरस्वतीला
अनुराग अनन्यभावनेनें । करि, त्या सेविल ती अनन्यतेनें १७
निपजेल महाकवी न मोलें । सहजस्फूर्तिविणें न शीर्ष डोले
खर अश्व न होय पोशिल्याही । गति जातीविण अन्य येथ नाहीं १८
पढतां कवितोपयोगि छंद । रचितां येति नवीन पद्यबंध

परि छंद गणीति देह मात्र, । रस आत्मा, प्रणयासि तोच पात्र १९
रस तो निपजेल केविं, ठावें । कविला मात्र, तयासि तें पुसावें
रचण्या शिकवीत पद्यमाला । कविकर्मा न सजोत शिल्पशाला २०
न महाकवि कां ह्मणून झाले । पुसतां, नित्य मनांत गूढ खेळे !
खडकावरि झाड कां न यावें ! । कवठाला मधुरत्व कां नसावें ? २१
फलदा फल दे, न ऊषर । ह्मणती बीज तसाचि अंकुर
प्रतिभा न दिली परेश्वरें । मनुजा तेथ न दूष्यता उरे २२
प्रतिशतकिं न होतसे **शिवाजी** । दरपिढिला न जवान--मर्द **बाजी**
बहुजन कविच्या महापदास । चढले परि एक **कालिदास** २३
असल्यास मनःप्रसन्नता ती । असतां ज्ञान, तशी दृढानुरक्ती
स्फुरतां प्रतिभास्फुलिंग चित्तीं । कविताज्योति अपाप घेइ दीप्ती २४
टिळकादि कवींस मी प्रणाम । करुनी वांछि तयांसि पूर्णकाम
कविताभिरुची जनांत वाढे । तरिही होइल कार्य तें न थोडें २५
यमकादिक शृंखला पदींच्या । प्रतिबंधा करिती तदुन्नतीच्या
निगडासि तया सबंध तोडा । प्रगतीच्या मग सद्यशासि जोडा २६

कळावें, लोभ करावा हे विनंती.

गिरगांव ब्याकरोड मुंबई

ता. २७।२।०७ ——— गणेश जनार्दन आगाशे बी. ए.

नववर्षाची भेट.

पुढील कविता एका गतभर्तृकेनें आपल्या भगिनीला "नववर्षाची" भेट ह्मणून पाठविली; तिलाच सार्वजनिक स्वरूप द्यावयाचें ह्मटल्यास, दुर्दैवी भारतीनें सांप्रतच्या स्थितींत ब्रिटानियेस पाठविली, अशी कल्पना कां करूं नये ?

पद.

चाल—(स्फटिकांचे ते०)

परमप्रिय मम जिवलग मैत्रिण, । विमल प्रेमाची तूं खाण ! धृ०
जीवितपथ तव योगें खडतर । क्रमावया बल ये अनिवार ! १
गढतां सखये दुःख--तमांत, । धीर देइ तव उज्ज्वल हात !
दृष्टी जातां जशी मनुजाची, । होते यष्टी स्नेही तयाची ! २
त्यापरि लपतां प्रेमरवी मम, । धवल चंद्रिका हरावया तम
उगवलीस तूं ईशेच्छेनें । प्रीति, शांति, शुभ घेउनि चिन्हें ३
माता, भगिनी, मैत्रिण माझी, । तूंची सगळें जगतामाजी !
क्लेशान्वित मम मार्ग असावा, । परि तव ठायीं होइ विसावा ! ४
वर्ष तुला नव सौख्यद होउन, । कायिक, वाचिक, मानसिक धन
ईशदयें तव वृद्धिंगत हो, । त्यांतचि माझें अभीष्ट राहो ! ५
सखये ! मजसम हतभागिनीनें । अन्य काय तुज द्यावें लेणें ?
भक्तिभाव त्या परमेशाला । ज्यास्तव दिधला म्यां मोबदला, ६
तें सद्धेतूचें हें लेणें । तुच्छ ज्यांपुढें वस्त्राभरणें !--
अर्पी तुजला, स्वीकारीं तें, । लिहुनि इतुकें मी संपवितें ! ! ७

[ओंवी]

अखिल सृष्टीचा नियंता,
सर्वाभूतीं जयाची समता,
तो आपणांमधील ममता
पदोपदीं वाढवो ! ८

———राजहंस ऊर्फ एंजिनियर वावीकर.

काव्यरत्नावलि.

अंक २ रा.

मेघनादवधकाव्य.

सर्ग ७ वा.

प्रमिला शिवदर्शनास जाते. **शिवपार्वती**संवाद. **शिवदूत** भद्ररथ **रावणास इंद्रजित्** मेल्याची वार्ता सांगतो. **रावणाची** युद्धास तयारी. **रामबिभीषणांचा** संवाद; **राम** स्वसैनिकांस युद्धास आव्हान करतो. **लक्ष्मीचें इंद्राकडे** जाणें व **लक्ष्मणास** त्याचें साह्य मागणें; **मंदोदरीचा** पुत्रशोक. **रावणा**कडून तिचें सांत्वन. **रामरावणाचा** संग्राम होणार ह्मणून पृथिवीस भीति व तिचें **श्रीविष्णू**कडे गमन. **श्रीविष्णू** देवतेज हरण करण्यास गरुडास आज्ञा करितो. **रावण** व **षडानन** यांचा संवाद. **षडानना**बद्दल **पार्वतीस** काळजी वाटते. **पार्वती** दूतीकडून **षडाननास** समरविन्मुख होण्यास सांगते. **इंद्राचें** व **रावणाचें** युद्ध. **इंद्राचें** तेजोहरण. **रावण** व वानरसेना यांचा सामना. **लक्ष्मण** शक्ति लागून मृतप्राय पडतो. **पार्वती लक्ष्मण**देह रक्षण करावा अशी **शिवास** प्रार्थना करते. **शिव रावणास** युद्ध बंद करण्यास सांगतो. **रावणास** जयप्राप्ति. देव स्वर्गास जातात.

आर्या.

गेली रात्र लयाला, उदयनगीं उगवला पुन्हा तरणि[1]
हर्षभरें हांसतसे नवविकसितकुसुमशोभिनी धरणी. १

[1] सूर्य.

वाजति मंगलवाद्यें, मधुर जशीं उत्सवीं सुरागारीं;
कुंजीं मारुतलहरी अविरत करिती स्वना मनोहारि. २
आदित्योदय होतां, नवनलिनी पावली विकास जलीं;
सूर्यमुखी फुल्लदलीं भेटायातें दिवाकरा सजली. ३
कुसुम जसें हिमनिकरीं निज तनुतें त्यापरी जलीं न्हाणी,
लावुनि तैल सुवासिक; घाली **प्रमिला** मनोहरा वेणी. ४
शोभे शशांकरेखा मेघसमूहीं जशी शरत्कालीं,
नवमुक्ताफलमाला शोभतसे कुंतलीं लसत्भौलीं. ५
स्वकरीं कंकण ल्याली, कंठीं रमणीय हार ती घाली;
कंकणहारभरानें व्यथिता कोमलकलेवरा झाली. ६
होउनि विस्मित बोले **प्रमिला**, " सखये तनूस आभरणीं–
कां त्रास सांग होतो ? रुदनध्वनि हा कुठूनि ये श्रवणीं ? ७
सखये ! स्फुरतो कां हा वामेतरें नेत्र आज हें न कळे,
येणार काय संकट; हृदयीं येतां विचार धीर गळे. ८
चल सत्वर वासंती भेटाया यज्ञमंदिरीं नाथा;
" जाऊं नका रणातें " प्रार्थू ठेऊनि तत्पदीं माथा. " ९
बोलुनि असें सखीतें, **प्रमिला** भयकातरा उगी राहे;
' रुदनस्वर वाढतसे ऐक ' असें तत्सखी तिला बाहे. १०
" गेला भरूनि सारा पथ, विस्तृत रथरथीगजाश्वांहीं
जाणें यज्ञागारीं सुलभ न सीमंतिनी, वृथा घाई. " ११
स्वसुतावनार्थ जेथें पूजित **मंदोदरी हरा** होती,
वदुनि असें, मग दोघी तेथें चिंतातुरा त्वरें जाती. १२
बसला विषण्ण चित्तीं **त्र्यंबक**, कैलास शून्यसा दिसला

---

१ देवमंदिरीं. २ सूर्यफूल. ३ तेजःपुंज. ४ उजवा. ५ प्रमिलेची सखी. ६ सुंदर स्त्रिये [जिचा भांग चांगला आहे अशी.]

निश्वासुनी विषादें पाहे **दुर्गे**कडे जणो ! रुसला ! १३
" झाले पूर्ण मनोरथ तव, पावे वीर **रावणी** मरण;
जाउनि यज्ञागारीं मारी **लक्ष्मण** तया करूनि रण. १४
विधुमुखि ! काय कथूं तुज, माझा तो परम गे ! सखे ! दास;
संग्रामीं मृत झाला पाहुनि मन्मन वरी सुखेदास. १५
मत्करधृतशूलाहुनि गुरुतर आघात पुत्रशोकाचा,
दे वेदना निरंतर कालहि शमवी न वेग गे त्याचा. १६
काय करील बिचारा **रावण** पडतांच वृत्त हें कानीं,
मानी मरूनि जाइल सत्वर; दारुण खरीच सुतहानि. १७
ठावें मज हें सारें, परि म्यां निजतेज ना दिलें त्यास;
वासव तवानुरोधें तोषविला निज उपेक्षिला दास. १८
अनुमति देईं आतां, द्याया संतोष **रावणास** ह्मणी; "
कात्यायनी शिवातें उत्तर दे परिसुनी वच श्रवणीं. १९
जैसें वाटेल मना, तैसें आतां करा **विरूपाक्षा** !
शक्रेच्छा पुरवावी, पुरली मम सफल जाहली भिक्षा. २०
श्रीराम भक्त माझा, नाथा ! याचें असो तुह्मां स्मरण;
काय कथूं याहुनि मी असती सर्वज्ञ पूज्य हे चरण. २१
हांसूनि **वीरभद्र**स्मरण करी **धूर्जटी** स्वकीय मनीं,
प्रकटुनि इच्छामात्रें भद्ररथी तोषवी **हरा** नमनीं २२
शूली[३] वदे तयाला " वत्सा ! विगतासु **इंद्रजित्** झाला,
मारी यज्ञागारीं **सौमित्री पार्वती**वरें त्याला. २३
भयभीत दूत सारे वार्ता ही **रावणा** निवेदाया,
लक्ष्मणशरहत कैसा **रावण**सुत त्यां न ही कळे माया. २४
जाउनि वत्सा ! सत्वर **लंके**तें असुरदूतवेष धरीं,

---

१ पार्वती. २ शिवाचा दूत. ३ शिव.

रे ! भैद्र ! मदाज्ञेनें रावणदेहांत रुद्रतेज़ भरीं " २५
उठला आकाशपथें गेला लंकापुरीस शिवदूत,
तद्भीमाकृति पाहुनि नमिती खेचरें तयास भयभीत. २६
शिवसेवकसौंदर्यें दिपला तेजोविहीन होय रवि;
इंदु जसा निष्प्रभ हो[3] उदयीं नवतेज जैं प्रभाकर वी. २७
पूजी भैरवदूता सागर गंभीर गर्जना करुनी,
रक्षःपुरांत आला दूत क्षणीं वायुमार्ग संतरुनी. २८
वृक्ष जसा कांपतसे बसतां पक्षीन्द्र दिव्य गुरुसारें,
कांपे थरथर ! लंका तिजला सहवे न दूतपदभार. २९
यज्ञागारीं पाहे रावणसुत पतित दूत लवलाहें;
नेणो प्रफुल्ल किंशुकें वायुबलानें पडूनि, नव राहे. ३०
पाहूनि रावणीतें दूताच्या लोचनांस जल आलें,
अवलोकुनि मरदुःखा अमराचें हृदय दुःखवश झालें. ३१
कनकासनीं मनोहर होता जेथें दशास्य बसलेला,
शिवदूत वीरभद्र व्यग्रमनें त्या स्थलास मग गेला. ३२
राहे उभा पुढें तो नेत्रांतुनि नीर त्याचिया वाहे,
पाहुनि मुग्ध तयाला राय पुसे " मौन कासया बा ! हें ? ३३
मानव राम तयाचा भृत्य न तूं वदन कां तुझें म्लान ?
वृत्त अमंगल कथिसी परिसाया तरि न उत्क[6] हे कान. ३४
तो क्षुद्रजीव राघव लढतां समरांत पावला पतन,
दूता आनंदाची वार्ता ही कर क्षणीं मला कथन. " ३५
वदला दूत " नृपाला अशुभ कथा सांगणें नको पावें.
अभयप्रदान द्यावें आधीं मज, मजवरी न कोपावें. " ३६

---

१ वीरभद्रा ! २ आकाशसंचारी ३ होतो ४ शक्तिमान् ५ पळसाचें झाड
६ उत्सुक.

रक्ष:कुलनिधि वदला दूता ! कथिं तूं, तुला अभयदान;
घडतें सर्व शुभाशुभ, संसारीं ज्यापरी विधिविधान. ३७
" राया ! पराक्रमी तव नंदन देवेन्द्र भी सदा ज्याला,
सौमित्रीसह लढतां समरीं मृति हाय ! हाय ! ये त्याला. " ३८
व्याधशरीं जेविं हरी हत होउनि भूवरी पडे विकल,
तैसा दशमुख पडला; काढी रुदनस्वना प्रजा सकल. ३९
वारी व्यंजनें कोणी, लावी नेत्रां त्वरें कुणी पाणी;
शिवतेजस्पर्शानें दूत नृपा चेतना क्षणी आणी. ४०
तो लब्धसंज्ञ रावण वदला " दूता ! खरेंच सांग मला,
कोण वधी मत्पुत्रा शक्राही जो अजिंक्यसा गमला. " ४१
" घेऊनि छद्मवेषा शिरला सौमित्रि यज्ञसदनांत,
स्वीकारुनि अनयपथा मारी तो त्वत्सुतास कदनांत. ४२
राया ! वीरश्रेष्ठा ! शोक पुरे, योग्य तो न वीरास;
जो शत्रु पुत्रहन्ता संहारुनि टाक संगरीं त्यास. " ४३
झाला अदृश्य सहसा वदुनि असें दूत शून्यसंचारी,
स्वर्गीय सौरभानें गेली कोंदूनि ती सभा सारी. ४४
पाहे जटात्रिशूलच्छाया नयनांपुढें उभी, रायें--
आश्चर्यमग्न बोले स्मरुनि शिवाचे निजांतरीं पाय. ४५
" झाली काय कृपाळा ! देवा ! स्मृति आज दीन दासाची,
दुर्ज्ञेया तव माया मत्सम मूढां असे सदा साची. ४६
कैसें असो, परी मी आज्ञा पाळीन आपुली आधीं;
मागाहुनि सर्वज्ञा ! सर्व निवेदीन मन्मनोव्याधि. ४७
" यावद्धनुर्धरांनो ! अपुलें चतुरंग सैन्य सिद्ध करा,
वेगें उठा ! झटा ! हो ! शत्रूशीं, दुःख या क्षणीं विसरा. " ४८

---

१ आज्ञा २ पंख्यानें ३ आकाशांत फिरणारा ४ सुगंधानें ५ रावण ६ एकंदर.

क्रोधावेशें ऐशा वचना **लंकेश** जों न उद्गरला,
उसळे रव दुंदुभिचा ज्यायोगें राजहर्म्य तो भरला. ४९
परिसुनि आरावं झणी तैं झालें असुरसैन्य सिद्ध रणा,
स्वर्णध्वज रथ हय गज घेउनि हो सिद्ध शत्रुसंहरणा. ५०
उडती नभीं पताका जणु वाटे धूमकेतुंचा राशि,
वाजति राक्षसवाद्यें रव ज्यांचा कोंदला महाकाशीं. ५१
घोर स्वर आयकिला शिबिरीं जैं **रघुकुलावतंसें** तो,
बोले **बिभीषणा**तें " स्वन मित्रा ! कोठुनी पहा येतो. ५२
कांपे थरथर ! **लंका** वाटे भूकंप काय कीं झाला,
हा धूमपुंज उडुनी मेघांसम आवरी अनंतौला. ५३
कालाग्निसंभवा जणु भयकर बघ ही विभों नभा उजळी,
विश्वप्रलय कराया उठती कल्लोल काय सिंधुजळीं. ५४
" नाहीं भूकंपन हें, आहे हा असुरवीरपदभार;
नोहे प्रलयाग्निविभा शस्त्रास्त्रांचा प्रकाश साचार. ५५
कोलाहल आयकिला त्वां जो, तो सिंधुचा नसे ध्वानें;
गर्जे राक्षससेना वीरमदोन्मत्त विसरुनी भान. ५६
संतप्त पुत्रनिधनें होई **लंकेश** सज्ज संग्रामा,
लक्ष्मणरक्षण कैसें करवे या घोर संकटीं **रामा** ?" ५७
परिसुनि **बिभीषणा**चें वचन तया सुस्वरें वदे **राम**,
" सैन्याध्यक्षदलींतें मित्रा ! बोलाव जा; असे काम. ५८
देवाश्रित मी, माझें करितिल ते देव संकटीं अवन;
चिंता वृथा कशाला ! येतिल धांवुनि जवें जसा पवन." ५९
धरुनि करीं मग शृंगा केला रक्षोवरें महानाद,
सुग्रीव शूर **अंगद** आले **नल नील** ऐकुनी सादं. ६०

---

१ नाद २ कुलभूषण ३ आकाश ४ प्रकाश ५ आवाज ६ समुदाय ७ हांक.

युद्धा सिद्ध जहाला **लंका**–पति विकल पुत्रशोकानें,
राम ह्मणे तत्सेना घोष करी ऐकवे न तो कानें. ६१
वीरानों! धीरानों! सज्ज तुह्मीं व्हा समस्त संग्रामा,
या घोर संकटीं द्या साह्य तुह्मीं सर्व वांचवा **रामा**. ६२
हतदैवी वनवासी मी, मम सारा तुह्मांवरी भार;
लंकेंत एक उरला वीर तया वधुनिया करा ठार. ६३
तुमचें साह्य ह्मणोनी लाभे मज सेतुबंधनीं सिद्धि,
तुमच्याच हो! बलावर वधिला तो **कुंभकर्ण** मी युद्धीं. ६४
कुलमान प्राणचि मम राखा त्यातें करा प्रियोद्धार,
कारागारीं क्लेशा साही कांता दिवानिशी फार. ६५
इतुकें कार्य करा हो,! बांधा मातें कृतज्ञतापाशीं;
दाक्षिण्य[१] प्रकटवुनी दूर करा मम समस्त तापाशीं." ६६
बोलुनि साश्रु नयनीं ऐसें, **रघुनाथ** मौनभाव धरी;
वारिदसम[२] निर्घोषें उत्तर **सुग्रीव** त्यास शीघ्र करी. ६७
मारूं रणीं रिपूतें, अथवा जाऊं मरून संग्रामीं;
ऐशी दृढप्रतिज्ञा करितों तव दास **राघवा**! आह्मीं. ६८
धनमानविभवदाता तूं अमुचा, **राघवा**! तुझ्यासाठीं–
झगडाया भी न गमे; यमधर्माशीं जरी पडे गाठी. ६९
होवोत सज्ज राक्षस, निकराचें त्यांसवें करूं युद्ध;
वदतां **सुग्रीव** असें, गर्जे वानरचमू रणा सिद्ध. ७०
रक्षःकुलराजश्री होती बसली **रमा** जगाधार,
आराव घोर ऐकुनि विस्मय पावे बघे सभोंवार. ७१
ऐकुनि रक्षोवाचें शून्यपथें वैजयंत[३]धामातें–
गेली, बसला होता **वासव** घेउनि **शची**प्रियां जेथें. ७२

---

१ सौजन्य २ मेघ ३ इंद्रभुवन.

केशवकांता पाहुनि भावें **वासव** नमी तिचे चरण,
बोले " जननी मजला दे आर्शीर्वाद मी तुला शरण. ७३
तुझिया वरप्रसादें झाला गतजीव **रावणी** समरीं,
भोगूं स्वर्गसुखातें झाली मत्कामना समस्त पुरी. ७४
ज्यावर कृपा जहाली तव त्यातें या जगीं उणें काय ? "
परिसुनि वच **शक्राचें** स्मित करुनी बोलली तया माय. ७५
रिपु तव मृत होय, परी सुतनिधनें क्रुद्ध राय **लंकेश**;
घ्याया सूड अरीचा घाली अंगीं स्वकीय रणवेष. ७६
ही वार्ता सांगाया आल्यें **इंद्रा !** तुझ्याकडे आज,
प्रत्युपकारासाठीं[2] **श्रीरामाचें** करीं पुरें काज. ७७
शक्र वदे तूं पाहीं वळुनी उत्तर दिशेकडे, माते !–
सुरसैन्य सज्ज सारें झालें करण्यास साह्य **रामातें**. ७८
पाहुनि असंख्य सेना अमरांची प्रमुदिता **रमा** झाली,
देउनि आशीर्वादा देवेशा; आपुल्या स्थला गेली. ७९
समरोन्मुख **रावण** हो परिसुनि राणी तयाकडे आली,
शिशुशून्य नीडें[3] पाहुनि जेंवि कपोती; तशी व्यथित झाली. ८०
प्रियसुतनिधनव्याकुल कदलीसम भूवरी सती पडली,
स्मरुनी पुत्रगुणांतें वत्सल ती माउली अती रडली. ८१
उठवुनि तीतें यत्नें भूप वदे सुंदरी नकोचि रडों,
प्रतिकूल दैव कांते ! पाहे तें आपणा पुरें चिरडों. ८२
जाईं परत गृहातें, येऊं माझ्या नको गडे ! आड;
जातों समरक्षेत्रा शत्रूचा घ्यावया पुरा सूड. ८३
आहे उभयांस पुढें सुंदरि ! चिरकाल काल शोकास,

---

१ लक्ष्मी २ लक्ष्मणानें इंद्रजितास मारून इंद्रास निर्भय केलें या उपकाराची फेड करण्यास ३ घरटें.

राज्यसुखावर पाणी सोडुनि मग आठवूं स्वतोकार्स. ८४
कां अश्रुनीर सिंचुनि शमविसि कोपाग्निची मम ज्वाला,
जा ! जा ! गृहा परत जा ! उशिर रणा जावया सखे ! झाला. ८५
पडला झंझावातें वनभूषण आज भूवरी शाले,
उत्तुंग शृंग चूर्णित हो राहुग्रस्त चंद्रमाबाल. ८६
धरुनी सखीजनांहीं नेलें राणीस शीघ्र अवैरोधीं,
क्रोधभरें बाहेरीं येउनि नृप राक्षसांस संबोधी. ८७
" त्रिभुवनजयी सदा जो, **शक्र** जयाची धरी मनीं भीति;
त्यातें निरस्त्र पाहुनि **लक्ष्मण** मारी त्यजोनिया नीति. ८८
जैसा मरे प्रवासी एकाकी बापुडा प्रवासांत,
लंकाऽलंकार तसा मृति पावे, दुःख दे मना मार्ते. ८९
वीरांनो ! आजवरी पुत्रासम पाळिलें तुह्मां सर्वा,
गोष्ट स्मरा; करा हो ! समराचा निकर सोडुनी पर्वा. ९०
शत्रूस जिंकिल्याविण याल तरी षंढ हो तुह्मीं सकल; "
या शद्वीं चेतवुनी सैन्या, नृप शांत जाहला विकल. ९१
परिसुनि **दशानना**तें गर्जे दानव--अँनीकिनी घोर,
प्रतिशद्वा आयकितां **रघुच**मुही गर्जना करी थोर. ९२
सुटला घोरसमीरण, दावाग्नि प्रखर काननीं उठला;
आला प्रलयचि वाटे, जनमनिंचा धीर सर्वही सुटला. ९३
झाली त्रस्त भयानें, गेली **नारायणा**कडे धरणी;
आराधना तयाची करिती नमना करूनि तच्चरणीं. ९४
घेउनि नानारूपें रक्षण केलें **रमा**धवा ! माझें,
प्रलयीं **कूर्मा**कारा स्वीकारुनि साहिलें तुवां ओझें. ९५
धरुनी **वराह**रूपा मजासि रैंदाग्रीं तुह्मींच सांवरिली,

१ मुलास. २ वृक्षविशेष. ३ अंतःपुरांत. ४ गोष्ट. ५ सेना. ६ दांतावर.

नरसिंहरूप घेउनि दैत्या नाशूनि काळजी हरिली. ९६
अवतार **वामना**चा घेउनि, **बलि**गर्व हरियला सारा;
आजवरी तारियलें तैसें या संकटीं मला तारा. ९७
वत्से ! वसुधे ! तुजवर संकट तें काय सांग गे मातें,
मंदस्मित करुनि तदा पुसिलें **पुरुषोत्तमें रमा**नाथें. ९८
ठावें न काय देवा ! सर्वज्ञ तुह्मीं तुह्मां खरें वृत्त ?
लंकेकडे पहावें **रघुरावण**सैन्य जाहलें मत्त. ९९
व्यसुतो दे **सौमित्री** स्वसुता रौयें ह्मणूनि शोकार्त;
केली दृढ प्रतिज्ञा शत्रुवधाची, कृतांत तो मूर्त. १००
तो **इंद्र** सिद्ध झाला समरीं **रामा**नुजास रक्षाया,
उठले राक्षस सुर नर वाटे **लंका**पुरीस भक्षाया. १०१
कालासम दारुण रण होइल आतां, कसें तया साहूं;
कैशी तुझ्या कृपेविण भूमि वदे मी **जनार्दना** ! राहूं. १०२
वेगें बाहेर निघे प्रतिघान्धौं मत्त राक्षसी सेना,
शद्ब करी घोर वरी धूलि उडे मार्ग नीट गवसेना. १०३
बघतां प्रभंजनातें सिंधूच्या उसळती जशा लहरी,
उसळे बाहेर तसें पाहे **रघु**सैन्य तो विशाल **हरी** १०४
बघुनी सैन्यबळाला जीवांचा धीरही गळाला हो !
योगीसंघ पळाला, अवलोकी सर्व हें **रमा**नौहो. १०५
वसुधे ! रक्षःकुलपति **शिव**तेजें परम विक्रमी झाला,
या विषम संकटीं तूं प्रार्थीं **शौरी** ह्मणे, **महेशाला** १०६
वदली वसुधा **श्रीशा** ! आहे **त्र्यंबक** तमोगुणी नित्य,
संहाररत तयाला विश्वाची काळजी नसे सत्य. १०७
वाही कोण तुझ्याविण विश्वाचा भार या **रमा**नाथा !

---

१ मरण. २ रावणानें ३ क्रोधानें अंध झालेली. ४ रमापति. ५ विष्णु.

अवन करीं दासीचें चरणीं तव ठेवितें प्रभो ! माथा. १०८
जा वसुधे ! स्वस्थाना, कार्य करूं देववीर्य संवरुनी;
देउनि अभय धरेतें विष्णु वदे खगपतीकडे फिरुनी. १०९
" जा ऊठ वैनतेया ! वेगानें उडुनि तूं नभोदेशीं,
हेरिं देवतेज सत्वर जैसा सविता हरी पयोराशि. ११०
हर्याज्ञेनें गेला उडुनि नभीं वैनतेय त्या कालीं,
पक्षांच्या छायेनें गिरिवननद सर्व झांकुनी गेलीं. १११
निघती चौफेर जशा ज्वाला जैं भडकतो गृहीं अनल,
गर्जत दशाननाचें तैसें बाहेर ये बल प्रबल. ११२
रघुसैन्य घोर गर्जे शिरला समरीं जवें अमरवृंद,
ऐरावतस्थ वासव तारकहन्ता शिखिध्वज स्कंद ११३
गंधर्व यक्ष किन्नर आले बहु विविध वाहनीं सुस्थे,
सर्व प्रदेश झाला अमरनिनादें तदा भयग्रस्त. ११४
बहु पूर्वपुण्य माझें ह्मणुनी येसी अशा विपत्कालीं,
वदला राम सुरेशा आगमनें तव पवित्र भू झाली. ११५
" देवकुलप्रिय अससी रघुवीरा ! बैस शीघ्र देवरथीं,
संहारीं बाहुबलें राक्षस जो वावरे अधर्मपथीं. ११६
सागरमंथन करुनी अमृत जसें आणिलें, तशी लंका--
विध्वंसुनि; सीतेतें मुक्त करूं सोड राघवा ! शंका ! ११७
वदला वासव ' रावण भोगी प्राचीन कर्मफल सत्य,
कर्म तसें फल लाभे पेरावें उगवतें तसें नित्य. ' ११८
लढती दानव सुर नर वाजति घन अंबुराशिसम कंबु,
उडती कैलंब अगणित वरवर ते पाहती गगन चुंबूं. ११९

१ गरुडा. २ हरण करी ३ पाण्याचा सांठा. ४ बसलेले. ५ शंख. ६ बाण.

शंपे[1]समान चमकुनि भेदिति ते वर्म[2]–चर्म[3]–देहातें,
रक्षोनरवीर रथी पडती नच पांहवे दशा हा ! ते. १२०
पडले कुंजर, कुंजीं अगणित पर्णें प्रभंजनें जेवीं;
झुंझार रणतुरंगम, भैरवरस समरभू तदा सेवी. १२१
बसुनी दिव्यरथावर शिरला सानुज रणांत **रघुनाथ,**
स्वप्रतिमूर्तिच **लक्ष्मण** बघतां विस्मय **षडानना** होत; १२२
सुर नर मिळवुनि सारे रचिला व्यूह प्रचंड **शक्रानें,**
त्याचा भेद कराया शिरला **लंकेश** संगरीं मानें. १२३
मृति **मेघनाद** पावे ह्मणुनी ये **इंद्र** आज **लंकेला,**
सूता ! चल हांक रथा; जेथें तो दुष्टधी असे ठेला. १२४
चाले रथ पवनजवें बघुनी **रघुसैन्य** त्यास दूर पळे,
वनवासी जीव जसे मदकल[4] मातंग ज्याक्षणीं खवळे. १२५
भेदावी व्याघ्रानें गोष्ठाची येडनी जशी सुवृति[5],
भेदी व्यूह तसा तो शर सोडुनि शूर भूप सिंहकृति. १२६
होउनि पुढें **शिखीध्वज[6]** आकर्षुनि शिंजिनी[7] रथा रोधी,
बोले तया **दशानन** भावें नमना करूनिया आधीं. १२७
" देवा ! **शिवगिरिजेतें** पूजितसें मी दिवानिशी भावें,
मग त्या नराधमातें आपण अनुकूल कासया व्हावें. १२८
केला घात सुताचा त्यानें तो अनय आचरी फार, "
दे मार्ग जाउं दे मज; त्या कपटपटूस मारण्या ठार. १२९
आहे मला **शिवाज्ञा** समरीं ह्या **लक्ष्मणास** रक्षावें,
जिंकीं मज बाहुबळें त्याविण इच्छित कसें तुझें व्हावें ? १३०
परिसुनि **शक्तिधराचें** वचन मनीं खवळला महा मानी,

---

१ वीज २ चिलखत ३ ढाल ४ मदोन्मत्त ५ कृपण ६ कार्तिकस्वामी
७ धनुष्याची दोरी.

अग्निपरी तेजस्वी शर सोडुनि तो **षडानना**[1] हाणी १३१
अभया[2] **विजयेस**[3] ह्मणे सखये ! **लंकेकडे** जरा पाहीं,
रक्षोऽधिप तीक्ष्णशरीं मारी **स्कंधां** तया दया नाहीं. १३२
आकाशांत पहा तो हरण करी देवतेज खगराज
विद्युद्वेगें जाउनि रणविन्मुख तूं करीं **गुहा** आज १३३
पाहुनि **गुह**देहांतुनि शोणित, मन हें मदीय कळवळतें;
प्रेम करी पुत्राधिक भक्तीं **शिव** ह्मणुनि **रावणा** बळ तें. १३४
गेली सत्वर दूती पवनपथें धरुनि सौरकर[4]वेष,
संबोधूनि **कुमारा** सांगे कर्णीं तदीय संदेश. १३५
आज्ञा तुज मातेची **शक्तिधरा** ! अस्त्र संवरीं तूर्ण,
भैरव तेज भवाचें भरलें देहीं नृपाचिया पूर्ण. १३६
परिसुनि दूतीवचना स्मित करुनी **तारकारि** रथ वळवी,
सिंहासम गर्जुनिया रक्षःपति सैन्यभार दुरि पळवी. १३७
चाल करी **इंद्रावर** वेढी निमिषांत यक्षकिन्नर तो,
हटवी कटका[5] मागें वेगें, कोणी रणांत कीं न रतो. १३८
भीषण तोमर **रावण** शीर्षीं ऐरावताचिया हाणी,
कापुनि तयास टाकी अर्ध पथीं **इंद्र** आपुल्या बाणीं १३९
" ज्याच्या भयें थरारा ह्रदय तुझें कापलें दिवारातीं,
कपटें त्वां मारविला **इंद्रा** ! समरांत तो तवाराति[6]. १४०
आलास आज ह्मणुनी निर्लज्जा ! विगतशंक ! नगरा या,
नसतें अमरत्व जरी वधितों तुज मी क्षणांत मग राया. १४१
तूं काय **लक्ष्मणाचें** रक्षण समरांत बा करावेंस,
वदतां असें मुखानें राय पडे भूवरी विकलवेष. १४२
माराया **लंकेशा** घे जों **वासव** करांत दंभोळी[7],

---

१ कार्तिकस्वामी २ पार्वती ३ पार्वतीची सखी ४ सूर्याचे किरण ५ सैन्य ६ शत्रु ७ वज्र.

खगपति तत्तेज हरी शक्ति करींची निघोनिया गेली. १४३
हाणुनि गजराजाशिरीं भीम गदा पाडुनी तया खालीं,
धांवे **लंकेश** पुढें **रामा**ची भेट तों तया झाली. १४४
राय वदे **रघुनाथा**! काज मला आज बा! तुझें नाहीं,
राहीं जिवंत दिनभर लढण्याची तुजसवें नसे घाई. १४५
कपटी अनुज तुझा तो कोठें रे! सत्वरींच दाव मला,
संहार करिन त्याचा तत्कृतिनें जीव फार हा श्रमला. १४६
सिंह जसा वृषसंघा[1] झडपी **लक्ष्मण** तसाच असुरांस
पाहुनि दूर तयाला गर्जे **भैरव** रवें महेष्वास[2] १४७
चाले रथ रायाचा पुष्पक घर्घर रवें, जवें पवन;
अग्निस्फुलिंग उडती चक्रांतुनि साहवे तयां लव न. १४८
पाहुनि **सौमित्री**तें गेला धावूनि राय त्यावरतीं,
मिळुनी सुरवरनरही रक्षण **सौमित्रि**चें रणीं करिती. १४९
हटवुनि मागें, **हनुमान्**, रक्षःशूरा रणीं **बिडालाक्षा**[3],
गेला **सौमित्री**ची शत्रूपासुनि करावया रक्षा. १५०
जेविं तुलाराशि उडे चारहि बाजूंस दूर वायुबळें,
पाहुनि यमस्वरूपी वीरा राक्षसचमू भिऊनि पळे. १५१
लंकेश प्रखरशरीं अपजयभय **अंजना**सुता देई
झाला अस्थिर हनुमान् भूधर भूकंपनें जसा होई. १५२
आठविले जनकाचे विषमीं बहु घोर **पवनजें**[4] चरण,
निजबल दे वायु तया सविता चंद्रास जेंवि निजकिरण. १५३
संलब्धरुद्रतेजें **दशवदनें** हटविलें **पवनजाला**,
आला **किष्किंधा**धिप तों समरीं[5] नाशुनी **उदग्राला** १५४
पाहुनि त्या राय ह्मणे सोडुनि कां राज्याभोग आलास,

---

१ बैल २ महाधनुर्धर ३ राक्षस विशेष ४ हनुमान् ५ संकटीं ६ सुग्रीव.

वैधव्य द्यावयातें पत्नीतें उत्क कां जहालास. १५५
देतों सोडुनि तुजला जाई मूढा ! त्वरें स्वदेशास,
भीम रवें उत्तर दे ऐकुनि तद्वचन तो बली त्यास. १५६
" रक्षोराजा ! तुजसम पापाचारी नसेच अन्य जनीं,
त्वां बुडविलें स्ववंशा परदारेचा धरूनि काम मनीं. १५७
रक्षोवंशकलंका ! प्राणांचें करुनिया तुझ्या हरण,
हस्तांतुनि तव माझ्या मित्रवधूचें करीन उद्धरण." १५८
बोलुनि **सुग्रीवानें** त्यावर निक्षेपिलें अचलशृंग,
सोडुनि तीक्ष्ण शिलीमुख[1] राय तयाचा करी क्षणीं भंग. १५९
झाला विषमाघातें **सुग्रीव** व्यथित घेच माघार,
तेजोविहीन सारी सुरसेना क्षण रणीं न घे थार. १६०
रे ! **लक्ष्मणा** ! विमूढा ! झाली रणभूवरी तुझी भेट !
वाट तुला दाखवितों परलोकाची क्षणांतरें थेट. १६१
कोठें जाय **शिखिध्वज** कोठें तो **वज्रपाणि** सांग मला,
भ्राता **रघुपति** कोठें **सुग्रीवहि** **वायुपुत्र** तो रमला. १६२
स्मर तूं माता कांता, आतां येणार कोण रक्षाया ?
शोणित मांस तुझें मी देतों मांसाशनांस भक्षाया. १६३
उल्लंघुनी समुद्रा शिरुनी नगरींत हरिसि सुतरत्न,
चोरा ! वधितों तुज मी राय वदे " विफल कासया यत्न " १६४
" क्षत्रकुलीं जनु माझें भीतों मी नच कधीं यमालाही
भ्यावें कवणें तूतें दुष्टा ! बडबड पुरे कशाला ही ! १६५
सुतशोकव्याकुल तूं समरेच्छा घे करोनिया पूर्ण,
शोक निवारूनि तुझा धाडिन पुत्राकडे तुला तूर्ण." १६६
वदुनि असें **सौमित्री** शौर्यें तोडी स्वशत्रुशरजाल,

---

१ बाण.

विस्मयमग्न जहाले सुर नर बघतांच केसरीबाल. १६७
रक्षोराज वदे तैं **सौमित्रे !** धन्य वीर तूं साच,
शक्तिधराहुनि बलवान् परि न ह्मणें आज मी तुला वांच. १६८
स्मरुनी पुत्रवरातें तीव्र महाशक्ति सोडिली रावें,
उठली तडित्स्वरूपा गर्जत ती कंप तैं मही पावे. १६९
भीमाघातें **लक्ष्मण** नक्षत्रासम पडे धरापृष्ठीं,
गिरिवर ससर्प तैसा अस्त्रांसह, देव जाहले कष्टी. १७०
वधुनी अव्यर्थशरीं व्याध मृगा धांवतो धरायातें,
तैसा द्रुतगति गेला राय धरायास तच्छवा हातें. १७१
हाहाःकारा करिती दुःखानें आर्तनाद काढोनी,
सुर नर रथी समस्तहि बसती **रामानुजास** वेढोनी. १७२
वदली **शिवास दुर्गा** " वधिलें **रामानुजास** संग्रामीं--
लंकेशें तोषविला देवा ! त्वां ! भक्त आपुला वामी. १७३
त्वां ! गर्व खर्व केला **इंद्राचा** सत्य हें **विरूपाक्षा !**
लक्ष्मणदेहा आतां रक्षावें मागतें पदीं भिक्षा. " १७४
" हत रिपु, समर पुरे कर आतां नच काज रण करायास,
जा ऊठ **वीरभद्रा !** माझा संदेश सांग रायासे. " १७५
परिसुनि **शिववचनातें** ह्मणुनि बरें दूत सत्वरीं गेला,
संदेश भूपतीतें कथुनी अंतर्हित त्वरें झाला. १७६
बैसे राय रथावर गर्जुनिया शूर सिंहनादानें,
शिरली रक्षःसेना नगरीं मदमत्तचित्त जयदानें. १७७
स्तविती देव सतीतें बंदीजन विजयगीतही गाती.
समरपराभूत तदा स्वर्गी **इंद्रासवें** अमर जाती. १७८

---

१ विजेसारखी २ अमोघ ३ वाममार्गी ४ कमी ५ रावणास.

रचिलें सप्तमसर्गा " **शक्तिविनिर्भेद** " नाम, कविरत्नें--
वंगीं, रूप मराठी त्यास दिलें **माधवानुजें** यत्नें १७९

माधवानुज.

ऋतुसौंदर्य.

वसंतऋतु.

श्लोक.

ज्याचे तीक्ष्ण शर प्रफुल्लित अशीं आम्रांकुरें साजिरीं;
तैशी पुष्पशरासनीं विलसते भृंगावली ज्या बरी;
संगोद्युक्त जनांचियाचि हृदया भेदीतसे जो क्षणीं;
ऐसा रम्य **वसंत**वीर सजुनी आला प्रिये ! सद्गुणी. १

पुष्पांनीं लवले तरू, सलिल तें पद्माश्रयें शीतल,
कंदर्पाकुल कोमलांगललना, तैसा सुगंधानिल,
भारी सुंदर सर्वदा दिवस ते, संध्या अती सौख्यदा,
सारीं हीं रमणीय फार सखये ! पाहें **वसंतीं** सदा. २

पाण्याला रमणीय पुष्करिणिच्या, रत्नांचिया कांचिला,
तैसें मत्त विलासिनी युवतिला, चंद्राचिया कांतिला,
पुष्पांनीं लवल्या मनोहर अशा त्या आम्रवृक्षांस हा–
देतो रम्य **वसंत**काल सखये ! सौभाग्य भारी पहा. ३

नवें वसन रेशमी, अरुण जें कुसुंभी अती,–
जणों नटवितेंच कीं रमणिच्या नितंबाप्रती,
तशीच नव कंचुकी, बहुत तांबडी केशरी,–
विशाल कुचमंडला परम भूषवीते बरी. ४

रक्ताशोक, विशाल चंचल अशा त्या कृष्ण केशांतरीं;
तैशीं नूतन कर्णिकारकुसुमें, कर्णांवरी साजिरीं;
पुष्पें मालतिचीं, प्रफुल्लित नवीं गुंफोनिया सेवितां;
हीं सारीं तरुणीप्रती खुलविती पाहें **वसंतीं** अतां. ५

स्तनीं धवलचंदनार्द्र मणिमुक्तहारावली;
तशीच जघनावरी रुचिर रत्नकांची भली;
करीं कनककंकणें; भुजलतांत केयूर हीं–
वसंतिं मदनातुरा युवति सेविती सर्वही. ६

ज्या गालीं रचिली मुदें मृगमदें पत्रावली गोजिरी,
ऐशा रम्य सुवर्णपद्मसम त्या संपूर्ण वक्त्रावरी–
तेजें सोज्ज्वल रत्नमिश्रित अशा मुक्तावलीचे परी–
देखें विस्तरली सदोदित कशी घर्मावली साजिरी ! ७

कंचुक्यादिक बंधनें बहुपरी तीं सैल ज्यांचीं अती;
कामव्याकुल होउनी अति, मुखें उच्छ्वास ज्या टाकिती;
त्या रम्या रमणी समीप बसल्या कांतावरी संप्रती–
अत्युत्कंठित होउनी, मग क्षणीं वक्रेक्षणें पाहती. ८

फार पांडुरता, तशी कृशता, सदा जडता, अतां–
आळसांत, पुनःपुन्हा बहु जांभयांत विलीनता,
काम हा तरुणींचिया मृदु कोमलावयवाप्रती–
आणितो बघ सत्वरीं रमणीय मोहकता किती ? ९

मद्यानें अति धुंदशा नयनिं जो चांचल्य रूपें वसे;
गालीं पांडुरवर्ण जो; स्तनयुगीं काठिन्यभावें असे;
जो ओटींत सुपुष्टसा विलसतो; माजांत गंभीरसा;
गात्रीं कामिनिच्या **वसंतिं** बहुधा कंदर्प नांदे असा. १०

शृंगारीं शिथिलत्व ये युवतिच्या गात्रांस निद्रावशें;
वाणीतें रमणीय उत्सुकपणा किंचिन्मदानें ठसे;
तेंवी ती अवलोकना कुटिलता भ्रूविभ्रमानें क्षणीं;
ऐशी मोहकता पहा जडवितो कंदर्प हा तत्क्षणीं. ११

कामें आळसल्या विलासचतुरा लीलावती सुंदरी,
तोषें केशर, पीतचंदन, लता मर्दोनिया साजिरी,—
कस्तूरी मिसळोनि दाट करुनी ती चंदनाची उटी,
प्रेमें दाट विलेपिती अपुलिया गौर स्तनांच्या तटीं. १२

लाक्षारंग जयास दाट विलसे, सूक्ष्मांबरें लाल तीं;
तैसा ज्यांस सुगंध धूप दिधला कृष्णागुरूचा अती,
ऐशीं सेविति; घट्टशीं शिशिरिंचीं वस्त्रें त्वरें टाकुन,
ज्यांचीं काममदेंचि धुंद अळशीं आंगें पहा ते जन. १३

आम्राच्या मधुरासवा पिउनिया उन्मत्त ज्यांची मती,—
प्रेमें ते नरकोकिल प्रियसखीवक्त्रांबुजा चुंबिती;
बैसोनी कमलावरी मधुपही गुंजारवें संप्रती—
कांतेला सुखवावया प्रिय तिचें बोलोनि संपादिती. १४

भारी तांबुस दाट पालविचिया गुच्छींचि जे वांकले;
यच्छाखा फुलुनी विशेष डुलती अत्यंत मंदानिलें;
मोठे जे सहकार सुंदर तरू; ते हे पहा संप्रती--
अत्युत्कंठित दर्शनेंचि करिती नारीजनांची मती. १५

प्रवाळाच्या रंगापरि सकळ जो तांबुस अती;
फुलांच्या भारानें किसलय जयाचे विलसती;
अशोकातें ऐशा तरुण ललना त्या निरखितां,
करी तो तत्कालीं हृदय बहु शोकाकुल अतां. १६

ज्यांचीं रम्य फुलें प्रमत्त मधुपें चुंबोनिया, चाखिलीं;
अस्ताव्यस्त अती मृदू किसलयें मंदानिलें वांकलीं;
त्या आम्रीं रमणीय पुष्पकलिका ती पाहतां रेखुनी,
देते उत्सुकता तदाच सहसा कामीजनांच्या मनीं. १७

कांतेच्या वदनापरी विलसते अत्यंत शोभा जिची;
ऐशी पुष्पित मंजिरी निरखुनी आरक्त कोरांटिची,
कामाच्या अति तीव्र भेदक शरें तत्काळ कामातुर—
नोहे सांप्रत कोण तो सहृदयी सांगे सखे ! सत्वर. १८

पुष्पांनीं लवलीं पलाशविपिनें सर्वत्र, वेगानिलें—
दीप्ताग्नीसम रक्तवर्ण डुलती; त्यांहीं जिला वेष्टिलें;
ऐशी ही धरणी **वसंत**समयीं या वाटतें पाहुनी,--
जाणों शोभतसे सदैव तरुणी रक्तांबरा नेसुनी. १९

कां शुकानन कांतिच्या पळसांनिं तीं न विदारिलीं ?
कर्णिकार तरूंचिया कुसुमींहि काय न जाळिलीं ?
कां तयांस पुन्हा मनोहर कूजितें पिक मारिती ?
जीं पहा तरुणांतरें रमणी--मुखीं रतलीं अती. २०

हर्षोनी नरकोकिलें कलरवें आलापिल्या गायनें;
उन्मत्त भ्रमरांचिया मधुरशा गुंजारवाच्या स्वनें;
होतें चित्त तिचेंहि विव्हल झणीं भार्ये ! पहा संप्रती;
रामा नांदतसे सदा कुलगृहीं जी नम्र लज्जावती. २१

चळवित फुललेल्या आम्रशाखादिकांला,--
पसरित पिकवाणी पूर्ण साऱ्या दिशेला,—
दहिंवर पडतां तें वारुनी या **वसंतीं**,--
नरहृदय हरोनी रम्य वायू वहाती. २२

जीं कां लीलावतीच्या तरुणरमणिच्या मंद हास्यापरी, त्या--
कुंदांच्या पुष्पभारें धवल उपवनें साजिरीं शुभ्र कोंल्या;
शोभेनें लोभवीती विषयविरतही तापसीचित्त शील;
तीं हीं सप्रेम कामीतरुणजनमनां कां न आकर्षितील ? २३

सोन्याची दीर्घ कांची सुरुचिर कटिला, सुस्तनीं रत्नहार,
कामोद्रेकें जयांचा गळुनि शिथिलसा जाहला देहभार;
त्या ह्या नारी नरांचें हृदय झडकरी वेधिती प्रेमपाशीं,
भृंगांच्या कोकिलांच्या परम मधुरशा गायनें चैत्रमासीं. २४

जे नानाविध रम्य पुष्पतरुंनीं चोहींकडे शोभले;
उल्हासें पिककूजितें सकलही यच्छृंग नादावले;
जेथें सर्व शिलातलीं पसरल्या जाळ्या लतांच्या पहा;
सारे लोक बिलोकुनी हरिखती ऐशा गिरीतें महा. २५

कांतेच्या विरहें उदास बनलीं ज्यांचीं मनें संप्रती;
ऐसे पांथिक पाहुनी फुललिया त्या आम्रवृक्षाप्रती,--
हस्तानें अपुल्या तदा झडकरी नाकास रोधोनियां,--
डोळे झांकुनि आठवोनि रडती उच्च स्वरें स्वप्रिया. २६

जो कां कोकिलगायनें मधुरशा, उन्मत्त--भृंग--स्वरें,--
शोभे पुष्पित कर्णिकारतरुनें, तैसाचि चूतांकुरें;
वेधी रम्य **वसंत** हा प्रखरशा बाणापरी टोंचुनी,
उद्वेगें मदनाचिया विरमल्या मानी स्त्रियांचे मनीं. २७

जो ढाळीत सुवर्णकांतिसम ती सत्पुष्पराशि स्वतां,--
ऐशा पुष्पितशा रसालतरुतें मंदानिलें डोलतां,--
मार्गी सन्मुख पाहुनी, पथिक ते क्षीणांग झाले तरी--
होती मोहित तीव्र मन्मथशरें अत्यंत चित्तांतरीं. २८

कर्णमंजुल भाषणा रमणीय कोकिलगायनें;
साजिऱ्या स्मित--दंतकांतिस, कंदपुष्पसुकांतिनें;
त्यापरी करपल्लवा, मृदु विद्रुमद्युति पल्लवें;
स्त्रींचिया हिणवीच काय **वसंत** सांप्रत वैभवें. २९

कपोलधवला अशा कनककांतिपद्मानने,
जिथें रुळति हार, त्या सकलचंदनार्द्रस्तनें,
प्रशांत मुनिलाहि कीं मदविलासवक्रेक्षणीं,
स्तनें विनतसुंदरी सहज लोभवीती क्षणीं. ३०

माध्वीगंध मुखांबुजीं, नयन ते आरक्त लोध्रापरी,
तैशी रक्त कुरंटकीं विरचिली वेणी अती साजिरी,
जीं उच्च स्तनमंडलें कठिणशीं, मोठी कटी सुंदर,
हीं आतां करितील कां न सखये! नारींस कामातुर? ३१

भृंगांच्या अति कर्णमंजुल अशा गुंजारवाच्या भरें,
उन्मादें नरकोकिलेंहि वदल्या अत्यंत उच्च स्वरें,
पुष्पांनीं लवल्या रसाल--तरुला आलिंगिल्या मारुतें,
होतें चंचल साध्विचें हृदयही स्वाधीन अत्यंत तें. ३२

शिंचोनी करितात सौधतल तें किंचिज्जलें शीतल,
चाफ्यांची रचुनी मनोहर फुलें गुंफोनियां कुंतल,
पुष्पांचे नव हार घालुनि गळां हारावलीही स्तनीं,
होती तत्पर या **वसंत**--समयीं ऐशा--परी कामिनी ३३

संध्याकाळ सुरम्य; पूर्ण शशिची स्पष्ट प्रभा सोज्ज्वल;
आम्रींचा नरकोकिलस्वर महा; तैसा सुगंधानिल;
नाना--मत्त--मिलिंदवृंदरव तो; रात्रीं सुरा--प्राशन;
हीं कंदर्प रसायनेंच सगळीं देतात उत्तेजन. ३४

विद्ध जो मलयानिलें; रमणीय जो नरकोकिलें;
साजिरा सुरभी मधू गळतां सुगंधित जो खुले;
वेढिलें बहुजाति भृंगगणें जयास सभोंवतीं;
हो प्रिये ! अति सौख्यदायक हा **वसंत** तुह्मांप्रती. ३५

ज्याचें चाप पलाशपुष्प, शर ते आम्रोत्तमामंजिरी,
पूर्णेंदू धवलातपत्र, गुण तो भृंगावली साजिरी,
बंदी कोकिल, दक्षिणानिल महा हस्तींद्र, जेता सदा--
तो हा काम **वसंत**युक्त शिव तें देवो तुह्मां सर्वदा. ३६

काव्य **श्रीकालिदासें** विरचित **ऋतुसंहार** रम्य प्रसिद्ध;
तट्टीकेचा मराठी विबुधजनमनोरंजना श्लोकबद्ध--
विद्वद्विख्यात **शिंदे**कुलजनित नत **श्रीनिवासें** प्रमोदें--
अंतींचा गुंफियेला **कुसुम**समय हा सर्ग त्या श्रीप्रसादें. ३७

ऋतुसौंदर्य समाप्त.

श्रीनिवास नारायण शिंदे.

ईशस्वरूप.

पद.

सच्चिन्मूर्ते ! विश्वकारणा ! सृष्टीच्या चालका !
दावीं सत्पथ या बालका
' अतर्क्य महिमा तुझा असे. ' हें वेदवृंद बोलला
माझा पाड किती लागला
निर्गुण किंवा सगुण अससि तूं वाद गहन हा भला
मला तो व्हावा का दुर्बळा ?
मज कृती तुझी ही दिसते ना भोंवतीं ?

रविविधुग्रहादि त्वद्यश आलापिती
हा निसर्गदर्पण दावी तव मूर्ति ती
करुणावलया ! भक्तिनें नमवीं मी मस्तका
दावीं सत्पथ या बालका १

अक्षयतेजा ! अगाधशक्ते ! इच्छा तव आकळी
अनंता भुवनांची सांखळी
सजीव तैशी अजीव सृष्टी वागविसी तूं बळी
सकळ हीं रूपें तव आगळीं
तूं निदाघिं पल्लव देतोसी तरुलते
दलहि ना कधीं तव इच्छेविण हालते
तव कृपा शिलोदरिं मंडूका पाळितें
यथार्थ तूंतें वर्णन करणें प्रभो असे शक्य का ?
दावीं सत्पथ या बालका २

फलित तरुवरीं विहंगगण जो आलापा सोडितो
तो त्वद्रूपाशीं जोडतो
मेघध्वनि जो परिसुनि जळधी रोषानें गर्जतो
तोही रूप तुझें साजतो
मग तुझी कल्पना जरी मनीं बाणते
तरि शद्बरूप तिस कोण कुशल आणतें
तव समान कवि जो तोच करिल काज तें
मी तों केवळ अल्पविषयमति, हे भुवनव्यापका !
दावीं सत्पथ या बालका ३

—— बाळकृष्ण अनंत भिडे बी. ए.

काव्यरत्नावलि.

अंक ३ रा.

मैनलदेवी.

उद्धार ३ रा.

सन १९०१ सालच्या १० व्या अंकांत ह्या काव्याचा १ ला सर्ग आला आहे. त्यानंतर सन १९०२ च्या १ ल्या अंकांत दुसरा सर्ग आला आहे. हें काव्य आजपर्यंत तसेंच पडून राहिलें होतें. या वर्षांत तें पुरें होईल.

या काव्याचें कथासूत्र पहिल्या सर्गाचें आरंभीं दिलेलें आहे. परंतु संदर्भ समजण्याकरितां थोडक्यांत कथासूत्र पुनः दिलें पाहिजे. ह्मणजे पुढील सर्गांतील कथानक समजण्यास अडचण पडणार नाहीं.

मैनलदेवी ही **चंद्रनगरचा** अधिपति **जयकेशी** याची कन्या. हिचा **गुजराथचा कर्ण**राजा याबरोबर विवाह झाला. **मैनल**देवीचें व तिच्या पतीचें परस्पराशीं वर्तन अत्यंत प्रेमळपणाचें असे. त्यांची कांहीं वर्षे चांगलीं सुखानें गेलीं. परंतु पुढें **कर्णास** वेश्यागमनाचा नाद लागला. यामुळें **मैनल**देवीस फार दुःख झालें. **कर्णास** ताळ्यावर आणण्याकरितां एका वृद्ध प्रधानानें **मैनल**देवीस वेश्येचा वेश देऊन राजास भेटविली. राजानें तिला ओळखलें नाहीं. तो इतर वेश्यापेक्षां इच्या अप्रतिम लावण्य–पाशांत जखडला गेला. शेवटीं **मैनल**देवी गरोदर राहिली, तेव्हां तिनें राजाजवळून एक खुणेची आंगठी मागून घेतली. पुढें वेश्यावेशानें राजास ती मुळींच भेटली नाहीं. राजाचें वेश्याव्यसन सुटलें. पुढें आपल्या राणीस मुलगा झाल्याची बातमी राजानें ऐकली.

अर्थात् ती जारिणी आहे असें वाटून तिचा शिरच्छेद करण्यास तो प्रवृत्त झाला. इतक्यांत खुणेची आंगठी तिनें राजास दाखविली. व ह्मणाली-- आपण वेश्यासमागमापासून परांगमुख व्हावें ह्मणून मी हें वंचक कृत्य केलें. हें राज्ञीवचन ऐकून तो एकदम निवळला.

पहिल्या सर्गांत **मैनल**देवीची बाललीला व तिचा लग्नसमारंभ हा भाग आलेला आहे. दुसऱ्या सर्गांत-- **मैनल**देवीस पित्यानें केलेला उपदेश आला आहे. आणि या सर्गांत राजास लागलेला वेश्यानाद, त्या योगानें राज्याची झालेली हानी, **मैनल**देवीची दु:खदस्थिति व वृद्ध प्रधानानें वेश्यावेशाचा केलेला उपदेश व युक्ति इत्यादि भाग आलेला आहे.

आर्या.

कृतिनें **भवा भवानी, कर्णा** बहु तेंवि तोषवी रमणी,
मानी अतर्क्यमूल्यचि तीस सुगुणरत्नकोष वीरमणी. १
अन्योन्यगुणाहृत तीं, अनन्य करिती परस्परांत रती;
शुद्धप्रेमोद्भवसुख सेवुनि, भवदु:खसागरा तरती. २
जरि देह भिन्न असती, अंत:करणीं तरी न भेद रती,
सद्गुणहरि हृदयदरी दुर्गुणगज पाहतांचि भेदरती. ३
निर्मळ मन तें त्यांचें दोषरहित, जेंवि शारदिक गगन,
प्रणयामृतकर शोभे त्यांत सवें घेउनी सुगुणभगण. ४
त्या **मैनलदेवी**चा शद्व सदा **कर्ण** लोकपति झेली,
निष्ठापूर्वक त्याची तिनेंहि सेवा सदा मुदें केली. ५
करितो न पक्षपात द्युमणि कधींही जसा प्रभादानीं,
कर्णहि तसाच वागे, पावे वृद्धी धनप्रभा दानीं. ६
त्याच्या प्रेमळ कृत्या फळ ये तें, जें महासवा लाहे;
दे भूतपंचक भलें त्याला सुख, जेंवि **वासवाला** हें. ७

न पडे अवर्षण तिथें, भूमी धान्यादिकांस विपुल करी;
पोहे सुखांत सप्रज, अच्छोदसरांत जेंवि सकुल करी. ८
राजा प्रजेस झाला प्रियतम, त्याला तशी प्रियतमा ती;
विपरीत स्थिति असतां, राष्ट्राची होतसे नियत माती. ९
गृहसुख, राज्यसुख तसें स्वयेंचि सेवी गुणी नृपाळा या,
सर्व तदाज्ञा गणिती प्रसाद, चुकती कधीं न पाळाया. १०
कालक्रमें परी नृप—मनांत दुरितें स्वपाय शिरकविला,
भिरकविला सद्गुणगण; नमवूं लावूनि त्याहि शिर कविला. ११
अवचित या रायाला भेंवे दुःसंग हा अघपद **शनी**,
सुखगिरिवर भंगाया सोडी दुर्दैव कठिण विपदशनी. १२
गुणमंडित पंडित परि नृप कालवशें करूनिया भ्रमला!
रमला वेश्यासंगें; पाहुनि तें देश सर्वही श्रमला. १३
बा **कर्णा** ! वेश्यारत जो, त्या त्यजिलाचि नीतिमार्ग नरें,
मानुनि सुधाशलाका टोंचुनि घेशी विखारि मार्गण रे ! १४
नवल न, मनोनभ भरे कुविचारघनें लपूनि बोधरवी,
दुर्विधि—वात भयंकर अंध करी, धूलि लोचनीं भरवी. १५
श्रीहरिमूर्तिहि झाली पाहुनिया स्तवनमर्मरा ज्याला,
द्यूतव्यसनीं दुर्विधि पाडी तैशाहि **धर्मराजा**ला. १६
वरि अमृताचें झांकण, आंत विषाचें परंतु सांठवण;
मोही असा खल, करी भोळ्यांची अघपुरास पाठवण. १७
त्यांत तया लाभे जरि दुर्दैवाचें अखंड पाठबळ,
विकळ व्याकुळ करितो सुज्ञांही होउनी खळ प्रबळ. १८
पडली मोही प्रबळा वेश्यासर्पीण डसुनि भूपाला,
प्रीती अंधचि केवळ जी त्यागी **मैनलासुरू**पाला १९
जी नित्य सतीव्रतरत, तिस सोडुनि गुणगणेंहि नटलीला,

पण्यांगनांसवें का पतिनें करणें अभद्र विट–लीला. २०
त्यजिली सती कशी ? जी गुणरूपीं दावि अमरसुंदरते,
अथवा सुधेस सारुनि, सुधेमधें अंध मंद धुंद रते ! २१
नंदनतरुसुमततिला सेवुनि मधुकर मनांत जो धाला
स्वैर कण्हेरिस सेविल तो, तरि कां ऐकणार बोधाला ? २२
नाथप्रेम सतीचें आधारस्थान शुद्ध जीवनची,
ती **मैनला** दहाली दु:खें, दावें जशी मृगी वनची. २३
सेवी यत्पति त्यांना, पैका जगिं ज्यांस विकविता काय
तीचें दु:ख यथातथ शक्य लिहाया कवि–कविता काय ? २४
चित्ताची दुर्व्यसनीं पडतां क्षणिं सुदृढ हंत गांठवण,
कैंची राज्याची, जरि तनुची **कर्णा**प्रती न आठवण ? २५
राजा असुनी, **गुर्जर**देश जहाला खरा अराजक तो !
चकतो नियमनकर्ता, समस्तही देश तेधवां झकतो. २६
सज्जन विदूर गेले, प्रासादीं दुष्टगण तदा नांदे;
अत्याचारव्यंजक दु:शद्ध बुधांस दु:खदानां दे. २७
फुटलें विषयरतांचें होतां विषयांध **कर्ण** जणुं पेव,
चेव चढोनि तयां, ते उडविति गुणतति जसा पवन रेंव. २८
वेश्यामागुनि जमले सुराप्रिय, द्यूतकार, हो ! नाचे,
कर्ण न जाणे परि, हे नसती निजमित्र, असति होनाचे. २९
हितकर मंत्री होते, त्यांचा चाले न सत्यबोध रती,
विषयतडाग फुटे, तरि सदुक्तिसिकता न त्यास हो धरती. ३०
मंत्री वृद्ध बघोनी खलमंडल नृपकुलांत घाबरले,
वर लेख जसे राक्षस देखुनि विजयोत्सवें दिवीं भरले. ३१
श्रीमन्**मैनल**देवी नाथत्यक्ता अतीव शोक करी,
भार सहील कशि मृगी, पेलुनि खाणार ज्यास झोंक करी ? ३२

सोडोनि कशी तीतें भाळे नीचांस बुद्धि रायाची ?
काय वरावी काकी ? ज्यानें हंसी मुदें वरायाची. ३३
सर्वप्रिया गुणखनी राज्ञीची दुःस्थिती बुधां कढवी,
चढवी दुःखपुर मनीं, हरुनी बळ, सहनशीलता पढवी. ३४
होता **सुमंत्र** मंत्री चालविता सरळ राज्ययंत्रास,
खल भिन्नबुद्धि नृप परि अवमानुनि देइ त्यास संत्रास. ३५
दु;शद्वें ताडुनिया त्याचा रायें करूनि धिक्कार,
स्वैरपण प्रकटविलें, निष्कारण काढुनी तदधिकार. ३६
अवमानित मंत्र्याला झाला निजदेशवास कटु कुचला,
परि **मैनल**देवीला सहाय होण्यास तोहि त्या रुचला. ३७
एके दिवशीं त्यानें राज्ञीची गुप्त घेवुनी गांठ,
युक्ती तिला सुचविली पावाया आपदब्धिचा कांठ. ३८
मंत्री ह्मणे, ' खलांचा राजकुलावर पडे पहा घाला,
गुणवान् रायहि झाला भाजन हा हंत ! हा ! महाघाला. ३९
सुदृढा, विमला मति जी, कशि पडली हाय ! मोहनी तीतें !
सौख्यास कां न होई, होतां हानी नृपालनीतीतें. ४०
पिढिजादे गादीचे सेवक आह्मीं सुनिष्ठ, अभिमानी;
हा ! हाय ! हाय ! देवी ! परि आह्मां राय आज अवमानी. ४१
सारुनि भूमिसुर दुरीं, आदरितो नृप खलांस असुरां या,
बा **कर्णा** ! हे विषधर करितील तुझे खलास असु, राया ! ४२
देवि ! न हा जाच करी केला अपमान मम जरी रायें,
त्वदवस्था परि पाहुनि अत्यंतचि कंप या शरीरा ये. ४३
आह्मीं वज्र खरोखर, दुःख जरि शिरीं पडेल पर्वतसें,
त्वत्तनुकदलीला परि हें चिरितें तीक्ष्णधार कर्वतसें. ४४
पावे धेनुतनु जशी पंकीं, दुःखीं तुझी सुतनु कंपा,

देवि ! बघोनि ही स्थिति दगडासहि कांपवील अनुकंपा ! ४५
ऐशा स्थितींत आह्मीं सेवावें याच पादकमलाला,
नच लावावें अंगीं पापाच्या पुण्यबाधक मलाला. ४६
हा मोहरा मळविला, साधीती डाव दुष्ट जन कपटी,
मारीति उरांत सुरी झांकुनिया तीस रम्य कनकपटीं. ४७
तरि हें सोशित बसणें स्वस्थ असें, उचित हें नसे साचें,
मन्मंत्र घ्याच, अथवा गळ्यास बसतील पाश केसाचे. ४८
सजती कपटप्रचुरारांति जरी सज्जनांस डाजाला,
नीचहि वेश उचित तरि, **विजय** धनुर्धर **बृहन्नडा** झाला. ४९
दासी **कृष्णा** झाली, घे सारथिवृत्ति पुण्ययश **नळ** ती,
नगजा होय **किराती**; तेंहि उचित, ही न अश्रुंची गळती. ५०
राजगृहीं लब्धांतर मन्मित्र असे हुशार हुजरा कीं,
साहाय्य करुनि माझें गुप्तपणें सर्वकाळ गुज राखी. ५१
वेश्यावेश धरावा राज्ञीनें त्वां, न राग आणावा,
उपरी सकंटक परी सुधामधुर आंत बोध जाणावा. ५२
वेश्यारंगीं नृपति भ्रमुनि असे हाय ! रंगला, जावें
वेश्यावेशें, त्यास न भुलवाया युष्मदंग लाजावें. ५३
भर्त्याशीं एकांतीं जातां स्त्रीजन मनीं न वचकावा,
कपटप्रेरित रिपुशीं सुजनाचें होय कीं कवच कावा. ५४
मंजुमधुर गानानें अदयहि विषजिव्हनायक वळेल,
भ्रांती जाउनि तुमच्या रूपगुणगणांत राय कवळेल. ५५
तुमचा वेश्याभावें त्याला जरि लागला पुरा चटका,
तरि युष्मद्भजननिरत तो या दुरवील दुष्टजनकटका. ५६

(अनुष्टुप्)

ऐसें आचरितां तुह्मीं, करूं पुढिल योजना,

यश देईल विभु तो, रक्षी दुर्बळ जो जनां." ५७
ऐकुनी **मैनला** युक्ती करी चिंतनमज्जन,
अंतीं ती संमती देई जाणुनी मंत्रि सज्जन. ५८

तृतीयोद्धार समाप्त.

———————— बाळकृष्ण अनंत भिडे बी. ए.

श्रीकृष्णलीला.

आर्या.

ज्याच्या रोमीं वसतीं, ब्रह्माण्डें सावकाश तीं बहुत,
तो **हरि** निजे सुखानें, **नंद**—गृहीं पाळण्यामधें महित ! १
ज्याच्या रोमच्छिद्रा पूरण करण्या न शक्त ही जलधी,
त्या **कृष्णाचें** न्हाणें, गोपी घटभर जलें अहो साधी ! २
मलिन किती दितिजें जरी, यद्दृष्टीनें विशुद्ध ते होती,
त्या **हरिच्या** दृष्टीतें, मलिन करी कज्जलें **यशोदा** ती ! ३
हरिच्या नामोच्चारें, भीउन बाधी न काळ भक्तांतें,
त्याला जनदृक्बाधा, होउं नये ह्मणुनि लावि कज्जल तें. ४
नवल खरें स्वीय करीं, **इंद्रादि**—सुरां स्वयें सुधा पाजी,
थोड्या दुग्धासहि तो, आनंदें **नंदसूनु** हो राजी ! ५
स्तनपयमिषें विषातें, पाजी **कृष्णास पूतना** प्रखर,
तद्विष हरुनी तिजला, देई **हरि** अमृत ही करी अमर ! ६
अघनाशक **हरि** तेव्हां, नाशी **अघ** हें सुयुक्त त्यास असे,
तो वत्स—पाल असुनी मारी **वत्सास** चित्रं हें न कसें ? ७
संसारावर्तीं यन्मायेनें विश्व हें सदैव फिरे,

---

१ समुद्र २ दैत्य ३ दृष्ट ४ कृष्ण ५ अमृत, मोक्ष ६ पाप ७ अघासुर ८ योग्य वासरास, वत्सासुरास १० आश्चर्य ११ संसाररूप भोंवऱ्यांत १२ ज्याच्या मायेनें.

त्यास **तृणावर्त** नभीं, नेतां आवर्ती तो मरून तरे ! ८
जणुं कृष्णें कीं कराया, स्वयश; **श्रीकृष्णें**हनन करण्याला–
येतां **बक** तदसू हीं, स्वयशें तद्वर्णही हरी गमला. ९
लोकीं अनर्थ करिती द्विविधें वदूनी[9] द्विजिव्हं[10] ते फार,
हरि कालियास ह्मणुनी, **यमुना**डोहांतुनी करी दूर. १०
आश्चर्य होय ऐका, अच्छेद्याभेद्य[11] जें परब्रह्म,
त्याचे करांत धरुनी, गोपी टोचीच कर्ण तें जिह्म[12] ! ११
यन्मुखदर्शन होण्या, ब्रह्मादिक देव ही तपा करिती,
तद्वदनातें[13] चुंबिति, पुन:पुन्हां **गोपें**[14] आणि **गोपी**[15] ती ! १२
एकपदें[16] भू, दुसऱ्या पादें आकाश आक्रमीच **हरी**,
गोकुलिं रांगत असतां, नवल पहा तो पडेच भूमिवरी ! १३
मणिमय भूवरि **हरि** तो, खेळत असतां स्वबिंब पाहूनी–
घेतां करीं न येतां, रडे **यशोदा**मुखा विलोकूनी ! १४
त्यजुनि **हरीस यशोदा**, पडतां बाहेर **सच्चिदानन्दें**[17]–
आक्रंदत[18] तो मागें, जातां समजावि त्या अहा ! **नन्द** ! १५
आतां दुग्ध नसे बा, बोलुनि कामांत मग्न[19] हो **गोपी**,
कोपुनि **हरी** तदा तो, धुंडुनि दधि दुग्ध बालकांसह पी. १६
निगमागम[20] ज्यापासुनि झाले, विद्यानिधीस त्या **हरि**ला,
बोलायातें शिकविति गोपी वाटे विचित्र हें मजला. १७

---

१ ह्या नावाचा दैत्य २ भोंवऱ्यांत [वावटळींत] ३ काळें ४ कृष्णघात ५ बगळा, बकासुर ६ बकासुराचे प्राण ७ कृष्ण ८ बकाचा वर्ण [पांढरा वर्ण त्याच्या पांढऱ्या वर्णाचेंही आपल्या यशानें हरण केलें !] ९ दोन प्रकारचें १० चहाडखोर, सर्प ११ छेद व भेद करतां येत नाहीं असें १२ वाकडें [कानाचें विशे०] १३ त्याच्या मुखातें १४ नन्द १५ यशोदा १६ एक्या पावलानें १७ कृष्ण १८ रडत १९ गुंतून राहिलेली २० वेदशास्त्रें.

गीर्ष्पति[1]--**सरस्वतीतें**, येई वक्तृत्व यत्कृपालेशें,
बब्बा ! मम्मा ! ह्मणतां चुकतो **हरि** तो विचित्र मज भासे ! १८
वर्णिति वेद जयातें, **सूक्तीं**[2] व्यक्तच सहस्रपाद असें,
भिंती धरून चालत, असतां पडतो विचित्र हें न कसें ! १९
नंद--यशोदा यांनीं केलें किति तरि असे असें पुण्य,
[3]यद्गेहीं ब्रह्म पहा, खेळे स्वच्छन्द सच्चिदानन्द ! २०
त्या भाग्याची महती, वर्णावी किति तरी **यशोदेच्या**,
घालूनि मिठी कंठीं, निजे परब्रह्म तेविं **नंदाच्या**. २१
आत्माराम प्रभु **हरि**, स्वानंदीं मग्न नित्य जो तृप्त,
जननीस तो सकाळीं दीनापरि मागतोच [4]पर्युषित. २२
कितिदां तुज पय द्यावें, आतां नाहीं ह्मणून ती [5]दापी,
[6]तद्वसनातें धरुनी, रडतां; देई हसूनि त्या **गोपी** ! २३
नाचे **हरि** बा ! तुजला, देतें [7]नवनीत बोलता कोणी,
थय थय नाचे, हंसती गोपी पाहूनि देति त्या लोणी ! २४
[8]यन्नैवेद्योच्छिष्टा, इच्छिति **सनकादि**ही सुभक्तीनें,
तो प्रभु गोपी[9]चर्वित, मागे तांबूल हो प्रसक्तीनें ! २५
मोठी शेंडी होइल, पी पय सगळेंच बोलतां माता,
पीई शिखेस धरुनी, वाढत नाहीं ह्मणे कशी आंता ! २६
संपूर्ण बिंब [10]विधुचें, बघुनी **हरि** तो वदे अगे माते !
दे हा चेंडू सुंदर, [11]गगनोदरिं अडकला असे मातें. २७
भक्तांबरीष यातें, छळितां **दुर्वास** त्यास चक्रानें--
पळवी, **हरि** तो भेदुनि दधिघट, पळतो स्वमातृभीतीनें ! २८

---

१ बृहस्पति २ पुरुष सूक्तांत ३ ज्यांच्या घरीं ४ शिळें अन्न ५ दटावी यशोदेच्या वस्त्रातें ७ लोणी ८ कृष्णाच्या नैवेद्याचें उच्छिष्ट ९ यशोदेनें चावलेला [१]० चन्द्राचें ११ आकाशांत.

अंतकही यद्भक्ता, शक्त नसे बांधण्यास त्या **हरिला**–
दधि–दुग्ध–चौर्य–रुष्टा, बांधी उखळीस घट्ट ती अबेला ! २९
अगणित पुण्यांनींही, दृष्टि–पथा अवतरे न विश्वपती,
बघति उलूखलबद्ध प्रभुला गोपीहि गोप चित्रगती ! ३०
तूं मृत्तिकेस खाशी, सतत **यशोदा** ह्मणे **घनश्यामा** !
कोठें ? कधीं ? ह्मणूनी स्वोदरिं जननीस दावि तो महिमा ! ३१
भैव–तामस–दैत्येन्द्रें भीत अशा साधुच्या भयास हरी,
मातृभयें तोच तैंमीं, राहे घनरुक् दडून दस्युपरी ! ३२
संसृति–यंत्र–स्थापित, मायेनें ज्याचिया फिरे जग हें,
तो गोर्धनास चारित, गोपोक्तीनें **हरी** फिरत राहे ! ३३
यद्वक्रदृष्टियोगें थरथर कांपेच काळही प्रथित,
तो प्रभु **नंदाच्या** तैं, भीतीनें भीत होतसे बहुत ! ३४
क्षीरोदधींत निवसे, क्रीडाहि करी तयांत जो सतत,
तो **हरि** अल्पदुधास्तव, करितो गोपीस याचना हसत. ३५
यमनियम करुनि विजनीं, तप करणाऱ्यांस दृश्य जो नाहीं,
दधि–दुग्ध–चोर ह्मणुनी, दापिति गोपीहि गोप त्या पाहीं ! ३६
यत्सत्ता श्रुति वर्णिति, यद्भीनें वात, मित्रें, भू, फिरती,
चित्र गमे प्रभुवर तो, गोपोक्तीनें सकंप हो चित्तीं. ३७
गोपाल–बालकांचें दैव किती थोर ! वर्णवे न मला,
ब्रह्मशिवाद्यर्चितपद, भगवान् ज्यांच्या सवें करी लीला ! ३८
ज्याच्या संनिध बसण्या, अधिकार नसे सुरेश्वरा नाकीं,
त्याच्या पृष्ठीं बसुनी खेळति गोपाल चित्र ह्या लोकीं ! ३९

---

१ काळ २ यशोदा ३ संसाररूप तमोगुण विशिष्ट दैत्येंद्रानें ४ अंधारांत ५ मेघवर्ण ६ चोर ७ संसाररूप यंत्रांत ठेवलेलें ८ गाइच्या कळपास ९ नंदाच्या सांगण्यावरून १० क्षीर समुद्रांत ११ एकांतीं १२ ज्याच्या भीतीनें १३ सूर्य १४ स्वर्गात.

इंद्रादिलोकपालहि, **हरि**च्या आज्ञेस मानिती शिरसा,
गोपाज्ञेनें प्रभु तो चारी धेनू **व्रजांत**[1], भृत्यें[2] जसा ! ४०
रुष्टां गोपसख्यांतें, क्रीडा करितां, बघूनि **हरि** विनयें--
मधुरवचें समजावी, प्रत्येकां ब्रह्मरूप शांत नयें ! ४१
यज्ञांत याजकांहीं, आहूत[3] न येतसे हविर्ग्रहणा[4],
गोपसख्यां दध्योदन, तो प्रभु मागे स्वतां कितीक जणां ! ४२
क्षीरसमुद्रोद्भव त्या, कौस्तुभरत्नें तसा न संतुष्ट,
गोपालांनीं दिधल्या गुंजाभरणें जसा **हरी** तुष्ट. ४३
गोवर्धनासि[5] करि जो, त्याचा उद्धार करितसे खचित,
हें दाविण्या जणूं कीं, **गोवर्धन** उद्धरी[6] प्रभु प्रयत. ४४
निगमागमसंस्तुत जरि, करी शिर:कंप जो कधीं न **हरी**,
गोपालबालवचनीं, आनंदें तो पुन:पुन्हांच करी ! ४५
ब्रह्मादींची पूजा, न रुचे **हरि**तें तशी पहा त्रिदिवीं[7],
पल्लव--सुधा--तुगुच्छीं, गोपालांची जशी रुचेच भुवि ! ४६
मृदुंगी[8]--शेष--तल्पीं, पद्मालालित[9] निजे सुखें न तसा,
गोपालकंबलीं तो, रानीं निद्रा करी हरी जैसा ! ४७
गंधर्व--गायनानें, कौतुक न गमे **हरी**स हो तितुकें,
गोपालगाननादें, वाटे प्रभुला बनामधें जितुकें ! ४८
येद्गुणगणना करण्या[10], सहस्रमुख शेषही न शक्त[11] कधीं,
तो **हरि** गोपसख्यांचे अगणित गुण गातसे, जसा बंदी[12] ! ४९
ब्रह्मशिवेन्द्रा दुर्लभ ज्याचें दर्शन, असा **हरी** महितें[13],

---

१ गोकुल २ चाकर ३ बोलावलेला ४ यज्ञभाग घेण्यास ५ गाईंचें पोषण ६ उचली ७ स्वर्गांत ८ मऊ आहे अंग ज्याचें अशा शेषाच्या शय्येवर ९ लक्ष्मीनें सेवा केलेला १० ज्या कृष्णाच्या गुणांची गणना करण्यास ११ समर्थ १२ स्तुति-पाठक १३ पूज्य.

तो गोपदर्शनास्तव, उत्सुक **यमुना**तटीं वसे सतत ! ५०
ज्याच्या पदाप्तिसाठीं तप केलें किति तरीहि **पद्मेनें**,
त्या **कृष्णा**सह गोपी, करिती रासोत्सवास हर्षानें ! ५१
सकल--सुरासुर--मनुजां, स्वकर्मपाशीं निबद्ध नित्य करी,
तो गोपीकरपाशीं, नवल गमे हो स्वतांच बद्ध **हरी !** ५२
संपूर्ण विश्व ज्याच्या आज्ञेनें फिरतसे सदैव पहा,
तो **हरि** स्वतांच फिरतो, प्रेमानें गोप--मंडळींत अहा ! ५३
गोकुलवासिजनांच्या, भाग्यांसम भाग्य हो न कोणाचें,
नर नारी बाल जिथें, बघती आतृप्ति ब्रह्म तें साचे ! ५४
बालक--लीला--व्याजें, वधिले दुर्बुद्धि दैत्य ते बहुत,
मथुरेंतही **हरीनें**, झटतो भक्तावनार्थ जो सतत. ५५
स्वर्गादि--राज्य देण्या, शक्त असे ईश तो स्वभक्तांस,
तो **हरि** याची चंदन, चर्चित करण्या स्वमूर्ति **कुब्जेस !** ५६
विधि--शिव--देवेंद्रादिक, ठाकति ज्याच्या कृतांजैली पुढतीं,
तो **उग्रसेन**चरणा--पुढें उभा सांजैली, विचित्र गति. ५७
श्रुतिशास्त्रें ज्यापासुनि, **पितामहों** प्राप्त जाहलीं बहुत,
सांदीपनिगुरुची तो, विद्येस्तव चाकरी करी महित ! ५८
वृंदावनभूमिसमा, नान्या धन्या सुभूमि कोठेंही,
*भगवत्पादन्यासज, सुखलाभा तीच लाधली पाहीं ! ५९
धन्यच नद्यांत सगळ्या **यमुना** वाटे मला जरी कृष्णै,
यज्जलिं केली करुनी, गोगोपांसह रमे अहा ! **कृष्ण !** ६०
वृंदावनवृक्षांचा महिमा वर्णावया न **शेष** कैंती,
ज्यांच्या पल्लवपुष्पीं, भूषविली निज--तनू प्रभूनें ती ! ६१

---

१ पदप्राप्तीसाठीं २ रक्षणार्थ ३ हात जोडणारे ४ हात जोडून ५ ब्रह्मा ६ काळी ७ समर्थ * भगवंताचे पाय लागल्यामुळें झालेल्या.

कुंतलें[1]केशविराजित, पिच्छालंकृत[2] सुसक्त वेणुरवीं[3],
गोगोपांनीं वेष्टित, मन्मनिं विलसोच मूर्ति ती बरवी ! ६२
निर्देशैं[4]संगविरहित, अवतीर्ण[5] ब्रह्म पाहुनी लोकीं,
तत्संगति करण्यास्तव अवतरले गोपरूप सुरें[6] ते कीं. ६३
तन्नैं[7] न तें तें न असें, श्रुति त्या ब्रह्मास धुंडितां थकती,
गोकुलिं बघूनि जणुं त्या, गोपी होऊन त्यासवें रमती ! ६४
गोवत्सगोपपरिवृत, मुरली--धर सगुण रूप गाऊन,
तत्ध्यानांतचि माझें, मन हें राहो विलीन होऊन ! ६५
योगिध्येय अरूप, ब्रह्मीं वा पय जसें पयीं लीन,
होवो मन्मन, जैसा, जातो वा श्वास मारुतीं मिळुन ! ६६
श्री--नन्दनन्दनाचें[8] कृत, लघु[9] हें कुतुक--चरित प्रेमरसें,
सुखद[10] जगज्जनका[11] हो, शिशुचे कैसेहि बोल गोड जसे ! ६७
त्रेसष्टाव्या वर्षीं, अर्पण केली प्रभूस भक्तीनें,
हरिसुगुणार्यामाला, पारखिकुलजात पांडुरंगानें. ६८

———— पांडुरंग गोविंदशास्त्री पारखी.

शबरी.

श्लोक.

पूर्वी कधीं **शबरराय** वसे नृपाल,
सत्ता करी महिवरी; स्वबलें विशाल.
कन्या तयासि **शबरी** म्हणुनी सुरूप;
होतें तिचें परम सुंदर रम्य रूप. १

---

१ कुरळ्या केशांनीं सुशोभित २ मयूर पिच्छांनीं अलंकृत ३ पावा वाजविण्यांत ४ दाखवितां येणें ५ अवतरलेलें ६ देव ७ तें नाहीं, तें नाहीं, असें वेदांत ब्रह्माविषयीं वर्णन आहे ८ श्रीकृष्णाचें ९ लहान १० संतोष देणारें ११ जगाचा पिता ईश्वर (कृष्ण).

लक्ष्मी जशी भयद--सागर--मंथनांत,
झाली पहा प्रकट रूपवती जनांत;
मातंग--जातिंत तशी **शबरी** सुबाला.
पंकीं जसें जनन सुंदर पंकजाला. २

गेली तिची सुखद बाल्यदशा सरून;
तारुण्य रम्य शशिरामधिं संचरून--
स्वर्गांगनेसम दिसे, रमणीय बाला--
उत्फुल्ल जातिकलिकाच गमे मनाला. ३

शोभे सुहास्यमुखचंद्र, विशाल भाल,
पद्माक्ष, तें सरल नासिक, ओष्ठ लाल;
तारुण्य उन्नत उरोजहि दावितातीं,
सर्वांगसुंदर अशी युवती पहा ती. ४

लग्नासि योग्य तनुजा बघुनी पिताही,
शोधूनिया परम योग्य वरासि पाही.
केली त्वरें सकल सिद्ध तयें तयारी,
शृंगारिली स्वनगरी; गज अश्व भारी. ५

तैसे अनेक अज मांसल मत्त पुष्ट,
आणी निजाप्तसुहृदां करण्यासि तुष्ट;
कीं त्या अजा वधुनि मांसपदार्थ नाना,
अर्पूनि तुष्ट करणें सकळां जनांना. ६

एके दिनीं स्वजननीसमवेत बाळा--
होती गृहीं फिरत, तेंवि अजागणाला,
पाहे अकल्पित; पुसे जननीस तेव्हां--
कीं 'किन्निमित्त अजसंघ घरीं असे हा!' ७

माता वदे तव विवाहमहोत्सवार्थ,
पाचारिलें बहु जनांप्रति भोजनार्थ;
बाले ! अजा वधुनि त्या समयीं अनेक,
सुग्रास अन्न सकलांसि मिळेल देख. ८

वार्ता अशी पसरुनी श्रवणीं अघोर,
लोण्याहुनी मृदु दयार्द्र तसें उदार;
तच्चित्त तें कळवळे; नयनांबुधारा--
येती, अहा ! तळमळे स्वमनीं उदारा. ९

अन्याय कैंवि जगतीतलिं हाय ! चाले,
कीं हे वधार्थ पशु सिद्ध समस्त केले;
शिक्षार्ह काय घडला अपराध त्यांचा,
हा स्वार्थ त्यास नडला खलमानवांचा. १०

हे जीवजंतु अवघे परमेश्वरानें--
मायावशेंचि घडिले अपुल्या करानें,
काया अनेक दिसती परि एक जीव,
नाहीं तयांत लवमात्रहि भेद--भाव. ११

ऐसी असून करणी सम ईश्वराची,
दुर्बुद्धि आपपरबुद्धि पहा नराची;
होळी क्षुधा शमविण्या इतरा जिवांची--
हा हा ! कसे करिति; दुष्ट कृती तयांची. १२

ईशें जगीं अमित जीव पदार्थ नाना,
जे जे अनेकविध निर्मियले पहा ना,
ते सर्व मानवहितार्थ असाच भाव,
मानूनि मारिति तयांवरि लोक ताव. १३

माझा विवाह शुभमंगल होत आहे,
आनंद उत्सव पुरींत भरूनि राहे;
हा हा ! तशांत अज हे वध पावताती,
आहे खरोखर किती खल आत्म--जाती. १४

पापी तशी पतित नीच कशासि आलें--
जन्मासि ? कष्ट जननीस वृथाचि झाले !
माझ्यामुळें घडतसे इतरांसि ताप,
पूर्वी घडे मम करें बहु घोर पाप. १५

होईल लग्न तरि पातक ह्या वधाचें,
माथ्यावरी खचित येइल घोर साचें;
जेणेंकरून मम लग्न मुळीं न होय,
योजीन मी स्वहितकारक तो उपाय. १६

हें राज्य ! हे स्वजनबांधव ! ही सुखाशा,--
सोडूनि, तोडुनि समस्त असार--पाशा,
जावें प्रशांत रमणीय अशा वनांत,
ध्यावें **रमेश**पदपंकज तें मनांत. १७

ज्ञानप्रकाश अति उज्वळ तापहारी,
ऐसा मनांत पडतां सुख होय भारी;
अज्ञान सर्व **शबरी**--मनिंचें पळालें,
संमोह मीपण समस्त तिचें गळालें. १८

अज्ञानरूपतिमिरीं रत लोक झाले,
ऐशा निशासमयिं भाग्य तिचें उदेलें;
तोडूनि आप्तजन--पाश सती निघाली,
लोटांगणें **हरि**पदावरि चित्ति घाली. १९

उत्तुंग भव्य घनदाट सुवृक्षराजी,
देई न ठाव रविच्या किरणा सदा जी;
प्रेमें तया कवळिती स्वकरें लताही,
माया लता, पुरुष वृक्ष असेंचि पाही. २०

वृक्षांवरी मधुर मंजुळ गोड गाणीं—
गाती, मनीं स्तविति हे द्विज चक्रपाणी;
वाहे सुगंधमय चंचल शीत वारा,
सांगे जणू क्षणिक ऐहिक हा पसारा. ! २१

विस्तीर्ण सुंदर मनोहर ह्या वनांत,
पंपा सरोवर असे श्रुत जें जनांत;
त्याच्या सरीस न टिके कुणि जीवनांत,
होई सुधाहि अति लज्जित ती मनांत. २२

होता पवित्रतम आश्रम सन्मुनींचा,
जो घालवी सकल ताप दुरीं मनींचा;
जे घालिती प्रभुपदासि मिठी सदैव,
ते तापसी वसति तेथ महानुभाव. २३

आत्मस्वरूप—रत संतत निर्विकारी,
आनंदमग्न भवपीडित—तापहारी;
निर्द्वंद्व निर्मम तपश्चरणानुरक्त,
ऐसे मुनी करिति वास अनंत भक्त. २४

सोडूनि वैर मृग व्याघ्र तिथें रहाती,
पक्षीहि ईशगुणगीत अगम्य गाती;
पुष्पें फलें तरुगणावरि सार्वकाल,
ऐसा पवित्रतम आश्रम तो विशाल. २५

पुण्याश्रमासि **शबरी** बहु रम्य पावे,
वंदी महामुनिपदांबुजयुग्म भावें;
आधींच होय सति शुद्ध निजानुतापें,
झालीं तिचीं सकल भस्म अनेक पापें. २६

पुण्याश्रमीं मुनिमुखोद्भव बोधरूप,
प्याली सुधारस सती **शबरी** अमूप;
सर्वांगशुद्ध सति होय, पळे अहंता;
चित्तीं करी स्मरण पूजुनि ती अनंता. २७

आत्मस्वरूप दिसलें पडला प्रकाश,
आनंद पूर्ण भरला करि पूरिताश;
घेई मुखें सतत ती प्रभु**राम**नाम,
ती आठवी घडिघडी हृदयाभिराम. २८

भेटेल **राम** कधिं या मज पापिणीतें—
हा ध्यास घे; सतत आठवि रूपही तें,
तद्भाव शुद्ध मनिंचा निरखूनि, **राम**—
भेटावया तिजसि जाय मनोभिराम. २९

उत्फुल्ल हास्यमुख नीरदनीलकांती,
आजानुबाहु कमलाक्ष शिरीं जटा ती;
शोभे चतुर्भुज **रमाधव रामराय**,
तें पाहुनी सगुणरूप न हर्ष माय. ३०

तद्दर्शनें विसरली सति देहभान,
पादांबुजीं भ्रमरसी मग होय लीन;
न्हाणी पदांबुज सती निज अश्रुनीरें,
ती दर्शनें सुखविली **रघुरायवीरें**. ३१

श्रीरामदर्शन तिला करि रामरूप,
सद्ब्रह्मसौख्यरस चित्तिं भरे अमूप;
त्यागूनि हा जड अचेतन देह, गेली–
आनंदसागरजलीं; चिरकाल ठेली.
जो शुद्ध भाव धरुनी निज अंतरांत,
ध्यातो सदैव रघुनायक लोकनाथ;
देईल दर्शन रमापति शीघ्र त्यास,
दावील थोर गति तोडिल सर्व पाश.

——— कै. नारायण श्रीनिवास निपाणीक

ईशप्रार्थना.

आर्या.

ईशा ! त्वत्पदवातहि करी रजातें गिरी, गिरीस रज;
ऐसें सामर्थ्य तुझें मंदातें वर्णवेल केविं मज ?
बहु अडखळे पडे तरि जाया करि यत्न बाळ आइकडे,
तेविं तुजकडे मी; परि धीपदिं रुतती कुभावरूप खडे.
मी अज्ञ दुष्ट भारी यास्तव करुणाकरा ! नको दवडूं;
अज्ञान दूर करुनी, करिं मज लागेनसा तुला अवडूं.
ज्या शैशवांत मानस शुद्ध असे जेविं वस्त्र तें कोरें,
न कळुनि कळूनि त्यांतहि जोडिलिं मीं बहुत पातकें घोरें.
येतां यौवन झालों अंध, ज्ञानांजनास लेववि़लें–
त्वां, ! तरि बळेंचि दुष्टें विषयें अहितचि करांत घेवविलें.
या कामा अनुसरले त्यांतें यानें समूळ नागविलें,
तरि त्यांपुढें न चाले ज्यांनीं चित्ता सदैव जागविलें.

या किंचिज्ज्ञानानें देवा ! मी मत्त दंतिसा झालों,
जें मद्धितार्थ दिधलें घालुनि तें कर्दमीं न दे हालों. ७
केलें कदा न पूजन भावें, तैसें प्रभो ! पदस्मरण;
'होइन हततेज' ह्मणुनि गर्व नरा पाडि काय विस्मरण. ८
जो **कोप** शांतिसुरभि त्यजुनी, चिंताशुनी गृहीं पाळी,
तो मद्देहीं नांदे; यास्तव गुणगण पहा मला टाळी ! ९
'मी बल तुह्मांस देतों' **कोप** असें सांगतो जनां वाटे,
परि तत्करणी देखुनि वज्रहृदयदुष्टही मनीं फाटे. १०
दावुनि माया बहुपरि निरीहसन्मनहि **लोभ** हा भुलवी,
मग पापपंकिं लोटुनि कोंडी, गज खंदकीं, तसाच भवीं. ११
मत्सर आधीं ह्मणतो 'सर सौख्यापासुनी जगा दूर.'
तुजविण कोण निवारी दुःखनदीचा असह्य हा पूर. १२
हा **मोह** पाश घालुनि धीवर मीना तसा मना धरितो,
ह्मणतो 'सुखार्थ तुमच्या झटतों' परि देह सर्व नासवि तो. १३
ऐसे हे **षडरि** जगीं होउनि उन्मत्त गांजिती विश्वा,
वंचक, भला न जाणुनि पिसाळलेला डसेच जेविं श्वा. १४
जी विश्वाची रचना केली त्वां सर्वपूर्ण सुविचारें,
ती हे स्वराज्य मानुनि विघडिति पाहें बळेंचि अविचारें. १५
अति चंचल वात ह्मणति, परि तो यत्नें जनांस आकळतो,
अनिवार खरें मन हें, येणें जन सर्वथा मळें मळतो. १६
ओढाळ धेनु जेवीं तोडुनि बंधन पळावया पाहे,
तेवीं अनंत विषयां देखुनि सुस्थिर कधीं न मति राहे. १७
त्वच्चरितामृत वाटे रोग्याला अहित जेविं ते काढे,
पटु वैद्य तूंचि देवा ! दुरवाया अरुचि जी मनीं वाढे. १८
चरिता अमृतासम मी वदलों, बहु माधुरी परी याची;

या सेवायास्तव तुज नाकींही जन्म भूवरी याची. १९
वाचस्पतीस मूढें तैसें म्यां तुजसि काय शिकवावें ?
जरि धन्वंतरि जाणे तरि रुग्णें भावनेस कळवावें. २०
सर्वज्ञा ! सर्वेशा ! जोडुनिया हस्त याचितों तुजला,
दुस्तर भव हा उतरीं, घ्यासें तव वत्स हा असे सुजला. २१
सुशद्बसुमें उसनीं । तुजपासूनि घेऊनी,
अर्पिलीं तुझ्या चरणीं । म्यां दीनें परमेश्वरा. २२

बा. सी. जोशी.

कवींच्या संमेलनास निरोप.

जळगांव येथें जें कवींचें संमेलन भरलें होतें त्यावेळीं कवयित्री सौ. लक्ष्मीबाई टिळक याणीं एक निरोप पाठविला तो येणेंप्रमाणें:—

पद.

ह्या काव्यतरूची छाया शीतळ भारी
तुह्मि कवी फुलें हो ह्या तरुवरचीं सारीं ॥ धृ० ॥
तुह्मि हसतां, हसती सृष्टि सर्व नरनारी;
तुह्मि कोपुन जातां जगीं खिन्नता सारी !
हा सुगंध तुमचा व्यापि दिशांना चारी
मग वाटे भरलें सुखच जगामाझारीं
हे रसज्ञ मंजुळ गीते । गाउनी
हे तुमच्या भोंतीं भोंतीं । हिंडुनी
हे तुमच्या गोड रसातें । चाखुनी
ह्मणतात जगाला ह्याच फुलांमाझारीं
अह्मि जन्म घालवूं हेंच सौख्य संसारीं १

अजि त्याच फुलांचें संमेलन हें झालें,
हा हार पाहुनी नाथ जगाचा डोले;
या पुण्यसंगमा येउन असतें नमिलें,
परि दैव आडवें मज दीनेला झालें.
ध्या नमस्कार मम ध्या हो । मानुनी
तरि हाच मला हो लाहो । जन्मुनी
संबंध कवींनो राहो । ह्या जनीं
मी बहीण, आपण भाउ सखे कैवारी--
कवि तुह्मी, भिकारिण मी तुमच्या हो दारीं. २

कविवृंदाची गरीब बहीण
लक्ष्मीबाई टिळक.

उत्तर.

' सौ. लक्ष्मीबाई टिळक यानीं वरील **कविसंमेलनास** पाठविलेल्या पत्रिकेस उत्तर. '

पद.

(चालः— चंद्रकांत राजाची कन्या.)

प्रेमभरें त्वां प्रेमललिखिता पतिसह धाडियलें,
विमलमनें तें वाचुनि बघतां हर्षित मन झालें. ॥ धृ० ॥
परिचय बाह्यात्कारीं नाहीं, नसो भगिनि ! अपुला;
अंतर्यामीं पटेल ओळख ऐशी खुण तुजला-- १
देतों मी गे; ज्या देवीला सेविसि तूं साची,
प्रेमानंदें करी भक्ति मी त्याच शारदेची. २
पत्रांतरिं तूं स्वतांस ह्मटलें दीन भिकारीण,
कारण याचें नुमजे मजला होतें मन खिन्न. ३

कविता--देवी--भाल--लग्नशा तिलकासम जगतीं
शोभे तव पति कवि**नारायण** धवल--विशद--कीर्ती ४
काय कमी गे भगिनी तुज तूं असून कवयित्री
वर्णालंकृत तव कविता मज भासे सुखदात्री ५
शांतमनानें करीं विचारा असशी तूं ' राणी '
' राजा ' तैसा भर्ता तव गे सत्य न का वाणी ६
सुंदर पुष्पित लताकुंज हे अपुले प्रासाद
उदात्त तैसे विचार खासे हेच उंच सौध ७
तारान्वित हे नीलांबर गे छत या सदनाचें
सूर्य चंद्र हे दीप उजळले वारिति तम साचें ८
जाई बकुली मधुर मालती सखिजन हा भासे
गुलाब चंदन च्युत चंपक वा सेवक तव तैसे ९
कोकिल भुंगे मयूर रावे स्तुति--पाठक जाण
भू--जल कमलें वन्य सुमें हीं अलंकार मान १०
श्वेतांबुद जो विलसे गगनीं रथ तो तव गमतो
पवनजवन हा वारु तसा गे त्रैलोकीं पळतो ११
उज्ज्वल काव्यप्रतिभाशाल्द हा तूं कटिं कससी
भव्य कल्पना हीच कंचुकी अंगीं तूं लेशी १२
वैभव तव हें विशाल ऐसें पाहुनि नृप--रमणी
करतिल हेवा तुझा सदा त्या होउनि खिन्न मनीं १३
सर्वेंचि तुजला गोष्ट दुजी मी कथितों अवधान
देईं; लक्ष्मी सरस्वतीची कट्टी वैरीण १४
मोदबधु हा अपुला तैसा शांतिबहिण विमले
काय कमी गे जगतीं अपुणां दुःखें जरि भरलें ॥ प्रेमभरें० ॥ १५

९--३--१९०७ अनंततनय.

सुभाषित.

श्लोक.

गंगेस शंकर शिरीं जरि नित्य ठेवी
त्याचें कधींहि मुखचुंबन ती न सेवी
रत्नाकरास परि चुंबि सहस्रदा ती
श्रीमन्नरास तरुणी अनुकूल होती १

कालत्रयीं सम, जयास न नाश पाहीं
ज्याला शिवे न सहसा अघ केधवांही
चैतन्यरूप विलसे त्रिजगीं जयाचें
आधीं मला स्मरण होय न कां तयाचें ! २

वन्दीन मी चरणपंकज मोरयाचे
विघ्नांबुधीस करि जें बहु शुष्क साचें
भक्तांस जें सुरतरूसम दे फळाला
नाशीतसें सतत जें अवघ्या खळांला ३

द्यायास अर्घ्य रविला जल घे करांत
गौरी मुखास बघता शिव होय त्यांत
कांपूनि हात गळुनी तंव जाय पाणी
आश्चर्ययुक्त शिव आठवुं तो स्ववाणी ४

घाली मिठी गिरिसुता शिवकंठनालीं
मूर्च्छा क्षणैक हरुषें तिजलागिं आली
वाटे हलाहलगुणें जणुं माद आला
मी वंदितों प्रथम त्या गिरिशप्रियेला ५

मोरो गणेश लोंढे.

काव्यरत्नावलि.

अंक ४ था.

मेघनादवधकाव्य.

सर्ग ८ वा.

लक्ष्मण मूर्च्छित पडलेला पाहून **रामा**चा विलाप. व **पार्वती**चा विषाद. **शंकर पार्वती**चें सांत्वन करितो. **रामा**नें यमनगरीस जावें अशी **शंकरा**ची आज्ञा. **पार्वती**कडून **मायेस** पाचारण. **माया रामास** घेऊन यमपुरीस जाते. **राम** निरनिराळे नरक पाहतो. त्यास प्रेतलोकांची भेट. **श्रीराम जटायू**ला भेटतो. **रामास दिलीप, नहूष** वगैरे राजांचें दर्शन होतें. **दशरथाचें रामास** दर्शन. **दशरथ** संजीवनी औषध **रामास** सांगतो. **राम मायेसह लंकेस** परत येतो.

आर्या.

भूप जसा कार्यान्तीं काढुनि मुकुट स्वमंदिरीं ठेवी,
अस्ताचलीं दिनान्तीं रवि तेजोरूप मंडना तेवीं. १

घेऊनि तारकादल आली नव यामिनी विलासवती,
ये कांत शांत शशधर मधुर सुधाबिंदु ज्यांतुनी स्रवती. २

होते रणभूमीवर धगधगले प्रखर वन्हिचे राशि,
पडला मूर्च्छित **लक्ष्मण राम** बसे रक्षणार्थ त्यापाशीं. ३

नयनाश्रु **राघवाचे** गळती रक्ताक्त बंधुच्या भालीं,
वाटे जल मेघाचें गैरिकयुत गिरिवरी पडे खालीं. ४

---

१ रात्र. २ काव.

पाहुनि दुःखी प्रभुतें, झालें रघुसैन्य सर्व शून्यमन;
अंगद नल नील हनू करिती किंकार्यमूढसे भ्रमण. ५
" आलों जैं बनवासा आशांवर सर्व सोडुनी पाणी,
बा! **लक्ष्मणा!** अहर्निश मजला जपलास तूं धनुःपाणि. ६
रात्रीं पर्णकुटीच्या द्वारीं जागृत सदैव बसलास,
दिसलास मत्परायण तेव्हां, कां सांग आज रुसलास. ७
वत्सा! ऊठ द्रुतगतिं, किति पडुनी राहशील भूवरतीं;
रक्षील कोण मातें करिशी कां मजवरी दया परती. ८
अपराध काय ऐसा घडला वद बांधवा! मजकडून?
बघसी अंत किती बा! ऊठ झणी भेट ये कडकडून. ९
पात्र जरी मी दोषा, योषा माझी न सत्य अपराधी,
रडते तूतें स्मरुनी, विसरशि कां तिज धरूनि अपरा धी. १०
मातेसम मान जिला आदरपूर्वक दिला तुवां नित्य,
कैसी उपेक्षिसी तिज वर्तन हें उचित का तुला सत्य? ११
पडली कारागारीं रघुकुलनारी न का तुला स्मरण?
शयन न योग्य तुला हें केल्याविण शत्रुचें रणीं हनन. १२
हे! रघुकुलजयकेतो! रणधीरा! ऊठ रे! महाबाहो,!
तुजविण मी एकाकी शत्रूतें संगरीं कसा साहों. १३
समरक्लांत जरी तूं असती, होऊं त्वरेंच रणविरत;
सीतोद्धार नको तो, चल जाऊं फिरुनि काननीं परत. १४
सुतवत्सला! **सुमित्रा शरयूतीरीं** करी सदा रुदन,
तुजविण कसें तिला मी जाऊनी परत; दाखवूं वदन. १५
नागरिकां काय कथूं, कैसा मी **ऊर्मिलेस** समजाऊं;
भाऊ तूं प्राणप्रिय तुजविण भवभार मी कसा वाहूं? १६

---

१ काय करावें हें न सुचल्यामुळें झालेले मूढ. २ विन्मुख. ३ स्त्री. ४ चिन्ह.

वर्षुनि शिशिरासारा करिसि सुमें फुल्ल तूं निदाघार्त,
म्लानप्राणसुमातें जीववि गे ! रजनि तूं सुधा मूर्त. १७
हे ! अमृतकरा ! चंद्रा ! कवि तुज संबोधिती सुधासिंधु,
माझ्या प्रियतम अनुजा दे जीवन सिंचुनी सुधाबिंदु. ! १८
अंकीं घेउनि अनुजा **राम** करी यापरी विलापाला,
झाला दारुण दु:खें वानरचमुभार शुष्कसा पाला. १९
कैलासीं **शैलसुता** **रघु**दु:खें व्याकुला मनीं झाली,
पत्रीं[1] हिम, अश्रु तसे गळती **शिव**पदसरोरुहीं खालीं. २०
रुद्रें पुसतां **गौरी** वदली " ठावें तुह्मां न का नाथा !
आक्रोशा **राम** करी **लक्ष्मण** मूर्च्छित रणांगणीं होतां. २१
झालें अस्थिर हृदयीं करितां आक्रोश दीन **रामानें**,
पूजील[2] कोण आतां मजला नाथा ! जगांत सन्मानें. २२
अपराध कीं जहाला केला मज ह्मणुनि दण्ड हा वाटे,
वदुनि असें, स्तब्ध बसे; अश्रूंचा पूर लोचनीं लोटे. २३
हांसुनिया **शिव** वदला तुजला शोका नसे पुरें काज,
प्रेरीं तूं **श्रीरामा मायेस**ह यमपुरा त्वरें आज. २४
जाईल मत्प्रसादें यमलोकीं तो सदेह **रघुनाथ**,
कैसा सजीव **लक्ष्मण** होय पुन्हां कथिल त्यास तत्तात २५
दे हा त्रिशूल माझा **माये**तें सोड सुंदरी चिंता,
उजळील हा स्वतेजें यमलोका दीपसा तमोहन्ता. २६
कैलासीं **मायेचें** स्वमनीं **कौत्यायनी** करी स्मरण,
अविलंबें येउनि ती अंबेचे मोहिनी धरी चरण. २७
आर्या[3] ह्मणे तियेला " **माये लंकापुरी**स तूं जाईं,

---

१ दवांचे थेंब. २ माझा दास राम संकटांत पडल्यावर माझी प्रभु ती काय राहिली असा पार्वतीचा बोलण्याचा भाव. ३ पार्वती.

शोकव्याकुल **रामा** यमलोका सत्वरीं सर्वे नेई. २८
लक्ष्मण वीर दुजेही जे जे समरांत पावले पतन,
फिरुनी उठतील कसे **दशरथ** तें करिल गे ! तुझां कथन. २९
घे हा त्रिशूल हातीं दाविल तो दीपसा तुला वाट, "
ह्मणुनि बरें वायुपथें **माया लंके**स जाय तैं थेट. ३०
शोक पुरे **श्रीरामा !** स्नान करीं ऊठ यमपुरा जाऊं,
दशरथ कथील तूतें फिरुनी कैसा उठे तुझा भाऊ. ३१
चल रे ! पातालपथें येत्यें मी मार्ग तुजसि दावाया,
श्रीरामकर्णविवरीं वचन असें हळुच बोलली **माया**. ३२
स्नान करी विमल जळीं वीरोचित भूषणें शिरीं घाली,
क्रमण्या पाताळपथा **मायेसह राम** उतरला खालीं. ३३
मार्ग क्रमितां सहसा श्रवण करी घोर गर्जना राय,
वाटे कीं कोपानें शतसागर फार खवळले काय. ! ३४
जातां पुढतीं **राघव** घोर पुरी चिरनिशावृता[1] पाहे,
नादवती **वैतरणी** परिखारूपें[2] सभोंवतीं वाहे. ३५
लाटेमागुनि उसळे लाट, जसें दुग्ध तापलें होतें;
आकाश शून्य सारें रविशशितारे न चमकती तेथें. ३६
गर्जे घोर बलाहक[3], चमके चपला धनंजयप्रखरा[4];
प्रलयीं **शिव**धनु तैसें **इंद्रा**युध भासलें तदा नृवरा. ३७
पाहे **राघव** सेतू अत्यद्भुत विस्मयें नदीपृष्ठीं,
अग्निप्रभ, धूमावृत केव्हां दिपवी स्वकांतिनें दृष्टि. ३८
सेतूकडे सदोदित लक्षावधि विविध धांवती प्राणी,
हाहा:कारा कांहीं करिती; आनंद मानिती कोणी. ३९
राघव मायेस पुसे " रूपें हा भिन्न कां धरी सेतू,

१ कायमची काळोखी रात्र जेथें आहे. २ मर्यादा. ३ मेघ. ४ अग्निमुळें तेज:पुंज.

प्राणीपतंग धांवुनि यावर जाती कळे न मज हेतू. ४०
रघुनाथा ! सेतू हा स्वेच्छारूपी वदे तदा **माया**,
पाप्यां धूमावृत हा, पुण्यजनां स्वर्गमार्गसा राया. ४१
कर्मफला भोगाया प्राणी जे यमपुरीसं येतात,
त्यांतुनि धार्मिक सत्वर उल्लंघुनि सेतु पैलं जातात. ४२
पापी धडफड करिती जाया रात्रंदिनीं नदापार,
पुलिनीं सलिलीं त्यांतें देती यमदूत यातना फार. ४३
चल मत्संगें आतां **रघुनाथा !** दाविल्यें तुला नाना–
अद्भुत मी देखावे, शक्य न जे पाहणें कधीं कोणा. ४४
माया दीपशिखेसम जाय पुढें, अनुसरे तिला राय;
मार्गी **राघव** पाही भीषण यमदूत अद्रिसम काय. ४५
कोण तुह्मीं, बल तुमचें काय, कशीं हो सदेह आलांत,
बोला यमयूत ह्मणे, नाहीं तर होय निश्चयें घात. ४६
हांसुनि **माया** दावी दूता **शिव**दत्त तो त्रिशूल क्षणी,
पाहुनि त्या दूर पळे दूत; जसा खगवरा बघूनि फणी. ४७
आयासैविण दोघें **वैतरणीच्या** पहोंचलीं पार.
रघुपति सन्मुख पाहे नगरीचें भव्य आयस द्वार. ४८
प्रक्षुब्ध अग्निकुंडें धगधगलीं सर्वदा सभोंवार,
आग्नेयं अक्षरांहीं लिहिलें हें तोरणावरी सार– ४९
"मार्गीतुनि या जाई पापी चिरदुःखभोग भोगाया,
प्राण्या ! तूं पूर्वाशा सोडुनि हो सिद्ध येथुनी जाया." ५०
रघुनाथें रोगज्वर भयहारक पाहिला उभा द्वारीं,
कांपे थरथर शीतें दाहें संतत हो कधीं भारी. ५१
पित्त श्लेष्मा वायू धेरी त्यातें हरूनि तज्ज्ञान,

१ पलीकडे. २ वाळवंटावर. ३ श्रमावांचून. ४ लोखंडी. ५ अग्निमय.

बैसे अजीर्ण सन्निध खाण्याविण अन्य ज्या नसे भान. ५२
फिरवित गरगर डोळे बसला जवळी विमूढ उन्माद,
हांसे, रडे, कधीं तर नाचतसे, गातसे, करी वाद. ५३
विगलितदेह शवासम बसला दुर्दान्त काम तन्निकट,
शेजारीं श्वास बसे दुस्तर यक्ष्मा[1] विषूचिका[2] विकट. ५४
ऐसे असंख्य भीषण दूत यमाचे चहूंकडे फिरती,
पाहुनि त्यांस जहाला विस्मित चित्तीं क्षणैक **दाशरथी**. ५५
त्यास वदे तैं **माया** " **रघुराया** चल झणी कृतांतपुरीं,
दाखवितें प्राणीगण कालक्षेप स्वकीय केंवि करी. ५६
ऋतुराज वसंत जणो दावानलदग्ध काननीं शिरला,
राम तसा यमनगरीं गेला तम घोर त्या स्थलीं भरला. ५७
स्थलजलकंपन होई, आर्तस्वन चालला सभोंवार,
कालानैल[3] घनें[4] वमैती[5] भ्रमती दुर्गंधि वायुही फार. ५८
कांहीं कालें पाही विस्तीर्ण न्हैंद[6] समोर **रघुराय**,
प्राणी असंख्य बुडती तडफडुनी त्यांत वदत हा! हाय! ५९
माया वदे विषादें " रौरव[7] हें नाम या न्हदा साजे,
येती या नरकातें दुर्मति हरितात परधना जे जे ६०
चाल पुढें नरक पहा हा कुंभीपाक तूं दुजा राया,
यमदूत तप्ततैलीं तळती पापीजनांस या ठायां. ६१
जोडुनि कर **राम** वदे बघवे परदुःख मजसि साचें न,
आणिक पाहीन जरी माते! मी क्षणभरी न वांचेन! ६२
स्वेच्छेनें संसारीं प्राणी कोणीहि ये न जन्मास,
शिवशिव परतंत्र खरा कर्माचा मनुज सर्वदा दास. ६३
परिसुनि **रघुनाथाचें** वच, उत्तर दे तया तदा **माया**,

१ क्षय. २ महामारी. ३ अग्नि. ४ मेघ. ५ टाकिती. ६ सरोवर. ७ नरकाचें नांव.

" भवविष जरीहि मारक आहे भेषज तया निवाराया. ६४
घालुनि धर्मकवचा कर्मक्षेत्रीं सदैव जो वागे,
अनुरागें त्या बघती हांकेला देव त्याचिया जागे. ६५
दण्डस्थल हें पाहुनि जर होती मानसा तुझ्या कष्ट,
वदली **माया** चल तूं सत्वर येथूनि हे **रघुश्रेष्ठ**." ६६
मार्ग क्रमितां पाहे **जनक**सुताकांत घोर कांतार,
नीरव[1] असीम जेथें पक्षी करिती कधीं न संचार. ६७
फुलती सुमें न तेथें, वन्यलतांवर न वायुही फिरती;
तरुपर्णपुंज भेदुनि कष्टें रविरश्मि त्या वनीं शिरती. ६८
जमले असंख्य सहसा **श्रीरामा**भोंवती तदा प्राणी—
मधुपात्रीं मक्षिकसे, पुसिती दीनस्वरें तया कोणी. ६९
" तूं कोण देहधारी असशी बा मनुज देव किन्नर कीं,
आलास कासया तूं वरपुरुषा ! सांग या महानरकीं. ७०
आल्यापासुनि येथें आयकिली कधिं न मानवी वाणी,
आह्मीं तव सौंदर्यें धालों; ध्वनि परि तुझा पडो कानीं " ७१
उत्तर दे प्रेतकुला रक्षोरिपु ' **रघुकुलांत** जनुं[2] माझें,
दशरथ कौसल्याहीं मत्पितरें **राम** नाम मज साजे. ७२
हतभागी वनवासी आलों पितरां स्वर्कीय भेटाया,
आज्ञा होय **शिवा**ची ह्मणवुनि मी पातलों अशा ठायां. ७३
वदला एक प्राणी शूरेन्द्रा ! असिस तूं मला ज्ञात,
पंचवटीकांतारीं तवशरहत जाहलों असें प्रेत ! ७४
तनुहीना **मारीचा** ओळखुनी विस्मया करी **राम**,
त्यास पुसे " सांग मला येण्याचें काय या स्थलीं काम. " ७५
" दुर्मति **पौलस्त्य**[3] खरा, झटलों तत्पापकार्य साधाया,

---

१ शब्दहीन. २ जन्म. ३ रावण.

वंचियलें तुज वायां; दुर्गति ही ह्मणुनि ये मला राया." ७६
खरसह दूषण आला फिरला **रामा** बघूनि माघारा,
विषदंतहीन जैसा अहि[1] नकुला पाहतां न घे थारा. ७७
भैरवरव हो सहसा, आले यमदूत, पाहतां सारे--
जाती प्रेत पळोनी, तरुपर्णें शुष्क, वाहतां वारे. ७८
कांहीं काळें वाणी आर्ता कर्णीं प्रभूचिया आली,
पाहे सन्मुख नारी निष्प्रभ; जणु तारका उषःकालीं. ७९
" सोडूनि धर्मभीती मुग्ध करायास तरुणजन कामी,
हरहर ! परोपरीनें भूषविला कचकलाप हा आह्मीं. ८०
घालुनि मुक्तामाला भूषविलें या उरःस्थला रुचिर,
नयनीं लेवुनि कज्जल तरुणांवर फेंकिले कटाक्षशर. ८१
अमुच्या सौंदर्याचा व्हावा हा का असा पुरस्कार[2],
तें स्वर्गसौख्य कोठें, कोठें हा नरकवास लाचार." ८२
होत्या परोपरीनें निंदित वामा स्वभागधेयाला[3],
पाहुनि समूह त्यांचा क्षण विस्मयमग्न भूपती झाला. ८३
सुंदर ललनांचा मग **राघव** पाहे पुढें दुजा संघ,
सौंदर्यसंपदा ती बघतां होईल कामही गुंग. ८४
परिमलमय कुसुमांहीं होता तत्केशभार भूषविला,
त्यांचें तें नयनद्वय विद्युत्तेजापरी वमे छविला. ८५
कोमल अधर तयांचा मधुर सुधेनें दिसे सदा ओला,
तत्कंबु[4]कंठदेशीं रत्नांचा हार घेतसे झोला. ८६
विरलस्वर्णावरण[5]स्फुट कुचरुचि चेतवी मनीं काम,
कदलीसमान कोमल ऊरुद्वय[6] मध्य[7] सूक्ष्म अभिराम[8]. ८७

---

१ साप. २ सत्कार, आदर. ३ आपल्या नशिबाला. ४ शंखासारखी सुंदर मान. ५ वस्त्र. ६ मांड्या. ७ कमर. ८ सुंदर.

वाजति नूपुर चरणीं, श्रुतिमोहक मेखला कटिप्रांतीं;
वीणा मृदंग वाद्यें वाजति, रमती समस्त संगीतीं. ८८
इतुक्यांत पुरुष आले हांसत हांसत अनेक बाहेरी,
सौंदर्यें मूर्तचि ते मन्मथसे, **रघुपती** तयां हेरी. ८९
त्या मूर्त मन्मथांतें पाहुनि झाल्या स्त्रिया गलितभान,
नरही मुग्ध जहाले; गेला त्यांचा लयास अभिमान. ९०
हंस रमे हंसीशीं, रसिकहि घेऊनि जेविं रसिकेला;
तैशा त्या नरनारी रमल्या, त्यांचा विवेक दुरि गेला. ९१
झगडे नार नरासह पाहुनि यमदूत मुद्गरा हाणी,
अवलोकुनि देखावा **माया रामा**प्रती वदे वाणी. ९२
वत्सा ! हीं स्त्रीपुरुषें होउनि कामार्त नित्य संसारीं,
रमलीं स्वच्छंदानें, पापाची भीति सोडुनी सारी. ९३
विधिनें दिधली ह्मणुनी शिक्षा ही त्यांस नरकवासाची,
मरणोत्तर गति ऐशी लाभे कामान्ध मानवा साची. ९४
तारुण्यीं अन्यायें निजसामर्थ्यव्ययास जे करिती,
वार्धक्यीं दीन दशा ये त्यांतें; कृति तशी फळें वरिती. ९५
" गोष्टी अनेक अद्भुत पाहियल्या तव कृपेमुळें माते !–
राम ह्मणे, पूर्णपणें कवण असे क्षम वदावया त्यांतें. ९६
कोठें राजर्षि परी वास करी, सांग तूं मला माते; !
उज्जीवन अनुजाचें होय कसें, हें पुसेन मी त्यातें. " ९७
हांसुनि **माया** वदली नगरी विस्तीर्ण फार याहून,
फिरलों द्वादश वर्षे होईल तरी पुरी न पाहून. ९८
पूर्वद्वारीं करिती पतिसह सौख्यें पतिव्रता वास,
हर्म्यें मनोहर त्यांचा स्वर्गीं मर्त्यीं तुळे नसे त्यास. ९९

---
१ मदन. २ तुलना.

तेथें हर्म्यामागें फुलती कमलें विशाल कासारीं,
वाहे वासंतानिल संतत पिकें कूजिती मनोहारि. १००
वीणा मृदंग मुरली वाद्यांचा चालला सदा गजर,
दधिघृतदुग्धमधूंचीं कारंजीं नाचती सुधामधुर. १०१
तेथें आपण होउनि सकलां परमान्नें अन्नदा देई,
उद्यानपादपांतें अमृतफळांचा सदैव भर येई. १०२
जें लेह्य पेय अथवा लागतसे चोष्य चर्व्य सेवाया,
तें लाधतें सकलही श्रम केल्यावांचुनी तया ठायां. १०३
तेथें काज न जाया, चल राया! शीघ्र उत्तरद्वारीं;
फिरुनी क्षणभर मग तूं हर्षें जनकास आपुल्या हेरी. १०४
वदुनि असें मग **माया** रायासह चालली पथ क्रमित,
वैदेहीनाथ बघे मार्गीं तों वंर्ध्य दग्ध नगें अमित. १०५
उत्तुंगशृंग कांहीं राही ज्यांवर सदैव हिम दाट,
कांहीं ज्वालाग्राही; होई ज्यांतूनि अग्निचा स्फोट. १०६
पाहे पुढें तडागा सागरसम जो प्रचंड विस्तीर्ण,
भीषण भेकें महोरगें वृश्चिक झर्ष घोर जलचराकीर्ण. १०७
पापी जलाशयीं या रात्रंदिन दीन होउनी भ्रमती,
त्यांची विलापवाणी कानीं येतां द्रवेल दुष्टमति. १०८
स्वग्रामासन्निध ये नाविक जैं करुनि दीर्घ जलयात्रा,
परिचित भूमि बघोनी येई नवशक्ति त्याचिया गात्रां. १०९
पूर्वानुभूत गानें पक्ष्यांची पूर्वदृष्ट तरुराजी,
परिसुनि पाहुनि जाई बुडुनी तो हर्षसागरामाजी. ११०
तैसें हो **श्रीरामा** वाद्यध्वनि परिसुनी सभोंवार,

---

१ कोकिल. २ उत्तम पक्वान्नें. ३ देवी अन्नपूर्णा. ४ ज्यावर झाडें नाहींत असा. ५ पर्वत. ६ बेडूक. ७ मोठाले साप. ८ मासे.

कांचनहर्म्य मनोहर बघुनी आनंद पावला फार. १११
बोले तयास **माया** " ज्यांहीं रणभूस अर्पिली काया,
चिरसौख्य सेविती ते या ठायीं शूर वीर नर राया ! ११२
ही पुण्यभूमि धन्या ! रविशशि येथें सदा असे उदित,
या स्थानीं दु:खाचा संसर्ग न; सकल राहती मुदित. ११३
रणभूषामंडितहर्यै उल्हासें हेषिती कुठें नाना,
गर्जति गजेन्द्र कोठें हर्षे आस्फालित स्वशुंडांना. ११४
झुंझति परस्परांशीं वीर कुठें घेउनी असि स्वकरीं,
उडती नभीं पताका; गणना त्यांची करील कोण तरी. ! ११५
कुसुमासनीं बसोनी रणगीतें रम्य राजकवि गाती,
दिव्यांगना सुनृत्या करिती; सुमवृष्टि होय दिनरातीं. ११६
वदली **माया** ' **रामा !** बघ हे दैत्य प्रसिद्ध रणधीर,
सुंदोपसुंद भीषण **महिषासुर वृत्र** दारुण **त्रिपुर.** ११७
येथें कैसा न दिसे मजला तो **कुंभकर्ण अतिकाय,**
तो **इन्द्रजित्** नरान्तक, **राम** पुसे उत्तरास दे **माय.** ११८
अंत्येष्टीविणें येथें वास कराया न योग्य हो कोणी,
प्रेतक्रिया न झाली; भ्रमती बाहेर तोंवरी प्राणी. ११९
बघ इकडे येत असे **रघुनाथा !** वीरकेसरी **वाली,**
भेट तया तूं प्रेमें, वदुनि असें गुप्त माउली झाली. १२०
तेजस्वी वीरवरा **राघव** सन्मुख सविस्मयें पाहे,
चमके तडित् किरीटीं तेज तयाचें न लोचनां साहे. १२१
वाली रामास ह्मणे ' कां येथें तूं सदेह आलास,
पूर्वीच्या संबंधा अपुल्या स्मरतोस ? का विसरलास ? १२२
सुग्रीवा तोषविण्या अन्यायें मारिलें तुवां मातें,

---

१ घोडे. २ राक्षसविशेष. ३ उत्तरक्रिया.

परि त्याचें भय आतां हृदयीं **रामा !** नको धरूं येथें. १२३
आह्मां क्रोध न ठावा, झालों इंद्रियजयी खरे सकल;
करिती न मानवांसम षड्रिपु आह्मांस या स्थलीं विकल. १२४
चल मत्संगें **रामा !** नेतों तुज शीघ्र एक उद्यानीं,
तेथें जनकसखा तव वास **जटायू** करी समाधानीं. १२५
तो परम धर्मचारी अर्पी जीवित सतीस रक्षाया,
होईल हर्ष त्याच्या प्रेमळ हृदया बघूनि तुज राया. ! १२६
सकल तुह्मीं समसौख्यीं करितां नगरींत काय या वास, ?
जिज्ञासिलें प्रभूनें **वाली** उत्तर करी तदा त्यास. १२७
अगणित मणि खनिगर्भी परि तेजें सारखे न ते जाण,
परि एकही न त्यांतुनि ऐसा मिळणार जो प्रभाहीन. १२८
जेथें कलकल शब्दा करुनी अविरत सुधानदी वाहे,
रघुपति रम्य वनीं त्या देवाकृति वर **जटायुतें** पाहे. १२९
" हृदया हर्ष जहाला पाहुनि तुजला **रघूत्तमा !** नयनीं,
तूं धन्य ! मित्रपुत्रा ! केली पावन तुवां यशें अवनी. १३०
देवकुलप्रिय असशी ह्मणुनी येसी सदेह या स्थानीं,
सांग मला रणवार्ता; **रावण** मृत जाहला न का अझुनी. ? १३१
आह्मीं तव प्रसादें वधिले राक्षस करोनि संग्राम,
एकाकीच **दशानन** उरला मागें; वदे तया **राम.** १३२
मदनुज **लक्ष्मण** झाला समरीं हतजीव तच्छरें सुमति,
ह्मणुनी **शिवानुरोधें** दुर्गम नगरीं मदीय होय गति. १३३
करुनि कृपा सांग मला, कोठें ते पूज्यपाद मम तात,
" **रामा !** पश्चिमदारीं राजर्षिदलीं सदैव रमतात. १३४
चल मत्संगें तेथें जनकातें भेटण्यास **रघुनाथा !**

---

१ कमी अधिक प्रमाणानें सर्वांस सुख मिळतें असा भाव.

अवलोकुनि हर्षभरें भावें ठेवूं पदांवरी माथा. १३५
हें बघ रम्य हिरण्मय **रघुनाथा !** भव्य पश्चिम द्वार,
हीरक निर्मित भुवनें असती येथें मनोज्ञ साचार. १३६
बसला सुवर्णपादपमूलीं कनकासनीं **दिलीप** पहा,
साध्वी **सुदक्षिणे**सह उज्ज्वल **इक्ष्वाकु** वंशदीपक हा. १३७
इकडे बघ हे बसले **मांधाता नहुष** परम राजमुनि,
घे दर्शन सकलांचें **श्रीरामा !** भक्तिनें तयां नमुनी." १३८
ह्मणुनि बरें राय करी भावें प्रणिपात नृप **दिलीपाला**,
'स्वस्ति असो तव' ह्मणुनी दे आशीर्वाद भूपती त्याला. १३९
तूं कोण कां ह्मणोनी कैसा येथें सदेह आलास ?
देवाकृति पुरुषवरा कवण तुला उजळिता जहालास ? १४०
दूर विदेशीं बघतां स्वजनातें हर्ष होय मनुजाला,
त्वन्मुख पाहुनि राया ! हर्ष तसा आमुच्या मना झाला. १४१
ऐकोनि दंपतीतें उत्तर दे बद्धपाणि **दाशरथी**,
पौत्र तुझा **अज** त्याचा नंदन **दशरथ** नृपाल धर्ममति. १४२
तन्महिषी **कौसल्या** साध्वी, उदरीं तदीय मज्जनन;
मन्नाम **राम**, माझे बांधव **सौमित्रि भरत शत्रुघ्न**. १४३
राजर्षि ह्मणे **रामा ! रघुकुलरवि** नाम हें तुला साजो,
यावच्चंद्रदिवाकर कीर्ति तुझी भुवनमंडलीं गाजो. १४४
वैतरिणीच्या तीरीं **अक्षय** नामें विशाल वटवृक्ष,
तन्मूलीं **श्रीरामा !** तात तुझा धर्मपूजनीं दक्ष. १४५
वंदुनि **जटायुमित्रा** राजर्षीच्या पदांबुजा नमुनी,
गेला शोधित वृक्षा **राम**, बसे ज्या स्थलीं विषण्ण मुनि. १४६
अक्षय वटवृक्षाचें कैसें माहात्म्य वर्णवे सत्य,
तरुराज मोक्षदायी देवहि आराधिती तया नित्य. १४७

पाहुनि तनयास पुढें मुनिच्या नयनांस लोटलें पाणी,
रडुनी मर्त्यजनासम तनुजातें नेत्रजें जलें न्हाणी. १४८
मन्नयनपूर्णचंद्रा ! भेटुनि तुज लोटलीं बहू वर्षे,
या दुर्गमदेशीं तुज पाहुनि माझें भरे हृदय हर्षे. १४९
तव विरहीं अनुभविलीं दुःखें मी तीं वदूं किती हाय !
विरहानल अति दारुण दग्ध जहाला तयांत मत्काय. १५०
वनवासीं **श्रीरामा !** तुजवर संकटपरंपरा आली,
कारण तीस खरोखर **कैकेयी** परम कर्कशा झाली. १५१
मदकलकरिणीसम[1] ती टाकी आशातरूस उन्मळुनी,
होणार तें जहालें दैवाचा सर्व खेळ ये कळुनी. १५२
ऐशा परोपरीनें राजर्षि करी महा विलापाला,
आदरुनी मौनव्रत शोकसरीं मग्न भूपती झाला. १५३
राम ह्मणे " हो ताता ! बुडतो हा तनय संकटग्रस्त,
देणार कोण घोर व्यसनीं ऐशा कळे न या हस्त. १५४
विश्वींचे व्यवहार ज्ञात जरी यमपुरींत[2] होतात,
आलों मी कां येथें कारण याचें कळेल हो ! तात ! १५५
अनुज प्रियकर माझा होय अकालीं गतासु घोर रणीं,
होय पुनः प्राप्ति न जर त्याची; मत्प्राण संपतील क्षणीं. १५६
प्राण बहिश्चर माझा अनुज तयाचें न होय उद्धरण;
तर मग जगीं जगोनी काय करावें; गमे बरें मरण. १५७
दशरथ ह्मणे सुपुत्रा ! शोक पुरे काळजी नको वाहूं,
होइल लब्धासु तुझा पुनरपि **लक्ष्मण** सुलक्षणी भाऊ. १५८
सोडुनि सुखभोगांतें पूजितसें धर्म मी तुझ्यासाठीं,
कष्टी होउं नको तूं, साह्य तुला तो करील जगजेठी. १५९

---

१ माजलेली हत्तीण. २ यमधर्म.

वत्सा ! विशल्यकरणी हेमलता गंधमादनीं भव्य,
धाडूनि **मारुती**तें आण झणी ती महौषधी दिव्य. १६०
रामा ! उपाय कथिला मज हा प्रत्यक्ष धर्मराजानें,
जा आतां **रावण**वध करुनी ने **जानकी** गृहा मानें. १६१
गंहिवरुनी **राम** पुढें झाला वंदावयास तातपदा,
स्पर्श पदांचा न करां होय; परी भय वरी नृपाल तदा. १६२
वदला **दशरथ** वत्सा ! छाया मी भूतपूर्व, देह न हा;
प्रतिबिंब दर्पणीचें सत्य नसे, भास मात्र जेंवि पहा. १६३
परिसुनि वच जनकाचें भावें करुनी तया नमन राय,
मायेसह माघारा ये **लक्ष्मण** ज्या स्थलीं मृतप्राय. १६४
रचिला अष्टम सर्ग ' **प्रेतपुरी** ' हा प्रसिद्ध कविरत्नें–
वंगीं, रूप मराठी त्यास दिलें **माधवानुजें** यत्नें. १६५

माधवानुज.

मैनलँदेवी.

उद्गार ४ था.

ह्या उद्गारांत रात्रीचें वर्णन. **कर्णा**च्या द्यूतकार वगैरे व्यसनी मंडळीचें निंद्य वर्तन. व त्या मंडळीच्या संगतीनें **कर्णा**ची झालेली स्थिति. व वेश्यारूपानें आलेली राणी. व तिनें केलेली **कर्णा**ची निर्भर्त्सना वगैरे विषय आलेले आहेत.

श्लोक.

नभोमंडळीं हिंडतां त्रास झाला । रवी ये निवायास अस्ताणवाला
श्रमानें जणों रक्तिमा तोंड लेई । न शोभे पिकोनी असें तोंडलें ही १
प्रशांताब्धि हा दीर्घ विस्तार साच । बिलोरी जणों ओतिला आरसाच

---

१ यमानें * गेल्या अंकांत ह्या काव्याचा ३ रा उद्गार आलेला आहे.

बघोनी तयांत स्वचक्रांबुजाला । रवी झाडि ज्यां स्वेदजा बिंदु–जाला, २
घडोनी विवस्वत्करस्पर्श–लाभ । उडोनी नभीं तेच चित्रोज्ज्वलाभ
दिनान्तास अंभोदरूपें सुढाळ । बरे राजती केशरी, पीत, लाल ३
स्फुरे वारिधी भेट घेण्या रवीची । रवीही करें स्पर्शितो अब्धिवीची
प्रभेचा निधी होय अब्धी अमूप । तसें भास्करें घेतलें वारिरूप ४
खरें प्रेम जैं लोटतें हें अलोट । घडे एक रूपत्व तेव्हां चखोट
ह्मणे कोण हो ! भिन्न आंभोधि भानू ? । नसे भेद, भासे धगागे कृशानू ५
जिथें खेंव देतात पाथोधि मित्र । किती तेथली दिव्य शोभा विचित्र
तिथें बिंबले रंगले सर्व रंग ! । द्रवत्वें उठे काय तेजस्तरंग ! ६
करी सूर्य अंतीं समुद्रीं प्रवेश । महीही तदा पालटी क्षिप्र वेश
झळाळे न दिव्योज्ज्वळ श्रेष्ठ तेजें । न वा पातले ध्वान्तही रात्रिसेजे ७
असे कांहिंसा मंद तेजःप्रसार । असे कांहिंसा भेदला अंधकार
नसे ज्ञान, अज्ञानही खास नाहीं । अशी होय संध्या मनोभ्रांतिदा ही ८
भली पश्चिमाभालशोभा विकासे । शुभें कुंकुमें मंद संधिप्रकाशें
परी काळिमा आक्रमी पूर्वदेशा । धरी काय कृष्णाभ वैधव्यवेशा ! ९
परी पश्चिमे ! घें न दुर्गर्वता ही । धरीं धैर्य पूर्वे ! सहा पर्वताही
न भोगी जगीं नित्य सौख्यास कोणी । न कोणी बसे सर्वदा दुःखकोणीं १०
स्वयें गांठिलें नीडवृक्षां अचूक । पडे बाहिरी घूक तैसा उलूक
पशुग्राम्य हे पावले स्वस्थळाला । त्यजी वन्य तोषें गुहांला बिळांला ११
टळावे न कीं काळ ते दोहनाचे । बळें हंबरे गाय, गोवत्स नाचे
धनी पात्र घे काढण्या दूधधार । सवें जाहली मांजरीही तयार १२
गृहस्थस्त्रिया लाविती दीपवात । तशा तेवती पंति वृंदावनांत
पुढें पेटवोनी चुलींचा धडाका । त्वरेनेंच आरंभिती अन्नपाका १३
जरासें उशीरास केलें ह्मणोनी । पतीची पहाते सती वाट कोणी
स्वयंपाककर्मीं न तें चित्त थारे । शरीराप्रती लागलें येरझारें १४

जरा कांहिं वाजे तिला खास वाटे । पतीचीच चाहूल ही होय वाटे
ह्मणोनी सहोल्हास ती डोकवीतें । अहा ! मूर्ति ही लोभवीते कवीतें १५
परी नाथ नाहीं असें पाहतांची । निराशा तिला अंतरीं हंत ! जाची
नसे जाहला फार कांहीं उशीर । तरी तें करी प्रेम चित्ता अधीर १६
असो शेवटीं तो पती येतसे कीं । सुखें चुंबितो धाकुटीं लेंकलेंकी
'असे जाहलें काय हो ! भोजनाचें ?' । असे घे समाचार तो स्त्रीजनाचे ! १७
शुचिर्भूत होती कुणी सत्वरीं ते । करीती महानिष्ठ धूपारतीतें
सुखें भक्षिती प्राप्त जें भातसार । गृहांतील दे शांति त्या स्वाद सार १८
कुठें घोकितीं हीं मुलें श्लोक फाडे । स्वरें त्या दणाणोनि जातीं बिऱ्हाडें
कुणीं भाविकां बैसवोनी सभोंतीं । खडा सूर काढूनि वाचीत पोथी १९
असो, यापरी मातला रात्रिकाळ । तमें कोंदलें पूर्ण पृथ्वी निराळ
गृहीं जाहले सुज्ञ सौख्यांत सुप्त । उजाडे खलां साधण्या पाप गुप्त २०
कुणी साजले घालण्याला दरोडे । जया चिंतितां श्रेष्ठिसंबाध रोडे
कुणी मूढ आरंभिती द्यूतकर्म । नसे ज्यामधें लेशही धर्मशर्म २१
नटोनी निघे रम्य वारांगना ही । जिच्या दुष्कृतीचा कुणा थांग नाहीं
जहाला नटोनी भला थाट काया । नटीही नटे हो ! विपन्नाटका या २२
समाजाननीं लाविते हे कलंका । सजे स्वर्णरत्नें भली पापलंका !
कशा वर्णु सौंदर्य जें पापदास ? । तुला वानिता एक तो **कालिदास** ! २३

अशा रात्रिकाळीं बसे चौकडींत । खलांच्या पहा **कर्ण** उन्मार्गनीत
अहा ! रातला हंस हा वायसांत । कशी मानितो आपुली हीच जात ? २४
सभा थाटली ही असे राक्षसांची । तदुक्ती अशी देतसे साक्ष साची
गमे सत्यवाणी न सद्वस्तु तीतें । धडाकोनि दे नित्य मिथ्यास्तुतीतें २५
गुणां रूप देतात हे दुर्गुणांचे । तसें दुर्गुणां वाणितां वाणि नाचे
खलोक्ती असे पूर्ण जादू खरी ती । भलाही भुले स्वीकरी दुःखरीती ! २६

जसे नाचवीती तसा **कर्ण** नाचे । खरे खेळ हे बाहुलीवर्णनाचे !
असे सर्वथा तो पराधीन—काय । तरी दुष्ट कार्यास साधी न काय ? २७
मुखानें स्तवी अंतरीं दुष्ट हांसे । न तें **कर्ण** जाणे, पडोनीच फांसे
तया नागवीतात हे नाचरंग । गणी सौख्य तें, होय तो त्यांत दंग ! २८
अफू भांग दारू खलश्रेष्ठ वेश्या । जिथें पावली सर्व ऐशीं प्रवेशा
तिथें सद्गुणांना कुणी पालवावें ? । वसंतें, न दावें, तरू पालवावे २९
अशा या स्थितींत प्रवेशे सभेंत । नृपाचा भला भृत्य विश्वासहेत
धरापृष्ठिं तो ठेवुनी जानुयुग्म । शिरीं लावितो तीनदां पाणिपद्म ३०
खुणावी तयाला तदा **कर्ण**राय । नृपासंनिधीं तो नतग्रीव जाय
हंसोनी वदे राय त्या, " सारसाक्षी । असे लाभली का ? कथी सार साक्षी ३१
तुवां वर्णिलें तें न वाटे खरेंसें । नसे लभ्य सौंदर्य ऐसें सुरेशें
कुठोनी तरी सांपडावें रसेला ? । न रंकास लाभे नृपासाध्य शेला ३२
जरी गा ! असे आमुची वंचना ही । करूं रे ! तुझे प्राण हे पंच नाहीं
तरी सांग वृत्तांत तूं सत्य सांग । नृपालोक्त हें वंद्य, तें जेंवि गांग ३३
ह्मणे भृत्य " जी ! लोकनाथा ! दयाळा ! । नसे ठाउका वंचना शब्द याला
नृपासीं वदे शब्द जो मंद खोटा । पहावा तयानें यमाचा चव्होटा " ३४
असें बोलुनी लागुनी भूपकर्णा । पुढें कांहिंसें तो वदे भृत्य **कर्णा**
खलांना न तें जाहलें कांहिं सह्य । न मेरूच्चता अंतरीं साहि सह्य ३५
तयाचा असे फार हेवा खलांना । कधीं तो तयांच्या पुढें वांकला ना
कधींही न तो सेवितां मार्ग वाम । असे ठाम भूपाल—विश्वास—धाम ३६
नृशंसाधमीं फार केले प्रयत्न । दुरावून तें टाकिण्या भृत्य—रत्न
परी जाहले सर्वदा ते निराश । न त्यांना तुटे प्रीतिचा वज्रपाश ! ३७
खलासंगतीं राय सोडी सतीही । असे **कर्ण** केला खरा रीस तींहीं
परी धिक्करी एक तो भृत्य हा न । मनुष्यस्वभावा न कांहीं प्रमाण ! ३८
असो, ऐकतां **कर्ण** ते गुप्त बोल । जणों जाणुनी अर्थ त्यांचा सखोल

उठे, जाइ सोडोनि त्या दालनातें । खलांचें तुटे काय तत्काल नातें ! ३९
पुढें दालनें दोन टाकी, तिजांत । सभृत्य प्रजापाल जों होय जात
वदे भृत्य तों लावुनी क्षिप्र दार । 'पहा मद्वचें सार किंवा असार'. ४०
असें बोलुनी बाजुचें दार भृत्य । त्वरें ऊघडी; जाय बाहेर राय.
अकस्मात् क्षणें आंत ये एक रामा । स्वतेजें जणों उज्ज्वळी रायधामा ! ४१
अकस्मात् गमे कौमुदीज्योत आली । विवस्वत्प्रभामूर्ति वा सद्य झाली !
वडे काय विश्वांतलें सारसार । जुळोनी असा रम्य सृष्टिप्रकार ! ४२
शिरे काय सौदामनी सौदगर्भी । स्फुरे अग्निकीलाच वा श्याम दर्भी
फुले रम्य लावण्यवल्ली सुरांची । तिची ही कळी उन्मळे काय साची ! ४३
सुधेचीच ही ओतली काय मूर्ती । कविस्फूर्ति ही काय शृंगारपूर्ती !
सरोजागरुस्वर्णपुष्पादिकांचा । असे निर्मिला कायसा काय साचा ! ४४
बघोनी अशी पूर्ण—चंद्रानना ही । नृपा राहिलें लेशही भान नाहीं
फुटे शद्व ना, दर्शनें त्या पवित्र । गमे राय तो कोरलेलेंच चित्र ४५
मुहूर्तान्तरें पावला देहभाना । धराया उठे आदरें तत्करांना
परी अंगुलीनेंच ती त्यास दापी । वदे ती, दपे तो जरी **कर्ण** पापी ४६
"अरे ! ऐक राया ! मदीया करा या । मुळीं पात्र नाहींस कांहीं धराया
मदीय स्वरूपीं जहालास लोल । तुला हें परी तापला लोहगोल ४७
जयाला नसे नीतिची अल्प पर्वा । धरी सन्निधीं जो नृशंसास सर्वा
विषाचा तया देह हा होय कर्वा । न ती सौख्य दैत्यां, सती सौख्य शर्वा ४८
सुधा राहुला जाहली हालहाल । रवीची प्रभा दे उलूकास हाल
सती जाचली त्या शतांक क्रतूतें । अनीते ! तशी ही असे वक्र तूतें ४९
मरे राक्षस स्पर्शतां जानकीला । पतंगास जाळी न का अग्निकीला ?
परी जो शरीरीं धरी नीतिवर्म । तया मात्र हा देह दे हर्षशर्म ५०
जयाच्या सभोतीं असे नित्य पाळा । महा दुष्ट वारांगनांचा नृपाळा
न त्यानें करा या धराया धजावें । सजावें नयानें, हिलाही भजावें ५१

असें ऐकतां **कर्ण** झाला विवर्ण । गळालें जणों वायुनें जीर्ण पर्ण !
तया ये स्थिती जी जळीं ढेंकुळातें । त्रपायुक्त झाली मती व्याकुळा ते ५२
प्रधानोदिवें जें नव्हे बोध—जालें । तिच्या चार शद्बेंच तें काज झालें !
सुखड्गेंहि वीरांस जें पारखेंची । यशा त्या नखेंची पहा नार खेंची ! ५३
नराच्या हृदीं जें असे गुप्त वर्म । न त्या स्पर्शतां, ना घडे इष्टकर्म
तिची ऐकुनी उक्ति ते, निर्मला जे, । न कोपे नृप, स्व स्मरे कर्म, लाजे ५४
अहंता गळाली, धृतीही पळाली । गुणेन्दूकळा—लीनता घे झळाली
मती, जी खळालीसहत्वें मळाली । धरी ऊजळा; लिंपनें तीं जळाली ५५
तिच्या जाहलें चित्त त्याचें अधीन । कृपार्थी तिच्या होय अत्यंत दीन
यमाचीहि ज्या कांपवी देहली न । असा स्त्रीपुढें होय तो देह लीन ! ५६

चतुर्थोद्गार समाप्त.

—— —— ——— बाळकृष्ण अनंत भिडे बी. ए.

संध्यातारक.

दिंडी.

रवी जातां जातांचि मंदिरातें
कोण डोकावुनि नभांतुनि पहातें ?
नभःसलिलीं का नील करीं केली
रती येई ? एकटी कशी आली ? १

काय फुलली नलिनीच वरि सरीं हें ?
काय मधुपाची वाट पाहताहे ?
देवललना--मणिहार गळोनीया
मणी पडला एकला अंगणीं या ? २

रत्नकंदुक की काय हा स्मरानें
दिला झोकुनि गगनांत विहारानें ?
रौंवली का भरजरी ही पताका ?
अमल रजनी राणिचा सुचविते का ? ३

अहा संध्यातारका ! द्युलोकीं तूं
वससि; परि तूं भूतलीं सौख्यहेतु;
एकवटला अनुराग तुझे ठायीं !--
अहा प्रीतिज्योतीच पाजळे ही ? ४

प्रणयतारक तूं ! तुला गगनलोकीं
नयन वळवुनि सोत्कंठ जन विलोकी !
विरहपीडित युवतीस निजपतीसी
जुळुनि आशीर्वच नित्य लाभतोसी ! ५

आणिशी तूं नलिनीस मधुकरातें,
तसा हंसीप्रति हंस पांखरातें;
धेनु हंबरडे देत, घरा येती,
बघुनि वत्सातें मुदित मनीं होती ! ६

कृषक उत्सुकतें वाट तुझी पाही,
बघुनि तुजला गगनीं न हर्ष राही !
ठेवुनीया आउतें, तो प्रियेला
श्रांत लंघित पथ येइ भेटण्याला ! ७

विलोकोनी सप्रेम का वरोनी
बोलसी तूं सकलांस मधुरवाणी--
" चला, थकलां बहु झटुनि दिवस सारा
सखीसह घ्या विश्रांति--सौख्य--सारा ८

हल, तराजू, लेखनी अतां ठेवा,
ढोल, मुरली, आणखी वीन सेवा;
त्यजुनि वटवट गा मधुर मधुर गाणें,
रमुनि रमणीसह झोंप सुखें घेणें !"

क्ष कवि.

दुष्काळांतील मायलेक.

पद (चाल:-- चंद्रकांत राजाची)

मृदु अंकीं या बालक माझें मरणोन्मुख पडलें
माया कैसी येइ न कोणा निष्ठुर जग झालें ! ॥धृ०॥
खाती सगळी आनंदानें मी परि उपवाशी
अन्नाविण हें बाळ तडफडे दया न कोणाशीं
ज्या नेत्रीं मीं कज्जल प्रेमें घालुनि दिनरजनीं
दिव्य ठेविली दृष्टि जयाची गेली ती थिजुनी
गेंद गुलाबी गाल मनोरम निशिदिनिं चुंबोनी
व्यथित मना या तुष्टचि केलें गेले ते बसुनी
माखुनि तेलें चरणिं न्हाणिली प्रेमें तनु ज्याची
चार्वंगीं त्या कशी पसरली छाया मरणाची
बोल बोबडे वदुनि मजपुढें मजला रंजविलें
हास्यवदन तें एकाएकीं म्लान कसें झालें
विठ्ठल म्हणतां टाळ्या पिटुनी मज आनंदविलें
कोमल कर ते आज प्रभुजी ! निःसत्वचि पडले
चुंबूं कवणा कुणा बाहुं मी कैसे दिन आले
माया कैशी येइ न कोणा निष्टुर जग झालें

परदेशीं ही दुबळी बाळा भणंग तव जननी
टाकुनि सखया कैसा जाशी तिजला बालपणीं
स्तनयुग्मीं या सु--दुग्ध--धारा फुटल्या बघ बाळा
मुख लावी या कैसा आला तुजला कंटाळा
मोक्ष देशिचें केणें भरुनी जासी कैलासीं
नको टाकुं मज एकटि येथें योग्य काय तुजसी
उदकाविण बा जसा तळमळे जलचर तो मीन
तैसि तान्हया रात्रंदिन मी होइन तुजवीण
दाउं केंवि हें वदन जनांना झालें हैराण
सदय हृदय हें सख्या तान्हुल्या ! केलें कां कठिण
जनकास्तव तव नेत्र जेधवां रडुनी सुजवीले
' पहा मजकडे ' वदुनी ऐसें मज तूं शांतविलें
पाहूं कोणाकडे अतां मी वद वद घाबरलें
केला मी अपराध कोणता ? संकट ओढवलें
या बायांनो जल कोणी तरि डोळे हे मिटले
माया कैशी येइ न कोणा निष्टुर जग झालें २
किंचित उघडुनि नेत्र तेधवां बाळ कसें बोले
नको जननि गे ! शोक करूं तूं दुर्दिन तव सरले
जाउनि पुढती प्रभुला विनविन सुखि तुज करण्यासी
ये मागोनी शांतमनानें राहूं प्रभुपाशीं
धैर्यकांस गे बळकट कसुनी प्रार्थि सदा प्रभुला
नको भाकुं तूं करुणा माते ! प्रभुविण अन्याला
मी जातों परि पोट एक गे ! तुजला कमि झालें
तितुकी चिंता गेली तव ती वाइट नच घडलें
बोलुनि इतुकें कंठीं त्याच्या घरघर तैं झालें

हाय ! हाय ! हे शेवटचे या अचके ते आले
पुत्र–सुखा मीं सर्वस्वीं का ? प्रभुजी आंचवलें
माया कैशी येइ न कोणा निष्ठुर जग झालें ३

अनंततनय.

अन्योक्तिमाला.

श्लोक.

कांटे दाट तुझ्या असून **फणसा** साऱ्या शरीरावरी
अंगातें मृदुता नसे ह्मणुनि तूं शोचूं नको अंतरीं
बाबा त्वत्फलपीतवर्ण बघतां लज्जा वरी कांचन
मैना केशर कस्तुरी धरितसे गंधे तुझ्या मोहुन १

हंसोत हंसणार ते तुजसि **तेरड्याच्या** फुला
धरोत न शिरीं स्त्रिया अपुलिया तुला कोमला
मना हरिसि माझिया निजगुणें परी संप्रति
जना शिकविसी छटा क्षणिक यौवनाची किती २

झाली जों न पुरी उषा निजकरीं घेती तुला सुंदरी
प्रेमें दाखविती मनोहर मुखा निःशंकुनी अंतरीं
याचा गर्व नको धरूं लवभरी बा **दर्पणा** तूं परी
तूतें देतिल फेंकुनी झडकरी पारा उडाला जरी ३

आहे वर्ण तुझा मनोहर खरा हे **कौंडळीच्या** फळा
तैशी आकृति वर्तुला ह्मणवुनी कां गर्व झाला तुला
आहे अंतर बा भयंकर तुझें प्राणां हरी सत्वर
ज्याचें सुंदर अंतरंग असतें त्या मानिती सुंदर ४

माधवानुज.

काव्यरत्नावलि.

अंक ५ वा.

दुर्दैवी हरिण.

दिंड्या.

अहा ! बसला हा **काळवीट** एथें*;
ज्यास देखुनि मन सहज हृष्ट होतें !
जगत्कर्ता जो सुतनु देइ यास;
असो साष्टांग प्रणति मम तयास. १

बघुनि आकृति तव **हरिणवृंदपाला** !
खचित झाला बहु मोद मन्मनाला.
कृपा **हरिणा** ! हरिनें उदंड केली;
योग्य काया तुजलागिं अर्पियेली. २

भीतिकातर तूं क्षणक्षणां होसी;
तदा व्हावें अवसान पळायासी,–
ह्मणुनि ईशें दृढ दिले तुला पाद.
खचित तुजवरि हा ईश्वरी प्रसाद. ३

तुला **हरिणा** ! परतापवारणाला–
दिलें नाहीं जरि अन्य साधनाला,–
तरी दिधलीं बघ अहा ! रमारंगें–
तीक्ष्ण शृंगें अति मुदित अंतरंगें. ४

* वस्ती जवळच्या ओढ्यावर.

भाग्य असतें बहु ज्या विलासिनीचें,
साम्य तन्नयना तव सुलोचनाचें;
असशि एवंविध तूं सुशोभितांग;
मन न वेधे तुजकडे कसें ? सांग. ५

मनुज धरुनी मनिं डौल जाणिवेचा,
करिति धिक्कारचि दुज्या प्राणियांचा;
मला गमतें तें उलट परी मात्र;
सत्य वदतों हें करुनियां विचार. ६

ज्ञान असतें मनुजांत अधिक; साठीं–
तया दीजे योग्यता जरी मोठी;–
तरी अज्ञानाहुनि ज्ञान त्याचें–
मजसि भासतसे फार अल्प साचें. ७

तुह्मी नसतांना ज्ञान तरी बा ! रे !--
विहाराहारीं वर्ततां विचारें
मनुज अविचारें त्यांत सदा वागे !
कसें ज्ञानी हें पद तयास लागे ? ८

तुह्मां उदरार्थ स्वार्थ मात्र ठावा;
सुज्ञ मनुजाचा स्वार्थ किति वदावा ?
नर--स्वार्थातें अल्प वर्णितांना,--
शीण येइल फणिपतिचिया जिभांना !! ९

असति षड्रिपु जीवांस; तुह्मीं त्यांना--
लावियेलें वांकवावया माना !
नरें माजविलें उलट बंड त्यांचें !
अशा मनुजातें ज्ञान असे कैंचें ? १०

ज्ञान देई शम, हरी क्षिप्र ताप;
नरज्ञानाचा अशम हा प्रताप !
मनुजलघुता याहुनि न वर्णवेचि;
अशा वचनीं कवि केंवि वर्ण वेंची ? ११

सार यांचें इतुकेंच असे बापा !
मनुजसहवासें पावशील तापा;
स्वैर, सावज, निरुपद्रवी, बिचारें
असशि; यांचें तुज पळहि नको वारें. १२

कृष्णसारा ! तूं ग्रामसन्निधानीं--
कसा आलासी आजि या ठिकाणीं ?
मनुजसंगतिची जरि असेल आशा,--
व्याधपाशासम मिळविशील नाशा. १३

पळें एथुनियां त्वरित **हरिणनाथा** !
बळें ओढविशी दुःख केंवि माथां ?
असशि वनचर जो तूं स्वतंत्र रानीं,
तसा राहें; हो न तव सौख्यहानि. १४

सृष्टिदेवीचा गुणसमूह खासा--
नव्हे परमेश्वर--दिसे बिंबलासा;
निसर्गश्री करि सुखें वास जेथें;
मृगा ! वसतिस्थल तुझें वनीं तेथें ! १५

वरी बघतां आकाश अबाढव्य,
जणों हेलावे द्युतिनिधीचि भव्य;

ज्यांत रविशशितारकादिकें रत्नें--
झळकताती बहु दिव्यशा प्रभेनें. १६

निसर्गाश्रय निज वितरुनियां ज्यांहीं,--
धन्य केली वसुमती अंगना ही;
विलसतांहे विस्तीर्ण यत्प्रसार;
असे गिरिवर तव वसतिसभोवार. १७

सहजसुंदर वनदेवताकृतीनें--
मोहियेला परमेश ज्या सतीनें;
अधोभागीं ती रुचिरसृष्टिदेवी--
नटुनि, जगदीशा स्वस्वरूप दावी. १८

नभोमंडल हें ज्याप्रती वितान;
स्तंभ ज्यातें दृढ पर्वतासमान;
सृष्टिदेवी तळ शोभिवंत ज्याला;
असें रम्य स्थल तुला वसायाला ! १९

सदा खाणें तृण, धान्य, फळें ताजीं,
विहरणेंही स्वच्छंद वनामाजी,
नदीनिर्झरजल सेवणें यथेच्छ,
अशा स्थितिपुढतीं सकल सुखें तुच्छ ! २०

यदृच्छेनें जें करुनि यत्न, लाधे;
तुझें उपजीवन तेवढ्यांत साधे;
प्रजेसाठीं तूं मात्र दारसक्त;
तुजसि जिंकाया 'काम' केंवि शक्त ? २१

जरी होसी तूं कुपित कधीं काळीं,
क्रोध शमतो तरि तुझा त्याच वेळीं;

"कोप राहे क्षणभरिच उत्तमाचा."
असा असशी तूं 'क्रोध' तुला कैंचा ? २२

तुला उदरास्तव फार मिळायाची--
नसे आशा; नच साच संचयाची;
अल्प लाभें तंव लोभ ना दुणावे;
'लोभ' नाहीं तुज कां न मग ह्मणावें ? २३

पुत्रदारादिक आप्त तुझे, त्यांचे--
तेच कारिताती रक्षण स्वतांचें;
येथ नाहीं तुज फारसें महत्व;
'मोह' कोठुनि मग हरिल तुझें सत्त्व ? २४

आत्मशक्ती जरि दाविशी प्रसंगीं,
तरिहि राहे बहु नम्रता त्वदंगीं;
वृथा बाळगिशि न गर्व निजबळाचा;
मला 'मदहि' न तुजमाजि दिसे साचा. २५

मिळे स्वल्पहि जें तेंचि तुला फार;
नको उदरास्तव तुज परापहार;
कसा अन्याशीं द्वेष तुझा होय ?
कारिल 'मत्सर' तुज काय अंतराय ? २६

वसशि विजनीं वनिं तूं **मृगा** ! सदाही;
मनुजवृंदाचा गंध तुला नाहीं;
नसे इच्छा तुज मानमान्यतेची;
'दंभ' न तुला निर्दंभ धन्य तेचि. २७

असशि ऐसा तूं खचित खचित शुद्ध;
ह्मणो कोणीही सुखें याविरुद्ध;

त्वरें एथुनियां परत परत साधो !
दुष्ट जनतेचा ताप तुज न बाधो. २८

गमसि ऋजुतेची मूर्ति तूं **कुरंगा** !
केंवि जाणिसि कुटिला नरांतरंगा ?
ह्मणुनि ह्मणतों मी त्यज अशा जनातें;
न तरि वरिशी दुःखाब्धिमज्जनातें. २९

अहा ! कैसें हें नवल आज झालें !
हरिण एथुनि हा कां न बरें हाले ?
नरा बघतां तत्काळ वन वरावें--
जयें; **मृगपति** तो आज कां स्थिरावे ? ३०

हाय ! झाला मम विफळ बुद्धिवाद !
कळुनि आला मजला निज प्रसाद.
नसे वनचर हा आज **काळवीट**;-
दिसे ह्मणुनी वरुनीच मात्र धीट ! ३१

मघा याला जरि निरखुनी पहातों,
तरी संशयिं या कां वृथा रहातों ?
लक्ष वेधे बिभुक्तिकडेचि सारें;
ह्मणुनि झाला हा भास या प्रकारें ! ३२

पदीं रुधिराच्या ग्रंथि दिसति याचे;
म्लानताही हरि तेज आननाचें;
करी ग्रीवेला रज्जुबंध खूण;
असे पाळीवच साच हा ह्मणून. ३३

अस्तु. वदलों तुज **काळविटा**! मागें;
त्यांत कांहीं मज फिरविणेंच लागे;
पुन्हां वदतों तें परिस गड्या! थोडें;
" नीतिदृष्ट्या मम तुशीं संग जोडे." ३४

हाय! **हरिणा**! हा थोर घात झाला!
तुझें सुखहि न देखवे दुर्विधीला!
तरिच तेणें तें पार लुटायाला--
घातला हा तुजवरी गुप्त घाला! ३५

वृत्ति गेली तव चंचला कुठें ती?
काय झाली **हरिणा**! स्वभावभीति?
तुझ्या अंगांतिल कुठें असे पाणी?
दशा दिसते तव केंवि दीनवाणी? ३६

वनीं असतांना तुजसि उदरचिंता;
नसे तीही पण किमपि इथें आतां;
सदा रक्षी तुज सदय तुझा स्वामी;
तरी कष्टी कां असुनि सौख्य नामी? ३७

उष्णकाळीं तूं भटकतां वनांत;
होतहोतासी गड्या! तृषाक्रांत;
धनी संप्रति तुज मधुर उदक पाजी;
तरि न दिससी कां सांग सांग राजी? ३८

समयिं व्हावें तृण, धान्य खावयास,
करित होतासी ह्मणुनि महायास;
मिळे रुचिकर तें जरि यथाप्रसंग;
तरि दिससी कां उदासीन सांग? ३९

नको बोलूं तूं वचन एकही तें;
तुझ्या स्थितिची कल्पना मला होते.
धन्य ! **हरिणा** ! तूं स्वामिनिष्ठ साच !
एक उद्गारहि न वदसी तरीच. ४०

स्वामिनिष्ठा हा सुगुण असामान्य,
मग न होइल तो मजसि कसा मान्य ?
" परी परिमिति जरि नसे कशालाही;
नुरे त्याची तरि योग्यताच कांहीं. " ४१

स्वामिनिष्ठेपुढतीं स्वतंत्रतेची–
नसे महती तुज काय सांग तेंचि ?
नसे किंवा हें ज्ञान गड्या ! तूंतें ?
सुखें करिसी तरि सर्व सहन तूं तें. ४२

परी पुसतों मी कासया तुला हें ?
गुह्य सारें तव दशा कळविताहे !
" ज्ञान बाह्याकृतिवरुनि इंगिताचें–
होय. " साचें हें वचन पंडितांचें. ४३

ज्ञान नाहीं जरि **मृगा** ! तुज विशेष,
तरी ह्मणवेना नसे मात्र लेश.
प्राणिमात्राला ज्ञान यथायोग्य–
स्वयें अर्पी रे ! सदय देवराय. ४४

कुठुनि, आलों मी कुठें, कासयातें,–
काय हावें कर्तव्य करायातें ?
दिली तनु ही कासया देवरावें ;
काळवीटा ! हें जरि न तुला ठावें;– ४५

सुखें पारि जीं आहारविहारादि,
क्षुधा तृष्णा परभीतिमुख उपाधि,
पारतंत्र्य स्वातंत्र्य आयुचें, हीं--
सकळ कळताती केंवि ह्मणों नाहीं ? ४६

तुझ्या नसतिल कल्पना उच्च उच्च;
परी अज्ञानहि मुळीं तुज नसेच.
" दुःखसुखविषयीं अज्ञ असा प्राणी--
मला न दिसे क्षितिमंडळांत कोणी. " ४७

ज्ञान आहे तुज **मृगा** ! स्वस्थितीचें,
तरिच वर्तन तव घडे या प्रतीचें;
एरवीं तूं दिसतास असा कैसा ?
कृपण होतो निधि हरपतांच जैसा ! ४८

' नसे स्वातंत्र्य क्षणहि मला एथें ';
असें फिरफिरुनी तुझ्या मनीं येतें.
याच खेदानें होय असा क्षीण !
हेतु यास न परतंत्रपणावीण. ४९

" सुखें नांदावें मीं सदा स्वतंत्र,
नको परवशता घोर लेशमात्र; "
सहज वांच्छा ही अखिलभूतमात्रा;
होय उचिता ती नच मुळीं विचित्रा ५०

असें असतां निजमुक्तता कराया--
कां न झटसी ? वद मज **कुरंग** राया !

जेंवि आलासी एथवरी आजी,--
तेंवि पुढतीं चल, मिसळ मृगसमाजीं. ५१

हेतु यांतिलही मजसि रे! कळाला;
पारतंत्र्यें मुकलासि निज बळाला!
मनीं येतें—वनिं सहज उडुनि जावें;--
वदे दुर्बलता स्वामिगृहिं निजावें! ५२

वृत्ति वदते ' परतंत्रतानळीं या--
कशी होमिशि बहुमूल्य रुचिर काया?'
उलट उपदेशी नित्यसंगती ते;--
' त्यज न अमृतोपम पराधीनतेतें.' ५३

असा माजुनि वाग्वाद उभयतांचा,
नित्य—संगतिचा विजय होय साचा;
त्याच योगें आमरण **हरिणपाला**!
हाय! मुकलासी स्ववशतासुखाला! ५४

वृथा गेला तव जन्म **कृष्णसारा**!
वंध्य जाहाला पराक्रमहि सारा!
नामकरणहि तव विफल **हरिणपाल**!
बंदिवासीं तव हाय! मरणकाल!! ५५

असो तुजला तरि कसा दोष द्यावा?
उचित गमलें हें कोंवि देवदेवा?
स्वैर निर्वैर प्राणियास तो दे—
बंदिवासाचा तीव्र ताप मोदें! ५६

देवरायाची अवकृपा विशेष--
असे तुजवरती खचित गा! **मृगेश**!

पूर्वसंचित वा अति बलिष्ट खष्ट !
भोगितोसी ह्मणुनी असह्य कष्ट ! ! ५७

मृगा ! जावें त्वां, स्वामिगृह वरावें;
उदर परदत्तें कसें तरि भरावें ! !
अशा कारागृहिं खितपतण्यापेक्षां–
करीं मृत्यूची सत्वरीं अपेक्षा ! ५८

भृंग.

मैनलँदेवी.

उद्गार ५ वा.

ह्या उद्गारांत वेश्या रूपानें **मैनल**देवी व **कर्ण** ह्यांची झालेली भेट. तीच्या मोहपाशानें व लावण्यानें कर्णाची झालेली स्थिति. पंधरा दिवस पर्यंत झालेला उभयतांचा समागम. त्यानंतर " उदईक मी येईन " असें सांगून ती **मैनल**देवी निघून गेली. ती पुनः आली नाहीं. यामुळें कर्णाची वाढलेली विरहव्यथा वगैरे विषय आलेले आहेत.

आर्या.

कमलास्पद पद--कमला स्त्रीच्या नमला, मनीं नृप श्रमला,
श्रम--लाजेंत विरमला, घर्मं गमला, न नवल, अभ्र मला. १
तीस ह्मणे, " रूप--खने ! भ्रम नेला त्वां, लसद्गुण--व्रतते !
त्यजुनी खल--संगतितें, त्वत्सेवस तीव्र वेइन व्रत तें. २
होतों भ्रमान्ध, होता दाटुनि म्यां कवळिला विनाश--पथ,
परि मी प्रबुद्ध झालों; मानीं हें, वेतल्याविना शपथ. ३
तूं कोण सांग आतां, अमरी कीं **शेष--वासुकी**--कन्या ?
अन्यास अलभ्य अशी, दैवें दिधलीस जी मला धन्या. ४

---

* गेल्या अंकांत ह्या काव्याचा ४ उद्गार आलेला आहे.

प्रेमगुणें निगडित मी झालों तव दास आज अंकित कीं;
जितकी तनू--मनाची प्रवृत्ति, वाहीं तुझ्या पदीं तितकी." ५
त्यास स्त्री उत्तर दे, "कोणाची कोण मी असें कुठली,
काळें कळेल सारें; संशय--वृत्ती मनीं न हो उठली. ६
परि सत्यत्वें वर्तें, मिथ्यालापा न कामितुल्य वदें;
होइं न गज, जो दावी एका, परि चावितो दुज्याच रदें. ७
तोडावी आज घडीं जखडी जी दुष्ट जन पदीं बेडी;
नातरि निष्फळ होइल मद्विषयीं प्रीति भाबडी वेडी. ८
दवडा राज--गृहांतुन शिरलेला दुष्ट--रूप खळ कवडा,
रव डाजो न मना हा, सारासारास चांगलें निवडा. ९
खल, कुटिल, अनीत, जना वाराया हा पुढें जपो वाडा,
मग साधू भाटांसम गातील सदैव राज--पोवाडा. १०
धाडा येथून, खलां निघून जाया, नृपा! निरोपाला,
जे साधु--स्वांतींही लावूं बघतात हानि--रोपाला. ११
नंतर मग तूं होशिल या स्पर्शायास योग्य देहाला;
हें कर अशंक सत्वर; साधु, सुधा दावुनी, न दे हाला. १२
अ--सती--गणांत न गणां मजला, देखून बाह्य वेशाला,
नीचत्व कोकिला कां घेते, येतांहि काकदेशाला?" १३
आश्चर्य--चकित नृपती तदुक्त करुनी, सुशीघ्र ये परता,
तन्मन बद्धचि झालें, त्यांत असे एकमात्र तत्पर--ता. १४
तेव्हां त्यातें सुदती वदती झाली प्रसन्न--तर वदनें,
फुल्लायत नयनें, मृदु अधरें, लज्जेस अंबु--ज--च्छद ने. १५
"रजनी सुखें क्रमूं या, उदयिक येइन पुन्हां अगारा या,
काळें चित्र--पवित्र स्वचरित्रा ही कथील, गा! राया! १६
मच्चरित शुद्ध आहे, न यशाची ही करील रांगोळी,

पारि या भेटीस्तव ही आंगठिनें भूषवाल आंगोळी !" १७
तें ईप्सित पूर्ण करी **कर्ण** तिच्या सेवनांत तत्परसा,
रूपाला, तेजाला, वाणीला लोभला तसा स--रसा. १८
'रात्री यावें, जावें निशावसानीं,' करी करारा ते,
वाटे चंद्र--कला ती न सुखीं, पाहून भास्करा, राते. १९
नृप--मति ह्मणे, "निशा--सुख लक्षुन, ह्मण, 'दिन--वियोग' धीरा ! 'हो,'
दुखवीं न हिला, रात्रीं स्थिरा हिची, विर्नात्रि, योग--धी राहो." २०
स्वाधीन केवळ तिच्या प्रेमाचा पूर तो करी राया,
जाणों तिचीच इच्छा राहों चैतन्य दे शरीरा या. २१
गमतें, दिवसा राजा तद्देहीं स्थापितो स्व--चैतन्य,
तें ती परतें आणी, रात्री तीं भेटतांचि अन्योन्य. २२
लागे तिच्या वचाला अनु--दिन तो **कर्ण**राय झेलाया,
मूर्त **भगवती** तिजला, न गणूं कां, भक्ति--पूर्ण चेला या. २३
प्रत्यक्ष दर्शनीं निशि नृप मानी लाभलें जनन--फल कीं,
दिवसा ध्यात बसे तो मूर्ति तिची चित्रिली मनः--फलकीं. २४
रात्री तृषितासम पी तें कर्णें **कर्ण**, जें वदे देवी,
दिवसा तत्सिध्यर्थी तत्परतेनें स्व--मानसा ठेवी. २५
मंत्रें तिच्या नृप करी दूर अघाचे नृशंस अवतार,
अधिकार दे **सुमंत्रा**, त्यावर टाकोन सर्व भू--भार. २६
कवि काव्या न, न लोभी द्रव्या, जपतो, करून ज्या यत्ना,
त्या यत्ना करुनी, नृप जपे निशीं नित्य कामिनी--रत्ना. २७
भुलला राजा ह्मणता, "आणूं दृष्टीसही नको **रतिला.**"
अधरामृत--लालस तो मानी विधु--कांति नृप--चकोर तिला. २८
नच दुष्ट सुष्ट पाही, रायाला तींत विश्व एकवट;
भव--पूरीं वाटे त्या झाली ती आश्रयार्थ एक वट. २९

जगणें, मरणेंहि, जणों भासे त्याला असो तिच्यासाठीं,
प्रेमातिशयाची ही ठाऊक असे जनास परिपाठी, ३०
विमळप्रकाश रात्री, दिन होई तिमिर अंध रायाला,
उलटा प्रकार अद्भुत हा, झाले दिवस पंधरा याला. ३१
तों सोळाव्या रात्रीं वाटे कडकड कडाडलें गगन,
उन्मूळुन बंधन तें झालें स्वैर भ्रमिष्ट राज--मन. ३२
टळला नेम तिचा तो, गळला आधार राय--जिवाचा;
भ्रांत स्थिती नृपाची यथार्थ वर्णील काय जी ! वाचा ? ३३
आली प्रिया न, तेव्हां संशय चित्तांत फार खळबळला,
सुख-कैलासावरुनी अंध दरीमाजि राय कोसळला ! ३४
वृत्ती पालटली ती रायाची अनुभवून संत्रास,
'अयि ! दयिते ! सुंदरि !' या जपत बसे दिवस--रात्र मंत्रास. ३५
आशा--तंतु परंतू मग तगला दोन दिवसपर्यंत,
उपरी काल--करानें झाला त्याचाहि सर्वथा अंत. ३६
चपला--विलास--सम जी निज--तेजें राज--मानसा उजळी,
ती जातां शोक--घनीं राहे माजोन अंधकार बळी. ३७
सुग्रास अन्न तोंडीं घालाया नर करी वरी हात,
तों, घडुन वज्र--पात, क्षणांत होई कसा असा घात ? ३८
हुंगाया जों जाई, कलिका पाहुन विशेष मोहकशी,
तों ती लोपे, टोंचे कंटक, मग कां न चित्त मोह कशी ? ३९
हातीं सहसा लाभुनि अपार, अद्भुत, भल्या, निधानाला,
जरि हरवील जन तया, तरि तें न करील कां द्विधा नाला ? ४०
सर्वस्व-सार जातां, धीरासहि ये न देह-कंप कसा ?
विश्व-प्रसार झाला त्याला नीरस, अलीस चंपकसा. ४१
सहन न झाला त्याच्या चित्ताला घोर--तर तडाखा तो,

अशनी आदळतां, तो कोण, न जो शैल--वर तडा खातो ? ४२
मरणापूर्वीच नृपा आला अनुभव खराच मरणाचा,
ती लावण्य–ज्योती होती त्या असुंहुनी अधिक पांचा. ४३
अखिलाहि वृत्ति झाल्या सुंदर--मूर्ति--स्मृतींत तन्मयशा;
तीच्यासह अंतरला वाटे तो राय काय जन्म--यशा ! ४४
झाला केवळ वेडा, स्नानाशन--पान त्या सुचेनाच;
मग काय विषण्ण मना गायन--वादन रुचे, रुचे नाच ? ४५
ज्या देह--भान नाहीं, काय तया गेह, काय वा राज्य ?
झालें चित्त तयाचें दयिता--विरहानळामधें आज्य. ४६
केव्हां मिटून नयनें होई तो मग्न जणुं समाधींत;
केव्हां खळखळ गळती नयन, मन द्रवुनि दुस्तराधींत. ४७
केव्हां भ्रांत मनानें इतस्तता शून्य लोचना चाळी;
केव्हां निश्चळ--नयना भासे तन्मूर्ति अश्म--पांचाळी. ४८
केव्हां मौनास वरी, केव्हां होई विशेष वाचाळ;
केव्हां हांसे, त्रासे, केव्हां रडतो जसा खुळा बाळ. ४९
केव्हां शुद्धींत असे, केव्हां होई खरोखरी मूढ;
केव्हां शांत स्थिर तो, केव्हां चांचल्य--विभ्रमारूढ. ५०
नाना कळा असा नृप दावी, परि एक सर्वदा नाद,
'ये, ये, अये ! प्रिये ! ये,' हा जप बोकी; नसे दुजी दाद. ५१
मंत्री **सुमंत्र** सज्जन राज्य–भरा सर्व नीट आटोपी;
सरळ पथानें चाले, नीती त्याची असे सदा सोपी. ५२

पंचम उद्गार समाप्त.

————— बाळकृष्ण अनंत भिडे बी. ए.

मार्गांतील सरोवर.

श्लोक.

अंभोधरें करुनि संतत वारिवृष्टि,
जीवांस सर्व दिधली बहु तुष्टिपुष्टि;
थोरास येइ जंव भाग्यदशा अपार,
दीनोपकारकरणीं रत होति फार. १

ओढे तडाग तटिनी बहु वारिदानें–
संपूर्ण हे भरियलें नववारिदानें.
दावीति ते सकलही निजवैभवातें,
मार्गस्थिता परि सरा प्रिय तूंच मातें. २

ओढे अशाश्वतविभूतिमदें प्रमत्त,
हे दाविती अविनयाचरणां प्रभूत;
भीतिप्रदां परम घोर रवां करूनी,
दिक्प्रान्त टाकिति समस्तहि हे भरूनी. ३

येतां प्रभूत कमला अविनीत लोकां,
होती मदांध बहु उद्धत ते विलोका;
जाईल वैभव समस्तहि हें क्षणांत,
नाहींच हें कधिंहि वागत तन्मनांत. ४

कूलंकषा उलथुनी स्वतटद्रुमांतें,
उद्दाम--वृत्ति तटिनी बहु ही वरीते;
अत्यन्तनीचकुलसंभव नारि जैशी,
चापल्य आदरुनि सर्व कुलां विनाशी. ५

कासार तूं असासि शान्त तसें गभीर,
लोकोपकारकरणार्थ सदां तयार;

संपत्तिगर्व तिळमात्रहि नाहिं तूतें,
थोरांस ऐहिकविभूति तृणासमा ते. ६

तापाकुला क्रमुनियां बहु मार्ग पाही,
सेवीतसे तुजशि पांथपरंपरा ही;
प्राशूनिया तव सुधेपरि गाडे वारी,
कल्याण इच्छिति तुझें बहुत प्रकारीं. ७

कोणी करून अघमर्षण या जलांत,
मार्गस्थताप हरिती अपुला नितान्त;
भक्षूनियां तव तटावरती शिदोरी,
कर्मी स्वकीय निघती मग हे खिलारी. ८

त्वन्नीर लोकहृदयां बहु तोष देई,
नेत्रोत्सवा विरचि पुष्पविकासभा ही;
घ्राणेंद्रियां सुखवि मारुत गंधयुक्त,
लोकानुरंजनिं निरंतर तूं प्रसक्त. ९

वर्णावया तव न वैभव शक्य वाणी,
आहे त्वदीय अमृतोपम गोड पाणी;
उत्फुल्लनीरज विनम्र मृणालिनी या
प्रोद्दाम सौरभभरें भरिती विहायां १०

सेवोनियां कमलनालमृणालकंदा,
प्राशोनि संतत सुधोपम तन्मरंदा;
लीलारसें स्फटिक निर्मल या जलान्ती,
या क्रीडती मधुपसारसहंसपंक्ति. ११

रात्रौ निशापतिकर प्रतिबिंबुनी हीं,
स्वच्छोदकें दिसति चित्रविचित्र पाहीं;

ताराशशिग्रहसुशोभित, भूप्रदेशीं;
आकाशभाग पडले, गमतें मनाशीं. १२

आहेस तूं सरसमानस तापहन्ता,
दीनां द्विजां परम आश्रय तूं समस्तां;
दानप्रपालितसुदीन परोपकर्ता,
तूं साधुभूपसम वाटसि लोकचित्तां. १३

आहे अशाश्वत समस्तहि हे विभूति,
हें तत्व ठेवुनि सदोदित आत्मचित्तीं;
लोकोपकारिं जल वेचिसि तूं समस्त,
धिक् अज्ञ मंदमति वारिधि हा प्रमत्त. १४

येतां विभूति जन होइ मदान्ध फार,
टाकून देइ अवघा सदसद्विचार;
धिःकारि मूढमति तो सकलाश्रितांस,
तू लाज आणिसि खरोखर त्या खलास. १५

ग्रीष्मार्कचंडकरिं होइन शुष्क जेव्हां,
कोठें अहा ! पथिकसंतति जाय तेव्हां;
ऐशा विचारिं तव होत कृशा तनू ही,
तूं धन्यजीवित तुझ्यासम कोणि नाहीं. १६

गीष्मार्क वैभव समग्र तुझें हरील,
शोषून वारि परिशुष्क तुला करील;
उत्साहहीन नच होइं तदा मनांत,
सोडी न धोर धृतितें विपदाभिभूत. १७

तूं वेंचिसी सकल वारि परोपकारीं,
चंडार्क तें निजकरीं हरि दुर्विचारी.

दुर्वृत्त दुष्टमति उद्धतवृत्ति भूप,
देई अकारण सदा सुजनांस ताप. १८

जाईल टाकुनि तुला खगसन्तती ही
टाकीति याचक धनी विगतार्थ पाहीं
पीडा तुला बहुत देतिल हे पशू रे !
आपद्गता सुपुरुषा खल पीडिती रे ! १९

जे प्राशुनी तव जलां सुख पावती ते,
दुर्गंधियुक्त करतील सदैव तूतें;
सोशी अपाकृति समस्तहि सद्विचारीं,
दुष्टापकार न गणीच परोपकारी. २०

जे त्वन्मनां गमति जीवितनिर्विशेष,
मत्स्यादि ते मरुनि होशिल पंकशेष;
होतांच दुर्गत महाश्रयभूत राय,
होती गतासु सकलाश्रित निःसहाय. २१

येईल दुर्गति जरी तुजला अपार,
जाईल वैभव लयाप्रति हें समग्र;
होशील पंकमय जातिल पक्षि सारे,
तूं श्लाघ्य एकचि तरी गमसी मला रे. २२

क्षीणार्थ देउनि जनां धन जो, विशेष,
तो शोभतो धनिक सद्गुणमात्रशेष;
तैसा **सरा** ! गमसि तू जगीं वंदनीय,
होई कलाक्षयिं निशापति दर्शनीय. २३

आहेत सन्निध जरी धनधान्यराशी,
दुर्बुद्धि अल्प कधिं देत न याचकांसीं;

त्याचें महद्विभव निष्फल होय सारें,
तो वारिराशि परि निंद्य जगीं खरा रे ! २४

रे ! वारिराशि ! बहु गर्जसि तूं किमर्थ,
आहे तुझें जगतिं जीवित हें निरर्थ;
होती तृषार्त जन जे तव तीरवर्ती,
ते टाकुनी तुजसि शोधिति कूपजाती. २५

होता सरा ! विभवनाश न खिन्न होई,
चित्तीं धरून दृढ धैर्य तटस्थ राहीं;
येईल तें परत सर्वहि सत्य पाहीं,
लोकीं सुखासुख टिकें नच सर्वदाही. २६

संपत्तिमान् विधिबलें धनहीन होई,
निर्द्रव्य तो विभववंत तसाच पाहीं;
चक्रप्रधीपरि दशा फिरते सदाही,
हें तत्व अंतरिं धरीं सखया ! सदाही. २७

त्वन्मित्र आम्रहि जगांतरिं धन्य होई,
लोकोपकारकरणीं रत सर्वदाही;
क्षुत्पीडिता--पथिक--संतति--सौख्य हेतु,
छाया करी, तपनदाह हरी; जसा तूं. २८

जेव्हां करून रवि अग्नितुषारवृष्टि,
तापाकुला करित ही सकलाहि सृष्टि;
तेव्हां तुझ्याबरि रसाल करीत--छाया,
सन्मित्र ते विपदिं जे हरिती अपाया. २९

येईल वैभव कधीं परतून तूतें,
जाईल ती सकल ही विपदा लयातें;

केव्हां सरेल अपकारि निदाघकाल,
ऐशा विचारिं कृश होइल हा रसाल. ३०

जाईल जी त्यजुनि तूज विनाशकालीं,
भाग्योदयीं परत येइल ती खगाली;
धिःकार तूं किमपिही न करीं तिचा रे!
आहेत लोचट खरे जगिं भिक्षु सारे. ३१

पर्जन्यकालिं तुज वैभव फार येई,
ग्रीष्मागमीं सकल तें विलयास जाई;
येतात सत्वरगती विपदाविभूति,
हें तत्व तूं ठसविसी दृढ लोकचित्तीं. ३२

" संपत्तिचा भरंवसा तिळमात्र नाहीं,
सत्कारणीं व्यय तिचा करिं सर्वदाही;
प्राणव्ययेंहि करणेंच परोपकार "
हें तत्व तूं शिकवितोस जनांस थोर. ३३

होशी जगीं परमवंद्य खरोखरी तूं,
संतप्त--पांथजन--संघ सुखैकहेतु;
लोकार्थ तूं झिजविशी सदया! तनूतें,
मी मानितों मनिं खरोखर साधु तूंतें. ३४

मेघें सदा उदकवृष्टि करून फार,
द्यावें तुला सतत वैभव हें अपार;
सत्कारणीं व्यय करून सदा तयाचा,
तूं धन्यवाद मिळवीं सकलां जनांचा. ३५

क्ष कवि.

प्रीतीला उद्देशून.

पद. (चाल-- प्रिये पहा--रात्रीचा.)

मनोहरी ! अक्षय प्रीतीलतिके ! जीवन तूं भूवरी ॥ धृ० ॥

अस्तातें जाय रवी
धेनू गोपाल वळवी
प्रेमानें त्यां रमवी--वेणुरव माधुरीं. १

तोफांचा कडकडाट
रुधिराचे जेथ पाट
होसि रणीं त्या अफाट--अश्वारूढ सुंदरी ! २

बहुविध करितां विलास,
सेवित सुख वैभवास,
राजमंदिरीं निवास--होय तव निरंतरीं. ३

हरित वसन लेवोनी
सृष्टि विनटली तरुणी
प्रीतिलते ! त्या स्थानीं--विहरसि कुरणावरी. ४

सृष्टिकरीं गुंफोनी--
कोमळ--कर सुखद वनीं--
रत होसी नृत्य गानीं--नयन तृप्तिला वरी. ५

वनवासी दीन जनीं
प्रीतिप्रेरित भुवंनीं--
करिती श्रम दिनरजनीं--गमत सुख नृपापरी. ६

राजसभा शोभिवंत
होय तव निवास तेथ
क्षुब्ध मानसा प्रशांत--करिसी बघ सत्वरीं. ७

येतां प्रिय ऋतु वसंत
मोदासी तव न अंत
आम्रकुंज तुज पसंत--नयन हृदय जो हरी. ८

साधू--संतीं--भूतीं--
कीं मानवहृदिं वसती !
न कळे कोठें प्रीति--वास न जगतीं करी ! ९

स्वर्गालय प्रेम असे
स्वर्गीहि प्रेम वसे;
स्वर्गसुखा न्यून नसे--प्रीति जरी अंतरीं. १०

दत्ताराम रामचंद्र पिंगे.

सत्सुमदाम.

आर्या.

ज्याच्या बोधसुधेनें पावन झालें मदीय हीन मन,
श्रीज्ञानेश्वरचरणीं प्रेमानें मी करीतसें नमन. १
नमिला **शिवराजगुरू परळी**चा **रामदास** भक्तमणि,
यत्पदकमलाधारें कालभयातें कधीं न विश्व गणी. २
श्रीवरकृपा जयावर, श्रीवर ज्याचें न वित्त किमपीही;
श्रीवरदसाधुवर्णी श्रीवरदा प्रणति **एकनाथा** ही. ३
शशि भगणीं, मन करणीं; साधुजनीं तेवि हा **तुकाराम**.
त्यजुनी तद्बोधसुधा धरिल तरी अन्यहेतु कां **रांम** ? ४
यवनकुलीं जनन जरी, स्मरणीं आणूं नको **कबीर** कसा ?
भेदाभेदरहित जो, भगवज्जनकंकणांत हीरकसा. ५

---

* कवीचें नांव.

ज्या हीन! हीन!! ह्मणती, पारे नमिती सुमति ज्यास; तो **चोखा**.
वंदावा न कसा म्यां? मज वाटे तद्गुणाभ्ररस चोखा. ६

ज्यास्तव अंत्यज झाला **हरि**, तो नमितों प्रबुद्ध **दामाजी**.
कां थोरवी न द्यावी त्यातें म्यां? कृपण देइ दामा जी. ७

यत्किंकर **शंकर**सख नमिला जगदेक विप्रवर **नरसी**,
यद्भक्ति दशमरस सुख देई; जें दे कविप्रवर न रसीं. ८

मान्य कसा न मला तो, भावहृदय **नामदेव**; जारि शिंपी.
लोकीं काम्य न कां ती मोतिं जिच्या उदरीं कठिन वरि शिंपी ९

वंदीन नित्य मोदें **गोरा**, जारि होय हीन! कुंभार!
झाला प्रभु वश ज्याला, नमितों तो **रोहिदास** चांभार. १०

प्रेमानंदें वंदन करितों मी साधु **तुलसिदासाला**,
मज्जन्मग्रामस्था* गुरुकल्पा नमन **टेलदासाला**. ११

दासी श्रीसुखदासी आह्मासी मायसी **मिरादेवी**,
सकरण तनु तच्चरणीं त्यजुनि नृतामान कां न कवि ठेवी. १२

सत्सुमदामीं दासी ह्मणुनि न गुंफावि कां **जनाबाई**
अक्षरमालेंतुनि कशि वांकडि तारि टाकवें जना! बा! ई. १३

हीं साधुबोधसुमनें निज सौगंधें करोत शुद्ध मला,
वंदुनि अर्पी **सत्सुमदाम** विनत **राम** ईशपदकमला. १४

———

गोविंदाग्रज.

* नवसरी.

काव्यरत्नावलि.

अंक ६ वा.

दशरथनिधन.

शिखरिणी.

सुदुष्टा **कैकेयी** मलिनकृतिनिष्पादनपरा,
महाकृत्या धाडी वनिं **जनक**कन्याप्रियकरा;
तदा शोकावेगें **दशरथ** मनीं होय विकल,
दिसे जीर्णारण्यासमचि वसुधा त्यास सकल. १

स्वयें **गंगा**पार त्वरित विभुतें नेवुनि वनीं,
रिता घेवोनीयां रथ सचिव आला परतुनी;
तदा राजा वक्षस्थल धबधबा घेत पिटुनी,
मुखीं घाली धूली क्षितिवरि पडे धीर सुटुनी. २

सुमित्रा कौसल्या त्वरित नरपालास धरिती,
अहा हा ! **श्रीरामा** ! ह्मणुनि रुदितें व्योम भरिती;
नृपाळाच्या भार्या रडुनि अति कल्लोळ करिती;
कुवृत्ता **कैकेयी** परि परम संतोष वरि ती. ३

अमात्याला तेव्हां नरपति वदे गद्गद-रवें,
" दिला दुष्टा मी जो **रघुपति** मदात्मा तुजसवें;
तयाला सोडोनी वनिं परत आलास अधमा !,
अहा ! नाहीं नाहीं तव कठिण चित्तास उपमा. ४

घनश्यामा **रामा** त्यजुनि विपिनीं कृष्णवदना !
कसा आलासी तूं परतुनि मम प्राणहरणा;
तरी आतां लात्रीं झडकरि पुरा पावक सुखें,
नको हा ! हा ! मातें असुखमय हें जीवित फुकें. ५

वनीं टाकोनीया प्रियकर अहा पाडस मम,
कशाला आलासी परतुनि महादुष्ट अधम;
अहा ! या अंधाची हरुनि करिंची यष्टि कशि रे !,
दुरी नेवोनीया अवचित तुवां टाकिलि बरें. ६

मुखीं लावावें जो अमृतचषका मृत्युसमयीं,
दुरी लोटी त्याला कुजन धरुनी वैर हृदयीं;
अरे ! केली तूं ही कृति तशिच ही निर्दय पुरी;
अहाहा ! यापेक्षां उरिं खुपसिली कां नच सुरी. ७

सदाही ज्याला मी बहुत जपलों प्राणधनसा,
सुखावें मी ज्याला बघुनि जलदा चातक जसा;
असे या प्राणाचा खचित जगिं आधारचि भला,
सुखाचा तो ठेवा **रघुपति** अहाहा ! हरपला. ८

विसावा जीवाचा मम नयनतारापति खरा,
तयाला ग्रासी हा अहह ! कपटी राहु दुसरा;
महादुःखाच्या या निबिड तिमिरीं मी भ्रमतसे,
न मृत्यूवाचोनी अहह ! मज आतां गति वसे. ९

विलोकोनी ज्याला बहुत सुख मानीं सतत मी,
निजप्राणापेक्षां कधिंहि गणिला अल्प न कमी;
धनाचा तो ठेवा परम कृपणाचा मम भला,
हरोनी नेला कां अहह ! असुखीं लोटुनि मला. १०

स्वराज्याचा भार प्रथम **रघुनाथा**वरि सुखें,
समर्पोनी जावें सखिसह तपा काननिं निकें;
अशी इच्छा चित्तीं बहुत धरिलीं मीं अजवरी,
बुडे आतां ह्या! हा! परि निबिड नैराश्यतिमिरीं. ११

समर्पोनी पुत्रा सकलविभवश्री अनुपम,
स्वयें कान्तारातें गमन करिती पूर्वज मम;
परी विश्वात्मा तो शिशुपणिं अहा! तें व्रत धरी,
तयाला **कैकेयी** अदयमति ही कारण खरी. १२

बसोनी विश्वात्मा मम कनकसिंहासनिं कदा,
स्वशौर्यें संग्रामीं हरुनि सकलाही अरिमदा;
यशःसौरभ्यानें भरिल धरणी ही कधिं तरी,
अशी उत्कंठा ही अहह! हृदयीं संतत धरीं. १३

अकालीं बर्फानें अभिनव लता ज्यापरि जळे,
तशी आशा माझी अवचित अहा सर्व वितळे;
सुखाचे ते सारे दिवस सरुनी, दुःखमय हा—
अहा! आला आतां समय गिळण्याला मज पहा. १४

अरे! ही **कैकेयी** दिसत मज कृत्याच जगतीं,
हराया मत्प्राणा टपुनि बसली निर्दयमति;
अहा या कृत्येनें मम तनय रानीं दवडिले,
अयोध्यापौरातें मजसह अहाहा! रडविलें. १५

गुणग्रामा! **रामा**! अतुलसुखधामा! निरुपमा!,
नवांभोदश्यामा! धृतकुसुमदामा! शुचितमा!,
चिदानंदारामा! जितललितकामा! सुखकरा!
अहा! दुर्भागी मी खचित मुकलों त्या **रघुवरा**. १६

स्वयें प्रेरोनीया निजवचननक्तंचर कुत्री,
गिळी ही **कैकेयी रविकुल**कलानाथ सपदी;
समंतात् भागीं हें घनतिमिर तेणें पसरलें,
भ्रमे एकाकी मी अहह ! मम आयुष्य सरलें. १७

अगे ! दुष्टे ! केलें तुजवरि सदा प्रेम अतुल,
तुझ्या सौख्यासाठीं मनिं न गणिले कष्ट विपुल;
सुमित्रा कौसल्या मज न तुजपेक्षां प्रियतमा,
अहा ! केली कां गे ! कृति मग अशी दुष्ट अधमा. १८

न केव्हांही तूतें कठिणहृदयें मी दुखविलें,
महायत्नें शश्वत् तव सकल हेतू पुरविले;
नसे केली केव्हां किमपि कुटिलें ! विप्रियकृति,
तुझ्या नैष्ठुर्यानें अहह ! परि आली मज मृति. १९

सदा आनंदानें कथन करिती यद्यश सुधी,
अयोध्यापौरातें प्रिय बहुत जो सद्गुणनिधी;
असे या जीवाचा निरवधि समालंबन भला,
अहा ! दुष्टे ! माझा **रघुपति** कसा तो दवडिला. २०

अगे ! दुष्टे ! केले मम गृह तुंवा शून्यवनसे,
जगीं राहोनीया मज किमपि आतां सुख नसे;
अहा ! झालें माझें परमकटु वार्धक्य सगळें,
प्रफुल्लाशावल्ली मम मुळिहुनी सर्वहि जळे. २१

जरी फुल्लांभोजा वदनसुषमा ही तव हरी,
अहा ! दुष्टे ! आहे तव हृदय वज्रापरि तरि;
सुरस्त्रीतुल्या तूं जरि वरुनि पुण्याकृति खरी,
मला वाटे कृत्या खचित तुजपेक्षां बहु बरी. २२

अयोध्यापौरातें सुखवि कारि नेत्रोत्सव गुरू,
अहा ! च्छेदोनीया मम उपवनींचा सुरतरु;
दिला तो टाकोनी दवदहनराशींत कुटिले !,
धरित्रीचें सारें उपचितमहैश्वर्य लुटिलें. २३

समस्ता विश्वातें अमृतकिरणीं तोषवि शशी,
तयाला धिःकारी कपटपटु घूकावलि जशी;
प्रजा माझी ज्याचे निरखुनि महासद्गुण रमे,
तुला त्रैलोक्यात्मा **रघुपति** कसा अप्रिय गमे. २४

नको राहूं येथें त्वरित कारें तूं कृष्णवदना,
अगे ! दुष्टे ! व्याली अससि जरि तूं कुंदरदना;
तुझ्या संसर्गाचें भय गमतसे फारच जनां,
प्रजा गेली तूतें भिउनि विभुच्या मागुनि वनां, २५

त्रिलोकीं दुर्वृत्ते ! तव कुयश मोठें पसरलें,
तुझ्या सौभाग्याचे दिवस अवघे जाण सरले;
तुंवा दुष्कर्माचा ध्वज उभविला उन्नत नभीं,
तुला पाहोनीयां कवण मग तो सज्जन न भी. २६

वनीं गेला आज्ञा त्यजुनि विभु कल्याणसदन,
प्रजा झाली सारी विकल, मम हें जेंवि वदन;
वियोगें पुत्राच्या मरण मज येतां झडकरी,
करीं साम्राज्यातें मग गतधवा तूं क्षितिवरी. २७

शिखा अग्नीची ही अतिभयकरी आणुनि घरा,
अमात्या ! झालों मी सदनदहना कारण खरा;
तयामध्ये माझी अहह ! तनु गेली जळुनियां,
चुकी माझी आली मज मरणकालीं कळुनियां. २८

सुखें ज्या आरामीं सुरतरुलतावृंद निवसे,
महानंदाचें जें सतत वसतिस्थान विलसे;
स्वयें तेथें मी ही विषमय लता लावुनि खलें,
विपद्गर्तेमध्यें ढकलुनि दिलें सर्वही बळें. २९

सुशीले ! **कौसल्ये** ! सुमति तव सौभाग्यसदना,
अकस्मात् लावी ही ज्वलन असुरी कृष्णवदना;
विपत्तीचा आतां खचित तुज आला समय हा,
अहा ! भोगीं आतां निरवधि महादुःखनिवहा. ३०

समस्ताचा आत्मा **रघुपति** वना जाय निघुनी,
जगामध्यें आतां फल मज अहा ! काय जगुनी;
प्रजा गेली सारी निघुनि, पडली ओस नगरी,
महा कृत्या येथें सुखित बहु ही नर्तन करी. ३१

असे या जीवाचा निरवधि समालंबन भला,
दिसेल **श्रीराम** प्रभु फिरुनि तो काय मजला;
वनीं कोठें त्याला त्यजुनि वद आलास सचिवा !
तयावांचोनी ही दिसत नगरी सर्व अशिवा. ३२

विवस्वान् सारी ही दशशतकरीं तापवि धरा,
महातापें होई मृगखगगण व्याकुळ खरा;
अशा काळीं रानीं कमलदलसा कोमल पहा,
कसा गेला **राम**प्रभु चरणचाली मग अहा !. ३३

खुपे ज्याला भारी नवकुसुमशय्याहि रुचिरा,
नवांभोजस्निग्ध प्रभुवर असा कोमल खरा;
पथीं चालोनीया विषमविपिनीं फार थकला,
सुमन्ता ! कोठें तो प्रभुवर अहा ! सांग निजला. ३४

दुकूलांनीं ज्याची तनु सततही भूषित दिसे,
सुमन्ता ! रानीं तो तनुवरि धरी वल्कल कसें;
असे विश्वात्मा तो मृदुलतरशय्यापरिचित,
पडे हा ! हा ! रानीं क्षितितलिंच धूलींत खचित. ३५

सुरांनाही स्वर्गी असति बहु जीं दुर्लभ खरीं,
अशीं पक्वान्नें जो सतत सदनीं भक्षण करी;
तरुच्छायेखालीं बसुनि फलमूलादिक कसे,
अहा ! सेवी आतां उदक गवसे वा न गवसे. ३६

वनीं जातांना तो प्रभु तुजसवें काय वदला,
वरी मूकत्वा वा विषम वनि चालून थकला;
मनस्तापानें तें मुखकमल कां होय विकल,
निवारी वा धैर्यें प्रबलहृदयक्षोभ सकल. ३७

अहा **आत्माराम** स्मरुनि मजलागी बहुपरी,
सदाही गाळी कां निबिड नवबाष्पांबुलहरी;
स्मरे **कौसल्येतें** फिरुनि फिरुनी काय, वद रे;
तयाला कांहीं–ही प्रिय तिजविणें अन्य न खरें. ३८

" सदा होवोनीयां कुटिल–ललनालंपट मनीं,
अहा ! धाडी वेगें नृपति मजला निर्जन वनीं;
नृपाच्या बुद्धीला अहह ! खचित भ्रंश पडला, "
असें बोलानीयां प्रभुवर वनीं काय रडला. ३९

मला भेटायाला परत कधिं येईल तरि तो,
सदा सूक्तींही जो प्रबलहृदय क्षोभ हरितो;
पुन्हा **रामाचें** तें कमलमुख मी पाहिन कधीं,
व्यथा ही सोसावी अहह ! कशि आतां निरवधि. ४०

महासाध्वीश्रेष्ठा उभयकुलदेवीच दुसरी,
जिच्या चारित्र्याला वसुमतिवरी अन्य न सरी;
स्नुषा माझी धन्या **जनक**नृपकन्या गुणवती,
महारण्यामध्यें अहह ! कशि राहील तरि ती. ४१

सुता ! **सौमित्रा** ! हा सकल जन वानी बहु तुला,
तुझ्या साधुत्वाला खचित जगतीं अन्य न तुला;
स्वबंधुप्रेमाची निरतिशय सीमाच करिशी,
जगीं नाहीं नाहीं खचित दुसरा त्वत्सम वशी. ४२

खरा भाग्याचा तूं प्रभुचरणसेवा तुज घडे,
अहा ! दुर्भागी मी पडुनि शयनीं हा धडपडे;
वनीं गेलासी तूं त्यजुनि अवघीं वैभवसुखें,
अहा ! या कृत्येचें मज न अझुनी दर्शन चुके. ४३

सुमन्ता ! **श्रीरामा**विण हृदय माझें तळमळे
वियोगानें त्याच्या तनु अहह ! ही संतत जळे;
मला **श्रीरामा**चें चरित वनिचें सांगुनि तरी,
विपत्कालीं या तूं भिदुरहृदयालंबन करी." ४४

नृपाचा आक्रोश श्रवण करुनी तो बहुपरी,
सुमन्ताच्या चित्तीं उठति वितता दुःखलहरी;
गळे नेत्रांतोनी अनवरत बाष्पोदक नवें,
महा कष्टानें तो वचन वदला सद्गदरवें. ४५

"क्षणामध्यें भूपा ! त्रिभुवन घडी जो निजबळें,
सदा ज्याची लीला कथन करिती सज्जनकुलें;
चिदात्मा तो येथें निजसुकृतियोगें अवतरे,
करी सत्कृत्यांनीं **रघुकुल** जगीं पावन खरें. ४६

गणोनीयां सारीं तृणसम मनीं वैभवसुखें,
नृपाज्ञा पाळाया **रघुपति** वरी कानन सुखें;
प्रभू तो पित्राज्ञा श्रुतिवचनतुल्या गणितसे;
नृपाला ! या लोकीं गुरुसम तया दैवत नसे. ४७

नसे साम्राराज्याची किमपि **रघुनाथास** महती,
गमे त्यापेक्षांही बहु सुखकरा वन्य वसती;
परी बाधे त्याला विरह तुमचा हा निशिदिनीं,
ह्मणोनी विश्वात्मा निरतिशय शोकाकुल मनीं. ४८

अयोध्या सोडोनी **रघुपति** निघे काननिं यदा,
बघे मार्गे मार्गे फिरुनि फिरुनी संतत तदा;
मनस्तापावेगें खळखळ नवास्रोदक गळे,
निवारी यत्नानें परि किमपिही तें नच खळे. ४९

सुखामध्यें नेई दिन सकल जेथें शिशुपणीं,
समस्ता लोकांतें सुखवि करुनी पुण्यकरणी;
पुरी पुण्या तीही चिरपरिचयानें प्रियकरा,
त्यजोनी जातांना प्रभु विकल झाला नृपवरा ! ५०

स्मरोनी तूह्मांतें फिरफिरुनि मार्गी बहुपरी,
नृपा ! दुःखें गाळी प्रभु सतत बाष्पांबुलहरी;
नवासोत्सेकानें वदनशशि तो फार मळला,
दिसे विश्वात्मा तो तरुवर जसा आंत जळला. ५१

निवारी धैर्यानें जरि हृदयपीडा **रघुपति**,
तरी उष्णश्वास त्वरित तिजला व्यक्त करिती;
महाकष्टानें तो क्षुभितहृदया आवरि जरी,
तरी अन्तर्व्याधि प्रकट दिसते संतत खरी. ५२

वनीं जातांना तो **रघुपति** वदे अल्पचि मला,
विचारांनीं त्याचा हृदयजलधि क्षुब्ध गमला;
निशाकालीं जैसा स्थिरसकलमीन ऱ्हद दिसे,
नृपाला ! त्या कालीं दिसति विभुचे लोचन तसे. ५३

दुकूलांनीं पूर्वी परम विलसे जो **रघुपती**,
विलोकोनी ज्याला मदनहि मनीं लज्जित अति;
जटाधारी आतां जरि वनिं फिरे वल्कलधर,
तरी त्याची शोभा दिसत अझुनीही अतितर. ५४

नृपा ! साम्राज्याचीं अनुपम सुखें सोडुनि खरीं,
प्रभू आनंदानें अतिगहन वन्यव्रत धरी;
फिरे रानीं भास्वान् जरि निजकरीं तापवि मही,
नृपा ! त्याला झाली खचित वनिं शय्या क्षितिचही. ५५

तिघेही ते होते नृपति ! उपवासी त्रिदिवस,
न रानीं भूपाला शिवति फलमूलेंहि सुरस;
मुखें तीघांचींही बहु सुकुनि गेलीं निरशनें,
विलोकोनी त्यांना असुख वरिती सज्जनमनें. ५६

क्षणामध्यें सारें स्मरण करितां कल्मष हरी,
अधिष्ठात्री देवी दिनकरकुलाची क्षितिवरी;
तिच्या तीरीं गेलों क्रमुनि पथ वेगें नृपवरा !,
तदा भेटे आह्मा प्रियसख निषादाधिप खरा. ५७

असे **गंगा**तीरीं सुभग बहु जो हिंगणतरु,
निजे त्याच्याखालीं त्रिभुवनविधाता सुरगुरु;
उषःकालीं बांधी निजशिरिं जटाजूट मग तो,
जसा ब्रह्मज्ञानी मुनि; विभु तसा रम्य दिसतो. ५८

निषादानें नौका त्वरित अणिली सिद्ध करुनी,
प्रभूतें तो सेवी बहुत हृदयीं भक्ति धरुनी;
महीजा—**सौमित्रा**सहित विभु नौकेंत बसला,
मला लक्षोनीया स्खलितवचनें शब्द वदला. ५९

" **सुमन्ता** ! तूं जांई परतुनि पुरातें झडकरी,
नृपाळातें पीडी विरह अमुचा हा बहुपरी;
व्यथा आतां त्याला सहन कशि ही होइल तरी,
विपत्कालीं या तूं नरपतिमनःसांत्वन करीं. ६०

जराग्रस्ता झाली नृपतितनु आधींच विकला,
तशामध्यें आली स्थिति परम कष्टावह तया;
असे हा दैवाचा बहु कठिण निर्घात खचित,
नृपा सांभाळीं तूं तरि करुनिया यत्न अमित. ६१

जरी गेलों कोठें क्षणभर नृपापासुनि दुरी,
तरी भूपालाचें मन विकल होई किकितरी;
परी आतां आला विरह अमुचा दीर्घतम हा,
महादुःखावस्था नृपति कशि ही सोशिल अहा ! ६२

सदाही पित्राज्ञा प्रणत शिरसा मान्य करणें,
तसें मातेचेंही वचन अवघें पूज्य गणणें;
असे पुत्राचा हा खचित जगतीं धर्म पहिला,
तयातें जो भंगी तनय खल तो जाण वहिला. ६३

पित्याच्या आज्ञेनें निबिडविपिनीं वासहि बरा,
तसा मच्चित्तातें अभिमत फलाहारहि खरा;
तदाज्ञा भंगोनी धरि सुचिर साम्राज्यसुखही,
सुमन्ता ! **रामा**तें प्रियकर नसे जाण लवही. ६४

तरी चौदा वर्षें निबिडविपिनीं वास करुनी,
महर्षींचा सारा असुरभव संताप हरुनी;
रणामध्यें शौर्यें करुनि असुरांचा क्षय पुरा,
सुमन्ता! आनंदें फिरुनि मग मी येइन पुरा. ६५

स्वयें साम्राज्याचा भर निजशिरीं घेउनि तरी,
सदाही न्यायानें सकल वसुधापालन करीं;
असे माझा प्राणप्रिय **भरत** तो बाल अझुनी,
सुमन्ता! त्याला तूं शिकविं नयचातुर्य जपुनी. ६६

असे जी या लोकीं खचित सतनु प्रेमसरिता,
जणों अन्या लक्ष्मी जगिं विचरते पुण्यचरिता;
वियोगानें माझ्या विकल जननी जी निजमनीं,
तिला आश्वासावें सतत सचिवा! गोड वचनीं. ६७

असे चारित्र्यानें सकलललनाभूषण खरी,
धरी जी प्रेमाची अनवरत छाया मजवरी;
मुखच्छाया जीची अहह! अधुना बाष्प मळवी—
सुमित्रा मन्माता, कुशल अमुचें तीस कळवीं. ६८

तपस्तेजानें जो क्षितिवरि तपे ज्यापरि रवि,
मनीं सद्बोधानें सकल परम ज्ञान भरवी;
क्षणामध्यें सारें हृदयगत अज्ञान पळवी,
सुमन्ता! ही माझी प्रणति गुरुनाथास कळवीं." ६९

जसा ब्रह्मज्ञानी सकल विषयाशा निरसुनी,
प्रवेशे शांतात्मा त्वरित शुभसायुज्यसदनीं;
तसा **आत्माराम** प्रभु सुरधुनीतें उतरुनी,
महीजा**सौमित्रा**सह परतटीं जाय निघुनी. ७०

उभी **गंगा**तीरीं प्रणतजननेत्रोत्सव करी,
" **अयोध्या**ला जाई " ह्मणुनि मज जी पालवि करीं;
महापुण्यानें ती नयनजधारांहिं भिजली,
मला **श्रीरामा**ची परतटगता मूर्ति दिसली. ७१

निघाला भूपाला ! मग **रघुपती** दक्षिण वनां,
तदा एकाएकी तिमिरनिकर व्यापि नयना;
दुरी जातां **राम**प्रभु निबिड रानांत निघुनी,
अभागी मी आलों मग निजपुरातें परतुनी. " ७२

सुमन्ताची ऐशी परिसुनि गिरा दुःसह पुरी,
गमे भूपालातें जणुं ह्यदें शिरे कां खर सुरी;
जहाला शोकाचा भर अविषह स्थैर्यहि सुटे,
मुखीं मृत्युच्छाया त्वरित पसरे शद्ब न फुटे. ७३

अनन्ता ! **श्रीरामा** ! मुनिजनविरामा अनुपमा,
व्यथा ही साहेना अहह ! मजला दारुणतमा;
तुझ्यावांचोनी हा रडुनि रडुनी कंठ सुकला,
अहा ! त्वत्संगा हा तव जनक अत्यन्त मुकला. ७४

गुणग्रामा **रामा** ! तव ह्रदय तें कोमल असे,
कसें झालें आतां निरवधि अहा ! निष्ठुर असें;
मला वार्धक्यीं या त्यजुनि चिर कान्तार वरिसी,
कसा हा ! हा ! पुत्रा ! मजवरि असा कोप करिसी. ७५

तनूतें जाळी हा तव विरहजन्माग्नि विकट,
नसे शंका कांहीं मम मरण आलें सुनिकट;
तरी भेटी देई मरणसमयीं या झडकरी,
मदाशा ही वेगें सुफलित करीं अन्तिम खरी. ७६

अहा ! धांवें दीनव्यसनपरिहारव्रतपरा !,
प्रभो ! होशी लोकीं प्रणतजनकल्पद्रुम खरा;
उपेक्षा ताताची करिशि मग तूं यापरि कशी,
अरे ! देईं वेगें मरणसमयीं दर्शन मशीं. ७७

द्विजाचें हा ! हा ! तें प्रकट दिसतें शापवचन,
दिसे आतां कैसें मरणसमयीं पुत्रवदन;
खरा दुर्भागी मी असुनिहि चतुर्नंदन पहा,
नसे माझ्यापाशीं मरणसमयीं एकहि अहा ! ७८

अहा ! कोठें आहे **रघुकुलकलानाथ** सकल,
अहा ! गेला कोठें अतुलकरुणामेघ विमल;
अहा ! नेला कोणी हरुनि कृपणाचा मम निधी,
झरा प्रेमाचा तो अहह ! सुकला कां निरवधि. ७९

परिच्छेदातीता विकृति मज ही काय न कळे,
प्रदीप्तज्वालांनीं तनु सकलही आंतुनि जळे;
तमोभारानें हे नयन अवघे पूर्ण भरले
अहा जिव्हा झाली जड परम ही ! **राम** ! ! !.... ८०

नारायणसुत.

मैनलँदेवी.

उद्गार ६ वा.

ह्या काव्यांत **मैनल**देवी ही प्रसूत होऊन ती पुत्ररत्न प्रसवली. ही वार्ता **सुमंत्र** प्रधानानें **कर्णा**स कळविली. त्या वेळेस **कर्णा**ची झालेली

---

* गेल्या अंकांत ह्या काव्याचा ५ वा उद्गार आलेला असून ह्या अंकांत सहाव्या उद्गारानिशीं हें काव्य समाप्त झालें आहे.

विलक्षणस्थिति व त्याचा भयंकर संताप. तो संतापाकुल होऊन **मैनल**-देवीचा वध करण्याकरितां सूतिका गृहांत गेला. त्याच्या मागोमाग **सुमंत्र** प्रधान जाऊन त्याणें **कर्णा**चा हात आवरिला, नंतर **मैनल**देवीनें खुणेची आंगठी **कर्णा**स दाखवून त्याचा भ्रम दूर केला. इत्यादि भाग यांत आलेला आहे.

(साकी वृत्त.)

अशा प्रकारें क्रमाक्रमानें गत झाले नव मास;
शोक--वृकानें तोडतोडिलें रायाचें नव मास. १
होता पूर्वी रूपें, तेजें, तळपत राजस बिंडा;
विवर्ण, निर्बळ, झाला आतां, वाहुनि चिंता--दिंडा. २
एके दिवशीं राज--मंदिरीं गडबड थोर उडाली,
प्रभात--कालीं जों कर--माली ये उदयाचल--भालीं. ३
मैनलदेवी सुत प्रसवली बालार्का समतेजा,
पाहुन व्हावें प्रसन्न तत्क्षण शिशूस लोक--मतें ज्या. ४
हां हां ह्मणतां वार्ता पसरे या विषयाची पौरीं,
लोक हर्षले, जसे सुर यदा **स्कंदा** प्रसवे **गौरी**. ५
उपायनासह वार्ता सांगे **कर्णा** सचिव **सुमंत्र**,
राय दचकला, चकला, स्पर्शुन जेवीं विद्युद्--यंत्र. ६
प्रथम तयाच्या मना कळे ना त्याचा अर्थहि नीट,
जणों उडे ना बुद्धीवर जें सांचे मळकट कीट ! ७
शून्य लोचनें निरखित राही तोंडाला सचिवाचे,
स्फुरे ओंठ, पण येई न मुळीं त्या व्यक्तत्वचि वाचे. ८
हळूहळु परी प्रकाश लागे हृत्प्रांतीं उतराया,
तदर्थबोधें तत्काळचि ये विकृतीचा उत राया. ९
अर्थ बिंबतां मनीं, न झाली त्यास तोषदा वार्ता,

भ्याली नृप--मति वनीं मृगीशी पाप--दोष--दावार्ता. १०
कानीं नाहीं सुत--जन्माची मंगल वार्ता कथिली,
जणों ओतलें सचिव **सुमंत्रें** तप्त रसायन कथिलीं. ११
चरचर चरचर काळिज जळुनी, बसला जणु चटकाच,
राज--कुलाची सु--कीर्ति वाटे फुटली फटफट काच. १२
दार--दुरित तें मर्मच्छेदचि कैसा न गमो त्याचा ?
सु--यशो--रूपी गमे भंगला ऐसा नग मोल्याचा. १३
गर्जे, हाले, उसळे, जैसा उदधी मृग--नक्षत्रीं,
तैसा हृदयीं व्हावा ढवळुन का नृप मग न क्षत्री ? १४
क्रोध क्षोभुन हृदयाकाशीं मांडी निज आखाडा,
राय गर्जनें, श्वासें, नयनें, लज्जा दे आखाडा. १५
जणुं तद्--हृदयीं निगूढ होता ज्वाला--मुखी खराच,
स्फोट होउनी एकाएकीं मांडी भैरव नाच. १६
पाय--तळाची जाय मस्तका तिडीक, बसुनी घाय,
'हाय ! बायको काय ! ' ह्मणोनी, राय आपटी पाय. १७
कर--तळ चोळी, गमे उचटला हृदय--कोष तो गाढा,
ओंठ दंशुनी, करकर रगडी आवेशानें दाढा. १८
दुराचार--रत दार--रूप जो जडे काळिमा वदना,
खड्ग--करानें उचित वाटलें पुसणें तो **कर्ण**--मना. १९
पूर्वीचें तें वेड उडालें, शिरलें दुसरें वेड.
शांतिनीतिला दडपुन भरली अविवेकाची पेड. २०
विचार--कोट--स्फोट जाहला, सुटतां ही जंजाला;
मनांत आलें, तें करण्याला राजा उत्सुक झाला. २१
उपसुन लखलख खड्ग--लता जी **काला**ची रसनाच,
जणों मांडिती वीर--भयानक--रौद्र--चंड--रस नाच. २२

तडक निवाला चापापासुन सुटलेला जणुं बाण,
दार--वधाचें पदरीं घ्याया नीति--हानि--कर वाण. २३
पिसाट हातीं कोलित घेऊनि मारी जैसी धांव,
धांवे तैसा, त्या वेळेला, हा वेडा जड राव. २४
रोषावेशें स--खड्ग घुसला राय सूतिका--गेहीं,
जनन--प्रांतीं काय रिघाला दंड--पाणि **यम** देही ! २५
सुमंत्र मागुन धांवत आला, झालें मन भय--भीत,
कीं जो रचिला व्यूह, तयाचा अंत न हो विपरीत. २६
दुष्ट विकारामागुन यावा हृदयीं विचार जेवीं.
रायामागुन सचिव सूतिका--गेहीं शिरला तेवीं, २७
राय घाय जों जाय कराया स्व--स्त्रीवर पर्यंकीं,
हात आवरी **सुमंत्र**, त्याला उद्धरिता अघ--पंकीं. २८
रागातिशयें नृप पाहे जों मान वळवुनी पाठीं,
तो भासे मज घे सिंहाची अवलोकन--परिपाठी. २९
तोंच **मैनला** बसुनी, उठुनी, उतरे भूवर खालीं,
वस्त्र सांवरी, शिरास नमवी, मूर्त **नीति** जणुं आली ! ३०
मैनलदेवी रायापुढती बांधी जी अंजलि ही,
ती वाटे त्या लिखित दाखवी जें विधि--कर--कंज लिही. ३१
राय झाडुनी हातपाय तो तिस धिक्कारूं लागे,
श्वास--मिषानें रोषाग्नीची बहु आहाळ धगागे. ३२
परंतु **मैनल**देवी ओती सुधा--वाणिची धारा,
शांतवून ती पावक, निवळी सारासार--विचारा. ३३
देवी बोले, " नाथा ! माथा शांत जरा ठेवावा,
रागा न धरा, जों नच आलें इंगित तुमच्या गांवा. ३४
' पति हें दैवत सतीस उत्तम, ' जाणुन हें श्रुति--सार,

माझ्याकडुनी कसा घडावा पात--कर व्यभिचार ? ३५
हृत्कोशीं या बोध--केसरी असतां संतत जागा,
दुरित--जंबुका रीघ मिळे कां ? नाथा ! उत्तम--भागा ! ३६
पति--प्रीतिची वाहे निर्मल, मंगल, उज्ज्वल, **गंगा**,
व्यभिचाराचा अशुभ मल कसा चिकटावा या अंगा ? ३७
तुह्मीं, सोडुनी मला सतीला, जरी सेविल्या असती,
तरी न माझ्या मनो--वृत्ति या चंचल झाल्या असती. ३८
पहा, पहा, हो ! स्पष्ट दिसे ही निर्मळतेची खूण,
पहा, पहा, हो ! दूर करिल ही शंकेची गुणगूण. ३९
शंका केवळ जीव--हानि--कर होय विषारी गोळी,
तिची शक्ति--हर धरीतसे ही जादू मम आंगोळी. ४०
स्मरण--भूमिचें कपाट जेणें खुलें होउनी जाय,
ती ही माझी असे अंगुली, न्याहाळा, नर--राय ! ४१
वसंत--लक्ष्मी--समा अंगुळी माझी असे अदूर,
युष्मन्मति ही जशी कोलिला सेविल मधु--रस--पूर. ४२
या आंगठिचें तेज पाहुनी सुधा--किरण--सम--शील,
ह्मणाल, ' वेड्या ! मना ! ताप हा सोड, सुखीं रमशील. ' ४३
नसे आंगठी, प्रिया ! काय ही ओळख ती पटवीत ?
प्रीत आठवा निज निस्तुल, ती व्हावी का विपरीत ! " ४४
मैनल--वचना तेव्हां ऐकत असतां असतां राय,
त्याची बुद्धी, शुद्धी, शक्ती, गोंधळूनिया जाय ! ४५
विचारांत तो मग्न जाहला, निश्चय ठाम न होत;
शस्त्र करींचें गळुनी गेलें; विस्मय ओतप्रोत. ४६
कळे न त्याला, ' काय पहातों, काय ऐकतों तेंही,
गेहीं किंवा असें वनीं मी; ' भान लोपलें देहीं. ४७

टकमक टकमक **मैनल**--देवी–मुखाकडे तो पाहे,
भ्रांत मनानें शून्य दृष्टिनें, निश्चळ केवळ राहे. ४८
एकवार त्या गमे, ' आपली आली मानस--देवी; '
पुन्हां विचारी, ' अभाग्यास ती सांपडणारी केवीं ?' ४९
ही ती, किंवा ती ही, याचा त्यास न लागे थांग,
उलटें सुलटें जग भासे त्या, जणूं सेविली भांग ! ५०
' मी जागा, कीं असें झोंपलों ? ' उलगडलें हें न तया,
तोंच जाहली पुन्हां **मैनला** मानस--देहें नत या. ५१
ह्मणे सती, " जी वेश्यावेशें होय मना आवडती,
सती प्रिया निज तीच कळुन, कां शंका चित्ता जडती ? ५२
नीच वेशही धरितां झाली जी तुह्मां प्रिय आली,
निर्मळ, उन्नत, तीच निश्चिता; मग कां वृत्ती भ्याली ? ५३
दिलें वचन मी होतें, ' काळ--क्रमें कळे मम वृत्त, '
तेंच घडे हें आज; असावें भ्रमाहुनी विनिवृत्त. ५४
पहा, पहा, हो ! कोमल, सुंदर, नव, निज–वंशांकुर हा;
केवळ तुमची प्रतिमा दिसतो; महा–महा यास पहा. " ५५
पुढें साजला राज--मंदिरीं महानंद, अर्णव तो
न शद्ब जुळुनी मजला कांहीं वाचक हो ! वर्णवतो. ५६

मैनलदेवी काव्य समाप्त.

—— बाळकृष्ण अनंत भिडे बी. ए.

परापूजा.

(श्रीशंकराचार्यांच्या मूळ संस्कृतावरून.)

चाल–" चंद्रकांत रायाची "

चराचरीं तूं, आवाहन ये काय तुझ्या कामीं.
सकलाधारा द्यावें तुजला काय आसना मीं. १

स्वच्छ जो, तया केले ठरती अर्घ्यपाद्य वायां.
कर वाहे ना आचमन तुला शुद्धाला द्याया. २
घालूं कैसे तुला निर्मला देवा ! स्नानातें.
विश्वोदर तूं, तुला वहाया पट कवण्या हातें. ३
निरालंब तूं, उपवीताचें महत्व तुज नाहीं
नसे वासना, फुलें सुवासिक निष्फल त्या ठायीं. ४
गंधाची थोरवी कोणती नसे लेप ज्याला
स्वता रम्य तूं, फिकी तुजपुढें पडे रत्नमाला. ५
सदा तृप्त तूं, नैवेद्याचीं काय तुला वाणें
विभो ! तुष्ट तुज कसें करावें म्यां तांबूलानें. ६
नसे अनंता ! प्रदक्षिणेचें बल माझ्या ठायीं
अभिन्न तूं मी, मग कवणाच्या लागावें पायीं. ७
तुजला स्तवितां हात टेंकिले जेथें वेदांनीं
कशी टिकावी तेथें वाणी मम बापुडवाणी. ८
स्वयंप्रकाशी काय त्यापुढें नीरांजनजोती
विसर्जन तुला कोठें, विश्वें नांदविसी पोटीं. ९
कळून सारें सजलों देवा ! तुझ्या पूजनासी
भय न लेंकरा वाटे जाया निजजनकापाशीं. १०
चुकले मुकले शब्द मुलाचे गोडच जनकातें
बालिश लीला बघून त्याच्या मनीं हर्ष दाटे. ११
अजाण मी लेंकरूं, तुजकडे जनकाचें नातें
तव सेवेचा देवा ! ओढा असे मात्र मातें. १२
येईल तशी करितों सेवा गोड करुनि घ्यावी
पुण्यपदाची जोड वत्सला ! **विनायका** द्यावी. १३

विनायक.

चिमणीस उद्देशून.

[सकाळीं उठून बाहेर येतांच अंगणांत दोन चिमण्या अगदीं निकरानें भांडतांना दिसल्या–त्यावरून सुचलेले विचार.]

पद. (चाल--वीरा भ्रमरा०)

हरहर ! **चिमणे** ! कवण्या परिचा खेळ तुवां मांडिला
होई बोध न किमपी मला ! ॥धृ.॥
चिंव चिंव करुनी उड्या मारुनी रमसी मम अंगणीं
टिपितां दाणे पात्रांतुनी.
पिलें गोजिरीं मुखा उघडितां भक्ष्य तयां घालिसी
अवघी माया जणुं ओतिशी !
मिळवुनी मउ मऊ चारा खपुनी सदा
टुमदार बनविसी घरटें--सुख संपदा--
ठेविसी पिलांना प्राणापरि सर्वदा,
हाय ! कुठें ती माया गेली ?--लपली गिरिकंदरीं ?
वदे कां तूं सजली संगरीं ? १

आप्तमित्र, गणगोत, सोयरे घेवोनी संगतीं
खेळतां मौज किती, नच मिती.
विमल शांत निर्झरीं शमवितां श्रांत मना डुंबुनी
होतो मोद अमित पाहुनी !
घेत भराऱ्या जिवलगा–सवें फिरसी--सुख सेविसी
गडे ! गे ! धन्य जिवा मानिसी.
तूं बोध यापरी सकलांना दावुनी
जन--नयन आपुले क्रीडेनें सुखवुनी
राहसी सदोदित मोदवृत्ति सेवुनी,

हाय हाय ! तो हर्ष, सौख्य तें काय आज मावळे ?
न कळे तव बुद्धी कां चळे ! २

पंख विखुरले, कोमल मुद्रा भीषणता आदरे
नयनीं अग्नि जणूं संचरे.
जीव केवढा--भीमाहुनियां प्रबल शक्ति वाटते.
जणों ती सकलां संहारिते.
कवण विरोधीं आज दीन हा कैसा रत होवुनी--
अरी हो भस्म तुझ्या हातुनी !
सोड गे ! सोड हा राग देइ सोडोनी;
दे दया क्षमेला वास आपुले मनीं,
लवही न लाभ तो खचित गमे भांडणीं
विवेक धरुनी राग आवरीं, शांत मनातें करीं
तेणें सौख्य सदा भूवरीं. ३

दत्ताराम रामचंद्र पिंगे.

प्रीतिसंगम !

वसंत ऋतूंत एके दिवशीं कवि **कऱ्हाड** क्षेत्रीं **श्रीकृष्णा**—दर्शनार्थ गेला असतां तेथील देखावा पाहून सुचलेले विचार त्यानें खालील पद्यांत वर्णिले आहेत.

पद. (चाल--काय वदूं नशिबातें भैरवी)

संगम हा तोष--द वाटे मनातें । **कोयने**प्रती **कृष्णा** भेटे ॥धृ०॥
पितृदिशेनें आली **कृष्णा** । उत्तरवाहिनी सरित्**कोयना**
सन्मुख दोघी भेटती जाणा । असा न प्रीतिसंगम कोठें १
भेटहि होतां बहु दिवसांनीं । प्रेमल ऐशा भगिनी दोन्ही
आलिंगित्ति कीं प्रेमभरांनीं । सौख्य किती हें हृदयीं दाटे २

अथवा जैशा दुहिता माता । परस्परांच्या कंठीं पडतां
काय वर्णवें ती वत्सलता । शब्दसिंधु हा सर्वहि आटे ३
मधुपय उदकीं मिळतां जैसें । एकरूप तें प्रकटवी खासें
अभेदता ही पाहुनी तैसें । नवल वाटतें मजला मोठें ४
सुता**कोयना** पोटिं धरोनी । जननी **कृष्णा** तिजलागोनी
प्रियकर पतिचे पोंचवी सदनीं । अश्रुपूर हा नयनीं लोटे ५
ह्मणुनि **कऱ्हाडा** दक्षिणप्रांतीं । **प्रयाग** ऐसें जन कीं वदती
सुरवर किन्नर स्नाना येती । कौतुक वाटे मन्मनिं मोठें ६

अनंततनय.

ईश्वरी लीला अगाध आहे !

आर्या.

एका आम्रतरूवर घरटें बांधून आपुलें चोख,
त्यामध्यें प्रेमानें पक्ष्याचें जोडपें बसें एक. १
द्याया परस्परांच्या गांठ दृढ प्रेमरज्जुना फार,
ईश कृपेनें होती त्याना सुंदर पिलें तई चार. २
लालनपालन करुनी स्वपिलांचें निशिदिनींहि बहुसाल,
सुख अनुभविती खग तैं, पण सुख त्यांचें टिके न चिरकाल. ३
राहे कोण जगीं या सदा सुखी ? या करावयास खरें--
कविवचना जणुं, त्यावर संकट बहु धोर शीघ्र तैं गुदरें. ४
घेउन एक ससाणा, भाताही भरुन तीक्ष्ण शर त्यांत,
तैसें धनुष्य घेउन तेथें ये व्याध अल्प कालांत. ५
सोडी व्याध ससाणा आकाशीं, तरुतळीं स्वतां राहे,
करुनी सज्ज धनूला त्या पक्ष्यां मारण्यां तई पाहे. ६

उडतां धरे ससाणा, बसतां तेथेंच पारधी मारे,
ऐसें बघून तेव्हां पक्ष्यांचें धैर्य त्या गळें सारें. ७

पाहून मार्ग खुंटे सुटकेचा आपुल्या असें तेव्हां,
भक्तिभरें आळविती पक्षी निजभजक--तारका देवा. ८

देवा ! दयासमुद्रा ! धांव विभो ! सत्वरीं जगन्नाथा !
आलों शरण तुझ्या पदिं आह्मी, आह्मास रक्षि तूं आतां. ९

तुजवाचून जगीं या आह्मा कोणी न राहिला त्राता,
दीनोद्धारक ! लवकर बिरुदाला राखिं आपुल्या आतां. १०

पक्ष्यानीं भक्तिभरें आळवितां ये दयाब्धिला भरती,
संकट कालीं वाली कोण दुजा त्याविणें असे जगतीं ? ११

खगसाह्या ईश जवें योजी त्या तरुतलस्थ सर्पाला,
सर्पानें व्याधाला जोरानें दंश तत्क्षणीं केला. १२

दंशें त्या व्याधाचें गेलें तत्काल हरपुनी भान,
चापांतून सुटे शर, मरे ससाणा चुकून संधान ! १३

निरुपद्रवि--जीवांचा घातक तो व्याध मृत्यु पावतसे,
त्या पक्ष्यांचें रक्षण ईशकृपेनें क्षणांत होत असें ! १४

तात्पर्य मनुजमात्रें केव्हांही होउनी विकारवश--
नच दुष्कृती करावी, कर्त्याचा मात्र ती करी नाश. १५

आपत्कालीं मनुजें केव्हांही धैर्य निज न सोडावें,
ईशा स्मरुनी, करुनी निजकर्तव्यास, सुयश जोडावें. १६

ही कृति वसे सदा जर बुधगण हृदयांत होउनी प्रिय त्या,
तर मज मिळेल बहु सुख, जेवीं स्वसुताहितां बघून पित्या. १७

— — — — कृष्णाजी बाबाजी कुळकर्णी.

काव्यरत्नावलि.

अंक ७ वा.

दोरंगी दुनिया.

साकी.

सत्वशील, शुचि, धर्मपरायण, हरिभजनीं रतलेला—
विप्र असा कुणि भारतवर्षी पूर्वी होउनि गेला. १
कंदमूलफल सेवन करुनी स्त्रीसह सौख्यें नांदे,
यथाशक्ति करि परोपकारा; पीडा कवणा ना दे. २
प्रभुकृपेनें एक सुलक्षण पुत्र जहाला त्यास,
पुत्र नव्हे तो शोभादायक अलंकार सदनास. ३
कोमल, नाजुक, सरस, मनोहर, तनुजाची ती मूर्ती,
नयनीं पाहुनि धन्य आपणा पितरें मानुनि घेतीं. ४
तयांस देई सुतमुखचुंबन सुधारसाहुनि गोडी,
परी हाय ! हा ! त्या सौख्याची शाश्वतता अति थोडी. ५
न लागले शिशुचरण भूमिला तोंच घडे प्रभुकोप,
हाय ! हाय ! तें दग्ध जहालें कुलवृक्षाचें रोप. ६
सुतशोकाचा लागुनि झटका विव्हल झाला तात,
जननीच्या तर हृदयावर तो पडला वज्राघात. ७
वत्सवियोगें गाय जशी, ती केवळ वेडी झाली;
धरुनि मुलाचें प्रेत उराशीं स्मशानभागीं आली. ८
पींड पोटचा पहा जरी निष्प्राण होउनी गेला,

दहनभूमिवर न ठेवबे त्या शोकाकुल मातेला. ९

पुन्हा पुन्हा ती रडे मृताचें निष्प्रभ मुख निरखून,
गृध्र एक तैं आला तेथें रोदनरव ऐकून. १०
त्या अबलेच्या स्कंधप्रांतीं जाय तयाचें लक्ष,
जिव्हा वळवळ करूं लागली दृष्टिस पडतां भक्ष. ११
शिष्टपणें मग ह्मणे " अगे ! या ठेव सुताला खालीं,
सुखें गृहीं जा घडोनि आलें जैसें लिहिलें भालीं. १२
आजवरी अगणीत जनांचे प्राण कृतांतें नेले,
ठेउनि त्यांनां या स्थानावर आप्त गृहासी गेले. १३
वृथा रडोनी प्राण आपुला कां करिशी हैराण,
जन्मा आला मरण तयाला हें विधिनिश्चित जाण. १४
जिकडे तिकडे चिता भयंकर धडाडती या पाहीं,
अशा अमंगल जागेवरती गे ! क्षणही नच राहीं. १५
आतां अस्ता जाइल सविता पडेल निबिडांधार,
त्वरें घरा जा धरूं नको या प्रेतीं प्रेम असार. " १६

ऐकुनि ऐशा **गृध्र**भाषणा उठली बहु कष्टें ती,
तोंच ' थांब गे ! थांब ' ह्मणोनी शद्ब श्रवणीं येती. १७
वळोनि मागें बघतां दिसला एक कृष्ण **जंबूक,**
विवरद्वारीं टपोनि बसला जो शमवाया भूक. १८
प्रेत विलोकुनि आतुर झाला करावया तद्ग्रास,
परी न चाले निशाचराचें बल कांहीं दिवसास. १९
बसल्या जागेवरून विनवी " थांब जरा गे ! बाई !
गृध्रभाषणावरी भरंवसा धरुनि गृहीं नच जाई. २०

करिल कदाचित या मृतदेहीं पुन्हा प्रवेश प्राण,
घडी कधीं येईल कोणती निश्चय नाहीं जाण. २१
उल्हासित करि सदा जयाचें दर्शन तव चित्तासी,
धूलीमाजीं लोटुनि त्यासी आज अशी कां जाशी. २२
पुष्पासम करतलीं जयाला झेलुनियां धरिलेस,
प्रेम तयाचें आज न उरलें त्वच्चित्तीं गे ! लेश. २३
बरी तुह्मां मनुजाहुनि वाटे पशुपक्ष्यांची जात,
स्वापत्यांवर ते निष्काम प्रेम सदा करितात. २४
बाळें वाढुनि वृद्धपणीं हीं देतिल चारा पाणी,
हें प्रेमाचें ध्येय तयांनीं कधीं न धरिलें ध्यानीं. २५
परंतु दिसतो लोभमूल हा पुत्रस्नेह तुझा गे !
झालासे मृत ह्मणोनि त्याप्रत टाकुनि जाशी मागें. २६
सुकोनि जातां कमल तयासी मधुकर मानिति त्याज्य,
कृती तुझी ही तशीच दिसते गे ! हतवत्से ! आज. २७
असो; न हाले येथुनि रविचा प्रकाश जोंवर आहे,
पुनरुज्जीवन या तनुजाचें चित्तीं चिंतित राहें." २८

येतां झाली परत बापडी होउनियां निरुपाय,
परि संतापुनि **गृध्र** तेधवां बोलूं लागे काय. २९
"अगे ! भ्रमिष्टे ! विवेकनष्टे ! असो तुला धिःकार !
जंबुकवचनें मोहुनि जाशी करिशी वेडे चार ! ३०
पुत्रसुखाची प्राप्ति घडे कां प्रेताला कवळून,
तरि मग घेई उचलुनी हे दिसती जे पाषाण. ३१
जीवन येइल कसें खुळे ! या काष्ठासम देहास,
नको धरूं गे ! स्वप्नांतहि तूं ऐशी भलती आस. ३२

मनुजाधीन न जन्म मृत्यु हा विधिघटनेचा खेळ,
ऊठ गृहीं जा वृथा न दवडीं आयुष्याचा वेळ." ३३

सदनीं जाया सिद्ध जहाली खगवच मान्य करून,
तों **मृग**–वंचक 'थांब' ह्मणोनी आला आड फिरून. ३४
बोले " झालें असें उतावीळ चित्त तुझें गे! कां हें,
राहें निर्भय इथेंच अजुनी दों घटिका दिन आहे." ३५
गृध्र ह्मणे तैं 'जा जा गे! रवि अस्त जहाला ऐक'
'नाहीं नाहीं' ह्मणुनि तयाचें खंडण करि **जंबूक**. ३६

यापरि हितकर जशी जयाला तैशी सांगुनि नीती,
स्वार्थसाधनीं धडपड केली बहु पशुपक्षांनीं ती. ३७
बावरुनी बहु जाय माउली स्थैर्य नुरें तद्देहीं,
सुचे न तिजला इथें रहावें अथवा जावें गेहीं. ३८
तया प्रसंगीं करुणाघन ह्या प्रभुला करुणा आली,
एकाएकीं सुधारसाची वृष्टि महीवर झाली. ३९
मृत झालेलें, नव्हे नव्हे जणुं निजलेलें तें बाळ;
जागें होउनि लागे दुडदुड रांगाया तत्काळ. ४०
तैं मातेच्या आनंदाला उरला नाहीं पार,
कडिये घेउनि त्या सकुमारा चुंबियलें शतवार. ४१
मनीं प्रीतिचें, स्तनीं दुधाचें खळखळ भरतें आलें;
ठेउं कुठें तरि तान्हुल्यास या ऐसें तिजला झालें. ४२
हर्षातिशयें गेली क्षणभर विसरुनि सारें भान,
हातीं आलें हारपलेलें संसृतिसौख्यनिधान. ४३
आली होती रडत, तथापी हांसत सदनीं जाय;

मात्र बुभुक्षित पशुपक्षी ते करीत बसले हाय. ४४
मायिक मिथ्यालाप तयांचे कामीं अल्प न आले,
परंतु तेणें तत्व केवढें जगता विश्रुत झालें. ४५
' स्वार्थपरायण दुनिया सारी निजहितकार्यी दंग,
जेव्हां जैसा प्रसंग येइल तैसा दावी रंग. ' ४६

——————- बाळकृष्ण लक्ष्मण जोशी.

प्राचीन वैभव !

श्लोक.

सा रम्या नगरी महान्स नृपतिः सामन्तचक्रंच तत्–
पार्श्वे साच विदग्धराजपरिषत्ताश्चन्द्रबिम्बाननाः
उन्मत्तः सच राजपुत्रनिवहस्ते बन्दिन स्ताः कथाः–
सर्वं यस्य वशादगात्स्मृतिपथं कालाय तस्मै नमः

भर्तृहरिः

पूर्वीचीं नृपमंदिरें सुरुचिरें, दिव्येंहि अंतःपुरें,
हा ! हा ! जाति लयास दुर्गहि, तशीं तीं सुंदरें गोपुरें.
होते तत्स्मृति मात्र दुःखद मना ही शक्ति येथें उरे !
इच्छा ही **प्रभुजी** ! तुझी नच दुजी शंका **मुरारे** ! **हरे** ! १
होता वंदित वर्णनीं यश नृपा बंदीजनांचा थवा;
जेथें दुंदुभि अंबुदासम करी गंभीर पूर्वी रवा;
नीतिन्यायविशारदप्रकृतिही भूपासभोंतीं जिथें–
पूर्वी वेष्टुनि बैसती; निरखिलें कां स्थान उध्वस्त तें ? २
नामा ऐकुनि ज्याचिया थरथरा शत्रू पुरा कांपती,
घेऊनी चतुरंग सैन्य निवसे तो दुर्गि सेनापती.

आजी दुर्गति दुर्ग तो अहह ! कीं ईशेच्छया पावला !
खेदोर्मिप्रद पाहिलें स्वनयनें कां त्या सुदुर्गस्थला ? ३

काळाचा पगडा गडावर बसे, झेंडा उभारी तिथें;
येती कोसळुनी धडाड तट ते भूमीवरी खाळतें.
जाणायास तयास आज उरले जे भाग त्यांच्यांतुनी--
आर्यांनो ! बहु भक्तिनें निरखिले कां ते तुह्मीं लोचनीं ? ४

रात्रीं चंद्र करी प्रकाशित जरा जेव्हां महीलागुनी,--
येती घोरवनीं तदा दिसुनियां दुर्गस्थलें जीं जुनीं;
उध्वस्ता भयदा अशी निरखुनी नेत्रीं तदीयाकृती,--
होती क्षुब्ध मनोविकार, करिती उद्विग्न चित्ताप्रती. ५

वा अस्तंगत जेधवां दिनमणी व्हावा, प्रसंगीं अशा--
त्याच्या स्वर्णमयीं करीं उजळती जेव्हां दहाही दिशा,
प्राचीना नृपशून्यगेहशिखरा हैमा तदा पाहुनी,--
चित्ताला विकृती न होय असला कोणी असे कां जनीं ? ६

कोणी अज्ञ ह्मणेल " दुर्ग असले प्रासादही पाहिले;
झाले वैभवशून्य आज जगतीं तन्नाम पैं राहिलें !
त्यांपासून विकार मात्र अगदीं नाहीं मना जाहला. "
त्याला योग्यचि तें रहस्यलवही ज्याला नसे लाभला. ७

कोणी ते करितील तर्क--बघतों त्यांतें जरी प्रत्यहीं,
चित्ताला न विकार होय, न कधीं तीं बोलती बर्णही.
ते पाहोत मनीं करोनि पुरती आपापल्या चौकशी.
' जैशी वर्ततसे सती गुणवती ह्यांचीहि रीती तशी. ' ८

बोलावे जरि बोल सुंदर इहीं ऐशी कुणाला स्पृहा,
जावें घेउनियां सवें तरि तयें उत्कृष्ट संभार हा;

त्यांचे बोल कळावयास्तव हवी पूर्वेतिहासज्ञता,
तैसा श्रोतृगणास मुख्य गुण जो ती मानसैकाग्रता. ९

जेव्हां जाल तुह्मी तयांजवळ हीं घेऊनियां साधनें,
तेव्हां तीं गुज सांगतील तुमच्यापाशीं बहु प्रीतिनें.
जातां त्यांजकडे परंतु नुसतें या साधनांवांचुनी–
गोष्टी दूरच सांगणें ! न बघती नेत्रींहि तीं ढुंकुनी ! १०

जाणोनी मनिं योग्य हृद्गत जरी आरंभ बोलावया--
केला सत्य तिहीं तरी, सुख मिळे; तें ये न सांगावया !
त्यांच्याशीं समता नसे त्रिजगतीं अन्यत्र कोठेंहि ती;
भाग्याचे नर ते अपूर्वसुख हें दैवें सदा भोगिती. ११

ज्यांना श्रेष्ठ अशी सदैव रुचते तत्पूर्वजांची कृती,
वंशा उद्धरितील तेच; जगतीं ते भासती सत्कृती.
प्रेमानें बघती सदोदितचि जे प्राचीनवस्तूंप्रती,
होती आर्यमहीस भूषणचि ते; ते धन्य कीं संप्रती. १२

जेथें वीर विराजले सकटक प्राचीन दुर्गा अशा--
आजी दुर्विधिनें अहा ! निरखुनी पैं छिन्नविच्छिन्नशा,
बाहूंमाजि तयांचिया स्फुरण ये पूर्वील गोष्टींमुळें.
तज्ज्ञालाचि कळे तदिंगित अतज्ज्ञाला कसें तें कळे ? १३

जेथें वीरविलासिनी विलसल्या पूर्वी नृपांत:पुरीं,
त्यांचा कांतवियोगतापचि जणों व्हावा ह्मणोनी दुरी,
कारंजेंहि निकुंजिचें जलकणा वर्षोनि शांती करी.
तें पाहोनि विभग्न येइ भरती अश्रूंस नेत्रांतरीं ! ! १४

वीरांना जयलाभ हो ह्मणुनियां ज्या संकटीं थोरल्या--
तैं कामीं पडल्या, गुहा बहु अशा दुर्गीत विस्तारल्या;

त्यांची देखुनि भीषणाकृति अजी--जी अल्प कांहीं उरे,--
रोमांचीं तनु होतसे पुलकिता, अंगीं भरे कांपरें ! ! १५

एवं सर्व जुनीं स्थलें अहह ! हा सर्वस्व जाऊनियां--
झालेलीं गतवैभवें असति जीं, त्यांतें विलोकूनियां,
पूर्वैश्वर्य तदीय, आठवुनियां कीं पूर्वजांच्या क्रिया,
ऐसा कोण असे नराधम जया कांहीं नव्हे विक्रिया ? १६

स्थानें निर्मियलीं जरी सकलही हीं मृत्तिकाप्रस्तरीं,
चैतन्यांश असे न लेशहि जरी या सुस्थलाभ्यंतरीं,
भेटायास तथापि योग्य नर जैं जाई तयांचेकडे,
ये चैतन्य तयां मनोमय तयीं संवाद त्याशीं घडे ! ! १७

शेषाचींच जणूं सहस्रवदनें येती तयांला तयीं,
जिव्हाही जणुं एक एक उपजे त्या प्रस्तरांचे द्वयीं.
त्यांहीं तीं कथिती रहस्य नर जो ऐके मुदें त्याजला;
मानोनीच सवंगडी मनिं भला तो संकटीं आपला. १८

जेव्हां निद्रित होय विश्व अवघें शांत प्रसंगीं अशा--
आक्रोशा गतवैभवार्थ करिती हीं सुस्थलें प्रायशा;
तेणें जाय वसुंधरा सहज ही शद्बें दणाणोनियां.
कोणी तेथ असे न हेंच बरवें तो शद्ब ऐकावया. १९

एकादा जरि होय जागृत अशा वेळीं कुणी प्राक्तनें,
तेव्हां ऐकुनि तो विलाप थिजतो तो बापडा भीतिनें.
सारें पूर्वजचित्र त्यास दिसतें दृष्टीपुढें स्पष्टसें;
जाणों कीं कथिती स्वपूर्वज तया कष्टांस ऐशा मिषें. २०

भृंग.

गृह-कलह.

(साक्या)

गृहकलहानें राष्ट्रें बुडती विभवपूर्ण जीं असती.
झंझावातें तरुवर जैसे नष्टप्रायचि होती. १
बहुतचि झाले अनर्थ येणें आतांही बहु होती
पुढती होतिल अनेक त्यांची कोण करिल हो गणती. २
कितिक जहाले याच्यायोगें अन्नालाहि महाग !
कितिकाकरवीं तत्प्रियभूवरि पाखडवी हा आग ! ! ३
अमित नृपकुळें नाश पावलीं वश होवोनी यास.
मृगयूथें काननीं ज्यापरी भुलुनी मृषापयास. ४
श्रीचा दिसतां विलास कोठें यास खुपे तें शल्य.
हा खळ मिळवी धुळीस तिजला योजुनि निजकौशल्य. ५
धैर्य शौर्य औदार्य नम्रता अनुपम सुमति सुकीर्ति.
इत्यादिक सद्गुणां लोपवी स्वबळें हा कलिमूर्ति. ६
अमूर्त हा परि मूर्त अरिहुनी बलवान् बहुतचि साचा.
शिरेल तेथें करी कहर हा जनिता शोकरसाचा. ७
कैकेयीनें पेटविलें हो ! जेंव्हां या अनलासी
श्रीरामप्रभु सभार्य सानुज होय तदा बनवासी ८
प्रियसुत जातां विपिनीं **दशरथ** नृप बहु विव्हल झाला
करी तयाला दग्ध तेधवां सुतविरहाग्निज्वाला ! ९
प्रसाद वांछी सुरेंद्र ज्याचा सख्यासहित सदैव
इंद्रियजितता स्वतां सुचवितें ज्याचें पवित्र नांव १०
वीरशिरोमणि **दशरथ** तोही गृहकलहरूप दावें
भसित शलभसा केला ! ह्याचें सामर्थ्य किति वदावें ११

गंगानदन विदुरहि ज्याचे स्वजन हितप्रद तोही.
प्रज्ञाचक्षू बळें लोटिला येणेंचि दुःखडोहीं. १२
सकल सुखाला मुकला मेले सुत शत बलाढ्यही ते.
नुरे एकही हाय ! शेवटीं द्याया जलांजुलीतें. १३
दिल्लीश्वर जो **पृथ्वीराजा** गुणमंडित बलशाली.
वक्रदृष्टि त्यावरती जेव्हां गृहकलहाची झाली. १४
जयचंद्राभिध तदाप्त होता तन्मनिं शिरुनि खलें या.
विधर्मीय अरिकरवीं अपजय देवविला नृपराया. १५
तेंव्हांपासुनि परस्थ बनले अधिपति या वसुधेचें.
याच दानवें तया ओपिलें हें पात्र नवसुधेचें. १६
महाराष्ट्रिच्या प्रधानकीला मीं व्हावें अधिकारी.
ह्मणुनी करिती आश्रय याचा प्रसिद्ध राव भरारी. १७
परिणाम तदा तदाश्रयाचा कैसा किती जहाला.
कोणासहि हें नको कथाया विदित असे सकलांला. १८
सुखसर्वस्वावरी घालुनी चांडाळें या पाणी.
दिधली आह्मां परवशता ही अतिदुःखाची खाणी. १९
गणुनि हितप्रद केला मोदें आश्रय ज्यांहीं याचा.
तेही याच्या कृपाप्रसादें वरिती लाभ लयाचा. २०
कृत त्रेत वा **द्वापार** युगें जरी पावलीं अंत.
ग्रंथ तयांतिल तरी दाविती परिणाम मूर्तिमंत. २१
किंबहुना या गृहकलहातें प्राचीनचि नच भजते.
मग कोठोनी **भारत** किंवा **रामायण** हे दिसतें ? २२
गेलें जावो आहे त्याचा विवेक कीजे थोडा.
जन हो ! या खल गृहकलहाचे समूळ अंकुर मोडा. २३
श्रीरामादिक समर्थ नव्हते काय यास नाशाया.

परंतु मग ही कशी लाभती बोधसुधा प्राशाया ? २४
" असो कसाही कुणीहि जों जों मोहें सेविल याला.
स्वकुलासहि आपणा परासहि नेइल तो विलयाला. २५
दीनांचा किति पाड यापुढें यास्तव सोडुनि द्या या
प्रेमैक्याला भजा " शिकविती ग्रंथ सार हें घ्याया. २६
" पाठ दिसो आह्मांस इत:पर या खल गृहकलहाची.
श्रीरघुराया ! त्वत्पदकमलीं लीन **मधुप** हें याची. २७

मधुप.

गृहशिक्षा.

श्लोक.

ब्राह्मीं मुहूर्ति नियमें मनुजें उठावें,
सारोनि शौचविधि शुद्ध अतीव न्हावें;
भावें नगाधिपसुतापतिनाम गावें,
पश्चात् पवित्रपुरसप्तक आठवावें. १

पुण्यश्लोकां चार नामांस घ्यावें । साध्वीनारीपंचकाला स्मरावें,
भक्तीनें जे ख्यात लोकत्रयांत । घ्यावें ऐसे भक्तवीर प्रशांत. २
चिरंजीव तैसे मुनी आठ यांना । धरावें मनीं सोडुनी तर्क नाना,
स्मृती साधुची व्यर्थ केव्हां न होते । हरी जे सदा पातकाच्या चयातें. ३
ज्ञानें तपानें अणखी वयानें । जे वृद्ध त्या वंदुनि आदरानें,
गुरूसवें वागुनि लीनतेनें । काल क्रमावा असल्या क्रमानें. ४
नुल्लंघावा शद्व लीलें गुरूंचा । जोडावा सच्छंद विद्यार्जनाचा,
शोधावी सत्संगती आर्ततेनें । ती सद्विद्या आकळावी श्रमानें. ५
अन्यस्त्रीचा त्यापरी कांचनाचा । खोडावा तो मोड यत्नें अघाचा,
स्वस्त्रीसंगीं आणखी स्वीय वित्तीं । राहाटावें राहुनी स्वस्थ चित्तीं. ६

लाभे पैसा नीति न त्यागितांच । तेणें सौख्यें चालवावा प्रपंच,
गेहीं सर्वा नित्य आनंद द्यावा । सामर्थ्यानें पाहुणा आदरावा. ७
कोणालाही उक्तिनें वा कृतीनें । दुःखा द्यावें न प्रमादें कृतीनें,
जे व्याधीनें आधिनें होति आर्त । दावावें त्या सर्वदा चित्त आर्द्र. ८
सदैव उद्युक्त परोपकारीं । व्हावें परावृत्त परापकारीं,
जीवाहुनी या सुयशास मान । माना अकीर्ती मरणासमान. ९
विलंब सत्कार्यिं कदा न लावा । त्वरा असत्कार्थिं तशी न दावा,
सद्बोध चित्तांत पुरा ठसावा । मनावरी संयम नित्य व्हावा. १०
प्रारब्धानें जी स्थिति प्राप्त होते । कर्तव्यातें आदरा तींत मोदें,
सोडा सारा भार तो मीपणाचा । मोडा नेटें हेत हो कामनांचा. ११
हर्षा विषादा न कदापि वाना । मानापमानास समान माना,
ध्या पार्वतीकांत सदैव भावें । सत्संगतीतें मिळवा स्वभावें. १२
ऐशी शिक्षा बाणतां मानवास । त्याच्या गेहीं ठेवितो मान वास,
भक्ती मुक्ती आणखी जी विरक्ती । त्याच्या पायीं पावती त्या विरक्ती. १३
या शिक्षेतें संसृतीं चालवावें । चारी अर्थी मानवें मेळवावें,
आर्यत्वातें या जगीं गाजवावें । सच्छीलानें शत्रुही लाजवावें. १४

दंडी.

सोंगटीचा खेळ.

पद.

(चाल– " लक्ष्मी गर्वें निंदा बोलुनि ")

खेळ मांडिला जगन्नायकें जगत्पटाच्यावरी.
मानव नरदा, दिवसयामिनी फांसे धरिले करीं.
भिन्नत्वास्तव रंग चढविला **हिरवा पिंवळा** वरी.
रंगाखालीं साऱ्या नरदा शुष्क लांकडें परी ! १

या भिन्नत्वीं भरली जादू– तिचें नांव संसृती.
भिन्नत्वबळें दिसे चालली जगताची राहटी.
हिरवीमागें **पिंवळी** लागे; **लाल** बैसली कटीं.
घरांत राहे पडून **काळी**; तिची खुंटली गती. २

पडेल जैसा डाव, त्यापरी पेटीं **सोंगटी** फिरे.
अभिमानमदें गिळित चालली **लाल** घरेंच्या घरें.
पिंवळीचा बैसला तडाका, **हिरवी** पिकली मरे.
नशीब फुटकें झणून **काळी** मनीं बिचारी झुरे ! ३

मारील कुणी, मरेल कोणी, मागें, कोणी पुढें.
न्याय जगाचा, जो चढतो, तो यथावकाशें पडे.
परम पदाचा लाभ सुदुर्घट, एकादीसच घडे.
पदाजवळ पोंचली **सोंगटी**, फांसा चुकतां, बुडे. ४

तिच्या ललाटीं, पुन्हा फिरावीं पटीं घरें तींच तीं
चर्वितचर्वण केल्यावेगळ तिला न दुसरी गती.
स्वबळें तरल्या दुसऱ्या नरदा तिज द्याया सद्गती
चौऱ्याशींचा चुकला फेरा पुन्हा क्रमूं लागती. ५

स्वता खेळता– खेळविणारा **प्रभू** जगाचा पती.
निमित्त नरदा. यदृच्छाबळें खेळ मात्र खेळती.
परि ह्मणती निर्जीव लांकडें " माझी माझी " कृती.
धन्यास भुलली, स्वतास नसल्या दोषांनीं लिंपिती. ६

विनायक.

शेतकरी.

पद.

श्रीमते
धरे देवते
तव्रांकीं बसुनी
तव बाल खेळतें शेतकरी दिनरजनीं
जों रमे
सर्वदा गमे
दृष्टि आकाशीं
लवलेश येइ ना शांत झोंप दीनासी !
जलपूर्ण
मेघ येऊन
देत वृष्टीतें--
काळजी नष्ट ही नित्य कष्ट दे त्यातें !
तळमळे
जीव कळवळे
सुचे नच कांहीं
जों जलद करी ना वसुमतितनुशांती ही
घनराय
दयाळू होय
वर्षि जलधारा
उल्हास तन्मनीं वर्णवे न अनिवारा !
दिनरात
खपुनि अश्रांत

धरेची सेवा
करण्यांत गुंग हो सतत भजुनिया देवा. ६

माउली
सृष्टि कोपली
जधीं त्या वाटे
हा ! केविलवाणें वदन ! हृदय बहु फाटे ! ७

ज्यापरी
अर्भकावरी
रोष जननीचा
होय तों न सोडी बाल अंक मातेचा ! ८

झिट्‌करी
स्वमाता जरी
बहुत रागानें–
कवळितें तरी जननीस शिशु प्रेमानें ! ९

भू–जननि
कुपित पाहुनी
कृषीवल स्वमनीं
हो खिन्न बहु; परी चैन न तिजवाचोनी ! १०

मोदांत
असो रागांत
दु:खिता अथवा
प्रेमार्द्र दृष्टिनें करी सृष्टिची सेवा ! ११

संपदा
तयाची सदा

गुरांढोरांची;
त्यांमधीं नांदतां वाण नसे सौख्याची ! १२

मधुगान
करित रसपूर्ण
शेत नांगरितो;
स्वातंत्र्य भोगितो--इंद्र काय सेवीतो ? १३

जरि दीन
त्या समाधान--
सुखाची जोडी;
त्यापुढें भासते राजसंपदा थोडी ! १४

जगदीश !
नमुनि चरणांस
विनति पदकमलीं
दे समाधान, सत्प्रेम; दास सांभाळी. १५

दत्ताराम रामचंद्र पिंगे.

विरहाकुल राजिमतीचें उद्गार !

जैनांचा २२ वा तिर्थंकर **नेमिनाथ** याला ऐन लग्न लावण्याचे वेळीं कांहीं कारणानें वैराग्य उत्पन्न होऊन, आपल्या भावि पत्नीचा त्याग करुन तपश्चर्ये करितां अरण्यांत निघून गेला त्यावेळीं त्या भग्न--मनोरथ साध्वीला झालेल्या मनस्तापाचें काल्पनिक प्रतिबिंब सदरहु कवितेंत उठविण्याचा प्रयत्न केला आहे.

श्लोक.

स्वाती--पयोद चिर वांछित चातकाला--
जों द्यावयास लवला नव जीवनाला,

तों ने तया पवन अन्य दिशे विलोकीं,
हा ! हंत ! हा किति विधि--क्रम वक्र लोकीं ! १

जो जाहला प्रिय निरंतर मन्मनाला,
ज्याच्यासवें सुखदशा नृप--वैभवाला;
भोगोनिया चिर करीन विलास--लीला,
ऐशी मना सुखवि नित्य विचार--माला. २

तो **यादवाग्रणि** कुठें प्रिय **नेमिनाथ**,
गेला मला त्यजुनिया विरहानलांत; !
भाजे मदंग, निशि झोंप न अल्प येते;
ती रम्य मूर्ति नयनापुढुनी न जाते. ! ३

प्रासाद रम्य विभवें कमला--गृहाला--
आणी उणेंपण, उणें नच सेवकांला,
स्वर्लोकतुल्य सुख--साधन--लाभ जेथें,
भासे स्मशान पतिवाचुनि आज मातें. ४

नाना लता विटपयुक्त मनोभिराम--
आराम--वास लव दे न मना विराम. !
आलाप सांगति जणों मज कोकिलांचे
" कांताविणें विफल जीवित बायकांचें " ! ५

जेव्हां शशांक निशिला उदयास येतो,
प्रेमें निज प्रिय सखीस--महीस देतो--
आलींगना निजकरीं, सुख तें तयाचें--
मन्मानसीं प्रखर शल्यसमान जाचें. ! ६

वाटे सखीजन--विनोद मना न गोड, !
लागे न मातृवच गोड न, ज्यास जोड. !

कांहींच तें सुखविते नच मानसास, !
नाहींच औषध जगीं विरहामयास. ! ७

सोडोनिया अतुलशा नृप--वैभवास,
माता पिता परिजनासह गेह--वास;
जी भामिनी तुज गणी सुख सर्व, तीस--
सोडोनि कां तुज रुचे तरि शैल--वास ? ८

नाथा ! तपें, अनशनें, प्रखरातपानें,
गारा अघोर पतनें, घन--वर्षणानें;
तेवि प्रचंड पवनें, निशिला हिमानें,
हो काय मुक्त वसनें तनुचें न जाणें. ! ९

जेव्हां निशी तम करी निज रूप व्यक्त,
भेसूर घूकरव गोठवि सर्व रक्त;
एकाकि घोर वनिं हिंस्र पशू सभोंते,
ऐशा तुला स्मरुनि मानस दग्ध होतें. ! १०

या एकनिष्ठदयितानयनाश्रु--पातें,
येई न कां द्रव तुझ्या लव मानसातें;
हा ! हंत ! मन्मथ--शरानल--तप्त--काया--
जाया गमे उचित कां तुज ही त्यजाया. ! ११

केलें समर्पण जिनें निज जीवितातें--
तूतें, त्यजोनि विरहानलिं हाय ! तीतें,
जाशी स्वतास सुख संतत लाधण्याला,
तो स्वार्थ थोर ! वदती बुध मोक्ष ज्याला. ! १२

इच्छीतसे ह्रदय हें परिरंभणातें, !
कांता ! तुझ्या मृदुलशा कर--बंधनातें; !

झाले समुत्सुक तुझ्या मुख--दर्शनातें. !
मन्नेत्र, कर्ण वचनामृत सेवनातें. ! १३

गेलें लया सुख, मनोरथ भग्न झाले, !
मन्मानसोत्पल तसें करपोनि गेलें; !
हें विश्व शून्य गमतें, सदन स्मशान !
भोग प्रभोग--द ! हलाहलतुल्य अन्न. ! १४

हें भारभूत मम जीवित होय पाहीं, !
नाहीं जरी सुखद या जगतांत कांहीं; !
त्वन्मूर्ति जी वसविली मम शुद्ध देहीं !
काढीं न, तूं चिर जरी बनशी विदेही !!! १५

——— दत्तात्रय भिमाजी रणदिवे.

ऐहिक नश्वरता !

श्लोक.

जो झाला नच काल--भक्ष्य जगतीं प्राणी असा कोणता ?
मृत्यूपासुनि सोडि कोण असला आप्तेष्ट वा जाणता ?
तोडायास समर्थ कोण जगतीं पाशा यमाच्या बरें !
देई कोण सुमित्र जीवन पुन्हा आयुष्य जेव्हां सरे ! १

बैसायास विमान वाहन जयां, आकाश हें मोकळें--
स्वच्छंदें फिरण्या, कधीं न जळती चिंता--निराशानळें
घ्याया विश्रम नंदनोपवन तें, प्याया जयांना सुधा;
कांताऽलिंगन--चुंबनादि बहुधा व्यापार ज्यांचे सदा ! २

होती ते निमिषांत नष्ट सुरही ऐशा सुखांपासुनी,
जेव्हां कालकरालखड्ग पडतें मानेवरी येउनी !

नाहीं होत समर्थ एक पलही वांचावया तो बरें !
काल--व्याघ्र--मुखीं सुरेशहि पडे होवोनिया गाय रे ! ३

होते विश्व समर्थ दग्ध करण्या आत्म--प्रकोपेक्षणीं
ते तेजस्वि तपोनिधीहि पडले जावोनि कालाननीं !
केलें बाहु--बळें जयें निखिल या निर्वीर भूमीतला
तो राजेश्वरबाहु हाय पडला ! कालापुढें रे ! लुला ! ४

ज्यांच्या रम्य पवित्र निर्मल कथा अद्यापिही ऐकुनी
धन्योद्गार मुखांतुनी सहज ये प्रेमाश्रुही लोचनीं !
ते न्यायी नृप, संत, धर्म--जनिते, देशार्थ--संपादक
झाले काय न काल--भक्ष्य सगळे ते सद्यशोधारक ! ५

आहे यांतिल सार हाच मनुजा ! ये वस्तु जन्मास जे
ते पावे लय सर्व--भक्ष्य ह्मणती तें सत्य कालास जें
न स्थान स्थिति नीति रीति गुण वा सत्कर्म ऐसें कुठें
ज्याची आश्रयभूत वस्तु न कधीं कालप्रहारें फुटे ६

वाया या गमजा कशास मनुजा ! तूं चालवीशी तरी
आयुष्य--क्षय--छिद्र--युक्त असतां ही देहरूपी तरी !
होई सावध मोह--जन्य विफला सोडीं दुराशा दुरी
जों गेलासि न काल--मत्स्य--वदनीं संसार--सिंधूदरीं ! ७

—————— दत्तात्रय भिमाजी रणदिवे.

बोधसुधा.

श्लोक.

संतोषयुक्त नर होय समृद्ध लोकीं,
तृष्णा प्रभूत धरि चित्ति दरिद्र तो कीं;

उद्योगहीन मृत तो जरि हो जिवंत,
जो कां निराश मृततुल्यहि तो जगांत. १

तो बद्ध होय विषयांत सदा सुसक्त,
जो का अलिप्त विषयीं जगिं तोचि मुक्त;
निद्रा सुखें करितसे करि जो न पाप,
तो होय जागृत विवेक करी अपाप. २

तो पाश होय ममताभिधही सुजाणा,
ती मोहकारक जगीं रमणीच जाणा;
तो अंध होय जरि डोळस कामसक्त,
आहे तसाच नर जो मदिराप्रसक्त, ३

योजी हितीं गुरुहि मित्रहि तोचि माना,
तो होय शिष्य गुरुभक्तिविशिष्ट जाणा;
सच्छील हेंच जगिं भूषण हो नराचें,
सत्तीर्थ तेंच मन शुद्ध असे जयाचें. ४

तो शूर मन्मथशरींहि असे अभेद्य,
तो मूर्ख होय नर जो असतो अविद्य;
सत्संगलाभसम अन्य न सौख्यदाता,
हो आत्मबोधसम नान्य भवापहर्ता. ५

नारीसमान दुसरी जगिं शृंखला ते,
याञ्चेपरी न पर, नीच असे नरातें;
ती त्याज्य होय जरि दुस्त्यज ही दुराशा,
ती ग्राह्य एक विभुभक्ति करी विपाशा. ६

तो मूक होय वदण्या न समर्थ सत्य,
बाधिर्ययुक्त हित जो अयके न कृत्य;

तो अंध ज्या दिसतसे न सुयुक्त कार्य,
तो पंगु सत्पथिं जया चलण्या न धैर्य. ७

स्वीयेंद्रियें अवश तीं जगिं शत्रु होतीं,
स्वाधीन तींच असतां बघ मित्र होतीं;
नाहीं विचारसम अन्य सखा जगांत,
कामादिकासम नसे रिपु वा विगीत. ८

तें ग्राह्य होयच सदा सुजनोक्त जाणा,
तें त्याज्य संतत अकार्य मनांत आणा;
कर्तव्य शीघ्र जगिं एक असेच धर्म
काढूं नयेच सुजनें कधिं अन्यवर्म. ९

तें साक्षरत्व तनुमंडन एक आहे,
दुर्नामतुल्य तनुलाञ्छन अन्य नोहे;
तें श्राव्य होय गुरुशास्त्रवच प्रशस्त,
आहे तसें अभयदान जगांत शस्त. १०

तो होय सत्य पशु पुण्य करी न कांहीं--
तारुण्य आयु धन चंचल पाहुनीही,
तें पारतंत्र्य नरकापरि सत्य जाणा;
मूर्खत्व हें मरणतुल्य असेच माना. ११

लोकापवाद--भय चित्तिं सदैव ठेवा,
सौजन्य हें जगिं असेच अमूल्य ठेवा;
माता पिता गुरु भजा परमेश भक्त्या,
व्हा कीर्तिवंत जगिं हो करुनी सुकृत्यां. १२

—————— पांडुरंग गोविंद शास्त्री पारखी.

दिव्याला विनंति.

श्लोक.

गेला ! गेला ! सुखकर दिना--धीश अस्तास गेला !
शीतांशूही अजि रजनिला ये न भेटावयाला !
अंधारानें सकलहि दिशा व्यापिल्या ! काजळाचा
भासे वर्षे भयकर मला आज पर्जन्य साचा ! १

तारा थोड्या चमकति नभीं रम्य त्या दर्शनाला,
त्यांना शक्ती परि नच तमा दूर सारावयाला
हे खद्योत प्रतिपल उगा दाविती डौल सारा;
दीपा ! नाहीं तुजविण अतां अन्य आह्मांस थारा ! २

स्नेहें तूतें दिधलि सखया ! पुष्टि तूझ्या गुणाला
केलें **दीपा** पुढतिं पुढतीं, आठवोनी तयाला
ह्या अंधारीं घडिभर निजें राख मित्रा द्युतीनें !
येतां व्योमीं दिनकर उद्यां तूजला कोण जाणें ! ३

जेथें नाहीं तम नच निशा ! नित्य जेथें प्रकाश !
जेथें आह्मी प्रभुसह वसूं सर्वदा पूरिताश !
तेथें जातां, मग रविशशी पाहिजेती कशाला ?
दीपा ! **दीपा** ! उमजुन मनीं साध कर्तव्यतेला ! ४

टिळक.

सतार.

श्लोक.

छेडीतसें मी समयीं सखे ! या । **सतार** जी ही तुज रंजवाया
ती पूर्व जन्मीं जल--देवता गे । होती असें कीं वदती शुभांगे ! १

ती सागरीं गे दिवसां बसोनी । स्वर्जीवितेशास सदा स्मरोनी
मोदानुरागें मधुर स्वतांनीं । गावीं तिनें कीं बहु गोड गाणीं २
रात्रौ तिनें त्या विमलोदकांत । सदा फिरावें रमणा पहात
देवोनि तीरीं जल--पूर्ण--दृष्टी । व्हावें मनीं तो दिसतां न कष्टी ३
केलें वृथा प्रेम गमे तिनें कीं । त्याच्यावरी त्यांत नसोनि नेकी
दुःखांत त्यानें तिज लोटियेलें । रडावयातें बहु लावियेलें ४
त्यातें तिनें अक्षय आठवावें । उच्चस्वरानें बहुधा रडावें
ललाट भूमीवरि आपटावें । क्षणोक्षणीं मूर्छितही पडावें ५
शेखीं दृढ प्रेम तिचें बघोन । दयार्द्र झालें प्रभु--चित्त पूर्ण
केलें तयें त्या जलदेवतेला । **सतार**, ही काय अगाध लीला ६
एवं तिचें पूर्व जलस्वरूप । जावोनि ये हें जरि काष्ट--रूप
गालीं तिच्या गे परि तोचि राग । दिसे तसेंही मन सानुराग ७
स्कंधीं तिचे गे सखये प्रकीर्ण । जे केश होते मृदु हेम--वर्ण
सु--तंतु झाले सखि ! ते सुयंत्र । ते जाणती मोहक--गान--मंत्र ८
गे त्या दिसांपासुनि आजवेरी । **सतार** माझी दयिते बिचारी !
सु--प्रेम--शद्बीं विरहाकुला ती । विलाप वाणी मिसळीत होती ९
मिश्र--स्वना त्यापरि आज बाले । भागून गे त्वां द्वय भाग केले
तैसे **सतारी**सहि शिक्षणास । दिलें; त्रिशाळा तव बुद्धि खास १०
कीं जोंवरी मी तव संन्निधानीं । तिनें करावी अनुराग--वाणी
जातां परी मी सखि ! दूर देशीं । तिनें करावें विरह--स्वनांसीं ११

अनंततनय.

काव्यरत्नावलि.

अंक ८ वा.

गंगालहरी.

गंगा ममांगान्यमलीकरोतु ।

(पंडित जगन्नाथराय.)

प्रख्यात कवि पंडित **जगन्नाथराय** यांच्या **गंगालहरी** नामक संस्कृत काव्याचा मराठींत अनुवाद करण्याचा हा अल्पबुद्धीचा प्रयत्न आहे. या काव्याचें मराठींत समवृत्त व समश्लोकी भाषांतर प्रसिद्ध महाराष्ट्रकवि **वामन** पंडित यांहीं सुरस केलेलें असतां,* हा भरतीला आणखी एक प्रयत्न करण्याचें काय प्रयोजन? अशी शंका सर्वांस येणें साहजिक आहे. तिचें समाधान असें;—ज्या **गंगालहरीं**तील भक्तिरसभरित स्तुति श्रवण करून **श्रीगंगा**देवी मूर्तिमंत प्रकट झाली, व तिनें रायांचा उद्धार केला; तिचें या अपवित्राकडून यथामति संकीर्तन झाल्यास ‘ कायवाङ्मनःशुद्धि ’ अंशतः तरी होईल; एवढाच हेतु धरून, मूळांतील भावार्थ न सोडितां, पुढील पद्यें केली आहेत. त्यांत गुणाचा जो थोडा फार अंश असेल, तो सर्वस्वीं मूळांतील असून, दोषांचा मात्र मी वांटेकरी आहें. अस्तु.

श्रीगंगादेवीची ही अल्पस्वल्प सेवा तिला पावो, व भाविक जनांस रुचो; अशी श्रीरामचंद्रास मनोभावें प्रार्थना आहे.

---

* दंडी कवीनें केलेलें ह्या काव्याचें समश्लोकी भाषांतर रत्नावली अंक १० आक्टोबर १८९४ यांत आलेलें आहे.

संपादक का. र.

मंगलाचरण.

श्लोक.

परम विमल **गंगा** पावली जेथ जन्मा;
भजक भजुनि ज्यांना पावती मोक्षधामा;
असति विकसलीं जीं भक्तहृत्पद्मकुंजीं;
प्रभुपदकमलीं त्या घालितों भृंग रुंजी. १

गंगालहरी.

श्लोक.

सर्वद्रव्यान्विता जी सकल वसुमती पूर्ण सौभाग्य तीचें;
मोठें ऐश्वर्य किंवा सहज जग सृजी त्याहि **गौरीपती**चें;
कीं सर्वस्व श्रुतींचें; सुकृतचि विलसे मूर्त किंवा सुरांचें;
तें हें पीयूषतुल्य त्वदुदक अशिवा संहरो या नरांचें. १

गंगे ! जो एकदांही क्षणभर पडतां दृष्टिला मानवांच्या,—
दीनांचें दैन्य वारी; झडकरि दुरिता संहरी दुर्मतींच्या;
अज्ञानत्वद्रुमाचें दलन करविण्या जो गुरू बोधदाता;
ऐसा हा ओघ आह्मां अतिशय वितरो श्री तुझा देवि ! आतां. २

जैसा मार्तंड शोभे उदयगिरिवरी सान आरक्तमूर्ति;
तैसे सापत्न भावें तुजवरि **गिरिजा**लोचनाक्षेप होती.
जाणों तेणें **शिवा**च्या शिरिंहि तव अनूद्भूत तुंगां तरंगां—
येई चांचल्य; त्यांहीं अखिल अघभया पाववीं देवि ! भंगा. ३

माझा आधार तूं हें गणुनि, बहु मदें म्यां विचारा त्यजोनी,
सर्वां वृंदारकांना अति अवगणिलें उद्धतत्वा धजोनी !
आतां औदास्य **गंगे** ! जरि मजविषयीं आणिशी चित्तिं कांहीं;—
तों मी आधारहीन त्रिभुवनिं करुणा हाय ! भाकूं कुणा ही ? ४

ज्यांहीं नाहींच केलें सुकृत लवभरी जन्मजन्मांतरींही,
त्यांचें अज्ञान नाशी–विधु तिमिर जसा–आणितां अंतरींही;
गंगे ! त्वन्मूर्ति ती ही सकल सुरवरां सेव्य यत्पुण्यवारी–
अंत:संताप माझा त्रिविध अघहि तें संहरो आर्ति सारी. ५

माते ! साम्राज्यही तें तृणसम गणुनी, सोडुनीयां तयाला,
वेत्रांचे संघ जेथें बहु हलति–अशा त्वत्तटीं आश्रयाला--
येवोनी, सेविती जे त्वदुदक अमृतस्वादु **गंगे** ! यथेच्छ;
त्यांचा आनंद लेखी तव विमल जलाहूनि मोक्षास तुच्छ ! ६

स्नाना येती प्रभातीं नृपजनयुवती त्वत्पवित्रोदकांत;
तद्वक्षोजीं वसे, तो मृगमद सलिलीं जों असे मिश्र होत,--
तों ते शुद्धांग होती मृग; हरिगणही त्यांसि घेऊनि जाती–
स्वच्छंदानें विमानीं बसवुनि; मग ते नंदनीं क्रीडताती ! ७

भो ! **गंगे** ! एकवार स्मृतिहि करितसे शांत चित्तास ज्याची;
पापा, संसारतापा हारि धरुनि मनीं प्रेम उच्चारितांचि;
तें हें त्वन्नाम माते ! परम विमल जें तेंवि सुश्राव्य " **गंगा**, "--
येवो प्राणांतकालीं मम मुखकमलीं आस ही अंतरंगा. ८

ज्यामाजी क्रीडणारे करटहि हृदयीं पावुनी फार तोष,
स्वर्गीच्या अल्पसौख्यीं--सुरपुरविषयीं–होति ना साभिलाष;
यत्सान्निध्यें जनांनीं जनि, मृति, तिसरा शोक यां घालवावें;
तें हें त्वत्तीर **गंगे** ! श्रमपरिहरणा आमुच्या सिद्ध व्हावें. ९

साक्षात् अद्वैतवादी निगमहि थकले; पार ज्याचा न लागे !
अन्याच्या वाङ्मनाची गति कितिक ? जिथें व्यासवाणीहि भागे !
आकारातीत, मायामलरहित, अहा ! जें सदा स्वप्रकाश,
तें नित्य ब्रह्म **गंगे** ! असशि. विषय तूं अन्य नाहींस खास. १०

जें नोहे लभ्य लोकां बहुविध यजन, ध्यान, दानादि यांहीं;
पावे ना ज्या तपस्वी खरतर अथवा सौम्य ऐशा तपांहीं;
तें **श्रीवैकुंठ** देशी निज भजक जनां सर्व सामान्यतेनें.
कोणाशीं तुल्य होशी जननि ! वद अशा या महोदारतेनें ? ११

क्रोधानें म्लान **गौरी** अनुसरण परी त्या प्रियेचें त्यजोनी,
प्रेमें **श्रीसांब** अंबे ! स्वशिरिं तुज धरी सर्वदाही रिझोनी;
प्रौढी त्वन्मूर्तिची त्या वद वद वदनें कोण वर्णील ? माते !
कल्याणी ! दर्शनानें भवभय हरुनी दे गती उत्तमा ते. १२

उन्मत्त, व्रात्य, पापी, पिशुन जन असे ज्यांस पाहून भ्यावें;
सांगावें काय ज्यांचें भय मनिं गणुनी त्यांस रोमांच यावे !
पापें ऐशीं जनांचीं अपरिमित सदा संहरोनी, फिरोनी--
अश्रांताशी तरीही जननि ! विलससी तूं प्रकर्षे करोनी. १३

स्वर्लोकाहूनि येतां क्षितिवरति करूं लोकशोकास नष्ट,
रक्षी तूंतें कपर्दी मदनदहनही सर्वदा योगनिष्ठ !
होती निर्लोभही ते तव सुगुणगणें मानसीं साभिलाष !
माते ! त्वत्सद्गुणाचा मजसि गमतसे होय हा काय दोष. १४

जे जे या लोकिं पंगू, जड, बधिर, मुके, अंध, दुष्टग्रहार्त,
प्रायश्चित्तेंहि ज्यांच्या निरखुनि दुरितां जाति अस्ता समस्त;
देवींही अक्षमत्वें निरयगतिक जे त्यागिले मर्त्य सत्य;
त्यांची दिव्यौषधी तूं असशि जननि ! गे ! रक्षिशी त्यांस नित्य. १५

जें प्रख्यात स्वभावें अवनितलिं तुझें शीतल, स्वच्छ वारी;
ज्याचें माहात्म्य लोकीं अतितर विलसे; जें अघांसी निवारी;
होत्साते दिव्यकांति स्फुटपुलकयुत स्वर्गलोकीं जयाला--
गाती अद्यापि मोदें **सगर**ज सगळे; कोण वर्णी तयाला ? १६

क्षुद्राघा आचरोनी त्वरित पारे पुन्हां यन्मना ताप होई,
उद्धाराया तयांला त्रिभुवनिं असती अन्य तीर्थें; तरीही--
प्रायश्चित्तेंहि ज्यांच्या बघुनि अघनगां जाहलीं स्तब्ध सर्व !
ताराया तूंच त्यांना तुजसम असशी अंब ! लोकीं अपूर्व ! १७

धर्माचें जें अहाहा ! पद, जनक असे नूत्न हर्षास जें कां,
तीर्थांचा भूपती जें, सुविमल अथवा अंतरीय त्रिलोका,
जें मूढा गूढ गाढें सहज, सुमतिला जें समाधान साचें,
तें मोक्षश्रीद **गंगे** ! तव वपु शमवो ताप मन्मानसाचे. १८

सेवोनी द्रव्यमद्या अविरत नयनें जाहलीं धुंद ज्यांचीं,
नाचें त्या भूपतींच्या पुढतिं सतत मी ! खेद हा आज जाची !
त्यायोगें त्वद्वियोगें स्वहितशत बळें नाशिलें सत्य येणें ! !
माते ! हा मंतु माझा स्वमनिं न गणितां पाहिं मंदा दयेनें. १९

वायूनें लोल होती तव लहरि, हले त्यामुळें पद्मसंघ,
लेपें जें तद्रजांच्या सहज वरितसे कुंकुमाचा सुरंग;
ज्यामाजी देवनारीस्तनगत अगरू मिश्र; जंबालही जें;
तें त्वद्वारी निवारो जननि ! बहुविधां जन्मबंधांस माझे. २०

उत्पत्ति श्रीशपादांबुजिं विमल नखापासुनी होय पाहीं,
वस्ती कंदर्पशत्रु **त्रिपुरहर**शिरीं, शुद्ध दोन्ही कुळें हीं;
व्यासंग स्तुत्य चाले हत, पतित नरां उद्धराया सदैव;
सांगें **गंगे** ! कसें गे ! जगतिं नच तुझें श्रेष्ठ व्हावें महत्त्व ? २१

अद्रींहूनी वहाती बहुविध सरिता; त्यांमधें कोण ऐशी ?--
माहात्म्यें जीस तुल्या कवि जन गणिती अंशतांही तुझ्याशीं.
विश्वेशांच्या कपर्दी तुजविण दुसरी आरुढे कोण धन्या ?
प्रक्षाळी **श्रीपती**च्या पदसरसिरुहा पावनी कोण अन्या ? २२

सर्गस्थित्यंतशंका त्यजुनि, विधि सुखें नित्य साधो समाधी,
सौख्यें शेषीं निजो कीं **हरि, हर**हि वरो नृत्य सांडोनि आधी;
प्रायश्चित्तांसि कांहीं श्रम न जनिं, तपोदानयज्ञादिकांहीं;
जों लोकीं कामदात्री जननि ! असशि तूं जागृता सर्वदाही. २३

स्नेहार्द्रे ! हा अनाथ, प्रतिहतगति हा पुण्यलोकप्रदात्रि !
हे ! पीयूषापगे ! हा तृषित, पतित हा हे ! जनोद्धारकर्त्रि !
हे ! **गंगे** ! सिद्धवैद्ये ! गदविगलित हा, हा शिशू आजि माते !
आलासे हे ! शरण्ये ! शरण तरि करीं योग्य वाटे तुला तें. २४

झालासे शांत कोलाहल, यमनगरीं जीव जाई न कोणी,--
जाती शोधावयाला तदनुचर शवां अन्य कांहीं ठिकाणीं;
येती जाती विमानें सततचि, ह्मणुनी दाटती स्वर्गपंथ;
जेव्हांपासूनि आली जननि ! तव कथा मंगला या महींत. २५

कामक्रोध प्रकर्षें स्फुरति, ह्मणुनि जो वाढला फार ताप;
यज्ज्वालांहीं शरीरें निशिदिनिं जळती आमुचीं हीं अपाप;
त्यातें नाशूत माते ! जलकणसरणी या तुझ्या स्वर्**गंगे** !
ज्या अंबूमाजि लाटा उसळति बहुधा सर्वदा वायुवेगें, २६

ब्रह्मांडीं वर्तताती सकलहि भुवनें; होय हें त्यास मान,--
तेंही ज्याच्या तरंगीं मिसळुनि उसळे तिंदुकाच्या समान;
शंभूच्या उत्तमांगीं जटिल दिसतसे जो कपर्दे विशालें;
अस्मत्तापास नाशो जलनिवह तुझा तो शरच्चंद्रिकाले ! २७

ज्याच्या उद्धारकार्यी बल नच, ह्मणुनी लाजती सर्व तीर्थें;
कर्णीं ठेवोनि हस्तां, विरमति बघुनी ज्यास **शर्वा**दिही ते;
त्या मातें तूं दयार्द्रे ! अघनग हरुनी, शुद्धदेही करूनी,--
सर्वांचा गर्व जो कां अलिमलमथनीं तोहि घेसी हिरूनी. २८

चांडालांहींहि बुद्ध्या भयकर ह्मणुनी त्यागिलें ज्यांस, ऐशीं--
पापें म्यां आचरीलीं; अघसदनचि मी एकला पापराशी !
ऐशाही उद्धराया मज कटि कसिशी; धन्य ! माते ! स्तुतीतें--
कैसा मी शक्त होऊं नरपशु ? न सुचे शब्दही दुर्मतीतें ! ! २९

ऐसा कोणीहि नाहीं अजवरि मजला लाभला पातकी; कीं,--
उद्धारातें जयाच्या परिसुनि कुतुकें थक्क व्हावी त्रिलोकी;
इच्छा चित्तीं तुझ्या ही, परि न फल तिचें प्राप्त अद्यापि झालें;
माते ! तीतें कराया सफल शरण मी; सद्गती दे दयाळे ! ३०

व्यासंगीं श्वानवृत्ती नियतचि; वचनीं तेंवि मिथ्या प्रलाप;
बुद्धी चाले कुतर्कीं सतत; पिशुनताचिंतनीं काललोप;
ऐकोनीयां अशाही सतत सहृदये ! माझिया दुर्गुणांला,
माते ! पाहील अन्या तुजविण पळही कोण या आननाला ? ३१

धिक् धिक् त्या मानवाला ! गमति मजसि तीं व्यर्थ आकर्ण नेत्रें !
रम्या त्वन्मूर्ति ज्यांहीं मुळि न निरखिली आदरानें पवित्रे !
तैसे त्यातें वृथा ते श्रवणहि दिधले वाटतें ईश्वरानें !
त्वद्वीचींच्या ध्वनीला क्षणहि नच जिहीं ऐकिलें आदरानें ! ३२

स्वेच्छें आकाशयानीं बसुनि, सुरपुरीं जाति जे पुण्यवंत;
पापी पापें स्वतांच्या नरकिं पचति, जे सर्वथाही अनाथ;
ही जी भागव्यवस्था अशुभमय अशा त्याच देशांत **गंगे** !
जेथें वास्तव्य नाहीं तव जननि ! अये ! सर्वपापौघभंगे ! ३३

विप्रांसी मारिती जे; धरिति कुमति जे दुष्ट गुर्वंगनेशीं;
मद्यासी प्राशिती जे अधम; हरिति जे कांचना पापराशी;
पापी अत्यंत तेही त्यजुनि निज तनु त्वज्जलीं अंब ! अंतीं,
स्वर्लोकीं पुण्यवंतावरि वसति तयां देव सन्मानिताती ! ३४

जो पुष्पांच्या सुगंधा सतत हरितसे दुर्लभाही, तसाच--
प्राणांनाही हरी जो क्षणिं विरहयुता मानवांच्याहि साच;
ऐसाही दुष्ट वायु त्रिभुवन करितो शुद्ध हें सर्व अंगें;
येतें सामर्थ्य त्यातें खचित जनिं तुझ्या वीचिसंगेंचि **गंगे** ! ३५

कोणी एथें मिळाया सुख झटति सदा लोककल्याणकार्यीं
शुद्धात्मे अन्य कोणी श्रमति बहु परत्रार्थ नाना उपायीं;
माते ! दोन्ही स्थलींचा तुजवरि परि मी सर्वथा भार ठेवीं,
आनंदें नित्य निद्रासुखहि अनुभवीं, त्वत्कृपेनेंचि देवी ! ३६

पाप्यांचींही शवें जीं पडति तुजमधें, द्यावया त्यांस मोक्षा--
स्नेहें तूं सिद्ध, अंबे ! तुजसि न करवे त्या जनांची उपेक्षा;
हा जैसा त्वत्स्वभाव प्रकट जनिं; तसें दुष्कृतीं प्रेम माझें,
" कोणाही त्यागवे ना प्रकृति सबळ ती सर्वभूतीं विराजे. " ३७

आरंभी तांडवासीं करिं धरुनि जटा **शंभु** जेव्हां दिनांतीं,
तेणें वीची तुझ्या ज्या चलित, अभिनया हस्त ते दावितातीं;
तीरींच्या कंदरींचा जलरव, डमरू तो, तयें शोभिवंत;
ऐसा त्वत्तांडवाचा विधि जननि ! करो सर्व तापास शांत. ३८

कल्याणाची स्वतांच्या तुजवरि असतां सर्वथा भिस्त माझी;
या दीनासी जरी कां त्यजिसि समयिं या संकटाच्याचि आजी,--
तेव्हां उद्धारिणी तूं त्रिभुवनतलिं हें ब्रीद पावेल अस्ता;
झाली आधारहीना अकपट करुणा जाण लोकीं समस्ता. ३९

श्रीकंठाच्या कपर्दांवरुनि मृदुलशा केशवेशीं क्रमानें--
येतां, मात्सर्ययोगें निरखुनि नयनीं ज्याप्रती संभ्रमानें--
कर्षी शर्वार्धदेहीं स्थित **हिमगिरिजा** आपुल्या दिव्य हस्तें;
ऐशा **गंगे** ! तुझ्या ज्या जललहरि असो नित्य उत्कर्ष त्यांतें. ४०

पूज्ये ! येती न तूंतें शरण जन असे कोणते सर्व लोकीं ?
त्यामाजी हेतु हा तूं वितरिसि वरदे ? इच्छितार्था विलोकीं;
माझा आत्मा परी हा तुजवरि करितो प्रीति सेव्ये ! स्वभावें;
हें मी घेऊनि सांगें शपथ सुरनदी ! जाणिजे शुद्ध भावें. ४१

मध्यान्हीं सूर्य वारी अखिल तम, तशी पूर्ण अज्ञान नाशी,—
लीलेनें यामुळें जी सकल जन अहा ! चर्चिती भालदेशीं;
धात्याच्या लोपवी जी निटिलिं बिलिखितां दुष्ट वर्णां समस्तां;
संहारो शोक सारा मम तव तटिंची मृत्तिका ती प्रशस्ता. ४२

देशामाजी स्वतांच्या तुजविण अगती वागती जे सुखानें,—
त्या मूढां हांसती जे बहु विकसित जीं त्या सुमांच्या मिषानें;
अंगींच्या पुण्य गंधें मलिन अलिकुला जे करीती पवित्र,
तें हे त्वत्तीरवासी तरु मज मलिना देवि ! होऊत मित्र ४३

कोणी सेवा करोनी प्रखरतर मुदें अर्चिती देवदेवा;
कोणी आसक्त यज्ञीं; यमनियमिं कुणी ठेविती शुद्ध भावा;
त्वन्नामाचे स्मृतीचा सुगम पथ परी इष्ट ओपील मातें,—
विश्वासोनी असा मी तृणसम समजें हें जगज्जाल माते ! ४४

विश्रांतीतें न घेतां मिळविति सुकृता संत आजन्म आंगें;
गंगे ! त्यांचें कराया हित कुशल न, ते कोणते देव सांगें.
माते ! जे घोरपापी, सुकृत न करिती, ते निराधार पाहीं;
ताराया त्याजलागीं त्रिजगिं तुजविणें देवता श्रेष्ठ नाहीं. ४५

प्राशोनी एकदां मी त्वदुदक, विहरें घेउनी मूर्ख मित्रां;
क्रीडांहीं मन्मनाला परि पळ न गमे शांति; लाभे न निद्रा;
त्वत्तीरांकीं तरी या चिर मज निजवी संप्रती हे ! दयार्द्रे !
संचारे मंद वायू म्हणुनि शिशिर जो जाहला देवि ! भद्रे ! ४६

गंगे ! रम्या कटी जी तव बळकट ती बांधिजे शीघ्र पाहीं;
बालेंदूला किरीटीं दृढ नियमुनियां ठेविजे पन्नगांहीं;
धिक्काराचें न कार्या; इतर जन, तसा हा **जगन्नाथ** नोहे !
उद्धाराचा तयाच्या समय सुरधुनी ! आजि हा पातलाहे ! ! ४७

शुभ्रा जी शारदेंदूपरि; शुचि मुकुटीं बाल इंदू जियेच्या;
हस्तीं अंभोज, आशी, अभय, कलशही पीयुषाचा जियेच्या;
वस्त्रालंकार जीचे रुचिर अमृतसे; गौर—नक्रस्थिता जी;
गंगे ! ऐशा तुला जे स्तविति सुविमले ! त्यांवरी विश्व राजी. ४८

वाढे मंद स्मितें जें विकसित वदनीं कांतिपीयूष, तेणें--
जी लोकां जीववीते भवदहन जयां जाळितो तीव्रतेनें;
शोभे चिच्चंद्रिकेच्या रुचिसम रुचिरा कांतिही यत्तनूची;
ती होवो मत्तनूची त्वरित सुखकरा अंगना **शंतनू**ची. ४९

मंत्रां संकोचता ये, अमृतरस थिजे, देवही त्रस्त जेणें;
निःसत्त्वा औषधीही, विषहर उपला भग्नता येइ जेणें;
ऐसा जो ताप माझा भवदवविभवें वाढला आजि भारी;
वीचिप्रक्षाळितश्रीपतिपदकमले ! स्वर्धुनी ! त्यासि वारीं. ५०

द्यूतीं जैं **पार्वतीशीं** पुरमथन **शिवें** लावुनीयां पणाला,–
सर्वस्वा घालवीलें; मग **हर** बसले लावुनी आपणाला;
तैं साभिप्राय **गौरी** स्मित करुनि, छलें पाहती होय तूतें.
तेव्हांचें लास्य **गंगे** ! त्वरित तव करो शुद्ध अस्मद्वपूतें. ५१

अनंगारिपुच्या शिरीं वसुनि, भूषवी जी तया;
जनार्तिसहि लीलया त्वरित पाववी जी लया;
मनोहर, विशाल, चंचल, तरंग ऐसे जिचे;
अशी सुरनदी करो शुचि वपु त्वरें आमुचें. ५२

उपसंहार.

जगन्नाथें केली रसभरित **गंगालहरि** ही;
सुधेच्याही गर्वा मज गमतसे सत्य हरि ही;
हिला वाची प्रेमें नर सतत जो, त्यास जगतीं--
सुकीर्ती, संपत्ती, वरिति हरिखें; अंतिं सुगती. १

भृंग.

बहुभाष आणि लंबजिव्ह.

आर्या.

होते सैनिक दोघे नामें **बहुभाष लंबजिव्ह** दुजा
नृपसैन्यांत जयांसम वक्ता कोणास ठाउका न तिजा १
काव्येतिहाससागर करतलगत ह्यांजला असें गणती
ह्मणती सैनिक सारे बृहस्पती ह्यांजला करो प्रणती २
अश्रुतपूर्व कथानक नित्य मुखांतून त्यांचिया वाहे
सर्वांगरम्य ज्यांत न सत्याचा लेशही परी राहे ३
शशिच्या सुखद करांहीं परिरंभित हसित सुंदरा सृष्टि
रात्रीं अशा घडीभर जमलें नृपदल वरावया तुष्टी ४
बहुभाष ह्मणे ऐका " बांधव हो काय जाहलें पूर्वी
साक्षी मी, रवि, नभ हें, अष्ट दिशा, वायु, साहवी ऊर्वी ५
डोळ्यांचा धाक पुरे मनुजाच्या हिंस्रपशुस भिववाया
आयकतों आपण जें म्यां अनुभविलें नसेच तें वायां ६
निर्जन अरण्य होतें मृगयाकुल मी तयामधें शिरलों
मागें पडले अवघे सहचर मी एकला वनीं उरलों ७
आराव ऐकिला मीं व्याघ्राचा मींहि गर्जना केली
बाहु स्फुरले माझे पाहुन आली अशी पुढें केली ८

हूं हूं ह्मणतां आला शोधित मज पशुप मी जसा त्याला
मम वीराची दृष्टी बघतां परि तो दिसे अती भ्याला ९
आलें मनांत माझ्या ह्यावर केवळ दृगस्त्र सोडावें
मोडावें ह्याचें बळ आयु:सूत्रास अंतिं तोडावें १०
भ्रूधनु ओढुन दृक्शर वर्षाया लागतांच तो विरला
हरला तो व्याघ्र पुढें ठरला क्षणभर न मागुता फिरला ११
घूकास रवी तैसा झालों मी वनचरा असह्य तया
असिशर जरि योजीतों तीच तया वाटती अमोघ दया १२
नेला हांकित ऐसा झालीं कीं दोन योजनें दमलों
पशु तो गुहेंत शिरला द्वारीं वीरासनस्थ मी रमलों १३
झाले दिन तीन न ये रक्तप तो एकवार बाहेरी
आहें कीं गेलों मी भीरुपरी आंतुनीच तो हेरी १४
झाला व्याकुळ जठरीं क्षुत्पीडा होमकुंड पेटवि ती
आला द्वारीं परि मम दृष्टी त्या होय परत पाठविती १५
ऐशा शंभर खेपा झाल्या परि तो न बाहिरी आला
मेला ह्मणत " भला मी सुटलों ह्या वीरदृष्टिपाताला " १६
आला अनुभव मजला तोच यथातथ्य आज मीं कथिला
वाटेल खरा त्याला वीराची दृष्टि ती असे ज्याला १७
हसले वदले सारे " लोकीं **बहुभाष** धन्य धन्य खरा !
ज्याच्या नयनें हरिलें व्याघ्राच्याही कराल रदनखरां १८
त्या **लंबजिव्हहृदयीं** शिरला हा धन्यवाद कीं क्षुरसा
बोले " कां तक्काला भुललां ? घ्या प्या मदीय इक्षुरसा १९
नौकाधिष्ठित आह्मी जलमार्गें भूप्रदक्षिणा करण्या !
होतों जात, कवण हो शूरांच्या वर्णिता कवी करण्या ! २०
दक्षिणसागरमध्यें आलों जेथें जलास अंत नसे

हिमगिरिसहस्त्र दडलें ज्याच्या उदरांत वालुकाकणसें ! २१
हसुनी ल्हरी ज्याच्या वदती आकाश ठेंगणें भारी
कोण तयाचा आह्मां वीरांवांचून गर्व संहारी ? २२
एके दिवशीं दिसली आह्मां येतां दुरून अल्प तरी
दर्शन जीचें अमुच्या हृदयीं नानातरंग नव वितरी २३
तें क्षुद्र उडुप दिसलें बसलें जणुं पाखरूं जलावरतीं
आलें जवळ न त्याला किंवा तन्नायकास तिळ भीती २४
फुटलें तारूं कोठें त्यांतुन हा वांचुनी असा आला
किंवा प्रभंजनानें खोल महासागरांत वाहविला २५
केले तर्क असे किति एकाकी पाहुनी तया द्रवलों
ताराया त्यास पुढें नौकाधिष्ठित समस्त हो झालों २६
केली खूण तयानें दोन्ही अपुले उभारुनी हात
तेव्हां समजे ह्याच्या जीव असे अजुन मर्त्य देहांत २७
आला नौकेजवळीं हासत नवराच जेविं लग्नाला
केले चकित तयानें आह्मां सर्वां वितर्कमग्नांला २८
बोले " सप्तसमुद्रां लंघुन मी चाललों स्वदेशाला
व्यायाम अल्पसा हा माझ्या ह्या स्थूल अवयवां झाला २९
मासत्रय झालें मी अन्नावांचून राहिलों आहें
होईल हा व्रतावधि परिपूर्ण असाच एक सप्ताहें ३०
मजला नलगे कांहीं थोडेंसें नस्य द्या पुरें तितुकें
हा नर किंवा किन्नर वदलों आह्मी मनामधें कुतुकें ३१
नौकाधिप अमुचा दे अपुल्या त्यालागिं नस्यधानीतें
गेला घेउन झोला नवला मन्मति अजून मानीते ३२
बलभीम मला न कळे कोठें तो भूवरी जलीं अथवा
आतां असेल नाहीं रविसम त्या ठाउका कधीं थकवा ३३

तो **लंबजिव्ह** ऐसें बोलुन थांबे समस्त " वा " ह्मणती
बहुभाष नस्यधानी दावुन सर्वांप्रती करी प्रणती ३४
बोले तो " पोताधिप अन्य नसे मीच तो जलावरतीं
स्वैरगती संचरलों केली कीं हौस आपुली पुरती ! ३५
ही तीच नस्यधानी बागवितों जवळ खूण मित्राची
दिधली अन्नांहुनि ही महती जेव्हां मला अधिक हीची ३६
आत्मश्लाघी ह्यापरि ते दोघे रंजनार्थ मित्रांचे
कथिती असत्य गोष्टी वाढविती जों प्रवाह हास्याचे ३७
तों आले झुंजत हो तेथें मार्जार दोन अविचारी
व्याघ्राला भिववी त्या **बहुभाषाची** गळे धृती सारी ३८
" वीरशिरोभूषण हो ! थांबा थांबा ! " समस्त ओरडती
बहुभाषाची तनु परि थांबे ना जीव घेउनी पळती ३९
" जातों मी आणीतों धरुनी त्या जल्पकास ह्या ठायीं
तो **लंबजिव्ह** ऐसें वदुनी आपण पळोनियां जाई ! ४०

टिळक.

दोनचित्रें.

शांति.

(चालः— भज गोविंदं इ०)

निसर्ग स्थिती.	**मानवी कृती.**
पद.	पद
बिंब रवीचें उदया आलें,	नीलाभ प्रतिबिंब नभाचें
क्षितिज झळाळे लाल गुलालें!	विमल सरोवर शोभे साचें;
किमया गमते कारि हें मातें !	परिवेष्टी त्या वर्तुळ घाटी
उदयगिरि दिसे समहेमातें. १	उदयास्तीं ये जेथें दाटी. १

स्वकरांचा रवि करुनि कुंचला,
विविधरंगगण ज्यांत सांचला,
चित्रकार हा भूतलफलकीं
चित्र चितारी विचित्रकल कीं ! २

एकवटोनी रुचिकलाप हा
प्रकटी दिनकर शुचि कला पहा
क्षितिला शालू अर्पी सुंदर,
जेणें पात्रे स्फूर्तिस कविवर. ३

सुभगकांति, मृदु, मधुर, मनोहर,
दरवळती बहु परिमळ मोहर;
गुंजारत उन्मद मधुपानीं
नाच मांडिला या मधुपांनीं. ४

दलसंघीं तरुवल्लीवरती
विहंग पुरविति संगीतरती;
प्रेमाचीं ते गाती गाणीं
नंदनवनिंची व्यर्थ कहाणी. ५

विमलमधुजला नदी निर्झरी,
तयांत मृदु संचरती लहरी;
असंख्य फुलत्या डुलत्या कमळीं
पुष्करिणींत भ्रमतात अळी. ६

कुठें धबधबा विनोदलहरी
स्वतुषारें सुरधनू अपहरी;
फेनमिषानें दांत विचकुनी,
नाचे, खिदळे, खोखो करुनी ! ७

सरस्तटीं त्या सुंदर खेडें,
वेधुनि मन जें कारितें वेडें;
द्राक्षमळ्यांचा वेढा भोंती,
नयना सुख कर्पूरज्योती ! २

भरुनी दल नव कुसुमें फुललीं;
उपवनभूमी नटली, खुलली;
भिडतां वायू तिस त्या कालीं,
पेर सुमांचा पडतो खालीं. ३

नवदलमंडित उपवनभागीं
तरुगण दिसती हे अनुरागी;
मृदुकलिकांनीं व्रतति डवरल्या,
मदनाचे तूणीरचि बनल्या ! ४

होई सुमफलसुगंध साच
घ्राणमनांतें निबंधसाच;
लतामंडपीं तरुणजनाचे
संगें प्रीतिप्रताप नाचे. ५

संगीताचा सूर धुमधुमे,
अमृतरसाचा पूर संभ्रमे;
किति कंठाची मधु मंजुलता !
काय खुमारी तालकुशलता ! ६

प्रणयी उसळुनि तरंगमाला,
तुळे मन क्षण विहंगमाला;
प्रेमाचा निश्वास प्रगटे,
आनंदाश्रू अश्रुस लगटे. ७

निशी शशी शुचि नभीं प्रकाशे,
सुरतरुकुसुमचि काय विकासे !
किंवा सस्मित रंभामुख तें
प्रेमकौतुकें भूस निरखितें ! ८

सुधांशु शांतिप्रणयदेव तो
सुनिष्ठ त्या भूलोक सेवतो;
अमृतकरानें भक्तशिरा हा
स्पर्श करी, दे शांतिस, पाहा. ९

मंथर, शीतल सुगंध, मलयज--
संगत वायू सुख दे सहज;
स्पर्श तयाचा अद्भुत जादू
मतिस्मृतिस दे मोद स्वादू! १०

अधर अधर करि बिंबफळाला,
यौवनरस पारि पक्वचि झाला !
लोचन चंचल तेज:परिकर
प्रणयाचें तें काय सरोवर ! ८

कामुक युवयुवतींच्या युगळीं
प्रेमनदी ही पूरें फुगली,
परस्परा तीं बघती युगळीं,
करिती नयनें परंतु चुगली ! ९

मेळवितीं तीं हस्ता हस्त,
प्रणयपिकें हीं झालीं स्वस्त !
आलिंगन न, प्रेमपिंजरा
कोंडीं कामुकशुका साजरा ! १०

——————— बाळकृष्ण अनंत भिडे बी. ए.

पुष्पाप्रत.

[मोठ्या आनंदानें झाडावर स्वच्छंदानें विहार करणारें सुंदर पुष्प तोडून मेज शोभिवंत केलें. परंतु दुसऱ्या दिवशीं पाहतां तें अगदी वाळून गेलेलें दृष्टीस पडलें. पुष्पाची ही दीन आणि शोचनीय अवस्था पाहून मनांत आलेले विचार.]

पद:– चाल–दुंदुभी दुमदुमे भारी०

बा ! सुमना ! तुज पाहोनी
मन माझें व्याकुल होई ! धृ०
जी कान्ति भुलवि जगताला
लाजवी इन्द्रचापाला

लावितें वेड बघ कविला
हाय ! ती लोपुनी जाई ! १

जननी--जनकांकीं बसुनी
सुखविलें त्या दिनरजनीं
बोलुनी मधुर हांसोनी
मुकविलें त्यांस मी पाहीं ! २

लडिवाळें मातेजवळी
बोलतां बोबडी बोली
जननी मोदांत निमाली
दुखविलें सतीला मीही ! ३

पवनासह गुंग विलासीं
रंगांत दंग जैं होसी
मोदें स्वशिरा डोलविसी
तें सौख्य, मोद तो जाई ! ४

स्वातंत्र्यवैभवाशिखरीं
विहरतां स्वजन शेजारीं
भूपतीहुनी सुख भारी
दुष्ट हा हिरावुनि नेई ! ५

तरुधरी नयन सुखवाया
प्रभुपदीं पूज्य वाहाया
योग्य तूं युवतिकरिं जाया
मम करीं दैव तुज देई ! ६

सुकुमार सुंदरा काया--
जन--नयन मनोहर वाया !

होतो बहु ताप जिवा या
मज भान लवभरी नाहीं ! ७

सकलां भूतीं प्रेमानें
ओतिला जीव देवानें,
स्वसुखार्थ हिरावुनि घेणें
अदयता कळस हा पाहीं ! ८

अनुताप गड्या ! जाळीतो
बा ! फुला पदर पसरीतों
दे क्षमा विनंती करितों
बा ! अतां अंत नच पाहीं ! ९

दत्ताराम रामचंद्र पिंगे.

पिंजऱ्यांतील पोपट.

श्लोक.

येथें फळें नसति कां तुज गोड खाया ?
नाहीं सुधेसम तसें जल काय प्याया ?
कां हेम–पंजर नसे तुज सौख्य द्याया--
हा निर्मिला ? बघशि यांतुनि कां सुटाया ? १

या सुंदरी स्मितमुखी तुज रूप–खाणी
गाती गड्या ! रिझविण्यां किति गोड गाणीं !
या नेत्र–कर्ण–रमणीय–सुख–प्रकारें
होतें सुसह्य पर–दास्य न लेश कां रे ! २

“ हें मुख्य भूषण असें अमुच्या घराचें ”
दावोनिया तुज वदे धनि, ते तयाचें--

ऐकोनि कां न फुगशी वच गर्व--भारें ?
छे ! लागलें तुज, गमे न विचार--वारें ! ३

देतो धनी तुज अमोल किताब--दान !
हा काय सान ! तरि या जगतांत मान !
तेणें न कां गमतसे तुज धन्य ! धन्य ! ?
मान्यांस सांग मग होशिल केवि मान्य ? ४

स्वातंत्र्य हा विषय एक तुझ्या मनांत !
कां सांग वास करितो दिन आणि रात !
त्याहून अन्य हितकारक थोर कामें
चिंतावया न मन ठेविशि कां रिकामें ! ५

पूर्ण स्वतंत्र ललनागण काय झाला ?
वैधव्य--वन्हि नच जाळित काय बाला ?
कां दुष्ट रूढिगण सर्व लयास गेला ?
कां त्वत्समाज वद सर्व विरक्त झाला ! ६

हीं श्रेष्ठ इष्ट पहिलींच करावयाचीं !
कामें, विचार परिपूर्ण ! अह्मां नरांचीं !
तो दैवि सद्गुण न भूतदया जयाला !
स्वातंत्र्य मात्र तुज ठाउक पांखराला ! ७

आह्मांस जें गमतसे पुरुषार्थ--सार
तें देह--सौख्य तुज भासतसे असार !
लाधे तुझा सुख--शतांश जरी अह्मासी
स्वातंत्र्य शद्बहि उरेल न आत्म--कोशीं ! ८

स्वातंत्र्य--दिव्य--सुख--विस्मृति व्हावयास
जीं साधनें जगतिं ठाउक मानवास

जीं मानवी अनुभवीं ठरलींत नामी !
तीं हाय ! हाय ! पडतीं न विहंग--कामीं ! ९

———— दत्तात्रय भिमाजी रणदिवे.

गृहिणी.

श्लोक.

खेळे मुखावरि जिच्या स्मित सर्व काळ
वाणी सुधेसम जिची स्रवते रसाळ !
कोप क्षणैक न जिच्या शिवतो मनाला
आराध्य दैवत गणी चिर वल्लभाला १

कांतानुरागच जिचा परमार्थ थोर !
तच्चित--रंजन गमे जिस धर्म--सार !
कांतांतरंग--सुख--दुःख--विकार--बोध
जें ज्ञान दे खचित तेंच तिचें अगाध ! २

होता कुमार्ग--रत वेळिंच आवरावें
यत्नें करूनि पति--मानस, तोषवावें
त्या मग्न आत्म--विमल--प्रणयीं करावें
कर्तव्य जीस नच याविण अन्य ठावें ! ३

जीचें असे अनुपमेय विशुद्ध शील
नाहीं जिच्या सहनशीलपणास मोल !
चिंता हरी चिर जिचें मृदु गोड बोल
सद्वर्तनें गुरुजनांस गमे अमोल ! ४

स्वर्गाहुनी गृह गमे बहु रम्य जीचें
माहेर केवळ मनोहर शांततेचें !

जेथें तिच्या नवनव्या रमणीय–लीला !
आनंद--सागरिं सदा बुडवी पतीला ! ५

———— दत्तात्रय भिमाजी रणदिवे.

शरदृतु.

(एक संध्याकाळ.)

श्लोक.

स्फटिकतुल्य दिसे बर अम्बर
करित मेघ न तो बघ डम्बर
चपल ती चपला न दिसे मला
करित दीप्त अतां न नभस्तला १
सुरपती अपुलें धनु ठेवितो
गजनभीं रमणीरत वाटतो
स्मितयुता दिसतात अशा दिशा
कथिति खिन्नमुखें कधि ना बसा २
विहरती किति ह्या नभि तारका
द्युतिमता मधुरा जणुं बालिका
स्मित करीत सुधाकर पाहुनी
सखिसमूहपरावृत रोहिणी ३
खगतती वरती उडती किती
दिसत मोदभरें बहु डूलती
रुचत ना जनसंग अह्मां इथें
प्रमुस जाउन सांगत दिक्पथें ४
झुळुझुळू जल निर्मल वाहतें
कमल नील दिसें कमनीय तें

करुन त्या विहगें अवगाहन
सुचविलें मशिं मानव धूं मन ५

करुनि केश सती विविधाकृती
सुमन तें प्रिय त्या शिरिं खोंचिती
निटिल तो खुलतो बहु कुंकुमें
सकलवैभव बीजचि तें गमे ६

कटितटीं जड कुम्भ पयान्वित
युवति घेउनि आक्रमिती पथ
सलिल निर्मल जें भरलें घटीं
सुचवितें शुचिता तिचि गोमटी ७

हरित शालुस दूर करूनिया
धरित पीत धरा वसनास या
मुरडते मिळतां नववस्त्र तें
नविनता मिळतां जग भाळतें ८

परम हर्षित होत कृषीवल
धरिणिला नव तें दिसतें फळ
तिजकडे बघतां मनिं मोदतो
शिशु जणूं जननीमुख पाहतो ९

करुन कार्य दिलें अपुलें पुरें
दुरवरी बघ मेघ कसा सरे
करि शरदृतु राज्य अतां बरें
किमपि न स्थिर मानव जाण रे १०

———— त्र्यंबक जयराम प्रधान.

पारिजातकाचें फूल.

पद.

चालः-- चंद्रकांत राजाची कन्या०

गगना तारे, सदना थालें, विचार काव्याला,
खुलविसि त्यासम मदीय कुसुमा ! उपवनशोभेला. १
रूपें, गंधें, भुलुनी पडले तुजवरि सुरवृंद,
नवल काय मी मोहित झालों ? तूं मत्सुख--कंद; २
नंदनवनिच्या सुखापुढें तुज नीरस ही बाग--
रुचली कैसी ? उदय पावलें माझें जणु भाग्य ! ३
अलभ्य वस्तू प्राप्त जाहली, परीस तूं खास,
निष्फल जीवित कोण करी जन लोटुनिया त्यास ? ४
मत्सन्मुख तूं संतत राहीं, माझा तूं प्राण,
प्रीति ठेवितों तुजवरि, जैशी मीन जलीं जाण; ५
गलित--देह निस्तेज कां बरें सहसा तूं होसी ?
निष्कारण तव दुस्थिति करि मम सबाष्प नयनासी ! ६
मृत्युलोकच्या अधमाधम मी मत्स्पर्शें तुजला--
विटाळ होतां ही स्थिति आली काय ? सांग मजला ७
अमर पुष्प तूं असतां झालें कैसें विपरीत ?
विषसंगें विषपूर्ण हो सुधा काय अशी रीत ! ८
स्पर्शसुखा लव सुयोग्य नसतां किमर्थ जगलों मी ?
तव संगाविण साधन अन्य न पडलों गाढ तमीं ! ९
आकारें जरि सान गुणाकर अससी तूं सुमना !
अनुकृति तव जर करील नर तत्सौख्या ना तुलना; १०

मानव चित्ता ' सुमन ' बोलती अयोग्य मज गमते,
पूर्वस्थिति ना तुजसम इच्छी वारिते परवशते ! ११
विलया गेलें स्वत्व जिथें तो प्राणशून्य देह !
परवशताग्निज्वाला रुचती जरि करिती दाह ! १२
दीपपतंगन्यायें हीरकलोभें अग्निकणीं--
धावे तुज़विण सन्मार्गाविह कोण तया आणी ? १३

' आनंदी--रमण '

सुभाषित.

श्लोक.

जिंकाया त्रिपुरा शिवें, बळिछळें बांधावया विष्णुनें,
शेषें भूशिरिं घ्यावया, जग करें व्हाया सरोजासनें,
गौरीनें महिषासुरास वधितां, सिद्ध्यर्थ सिद्धीं, स्मरें--
विश्वा मोहवितां गणेश नमिला. त्या मी नमीं आदरें, १

बा रे ! हंस सुशुभ्र रम्य रचिले जेणें करोनी दया,
कीरांना बघ निर्मिलें हरितसें वर्णें विराजावया,
लीलेनें बहु चित्रवर्ण दिधला जेणें मयूरां बरा,
तो वृत्ती तव राम चालविल. ही चिंता कशाला नरा ! २

भागीदार धनास चार असती साचार हें जाणपां,
धर्माग्निप्रभुतस्कर, प्रथम जो संपादिजे तत्कृपा;
धर्माला स्वविभाग तो न मिळतां हे सर्वही कोपती,
नेती सर्व हिरावुनी ह्मणुनि बा ! धर्मीं असावी रती. ३

भृंग.

काव्यरत्नावलि.

अंक ९ वा.

मेघनादवधकाव्य.

सर्ग ९ वा.

लक्ष्मणास संज्ञा प्राप्त झाली ह्मणून **रावणास** आश्चर्य वाटतें. **इंद्रजिता**च्या मृत्यूबद्दल **रावणा**चा शोक. **रावणा**ची ७ सात दिवस युद्ध बंद करण्याविषयीं **रामास** विनंति. **रामा**चें तसें करण्याबद्दल अभिवचन. **सीता** व **सरमा** यांचें संभाषण **इंद्रजिता**च्या दहनसंस्कारार्थ लोकांची स्मशानयात्रा. **प्रमिले**ची सहगमनाची तयारी. **रावणा**ची अवस्था पाहून **शंकरा**चा संताप. **पार्वती**ची विनंति. **शंकरा**ची **इंद्रजिताला** स्वर्गी नेण्याविषयीं **अग्नीस** आज्ञा. **इंद्रजित्सुलोचना** अग्निरथांत बसून स्वर्गास जातात. **इंद्रजित्**स्मारक. सुंदर मंदिराची उभारणी. लोक दुःखी होऊन **लंकें**त येतात.

आर्या.

गेली लया त्रियामा[1] व्योमां[2] उजळी रवि प्रभादानें,
टाकी व्यापुनि **लंका** **रघुसेना** **राम**नाम नादानें. १
स्वन तो रक्षोनायक आयकुनी विस्मया करी फार,
सारण[3]सचिवास ह्मणे कारण मज सांग काय साचार. २
कां करिते अरिसेना न कळे जयघोष हा उषःकालीं,
कपटी **सौमित्री**तें अथवा जीवनकला पुन्हा आली ? ३

१ रात्र २ आकाश ३ रावणाचा मंत्री.

नाहीं असाध्य कांहीं **रामा**तें सर्व देव अनुकूल,
दुर्लंघ्य सागरावर ह्मणुनि तयें भव्य बांधिला पूल. ४
जोडुनि करद्वयातें नत भावें सचिव बोलला, " राया–
दुर्ज्ञेया देवांची या संसारीं असे सदा माया. ५
शैलेन्द्र **गंधमादन** गतरात्रीं या पुरीं स्वयें आला,
दिव्यौषधदानानें वांचविता **लक्ष्मणा** पुन्हां झाला. ६
गर्जे हिमावसानीं द्विगुणित तेजें जसा भुजंगम तो,
गमतो **सौमित्रि** तसा तत्सेनासंघ मातला भ्रमतो. " ७
निश्वासुनी विषादें राय वदे खेळ हा कुदैवाचा,
वांचावा **लक्ष्मण** तो कैसा मृत होय मच्छरीं साचा ? ८
गेला कृतांत विसरुनि मद्दुर्दैवें स्वधर्म हा ! हाय !
शोक कशास करावा कर्बुरगौरवरवी लया जाय. ९
संग्रामीं मृत झाला मत्सोदर शूलि **शंभु**सम शूर,
इंद्रजयी आत्मज मम गेला सोडोनिया मला दूर. १०
माझे सोदर सुत हे मिळतिल मज का कधीं तरी फिरुनी,
कंठावा काळ कसा कसली आशा मनांत या धरुनी. ११
मंत्रिवरा ! सत्वर जा ! माझा संदेश सांग तूं **रामा**,
" दिन सप्त स्वस्थ रहा वीरा ! येऊं नकोस संग्रामा. १२
हेतू असे करावी पुत्राची योग्य संस्क्रिया आजी,
तूं क्षात्रधर्म पाळुनि विनति करी मान्य **राघवा** ! माझी " १३
वंदुनि **दशानना**तें ह्मणुनि बरें सचिव सत्वरीं जाय,
तीरीं पयोनिधीच्या होता जैं वास करित **रघुराय**. १४
शिबिरीं बसला होता **रघुकुलमणि राघव** प्रसन्नमन,
लक्ष्मण मित्र **बिभीषण** बसले सन्निध समस्त नेतृजन. १५

---

१ हिंवाळ्याच्या अखेर २ राक्षसांचा वैभवसूर्य अर्थात् इंद्रजित् ३ सेनानायक.

दूत वदे तैं " राया ये **सारण** सचिव तूज भेटाया "
परिसुनि तें आणाया सांगे **रघुराय** त्यास त्याठायां १६
शिबिरीं शिरुनी करुनी भावें **राघव**पदाप्रती नमन,
सांगुनि नृपसंदेशा सचिव करी **राम**कर्णतृट्शमन. १७
राम वदे " मंत्रिवरा ! प्रभु तव माझा असेच परमारि,
परि दुःखमग्न त्यातें परिसुनि हो क्लेश मानसा भारी. १८
मंत्रिवरा ! मज गमती सम सारे संकटांत पर अपर,
भेद मनास शिवे ना, **लंके**तें विगतशंक जाच फिर. १९
नाहीं धरणार कधीं शस्त्रातें दिवस सप्त मी स्वकरीं,
जो धर्मकर्मरत त्या छळितों मी नच जरी असेल अरि. " २०
परिसुनि **रघुनाथाचें** वचन तया बोलला सचिव धीर,
" विद्याबुद्धिबळें तूं अससी पृथ्वींत अतुळ **रघुवीर**. २१
तूं भूप परम धार्मिक उचित दिसे हेंच कार्य बा ! तुजला,
जो सुजन तो कधीं का अनुचित कर्मे करावया सजला ? २२
रक्षोदळपति **रावण** तैसा तूं नर महाप्रभावाचा,
उभयांचें वैर असे खेळचि हा दैवदुर्विलासाचा. २३
सिंधुसमीरण वारण सिंह जसे **वैनतेय**[1] पन्नगही
वैरी विधि स्वभावें निर्मी या **रामरावणां**स महीं " २४
वदुनि असें नमुनि नृपा सत्वर तो सचिव जाय माघारा,
सांगे रक्षोपतितें घडला वृत्तांत जो खरा सारा. २५
निजचमुतें आदेशी " व्हा रण विन्मुख " ह्मणोनिया **राम**,
काढुनि रणवेषातें सेना भोगी सुखांत विश्राम. २६
होती **अशोक** विपिनीं बसली जेथें विरक्त **वैदेही**,
रक्षःकुलराजश्री **सरमा** स्थानास त्या त्वरें जाई. २७

---

१ गरुड.

आली पाहुनि **सरमा सीता** मधुर स्वरें वदे तीसी,
"विधुमुखि ! सांग मला गे ! कां करिती 'हाय ! हाय' ! पुरवासी. २८
झालें भयकंपित मी परिसुनि रणनाद घोर या कानीं,
कांपे भू पदभारें वीरांच्या व्योमही भरे बाणीं !. २९
परते दिनावसानीं राक्षससेना करीत जयघोष ?
वाजति ह्मणुनी वाद्यें यन्नादें कोंदलें महाकाश ? ३०
विजयी कोण ? कुणातें अपजय ये ? सांग सत्वरीं मजला,
सरमे अधीर झालें मन्मन ह्मणुनी विचारितें तुजला. ३१
तुजविण कोण कथी मज पुसतां देती न उत्तरा दासी,
मातें परोपरीनें छळिती करुणा शिवेचना त्यांसी." ३२
" तव भाग्यें भाग्यवती झाला विगतासु **इंद्रजित्** समरीं,
रात्रंदिनही नगरी ह्मणुनी ऐसा महाविलाप करी. ३३
बलहीन[1] राय झाला दुःखें **मंदोदरी** रडे फार,
रक्षोरथी समस्तहि झाले आनंदहीन गतसार. ३४
देवांसही सुदुष्कर कर्म असें देवरें[2] तुझ्या केलें;
वधिलें **घननादा**तें उदयातें भाग्य गे ! तुझें आलें. ३५
परिसुनि वच **सरमे**चें तीतें **सीता** प्रियंवदा वदली,
" असती धन्य खरोखर भावोजी मम समस्त वीरदलीं. ३६
वाटे विधिनें केली बंधांतुनि आज मुक्तता माझी,
करणार काय **रावण** पाहूं तो नीच एकला आजी. ३७
आतां तरी पहावें लिहिलेलें काय या असें भालीं,
परिस परी तूं सखये ! कसली ही थोर गर्जना झाली." ३८
" प्रेतक्रिया कराया ने **रावण** सिंधुतें स्वतोकास[3],
ह्मणुनी दुःखव्याकुल करिती राक्षस समस्त शोकास. ३९

---

१ निर्बल २ दीरानें ३ आपल्या मृत पुत्रास.

दिन सत्प शस्त्र कवणें न धरावें आपुल्या करीं ह्मणुनी,
केली **रामें** आज्ञा सेनेतें अरिवरी दया करुनी. ४०
साध्वी **प्रमिला** देवी शोकाकुल पतिसवें सती जाय,
स्मरतां कथा तियेची नयनीं या अश्रु लोटती हाय !" ४१
मूर्तिमतीच दया जी **सीता** परदुःखदुःखिता होई,
परिसुनि वच **सरमेचें** वदली तिजला दयार्द्र **वैदेही**. ४२
" **सरमे** ! मी हतभागी झालें मम दुर्दिनीं गडे ! जनन,
मद्दुर्भाग्यबलानें झाले पति सेविते भयाण वन. ४३
अनुसरले पतिराया भावोजी दुःखभोग भोगाया,
हरहर ! मामाजीनीं सुतशोकें स्वीय सांडिली काया. ४४
झाली शून्य **अयोध्या** सिंहासन भव्य तें रितें आज,
मेले मित्र **जटायू** दासीची रक्षण्यास या लाज. ४५
हे बघ इकडे **सरमे** ! मृत झाले **इंद्रजित्** रथी समरीं,
झाल्या दानवबाला शोकाकुल, दोषपात्र मीच खरी." ४६
पुसुनी जल नयनींचें वदली **सरमा** " तुझा न दोष सती !
फसवुनि आम्हा येथें कोणी ही दिव्य आणिली व्रतती ? ४७
राघवमानसपद्मा खुडुनि कुणी आणिलें असुरदेशीं,
निजपापकर्मयोगें राय बुडे सर्वथैव तो दोषी." ४८
वदुनि असें शोक करी **सरमा** परमाकुला अशोकवनीं,
परदुःखदुःखिता ती **राघव**जाया विषण्ण होय मनीं. ४९
द्वारांतुनि पश्चिम मग असुर निघाले झणी असंख्यात,
घेउनि हैमपताका राजपथांतूनि ते जवें जात. ५०
घेउनि दुंदुभि पृष्ठीं सर्वांपुढतीं गजेन्द्र तैं चाले,
गंभीर आरवानें दुंदुभिच्या देश सर्व तो हाले. ५१

---

१ वेल २ आवाजानें.

चालति किती पदातीमागुनि त्यांच्या तुरंगगजवृंद,
जात असे रक्षोदल सागरतीराकडे निरानंद. ५२
प्रमिलेच्या मग दासी पडल्या बाहेर शूर परि दीन,
कृष्णहयस्था दिसती मलिन जशी रात्र चंद्रिकेवीण. ५३
नयनांतूनि तयांच्या अविरल जल संतती गळूं लागे,
निश्वासिती विषादें कोणी **रघु**सैन्य पाहती रागें. ५४
गेलें हास्य कुठे तें विद्युत्सम, ते कुठें कटाक्षशर;
कुसुमाविण वृंतें तसा **प्रमिले**विण शून्य अंगनानिकर. ५५
जातां स्त्रिया पथांतुनि भरिती आक्रंदनें दिशा दाही,
अश्व रिता **प्रमिले**चा पृष्ठीं रणवेष आपुल्या वाही. ५६
घननादरथ निघाला चक्रें त्याचीं तडित्प्रभा वमेती,
इंद्रधनूसम झळके ध्वज तेजोहीन रथ दुजे गमती. ५७
शोभे धनुष्य भीषण खड्गगदाचक्रही रथामाजी,
तूणीर मुकुट सुंदर वीरोचित अन्य भूषणें जीं जीं. ५८
फेंकिति सुवर्ण मुद्रा कुसुमें कोणी पथांत उधळीती,
नेती रथ सिंधुकडे गाती स्वमुखें कुणी करुणगीती ५९
शिबिकेंत कुसुमवेष्टित बसली **प्रमिला** सती शवापाशीं,
मन्मथ मृत हो ह्मणुनी सहगमना सिद्ध होय **रति** जैशी. ६०
माळा गळां फुलांची भालीं सिंदूर बिंदुही साजे,
नटली विविधाभरणीं **प्रमिला** कंकण तिच्या करीं वाजे. ६१
मुखचंद्र म्लान परी आज दिसे तेज सर्व मालवलें,
गेलें स्मित विलयाला दुर्दैवें विष सुधेंत कालविलें. ६२
वेदज्ञ वेद ह्मणती उच्चरवें वन्हि ने करीं होतों,
चंदन केशर कुसुमें नेती रक्षोवधू जला पूतों. ६३

---

१ फुलांचा देंठ २ बाहेर टाकिती ३ पुरोहित ४ पवित्र.

चाले प्रचंड यात्रा सिंधुकडे पिटित वक्ष शोकानें,
वाजति विलापवाद्यें स्वन त्यांचा परिसवे न तो कानें. ६४
जाई **रावण** पायीं शोकव्याप्त स्मशानयात्रेला,
अशुभप्रसंगसूचक रायानें धवल वेष तैं केला. ६५
रायामागुनि जाती नगरींतिल वृद्धबालवनिताही,
बुडली शोकसमुद्रीं **लंका**, भरल्या तमें दिशा दाही. ६६
जाइ अशा रीतीनें सिंधुकडे ती हळू हळू यात्रा,
घननादनिधन तेव्हां एकहि वाग्विषय होय जनयात्रा. ६७
" रक्षःकुलशोकानें व्याकुळ हो **अंगदा** ! मम प्राण, "
" शिष्टाचारसुपालन **राम** वदे उचित धर्म हा जाण. ६८
घेउनि संगें सेना शवयात्रे **अंगदा** ! तुवां जावें,
संकट येतां अरिशीं विसरुनिया भेदभाव वागावें. " ६९
आज्ञा **श्रीरामा**ची शिरसा वंदूनि सत्वरीं जाय,
अंगद घेउनि सेना सिंधुतटीं जेथ पातला राय. ७०
दारुण तो देखावा जमले सुर कौतुकें पहायासी,
गंधर्व यक्ष किन्नर देवर्षी अन्यही नभोवासी. ७१
सागरतीरावर मग असुरांहीं रचियली प्रचंड चिता,
आणुनि चंदनकाष्ठें मेळवुनी अन्य वस्तुही उचिता. ७२
मंदाकिनीजलानें घालुनि यत्नें कलेवरा स्नान,
ह्मणुनी मंत्र पुरोहित करिते झाले चितेस शवदान. ७३
साध्वी **प्रमिला**देवी हर्षें अवगोहुनी महातीर्थी,
नमुनी गुरुजन अर्पुनि आभरणें सहचरींस ती प्रार्थी. ७४
" जा ! आतां सखयानों ! परत घरा शोक आवरा सारा,
सांगा मत्पितयाला कन्याही उबगलीच संसारा. ७५

१ रावण २ स्नानंकरून.

पाणिग्रहण जयांचें केलें मी चाललें तयांसंगें,
पतिनिधनानलदग्धा संसारीं कोण ती सती रंगे ? ७६
जें जें विधिनें लिहिलें भालीं तें शेवटीं खरें झालें,
सखयानों ! जा ! आतां तुमच्या मी दर्शनें मनीं धालें. ७७
वदुनि असें आनंदें चढली **प्रमिला** सती चितेवरतीं,
वेदज्ञ वेद ह्मणती रक्षोवाद्यें प्रचंड रव करिती. ७८
हाहाःकार ! जहाला गगनांतुनि देव वर्षिती सुमनें,
सुमनें केशर कुंकुम अर्पिति करिती कुणी चिते नमनें.[1] ७९
वधुनी तीक्ष्ण शरांहीं विविध पशू करुनि त्यां घृतोक्त[2] झणीं,
फेंकियले असुरांहीं, शक्तिपदीं शाक्त जेंवि नवमेंदिनीं.[3] ८०
शोकाकुल रक्षोधिप वदला आर्त स्वरें पुढें सरुनी,
" बा ! वत्सा ! **इंद्रजिता** ! पाहूं कोठें तरी तुला फिरुनी. ८१
वृद्धपणीं राज्याचा टाकुनि बाळा ! तुझ्यावरी भार,
अंकीं तुझ्या मरावें होती आशा मनांत ही फार. ८२
सिंहासनीं तुला म्यां **प्रमिलेसह** बैसला पहावें, ही–
आशा होती हृदयीं परि मद्दैव आडवें येई. ८३
केली भक्तिपुरस्सर मी जी आराधना **गिरीशा**ची,
लाधे फळ विषम तिचें दैवाची दृष्टि वक्र हो साची. ८४
परत गृहीं गेल्यावरि कैसा **मंदोदरीस** समजाऊं ?
साहूं चिरविरह तुझा वार्धक्यीं तुजविणें कसा राहूं ? ८५
ऐशा परोपरीनें राय करी त्यांक्षणीं विलापाला,
शोकाकुल पाहुनि नृप दुःखी राक्षससमूहही झाला. ८६
किंकरकरुणावस्था बघतां संतापमग्न होय **हर**,
हाले जटा शिरींची क्रोधें फूत्कारिती भुजंगवर. ८७

---

१ नमस्कार २ तुपांत भिजवून ३ नवरात्रांत शेवटच्या दिवशीं.

नेत्रस्थितानलाच्या निघती तेव्हां भयंकर ज्वाला,
आला पूर जलाचा प्रावृट्कालापरी त्रिपथगेला. ८८
कांपे **कैलास**गिरी थरथरथर ! कांपली मही सर्वा,
अभया होउनि सभया प्रश्न करी नमुनि कोपल्या **शर्वा**. ८९
" **घननाद** मृत्यु पावे प्रारब्धानें न दोष **रामा**चा,
आधीं मला वधावें त्याचा संहार जरि करायाचा. ९०
कां कोपलां प्रिया ! हो ! दासीचा काय यांत अपराध,
सांगा बिनवी तुमची दीना सहधर्मिणी पुरे क्रोध." ९१
परिसुनि वचन **शिवे**चें वदला **शितिकंठ** सादरें तिजला,
" **दशमुख** पाहुनि दुःखी होय सखे ! परम दुःख गे ! मजला. ९२
मत्प्रीति **नैकषेयीं** निस्सीमचि हें तुला असे ज्ञान,
केवळ तुझियासाठीं क्षमितों मी **रामलक्ष्मणा** जाण." ९३
" शुचि करुनि स्पर्शानें वेढुनि ये दंपतीस कैलासीं, "
आदेशिलें विषादें **श्रीकंठें** सत्वरीं कृशानूसी, ९४
अग्नि इरंमदरूपें वेगें धांवूनि भूतलीं आला,
सहसा चितेंतुनी तों वरवरतीं लागल्या निघूं ज्वाला. ९५
पाहुनि विस्मय करिती तेथें आग्नेय रथ समस्त जन,
बसला **वासवविजयी प्रमिले**सह त्यांत कीं दुजा मदन. ९६
रथ तो भूलोकाहुनि वेगें स्वर्गाकडे निघे जाया,
वर्षिति तैं सुर सुमनें लागे हर्षांत विश्व नाचाया. ९७
सिंचुनि विपुल क्षीरीं वैश्वानर शमविला झणी प्रखर,
यत्नें भरुनी रक्षा देती सिंधूंत फेंकुनी असुर. ९८
रचिती सुंदर मंदिर शिल्पी दहनस्थलावरी शीघ्र,
ते कळस मंदिराचे उज्ज्वल उत्तुंग भेदिती अभ्र ! ९९

१ गंगेला २ पार्वती ३ शंकरास ४ शुद्ध ५ अग्नि ६ वज्र ७ दुधाला.

अवगाहुनि सिंधुजलीं असुरचमू सर्व जाय माघारीं,
रडती **लंका**नगरी सप्त अहोरात्र दुःखिता सारी. १००
हा नवम '**संस्क्रियाभिध**' रचिला सर्ग प्रसिद्ध कवि रत्नें
वंगीं, रूप मराठी त्यास दिलें **माधवानुजें** यत्नें १०१

मेघनादवधकाव्य समाप्त.

माधवानुज.

राष्ट्र–शोक–क्षोभ



श्लोक.

अहो ! दश दिशा अशा वरिति कां उदासीनता,
अशी जनमुखावरी दिसुनि येइ कां खिन्नता ?

---

* गेल्या जुलै महिन्याच्या २२ व्या तारखेस लोकमान्य देशभक्त टिळक यांस जी भयंकर काळेपाण्याची ६ वर्षांची शिक्षा हायकोर्टानें दिली त्या वेळीं कवीनें हे उद्गार काढिले आहेत.

त्यजोनि निजवृत्ति कां बसति वैश्यही स्तब्ध हे?
भयाण तरि कां अशीं दिसति सर्व शालागृहें ! १

अहो ! सुजन लाविती पदर कां असे लोचना !
कशास तरि गाळिती अविरताश्रु पौरांगना !
विचाररत हे किती, दिसति हे किती बावरे !
हताश दिसती किती, तरुण कावरे बावरे ! २

वदा अशुभ काय तें, रडुं नका वदा हो वदा !
विदारि सकलांतरा कवण ती अशी आपदा !
अभद्र वदतां कशी तरि अशी गिरा दुःसहा !
' पडे **टिळक** बंधनीं ' ! अहह काय वर्षे सहा ! ३

न हें वचन ऐकवें हृदय जाळितें जें जवें !
न धैर्य धरवें, मनीं असुख--वारिधी काल्वे !
मतिप्रगति माल्वे, नयन गाळिती आसवें !
शिला--पतन मानवे शिरिं महा निराशोद्भवें ! ४

विचार--रवि काय हो तरि जगांतुनी लोपला,
खरेंच तरि **सत्य** कां त्यजुनि जातसे भूतला;
न काय सदसद्विवेकही जरा नुरे मानवीं,
कसें विमल मानवी सुगुण लोभ रे ! लोपवी. ५

मनस्तिमिर संहरी, प्रबल मोह--निद्रा हरी,
सहर्ष नव--जीवनोद्यम--निमग्न सर्वां करी;
समान रिपुबांधवां कळवि सत्य वस्तु--स्थिती,
तया गृहण लागलें अहह ! लोक--मित्रा--प्रती ! ६

प्रतिध्वनि, घुमे जिचा अझुनि सर्व विश्वांतरीं,
विपक्षकरिंनां करी गलित--गर्व जी सत्वरीं;

पयोदसम गर्जना विफल हो ! कशी ती तरी,
अखेर नर--**केसरी** गवसला कसा पंजरीं ! ७

स्वदेश--हित--साधनीं नरवरा ! दिवायामिनी,
महाबुधजनाग्रणी ! विमलवृत्त--चूडामणी !
शरीर झिजवोनिया करिशि भारतीयां ऋणी
परोपकृतिलाभ हा तुज मिळे अहा ! बंधनीं ! ८

करी असुख--कल्पना जशि जनांतरांचा चुरा
न संकट--परंपरा करि तशीं तुला घाबरा !
शिरावरि बघोनिही असिलता न भीसी जरा,
खराच जगिं एक तूं असशि धैर्य--शाली नरा ! ९

किती कठिन--आपदा तव शिरावरी कोसळे
जळे ! तुजमुळें पहा भरतखंड शोकानळें !
अजाण जनही रडे ! रडति बायका लेंकरें !
सख्या ! किति कथूं तुला उपलसंघही पाझरे. १०

किती स्वहित--साधिती मरति भूवरी जन्मती,
जिवंत किति कीटकासम नसे तयाला मिती;
परी, परहितार्थ जो निज सुखास हो पारखा,
जगीं विरल रे ! सख्या ! विरल तो तुझ्या सारखा. ११

प्रयत्न करि देश--बांधव--सुखार्थ जो आगळा,
सुगंधि सुम--मालिकोचित असे जयाचा गळा;
तयावरिच आज या बघुनि दांडग्या शृंखळा,
न काय असुखाग्नि तै करिल दग्ध मर्मस्थळा ! १२

“ उतार वय जाहलें बहु जया गदें पीडिलें ”
“ अशा समयिं लाडक्या ! तुज कुणी सुता ! नाडिलें ”

" कुणी हृदयिं मारिले मम शतावधि कोरडे "
" कुणी अहह फाडिलें हृदय ओढिलें आंतडें " १३

वदोनि किति हें असें जननि आर्यभू ओरडे,
किती तडफडे गळा करुनि मोकळा ही रडे !
नको रडुं गडे ! धरीं हृदयिं शांतता बापुडे !
निवारिल तुझ्या सुतावरिल ईश तो सांकडे. १४

दिसे **तिलक**हीन ही विरहिणी **महाराष्ट्र** भू,
पती अनभिषिक्त तो हरुनि दूर नेता प्रभू;
असेल जरि भाग्यशालिनि पतिव्रता स्त्री कुणी,
तरी असशि तूंच गे ! विमल **सत्यभामा** जनीं. १५

करोनि असहाय पंजरिं जरी तुला कोंडिती !
स्वपक्ष--विजयार्थ तूं तडफडाट केला किती !
हताश तव--चित्र तें करि पुढें उभें कल्पना !
तदा बघुनि मानसा अमित होति रे ! यातना ! १६

बरा दडपशाहिच्यावरि लगावला कोरडा !
पडे दिवस पांच बोलुनि तुझा घसा कोरडा !
निरुत्तर विपक्ष तो करिशि युक्ति--वादें जरी
द्रवे न **नय**--देवता कठिन--चित्त लोहापरी ! १७

" करा **नय** खरा **दया** मज नको ! नको आपली ! "
ज्युरीस रसना तुझी वचन जें असें बोलली
असें खचित वीरसें उचित तें **मराठ्या** गड्या !
अशाच तव सद्गुणें पडत पीळ या आंतड्या ! १८

" घडो मम विपत्तिनें चिर मदीय देशोन्नती "
" असेंच गमतें, खरें जणु जगन्निवासाप्रती "

निघे अशि अखेर जी तव गिरा मनोभेदिनी !
अश्रोनि जल आणितें मम पुनः पुन्हा लोचनी ! १९

सुरीसम चिरी मना तव विपद्दशा–कल्पना !
बघोनि तव हाल हे अमित हो जना--यातना !
कराल पवि--घात हा करि गमे शिरांचा चुरा !
खरा विलय पावला गमतसे सुखाचा झरा ! २०

स्फुरेल कवि--भारती गुण तुझे सदा गावया !
बघेल तुज साधुही सु--चिर लोभ जिंकावया !
दिसेल इतिहासही तुजविणें उणा सर्वदा !
चरित्र--परिशीलनें तव, नुरेल देशापदा ! २१

दिसो न नयना, परी हृदय पाहतें हें तुला !
न कर्णि वच तें पडो, स्वमन जाणतें हेतुला !
नृपाळ करितो जरी तुज महाशया ! पारखा
तरी वससि मानसीं अढळ आमुचा तूं सखा ! २२

महाभागाला त्या बघुं पुनरपी काय नयनीं !
पुन्हां तो येवोनी रवि हरिल कां मोह--रजनी !
पुन्हा त्या सिंहाचा रिपु--मदहरी ऐकुं रव कां !
बघूं कां आर्यांबा--कटिं पुनरपी बाल--**तिलका** ! २३

जगाचा या न्यायी बुध वदति तो ईश्वर धनी,
तरी कां हो त्याची विपरित अशी हाय ! करणी !
जनांच्या कल्याणीं सतत धरि जो वाक् तनु मन;
विपत्ती त्याची तो प्रभुवर करी केवि सहन. २४

“ करी जें जें कृत्य प्रभु करित तें मानव--हिता ”
“ तयाच्या लीलेचा लवभरि न ये तर्क करिता ”

" नरा दु:खांतीं हो त्वरित सुख--संप्राप्ति समजा "
असे मोठे मोठे वदति बुध अज्ञान मनुजा. २५

मृषा त्यांची वाणी जर नच असेल प्रभुवरा !
तरी देवा ! दावा अनुभव अह्मा त्यांतिल खरा
दरिद्री आह्माला धृति--बल--मती--रीति न जरा
तया त्राता आतां तुजविण समर्था न दुसरा ! २६

तुझा राहो बाहू वरद, **तिलकाच्या** शिरिं सदा !
तया लक्षीं रक्षीं हरुनि अशिव क्लेश सुहृदा !
पुन्हा त्यातें येथें कुशलपणिं आणीं द्रुतगती !
जगन्नाथा ! माथा नमवुनि करीं हीच विनती ! २७

——— दत्तात्रय भिमाजी रणदिवे.

केकादासी किंवा प्रभु-समालाप

समालाप १ ला.

श्लोक.

तुझी, **देवा**, सेवा स्तुति जन कराया नच शके,
तुझ्या नांवा गांवा कधिं न ह्मणतां प्राज्ञहि थके.
मुळीं कांहीं नाहीं नियमित अशी आकृति तुला,
कसें गावें ध्यावें समज न पडे मूढमतिला. १

जपें मातें, माते, ! विनवणि नको ही कधिं सुता,
सदाही वात्सल्यें जपुनि जननी होइ मुदिता;
स्वयें माथां ध्यावा श्रमगिरि, परी बालतनुला—
न लागो वाराही असुखद, अशी काळजि तिला. २

तशी तूं विश्वाची जपशि जननी प्राणिततिला,
नको चिंता मातें, परि न समजे अल्पमतिला;
जपावें कैसें हें त्रिभुवनिं तुला मात्रचि कळे,
तरी माझें चित्त भ्रमुनि बहु चिंतानळिं जळे. ३

करावें त्यां कैसें, मम गति पुढें होइल कशी,
अशी आशा पोटीं धडधडि; सदा शेगडि जशी.
कुठें जाऊं, पाहूं भवदत्र न जाळूं ह्मणुनिया,
भ्रम ग्रासी मातें फिरफिरुनि चित्तीं शिरुनियां. ४

भ्रमग्रस्ता ऐशा तुजविण नसे वैद्य दुसरा,
सरावा हा व्याधी ह्मणुनि गुटिका दे भ्रमहरा !
न जाणें त्वत्सेवा, सुकृतधन नाहीं मम करीं,
करीं ऐशा मुक्त; प्रभुपण तुझें राहिल तरी. ५

हरी व्याधी लोभ त्यजुनि, भुवनीं तोच सुकृती;
कृती अन्या धन्या कधिं न सदया निंद्य ह्मणती.
तुला 'हा व्यापारी अदय' न ह्मणो कोणि करुणा,
कधींही सोसे ना वच कठिण ऐसें तव मना. ६

नसोसे निंदा, बा, त्यजिलि ह्मणुनी त्वां स्ववनिता,
कलंका क्षालाया ल्हसि वरिसी ऋक्षदुहिता;
भुकेला कीर्तीचा असिसि परि कां स्वस्त बससी,
कसा, सर्वज्ञा, तूं त्यजुनि मजसी स्पष्ट फससी. ७

अनंतां पाप्यांतें धुवुनि वरिली कीर्ति विमला,
मला त्यागोनीया तिस करुं नको आज विफला;
कितीही सत्कृत्यें बुध करु, घडे दोष लव तो,
तया खांतीं जाळी, कुजनमुखिं भारी पसरतो. ८

मला जागें व्हाया, ह्मणशिल कशाला शिकविशी,
पहा, ज्ञात्या, तूंही परि कधिं कधीं स्पष्ट फससी;
सुवर्णाचा पक्षी करुनि **दशकंठें** फसविलें,
पशू ना, सोनें ना, रडत तुजला, बा, बसविलें. ९

तुला नष्टें दुष्टें बहु शिणविलें तें समजलें,
परी तूतें कैसें **बळिसि** छळितां गोड गमलें;
चुकें, मी, कीं-सोनें दहनिंच ठरे बावन कशी,
छळावांचूनीया **बळि** मिळविता कीर्ति न अशी. १०

तुला, सर्वश्रेष्ठा, कुजन फसवीती जरि असे,
तरी मातें क्षुद्रा छळितिल न कामादरि कसे?
मनीं हें आणीं कीं-गरिब फसतो अज्ञ ह्मणुनी,
करीं मातें ज्ञाता, स्तविन तुज आभार गणुनी. ११

नको माझी चिंता, परि तुज अकीर्ती कशि रुचे,
गमे पापां धूतां मन मलिन झालें नच सुचे;
परी शंका मिथ्या, रवि जरि हरी नित्य तमसा,
कलंका तो नेघे, लखलखतसे नित्य नवसा. १२

भवल्लीला, देवा, अखिल जगतीं व्यापुनि वसे,
परी ती वर्णाया मनुजमतिला शक्ति न असे;
असां भोक्ते तीचे ह्मणवुनि तुह्मां कोणिहि तरी,
प्रभो, व्हावा गाता, मजसि विनता ध्या तरि करीं. १३

तुह्मी हातीं घेतां मज, सुरगुरू होइल फिका,
भवल्लीला गातां, ह्मणतिल मला 'हा कवि निका;'
तुह्मां व्हावा तैसा स्तव करिन मी, डुल्लत रहा,
सदाही आनंदें, क्षण मज करीं घेउनि पहा. १४

नको शंका, शंखा मज करिं धरीं, मंदहि तरी,
नव्हें मी त्वच्छत्रु, श्रुतिहर नसें शंखहि परी;
जरी देवद्वेष्टा खलहि करिं तो इष्ट गमला,
किती अंदाधुंदी ! स्वकरिं भजका घेसि न मला. १५

धरीं गोऱ्या शंखा करिं, मज ह्मणा दूरचि रहा,
परी गोरा पोटीं मल किति धरी हें तरि पहा;
घनश्यामा, मी त्वँत्तनुसम रुचे ना करिं धरूं,
स्ववर्णाची तूतें कळकळ न, कैसें कथिं करूं. १६

रुचे तूतें कीं, जो कठिण अशिरःपाणिचरण,
असोनी प्रेतास्थी कुटिलहि नये शंख शरण;
तुवां मातें केलें सुकरण, नव्हें क्षुद्र जिवडा,
न होऊं दे माझा करिं न धरुनी व्यर्थ चिवडा. १७

न जाणे माधुर्या, भयकरचि ठण् ठण् रव करी,
खरा शंख ज्ञानें, मग वच कसें, अर्थहि तरी;
कसा, सुज्ञा, अज्ञा करिं धरिसि नादीं भरुनिया,
खऱ्या गोष्टी सांगे, ह्मणुनि चतुरा, का त्यजसि या. १८

अगा, मर्मा जाणें, तुजसि पडली भीड, जितुकी,
स्वकांताज्ञा ग्राह्या; विनतिहि न दीनाचि तितुकी;
निजभ्रात्यासांठीं तुज ठकवि **लक्ष्मी** ठिक असे,
परी, बा, ज्ञाता तूं असुनि ठकतां शोभत नसे. १९

नको हातीं घेऊं, त्वरित मज लावीं निजपदा,
पदस्थांबांकीं मी बसुनि पिइन स्तन्य विबुधा !

---

* कर्त्याचा रंग काळा आहे.

चुरी माता युष्मच्चरण तयिं मीही पद दुजें,
तुझें जीवें भावें चुरिन, मग कैलसहि खुजे.

———— जुन्या चालीचा.

बोधसुधा.

(राजे, संस्थानिक इत्यादिकांस उद्देशून.)

श्लोक.

राजे हो ! असतां समृद्धि सुकृता साधा तुह्मी सत्वरीं,
संपत्सार्थकता घनापरि करा वर्षूनि भूमीवरी;
लोकीं चंचल निम्नगामि जलसें हें द्रव्य जाणा असे,
अन्तीं तत्परिणाम बाष्पेंच असे तैल्लोभ सोडा कसे. ! १

पृथ्वी शुष्कसरोवरादि सगळी सत्पात्रपंक्ती किती--
हे धाराधर हो ! समृद्ध करुनी आनंदवीती अति.
येतां दैवबळें समृद्धि मनुजां, विद्याकलोत्तेजनीं--
औदार्यें धन वेंचिती बहुपरी ते धन्य होती जनीं ! २

येतां समृद्धि मनुजांस जगीं प्रभूत,
जे सद्व्ययास करिती न कधीं प्रमत्त;
संपत् तदीय कुपथा धरुनीच जाते,
वर्षा--नदी--परि तिची स्थिति सत्य होते ! ३

पाश्चात्य--वात--सम दुर्विधि जों न आला,
साधा घनापरि परोपकृती अमोला.

---

१ पुण्य २ नीच मार्गानें जाणारें ३ जलाचा व द्रव्याचा परिणाम ४ वाफ, अश्रु (जलाचा परिणाम वाफ होणें, द्रव्याचा परिणाम अश्रु गळणें.) ५ द्रव्याचा लोभ ६ मेघ ७ दुर्दैव.

येतां कुठें धन तुह्मीहि कुठें सहाय ?
पस्तावुनी मग मनांत कराल हाय ! ४

कोठें हो गजवाजिराजि मग त्या ते दासदासी कुठें ?
रत्नें वस्त्रविभूषणें मग कुठें वित्तादि सारें कुठें ?
कोठें सुंदर मंदिरें स्तुतिपरा मिथ्योक्ति कोठें अहा ?
पश्चाताप घडेल दैव फिरतां संस्थानिकांनो पहा ! ५

द्रव्यादि होय वॅश जों--वरि मालमत्ता--
जोडा सुपुण्यचय हो ! त्यजुनी अहंता--
संपत् तडिच्चल असे बघुनी जगांत
आणूनि कालगहनत्व तसें मनांत. ६

आहे जोंवरि भागॅधेयवशता तावद्विचारा करा,
अॅर्थाधीन सुपुण्यलाभ सुयशःप्राप्तीहि आहे नरा.
घ्या हा लाभ सदैव जोंवरि तुह्मा--पाशींच ऐश्वर्य हो !
येतां पश्चिमवात थोर, टिकणें दीपा नसे शक्य हो ! ७

संपन्न दैव फिरतां धनहीन होतीं,
निर्द्रव्य होति धनवंत धराच चित्तीं.
दुर्लॅघ्य या--परि असे जगिं कालचक्र,
साधा परॅार्थ नच जोंवरि काल वक्र ! ८

भूपांनो निजसंतती--परि सदा स्वीय प्रजा जाणुनी--
विद्यादान कलाप्रदान तिजला द्या द्या मनापासुनी.
लोकांचें हित आपुलेंच गणुनी प्रेमें तुह्मी वागतां--
येथें आणि परॅत्र होय तुमचें कल्याण हो तत्वता ! ९

---

१ स्वाधीन २ दैवानुकूलता ३ संपत्तीच्या स्वाधीन ४ धर्म ५ स्वर्गी.

आर्या.

पितरां--परीस दुर्घट, सोंपविलें ईश्वरें सदैव असे--
नाना--प्रजाजनांचें रक्षण शिक्षण तुह्मावरी बहुसें. १०

——— पांडुरंग गोविंद शास्त्री पारखी.

प्रळय.

(चालः— भज गोविंद इ०)

निसर्ग स्थिति.

पद.

प्रेममृगाचें सुदैव फिरलें
कलहव्याधें काळिज चिरलें !
निष्ठुरतेचा वणवा भडके
शांतिजिव्हारीं ज्वाळा थडके ! १
मेघ गडगडे, वीज कडकडे,
पंचहि भूतें करिती झगडे !
तिमिरापासुनि तिमिर प्रसवे,
प्रलयपवन संचरे अति जवें. २
द्वादश रवि हे जणूं भेटले !
नभ त्यानें हे काय पेटलें !
रुधिरोक्षित रवि वाटे निधडा,
वाली क्षितिला रक्तमय सडा ! ३
सागरवीची गर्जति फेनिल,
त्यास चाळवी हा प्रळयानिल;
उठती भासुर जळपर्वतगण
त्यांतुनि सुटती वड्वानळकण ! ४

मानवी कृति.

पद.

दुंदुभिनादें गगन व्यापे,
रणघोषानें श्रुतिपुट तापे;
धरुनी यंत्रें, भांडीं, चापें,
वीर धांवती; शांती कांपे ! १
गोलस्फोटप्रचंडगर्जन,
यंत्रहुताशनकृतजनभर्जन,
प्रास, खड्ग घे रुधिरघोंट ते,
धूम्रें घनतम नभीं लोटतें ! २
गोलस्फोटें नरहयगजगण
किंकाळति, ते उलती तडकण;
वायु जसा परिपक्कफलातें,
पाडिति यंत्रें शवशकलांतें ! ३
वीरसहस्रें करिती हल्ला,
तीव्रें कष्टें झेंपुनि पल्ला,
झटती घ्याया अरिच्या तोफा,
काळगृहाच्या परि त्या सोपा ! ४

घनतिमिरानें झाके अवनी,
लोट धुळीचे निघती गगनीं;
वृष्टि क्षितिला हाणी प्रजवीं,
सागरलोंढा गगना भिजवी ! ५

कालहुताशज्वालारसना
चंचच्चपला चाटी भुवना !
दिशादसकडी होउनि धमनी
तिला स्फुरविते त्रिजगद्दहनीं ! ६

प्रळयकाळ हा ऐसा धडके,
भूमी कांपे, धाके, तडके !
भूस्फोटांतुनि सुटती ज्वाला,
अणुसम फुटती पर्वतमाळा ! ७

दया, क्षमा ती पार दडाली,
सृष्टि क्षोभे जैशी व्याली !
भूतगणें ज्या विश्व जाहलें,
त्यांनींच अजी त्यास दाहलें ! ८

प्रभंजनाचे विषफूत्कारें,
प्रचंडसूर्यातपविस्तारें,
वारिक्षोभें, रसाविकंपें,
विश्वविरचना बिघडे, संपे ! ९

विस्खळली ही भुवनसांखळी,
भूतपंचकीं माजूनि कळी;
शून्यामधुनी जें ये उदया,
शून्यांतच्चि तें पावे विलया ! १०

धूम्रघनामधिं घुसती नेटें,
प्रळयानळ या भोंवति पेटे !
गोळ्यांचा हा वर्षे पाउस !
थांबविती हे परी न धुडकुस ! ५

हो न, सहुनिहि अपाय, पाय,
प्रसंत्र वदनीं न ' हाय ! हाय ! '
स्वतां मरति, परि परां मारती !
ही काळाची विकट आरती ! ६

सूं सूं सूं निश्वसती गोळे !
धडधड असंख्य मानव लोळे !
मानव नच हे, राक्षस खासे
प्रलय कराया जमले, भासे ! ७

व्याघ्रादि पशु क्रूर अकारण;
स्वजातिची परि करी शिकार न;
अपार परि यद्बुद्धिवैभवें,
पशूहूनि तीं नीच मानवें ! ८

बुद्धि श्रमवुनि बनवुनि अस्त्रें;
घडुनी, जडुनी, खरतर शस्त्रें;
नरा ! स्वकीयां यमसम ठरसी,
वनपशुहि बरा गमतो मजसी ! ९

पार नष्टली ती प्रेमलता !
कैंची शांती ? वा कोमलता ?
कठिण ह्मणूं द्या लोकां पविला,
नरहृदयें परि तो कांपविला ! १०

— बाळकृष्ण अनंत भिडे बी. ए.

माझा तान्हुला.

श्लोक.

(वसंत तिलकावृत्त.)

वर्णा खुशाल तुह्मि कांचन--मौक्तिकांते,
तत्संग्रहें सुख असेल, असो तुह्मां तें;
सोन्यासमान मम बालक केश--रौजी--
आहे परंतु किति ठेव अमोल माझी ! १

नक्षत्र--चंद्र--युत त्या नभ--वैभवाचे,
गा स्तोत्र--पाठ अथवा तैरणी--कराचें;
त्यांहूनि उज्ज्वल किती तरि बालकाचे--
ते नील लोचन गमे मजलागिं साचे ! २

अस्पष्ट, चारुतर बालक--भाषणाची,
त्याच्या सुधा--मधुर हास्य--युत--स्वैनाची;
ये लेशही न सर देव--सखि--स्वनाते,
वर्णा खुशाल तुह्मि तन्मधु--गायनाते ! ३

वर्णा गुलाब--सुमना नव--पंकजाते,
त्यांची वदा सतत मार्दव--कांति--गीतें; !
त्यांहून रम्यतर बालक--वक्त्र--खास !
या भूवरी गमतसे जनकांतरास ! ४

------------ दत्तात्रय भिमाजी रणदिवे.

---

१ सोने आणि मोती. २ पंक्ती ३ सूर्य किरण ४ भाषणाची.

विरहिणी.

पद.

(चाल:– कधिं करितिल लग्न माझें०)

तळहातीं गाल ठेवी
भ्रांतमनें[1] बैसली ! ॥ धृ. ॥

एकली सती अंगणीं
उठतसे क्षणीं,
घाबरी झणीं
स्वेदें[2] ये भाली ! १

चंद्रमासवें रोहिणी
गगनिं पाहुनी
खिन्न कामिनी–
अश्रुनीं न्हाली ! २

मस्तकीं केश मोकळे,
ओंठ वाळले,
कांति मावळे,
दग्ध तनु झाली ! ३

निःश्वासां बहु सोडिते !
हृदय कांपतें,
हात जोडिते–
" धांवें वनमाळी ! " ४

———— दत्ताराम रामचंद्र पिंगे.

१ भ्रमिष्टमनानें २ घाम.

काव्यरत्नावलि.

अंक १० वा.

महाराष्ट्र सौंदर्यलहरी.

अथवा

श्रीमच्छंकराचार्यकृत सौंदर्यलहरीचें मराठी पद्यात्मक भाषांतर.

प्रस्तावना.

ते कुंडलिनी जगदंबा, जे चैतन्यचक्रवर्तीची शोभा,
जया विश्वबीजाचिया कोंभा, सावली केली.

ज्ञानेश्वरी, अध्याय ६ वा.

अन्य धर्मांतल्यापेक्षां आर्यधर्मांत एक विशेष गोष्ट आहे; ती ही कीं त्यांत अधिकारपरत्वें परमेश्वरप्राप्तीचीं साधनें सांगितलीं आहेत. 'अहं ब्रह्मास्मि,' 'तत्त्वमसि' इत्यादि महावाक्यांच्या गहन विचारांत लीन झालेल्या तत्त्ववेत्यापासून तों थेट सटवाईची श्रद्धापूर्वक उपासना करणाऱ्या अडाणी माणसापर्यंत सर्वांच्या परमार्थाची सोय या धर्मानें योग्य रीतीनें लाविली आहे. या परम प्राचीन धर्मामध्यें परमेश्वराचें स्वरूप दोन प्रकारचें मानलें आहे; एक सगुण व दुसरें निर्गुण. पहिल्याच्या भक्तीला सगुणोपासना व दुसऱ्याच्या निर्गुणोपासना असें नांव आहे. सगुण स्वरूप पुंस्त्वानें किंवा स्त्रीत्वानें निर्दिष्ट असतें. निर्गुणाला प्राय: ब्रह्म ही संज्ञा आहे. निर्गुण स्वरूप ज्ञानवान् पुरुषासच गम्य असतें. ज्ञानी पुरुष जगांत विरळ असतात. यामुळें निर्गुणोपासना करणारेहि समाजांत थोडेच सापडावयाचे. बहुजनसमाजाला सगुणोपासनाच सुकर

आहे; व तो तीच करीत असतो. संस्कृतांत सगुणोपासनापरही अनेक ग्रंथ आहेत. त्यांस आगम किंवा मंत्रशास्त्रें ह्मणतात. या आगमांचे वैष्णव शैव व शाक्त असे तीन प्रकार आहेत.

वैष्णव आगमाचा भक्तीवर मोठा कटाक्ष आहे. मूर्तिपूजाविधि, देवतायतनांचे रचनाप्रकार, तुलसी वगैरेंचें पूजन इत्यादि विषय या आगमांत सांगितले आहेत. भजक हा देवाचा अंश आहे; अतएव तोही देववत् पूज्य होय असें मत या पंथांत प्रचलित आहे. अद्वैतसिद्धि किंवा योग या आगमांत नाहीं. हा वैष्णव संप्रदाय फार प्राचीन आहे. यावर बहुत ग्रंथ असून त्यांवर शेंकडों भाष्यें आहेत.

शैव आगमांत व्रतें, उपवास, देवतोत्सव, मंदिरस्थापना इत्यादि विषय आहेत. या संप्रदायांत भक्तपूजा नाहीं. धर्मगुरुपूजा मात्र आहे. तत्त्वज्ञानाचें उदात्त विचार शैवागमांत जागजागीं दिसून येतात. जीवात्मा व परमात्मा यांचें ऐक्य त्यास मान्य आहे; आणि असें ऐक्य सिद्ध करून देणाऱ्या योगशास्त्राचाही त्यांत विचार केला आहे या योगाच्या अनुषंगानें शक्तीचें माहात्म्यहि या आगमांत वर्णिलें आहे. उपनिषदुक्त अद्वैततत्त्वें यांत प्रतिबिंबित झालीं आहेत. पंच महाभूतें, पंच तन्मात्रें, पंच ज्ञानेंद्रियें, पंच कर्मेंद्रियें, मन, माया, महेश, शुद्धविद्या आणि सदाशिव हीं पंचवीस तत्त्वें या संप्रदायाला व समयागमाला संमत आहेत.

तिसरा शाक्त आगम यांत शक्तीची उपासना सांगितली आहे. ही, चिच्छक्ति किंवा जिला शुद्धविद्या असें नांव आहे, तिचें स्थूल स्वरूप होय. आगमविहित आचार व मंत्रजप यांच्या साधनानें शक्तीची उपासना करून मोक्ष संपादन करणें हा या आगमाचा अंतिम हेतु आहे. शक्तिसिद्धीच्या ऐहिक व पारमार्थिक फलोद्देशावरून शाक्त आगमाचे तीन भेद कल्पिले आहेत. ते कौल मिश्र व समया हे होत.

कौलागमांत चतुर्विध पुरुषार्थांपैकीं फक्त अर्थ आणि काम यांचीच उपासना सांगितली आहे. यांत शक्तीची उपासना आहे. परंतु पुढें सांगितलेल्या मूलाधार चक्रापलीकडे कौलमार्गी शक्तीला नेत नाहींत. जन्ममरणाच्या फेऱ्यांतून ते सुटत नाहींत. कामवासना तृप्त करण्याकरितां या पंथांतील कित्येक लोक वामाचारप्रवृत्त होऊन क्षणभंगुर सुखांना कायमचे बळी पडतात!

मिश्रागमामध्यें कर्म व उपासना यांचें मिश्रण आहे. शक्ति अथवा कुंडलिनी हिचा उल्लेख प्रथम याच आगमांत आढळतो. हिच्या उपासनेचा विधि यांत सांगितला आहे. मिश्रागमाचे अनुयायी कर्में यथाविधि आचरतात. सूर्य, वायु इत्यादि रूपानेंहि ते शक्त्युपासना करितात. सुवर्णादिकांच्या यंत्रांच्या साधनानें ते उपासनायोगही करितात. समयागमांत सांगितलेल्या अनाहत चक्रापर्यंत या संप्रदायांतील कित्येक उपासक शक्तीला नेऊन पोंचवितात.

शाक्त पंथांतील अतिशय महत्त्वाची शाखा समया ही होय. सनक, सनातन, सनत्कुमार, वसिष्ठ आणि शुक यांनीं समयागम लिहिले आहेत. या आगमांत शक्ति ही प्रधान देवता मानिली आहे. हिलाच कुंडलिनी अशी संज्ञा आहे. मनुष्याच्या शरीरांत गुदद्वारापासून वरतीं मस्तकापर्यंत क्रमाक्रमानें एकावर एक अशीं सहा चक्रें आहेत. तीं अशीं:– मूलाधार, स्वाधिष्ठान, मणिपुर, अनाहत, विशुद्धि आणि आज्ञा. यांचे अनुक्रमें भुवर्लोक, सुवर्लोक, महर्लोक, जनोलोक, तपोलोक आणि सत्यलोक असे लोक आहेत. वरील पहिल्या दोन चक्रांचा गुण तम व देवता अग्नि आहे; दुसऱ्या दोन चक्रांचा गुण रज व देवता सूर्य आहे; व तिसऱ्या दोहोंचा गुण सत्व आणि देवता चंद्र आहे. या चक्रांच्या वरच्या बाजूला सहस्रार किंवा श्रीचक्र या नांवाचें सहस्रदलात्मक कमल आहे. त्यांत चंद्रालोक नांवाचें दिव्य स्थान आहे. तेथें सत् आणि चित् एकरूपानें

वास करितात. वरती जी कुंडलिनी नामक शक्ति सांगितली ती या जोडप्यांतील चिच्छक्तीचें स्थूल स्वरूप आहे. परमात्मा हिच्या शिवाय प्रपंच उत्पन्न करूं शकत नाहीं किंबहुना हिच्या शिवाय त्याला नुसतें चैतन्य देखील नाहीं अशी स्थिति आहे; (प्रस्तुत भाषांतराचा पहिला श्लोक पहा.) प्राणायामादि योग साधनांनीं व पंचदशीत्यादि मंत्रसामर्थ्यानें कुंडलिनीला पूर्वोक्त मूलाधार चक्रांतून उठवून वरतीं चंद्रालोकांत नेऊन तेथें सच्चिदात्मक स्वरूपांत लीन करणें हा समयायोगाचा मुख्य विषय आहे. कुंडलिनीचा ब्रह्ममध्यें लय करणें हेंच मोक्ष साधन आहे असें या आगमांत प्रतिपादिलें आहे. हा योग साधला कीं मुमुक्षु जीवन्मुक्त झाला. मग त्याला संसाराचें भान राहात नाहीं. तो नित्य, शुद्धसत्त्व व आनंदरूप होतो. हा योग करीत असतां मध्येंच उपासक मरण पावला तर त्याचा सिद्ध झालेला योग वायां जात नाहीं. जन्मांतराचे ठायीं तो योगी अवशिष्ट मार्ग क्रमून परमानंदस्वरूपाप्रत पावतो.*

हाच योग श्रीकृष्णानें अर्जुनास सांगितला. श्रीमद्भगवद्गीतेंत हा विषय साहाव्या अध्यायांत भगवंतानीं 'शुचौ देशे प्रतिष्ठाप्य' इत्यादि श्लोकांनीं संक्षेपतः निरूपिला आहे. याचें रहस्य श्रीज्ञानेश्वर महाराजांनीं ज्ञानेश्वरीमध्यें उत्कृष्ट रीतीनें विशद केलें आहे. ज्ञानेश्वरांचें हें अप्रतिम भाष्य ह्मणजे मराठींतील एक स्वतंत्र योगशास्त्रच आहे यांत संशय नाहीं. यांत कुंडलिनीचें माहात्म्य वर्णिलें असून मूलाधारापासून जीवब्रह्मैक्यसिद्धीपर्यंत तिचा उपासनायोग सांगितला आहे.

श्रीमच्छंकराचार्य यांनीं संस्कृतांत सौंदर्यलहरी नांवाचें शिखरिणीवृत्तात्मक, फार प्रसन्न, प्रौढ व रमणीय असें एक स्तोत्र रचिलें आहे. यांत शक्तीचेंच वर्णन आहे. आचार्य महायोगी होते. त्यांनीं स्वानुभवानें

---

* चालतां पाऊल जेथ पडे, तेथ अपवर्गाची खाणी उघडे.
आव्हांटलिया तरी जोडे, स्वर्गसुख. ज्ञानेश्वरी. अ. ६ वा.

हें काव्य रचिलें आहे. वरतीं जो समयागम सांगितला त्यांतील कुंडलिनी हीच या स्तोत्राचा उपास्य विषय आहे. या स्तोत्रांत एकंदर पद्यें १०३ आहेत. पहिल्या चाळीसएक श्लोकांत शक्तीचे बहुतेक समयागमोक्त पद्धतीनें वर्णन आहे. पुढील श्लोकांत भगवतीचें मुकुटापासून तों चरण-कमलापर्यंत प्रायः काव्यपद्धतीनें स्तवन आहे. पहिल्या चाळीस श्लोकांना 'आनंदलहरी' असेंही कोणी ह्मणतात व बाकीच्या स्तोत्राला सौंदर्यलहरी असें नांव देतात. परंतु या सगळ्या स्तोत्राला प्रायः सौंदर्यलहरी हेंच नांव प्रचलित आहे. प्राकृत जनांत हें सुंदरलहरी या नांवानें प्रसिद्ध आहे. हें काव्य विद्वन्मान्य असून यावर अनेक पंडितांच्या टीका आहेत. सौंदर्यलहरीचा श्रद्धापूर्वक पाठ करणारे उपासक अद्यापिहि कोठें कोठें आढळतात. असें धर्माच्या व काव्याच्या दृष्टीनें या स्तोत्राला मोठें महत्त्व प्राप्त झालें आहे.

या सौंदर्यलहरीस्तोत्राचें मराठी पद्यात्मक भाषान्तर आह्मी चारपांच वर्षांपूर्वी केलें. तें विस्तृत टिप्पणी व मूलग्रंथ यांसह छापून प्रसिद्ध करण्याचा योग आला नाहीं. सध्यां नुसतें भाषान्तर प्रकाशित करण्याची योजना झाली आहे. हें, माझे मित्र रा. रा. नारायण नरसिंह फडनीस, यांच्या लोभाचें फल आहे. सदर गृहस्थांनीं 'काव्यरत्नावली' च्या द्वारें आधुनिक मराठीं काव्यें निरपेक्षपणें प्रकाशित करण्याचें अखंड व्रत आज जवळ जवळ दोन तपें चालविलें आहे ही गोष्ट महाराष्ट्र काव्य भक्तांस ठाऊक आहे. मूळकाव्यांत अनेक स्थलीं मंत्र व योग या शास्त्रांतील प्रमेयें व संदर्भ आले आहेत. ते टीकाग्रंथावरूनही लवकर समजत नाहींत. भाषांतरांतहि अर्थात् तीं स्थळें बरींच दुर्बोध राहिलीं आहेत. अशीं पद्यें प्रस्तुत भाषांतरांत दिलीं नाहींत. प्रत्येक पद्याचा विषय स्वतंत्र असल्या कारणानें असल्या संक्षेपानें भाषांतर समजण्यास अडचण पडणार नाहीं. मूळांतील एका पद्याचीं भाषांतरांत क्वचित् दोन पद्यें झालीं

आहेत. भाषांतराचें वृत्त शिखरिणीच योजिलें आहे. काव्यरत्नावलीचे वाचक प्रबुद्ध व काव्यमर्मज्ञ असल्यामुळें प्रस्तुत भाषान्तरावर विस्तृत टिपा देण्याच्या भानगडींत आह्मी पडलों नाहीं. सौंदर्यलहरीवरील अनेक टीकाग्रंथांवरून समयागमाची जी माहिती उपलब्ध झाली ती वर दिली आहे. ती मात्र वाचकांनीं प्रथम अवश्य वाचावी ह्मणजे काव्यविषयाचें स्वरूप त्यांच्या ध्यानांत येऊन त्यांस भाषान्तर समजण्यास फारशी अडचण पडणार नाहीं.

महाराष्ट्रकविमुकुटमणि व सन्मणिमालेंतील मेरु ज्ञानेश्वर महाराज यांनीं गीतेंतील अभ्यासयोगनामक सहाव्या अध्यायावर मराठी योगभाष्य रचिलें. त्याच्या आरंभीं प्रस्तावनेंत ते ह्मणतात:—

माझा मऱ्हाटाचि बोल कौतुकें, परी अमृतातेंही पैजां जिंके,
ऐसीं अक्षरें रसिकें, मेळवीन.

हे उद्गार ज्ञानेश्वरांचे ज्ञानेश्वरांसच साजतात. कारण त्यांचा अधिकार, अनुभव व प्रतिभा हीं लोकविलक्षण होतीं.

गीर्वाणवाग्वधूचा विलास, कविराजराजितिलक कालिदास यानें आपल्या रसिक वंद्य रघुवंशकाव्याच्या आरंभीं अत्यंत शालीनतापूर्वक असे उद्गार काढिले आहेत:—

'मन्दः* कवियशःप्रार्थी गमिष्याम्युपहास्यताम्.'

ज्ञानेश्वर व कालिदास यांना विलक्षण आत्मप्रत्यय होता, आणि ह्मणूनच वरच्यासारखे उद्गार त्यांनीं आपल्या वाचकवर्गाजवळ काढिले आहेत. आह्मांला अधिकार, अनुभव व प्रतिभा यांचा गंधही नाहीं. यामुळें आमच्या जवळ आत्मप्रत्यय कोठून असणार तेव्हां आमच्या

* मी मन्दमति असून महाकवीच्या कीर्तीची हाव धरीत आहे यामळें माझा उपहास मात्र होईल.

वाचकानां प्रस्तुत भाषान्तरासंबंधानें आह्मीं काय सांगावें हें आह्मांला कांहीं सुचत नाहीं. तथापि एक गोष्ट सांगावीशी वाटते तीं ही कीं वाणीच्या रूपानें भगवत्सेवा यथाशक्ति करावी असें मनांत आणून प्रस्तुत प्रयत्न केला आहे; व तो भगवच्चरणारविंदीं अर्पण केला आहे. ही गोष्ट मनांत आणून ही अत्यल्प सेवा सहृदयानीं मान्य करावी अशी त्यांस विनंति आहे. समग्र भाषान्तर कोणीं मूळासह छापण्याचें पतकरल्यास त्यास आह्मीं तें मोठ्या संतोषानें देऊं.

लक्ष्मण शास्त्री लेले.

महाराष्ट्र सौंदर्यलहरी.

(शिखरिणी वृत्त.)

प्रपंचा निर्माया क्षमे शिव तुझा संग घडतां,
नसे त्या देवांही स्फुरणबल तूं दूरि असतां;
जगद्वंद्ये माते ! तुज हरिहरादीहि भजती,
तुला वंदूं किंवा स्तवुं असुकृती केविं शकती ! १

तुझ्या पादाब्जाचें अतिलघु असें जें रज असे,
तयानें ब्रह्माण्ड स्थिरचर विधाता रचितसे;
धरी शौरी कैसा तरि दशशतीं त्या निजशिरीं,
तयातें मर्दोनी हर निजतनू भूषित करी २

---

१ समर्थ. २ देदीप्यमान शिवालाही. ३ अपुण्यवान. शक्तीचा संग झाल्याशिवाय शिवाला प्रपंच निर्माण करितां येत नाहीं किंवा तिच्याशिवाय त्याला चैतन्य देखील नाहीं. असा शक्तीचा मोठेपणा. ४ रचितसे याचा कर्ता विधाता व कर्म स्थिरचर ब्रम्हांड. ५. विष्णु. ६ सहस्त्र शीर्षांनीं.

अविद्यामूढांचें तम[1] हैचि तुझी सत्वर हरी,
जडालागीं होशी परमसुखदा चिद्रसझरी;
दरिद्रांना चिंतामणिघटित माळाचि भुवनीं,
वराहाची दंष्ट्रा भवजलधिमग्नासि, जननि ! ३

करांनीं भक्तांतें अभय वर तेवीं वितरिती
असे सारे माते ! तुजहुनि दुजे देव दिसती;
भया वारोनी दे जगतिवरि वांच्छाधिक फला
अशी शक्ती एक्या जननि ! तुझिया पादकमला ४

तुला आराधोनी नवयुवतिरूपा[6] हरि धरी.
तया वेषातें तो स्मररिपुसही मोहित करी;
अनंगाही लाधे, तुज नमुनियां, मूर्ति रमणी[7]
तिनें तो योग्यांही भुलवि नतसौभाग्यजननि ! ५

फुलांचें कोदंडें, भ्रमरमय मौर्वी,[10] शरतसे
सरोजादी पंच प्रथित[11], मधु[12] सामन्त विलसे;
रणीं बैसायाला रथहि मलयोद्भूत पवन,
तव प्रेमापांगें क्षत करि परी काम[13] भुवन ६

---

१ मोह. २ शुद्ध स्वरूप. ३ चैतन्य रूप रसाची नदी. ४ चिंतित वस्तू देणारी रत्नें. शेवटीं वाराह अवताराचा उल्लेख आहे. ५ इच्छिल्यापेक्षां अधिक या पद्यांत भगवतीचें इतर देवतांपेक्षां व्यतिरेकानें औदार्याधिक्य वर्णिलें आहे ६ मोहनी स्वरूपाला. ७ सुंदर 'तुज नमुनिया अनंगाही रमणी मूर्ति लाधे' असा अन्वय. ८ शरणागताचें मंगल करणारे. ९ धनुष्य. १० दोरी. ११ प्रसिद्ध. १२ वसंत—सामंत. मांडलिक. १३ काम— 'तव प्रेमांगें भुवन क्षत करी' असा अन्वय.

करी कांची मंजु ध्वनि, कुचहि होती कलशसे,
कटी सूक्ष्मा भारी, मुख विमल पूर्णेन्दु विलसे;
धनुर्बाणां पाशांकुश करिं धरी दिव्य सुखदा
अशी शैवी शक्ती रुचिर विलसो सम्मुख सदा ७

सुधाब्धीच्या मध्यें मणिघटित सद्वीप विलसे,
जयाच्या भोंतालीं घन सुरतरूंचें वन असे;
तयामाजी चिंतामणिरचित तें मंदिर दिसे
सुरम्या नीपांचें उपवन तिथें उज्ज्वल असे.
तिथें शैवीं[3] मंचीं परमशिवतल्पीं पहुडशी
मनोज्ञे ! मांगल्ये ! जननि ! बहुहर्षे विहरशी
अशा त्वद्रूपातें अनुभवि, चिदानंदलहरी !
सदा स्वान्तीं ऐसा नर परम धन्य क्षितिवरी ८

मही मूलाधारीं, मणिपुरिं असे तोय अमल,
वसे स्वाधिष्ठानीं अनल, हृदयामाजि अनिल;
अशा चक्रांच्याही उपरि विलसे चक्र गगन
भ्रुकूटींच्या मध्यें मन ह्मणति त्या तंत्रनिपुण
अशीं षट्चक्रें हीं सकलहि शरीरांत असती,
तयांमध्यें मति ! तव अनुचरी वास करिती;

---

१ कमरपट्टा. धनुष्य, बाण, पाश आणि अंकुश अशीं कल्याणप्रद आयुधें भगवतीच्या चार हस्तांत आहेत असें येथें वर्णन आहे. २ कळंबाचीं झाडें. ३ शिवरूप परम शिवतल्प– अत्यंत मंगलदायक शय्या. या श्लोकांत कुंडलिनीचा चंद्रालोक प्रदेशांत सच्चिदात्म स्वरूपाशीं लय वर्णिला आहे. ४ यांत मूलाधारादि चक्रें सांगितलीं आहेत. व प्रत्येक चक्रांत पंचमहा तत्त्वांपैकीं कोणतें प्राधान्यानें असतें याचा निर्देश केला आहे, व एकाचा दुसऱ्यांत क्रमानें लयही ध्वनित केला आहे. पद्म सहस्रार, श्रीचक्र पति सदाशिव यांत शक्तीचें शिवाशीं सारूप्य वर्णिलें आहे.

तयां उल्लंघोनी, दशशत दलें ज्यास असती
अशा पद्मीं क्रीडा करिशि पतिसंगें भगवति ! ९

निघे[1] त्वत्पादाब्जामधुनि नव पीयूषलहरी
तिनें योगीयाची तनु करिशि आर्द्रा वरिवरी
पुन्हां चंद्रानाडी[2]मधुनि निजगेहा परतसी
तनू सर्पाकारा करुनि कुल[3]कुंडीं विरमसी १०

तुझ्या सौंदर्याची जननि तुलना केविं करिजे ?
कवींद्राही वाटे अति कठिन तें कार्य गिरिजे.
तयातें पाहोनी त्रिदश[4]रमणी उत्सुकमती
अलभ्या सायुज्या तव पति[5]चिया चित्तिं वरिती ११

बहु झालेला जो जरठ, दिसतो फार विड्ळ
अडाणी शृंगारीं, चतुरवचनींही अकुशल;
कृपापांगें त्याला जरि निरखिशी तूं भगवति !
भुलोनी तद्रूपा युवति गळिं त्याच्याचि पडती !
जई त्या त्यामागें मदनवश होऊनि पळती—
स्तनद्वंद्वांहूनी पदर वरचे खालिं सरती;
शिरींच्या वेण्याही सुटति वसनेंही शिथिलती
बळें कांचीदामें तुटति तरि त्यांना न कळती ! १२

---

१ योग्याची पहिली तनु कृश व जीर्ण होते व त्याला अमृताचा लाभ होऊन नवी तनु व कांति प्राप्त होते या गोष्टीस अनुलक्षून येथें वर्णन आहे या विषयाचा विस्तार ज्ञानेश्वरींत सहाव्या अध्यायांत पहा. २ एक महत्त्वाची नाडी ३ कुल नांवाचें कुंड, मूलाधार हें चक्र. येथेंच कुंडलिनी नेहमी विराम पावते. कौलपंथांतील लोक कुलस्थित शक्तीचे उपासक होत. ४ देवांगना. ५ सदाशिव पतीच्या.

शरच्चन्द्रस्वच्छा[१], रुचिर मुकुटीं इंदु विलसे,
करीं माला, पोथी, वर, सभयरक्षा[२] दिसतसे;
अशा त्वन्मूर्तीला सकृतहि[३] सुभावें प्रणमती
मधुक्षीरद्राक्षामधु[४] कविगिरा त्यांस फुटती ! १३

कवींद्राच्या अंत:करणनलिना बालतपन[५]
असें ध्याती कोणी भजक तव, गे ! रूप अरुण;
प्रसन्ना वाग्देवी तदुपरि[६] कृपापांग विखुरी
रसज्ञस्वान्तातें[७] रमविति वचांनीं सुमधुरीं १४

वशिन्यादी होती तव अनुचरी त्यांसह तुला
सदा ध्यातो, अंबे ! हृदयकमलीं जो नर भला
महाकाव्यें रम्यें अतिसुरसशब्दार्थभरितें
रचायाची शक्ती निरुपम तयालागि मिळते. १५

झरी पीयूषाची, हिमकरशिलामूर्ति दुसरी
अशा तूतें ध्यातो भुवनिं जन जो शैलकुमरि[८] !
खगांच्या[९] स्वामीसा भुजंगबलदर्पासि[१०] हरितो
सुधाधारा दृष्टी फिरवुनिहि तप्तां निववितो १६

तडिद्वत् जी सूक्ष्मा अनलविधुसूर्यात्मक दिसे
कला षट्चक्रांच्या उपरितनभागीं तव असे

---

१ शरचंद्रस्वच्छा हें तृतीय चरणांतील मूर्ति या पदाचें विशेषण. २ भयार्तांचें रक्षण ३ एकवार. ४ मध, दुग्ध, द्राक्षें यांच्यापेक्षां मधुर, हें कविगिरा यांचे विशेषण. ५ बालसूर्य– पहिल्या दोन चरणांत अनाहत चक्रांत योग्याला विद्युल्लतेप्रमाणें गोचर होणाऱ्या शक्तीचें वर्णन केलें आहे ६ त्या योग्यावर. ७ रसिकांचें अंत:करण. रमविति याचा कर्ता ' तुझ्या कृपेला पात्र झालेले भजक ' एवढा घ्यावयाचा; याचें कर्म ' रसज्ञस्वांतातें ' होय. सुमधुरीं हें ' वचांनीं ' याचें विशेषण. ८ पार्वती. ९ खगस्वामी गरुड. १० सर्प पक्षी कुटिल, वक्र अर्थात् खल.

महापद्मारण्यीं[1] विमलहृदयें संत करिती
तयेच्या ध्यानातें, जननि ! परमाल्हाद वरिती १७

भवानि ! त्वां दृष्टी मजवरि करावी सकरुणा.
असें प्रार्थायाला मनुज जंव आरंभि वचना
' भवानि[2] त्वां ' ऐसें श्रवणिं पडतां तत्क्षणिं अहा !
तया देशी ब्रह्मादिकनुत भवानित्वचि पहा ! १८

हर[3], ब्रह्मा विष्णु त्रिगुणभव[4] ते अंजलिपुटा
रचोनी त्वत्पादीं नमविति सदा स्वीयमुकुटा;
ह्मणोनी जे कोणी भजति तव गे ! पादकमळें
तयांना त्यांचेंही सहज परिचर्या[5]फळ मिळे ! १९

विरिंची[6] पंचत्वा[7], हर विरतिला[8], काळ मरणा,
विनाशातें पावे धनपति[9], सुरश्रेष्ठ[10] निधना[11];
असें कल्पांतीं हें सकलचि लया पावत असे,
तुझ्या सौभाग्यानें तव पति लयातीत विलसे ! २०

वदें जें मी कांहीं जप समज तो विश्वजननि,
कृती हातांची जी तिस विहित[12] मुद्रा[13] मनिं गणीं;
गती[14] प्रादक्षिण्यक्रमण, हवनस्थानिं समजे
शिवे ! तें प्रेमानें सतत करितों मी अशन जें

१ सहस्रार अथवा श्रीचक्र. २ यांतील भवानित्व शद्वावरील कोटी उत्तम आहे. ३ ब्रम्हा, विष्णु आणि हर असा क्रम विवक्षित आहे. ४ सत्व रज तम यांनीं संपन्न ५ पूजा. ६ ब्रह्मदेव. ७ मरण. ८ मरण. ९ कुबेर. १० इंद्र. ११ मरण पावे या क्रियापदाकडे विरंच्यादि पदांचा अन्वय आहे. १२ शास्त्रोक्त. १३ चित्रें. १४ चालणें-प्रदक्षिणा मी जें प्रेमानें अशन करितों तें हवनस्थानीं समजे इत्यादि अन्वय.

पडें दंडा ऐसा श्रमुनि निजण्यासाठिं शयनीं
नमस्कारस्थानीं ग्रहण करिं त्या लोकजननि !
अशीं सारीं कृत्यें मनिं धरुनि आत्मार्पणसुधी
समर्पी मी तेणें सकलहि घडो पूजनविधि २१

जिच्या सामर्थ्यानें भयकर जरा मृत्यु पळती
सुधा तीही पीतां सुरवरहि दुःखांत पडती;
विष प्राशी तीव्र प्रिय तव तरी तापैंगरिमा
तया बाधीना ! हा तव जननि ! ताटंकमहिमा २२

हर, ब्रह्मा, विष्णू तव पदयुगीं ठेविति शिरें
किरीटांचे त्यांचे बहु चमकती उज्ज्वल हिरे;
शिवे ! येतां ऐशासमयिं सहसा त्वत्पति घरीं
तया सामोरी तूं निघसि अतिमोदें झडकरी
' अहो हे देवांचे मुकुट असती येथ पडले
तयांच्या संघर्षें शिणतिल भवत्पादकमलें;
ह्मणोनी सांभाळा ! हळु हळु चला; घाइ न करा. '
विनंती ऐसी त्वत्परिजन करी जोडुनि करा २३

धरा तूं, वारी तूं, अनल, अनिल, व्योम, मनही;
तुझीं रूपें ऐसीं, तुजविण नसे अन्य लवही;

---

१ दंडासारखा. २ ब्रह्मार्पणाविषयीं आहे अनुकूल मति ज्याची असा मी. " माझीं सर्व कर्मे त्वदर्पण होवो " असा श्लोकाचा भावार्थ. ३ तापाची तीव्रता हें हालाहल प्राशाचें वर्णन. ४ कर्णभूषण. भगवतीचें सौभाग्य शिवाचा ताप दूर करण्यास समर्थ झालें असा भाव. ५ तुझा पति सदाशिव. मागें प्रस्तावनेंत सांगितलेलें पंचविसावें तत्व ब्रम्हा विष्णु महेश हे तुझे सेवक आहेत हें ह्या पद्यांत स्पष्ट सांगितलें आहे. ६ तुझ्याशिवाय जगांत कांहींच नाहीं. तूंच सर्व व्यापक हा भाव.

अये ! विश्वाकारें परिणति घडावी म्हणुनियां,
चिदानंदाकारा धरिशि शिवपत्नी बनुनियां　२४
असे आंज्ञाचक्र भ्रुकुटिमधिं तेथें प्रथित तो
चिदंबेनें युक्त त्रिनयन परब्रह्म वसतो;
जयाच्या तेजानें तपनशशिकोटीहि दिपती
असें द्वंद्व क्षेमप्रद करि तया लागुनि नती　२५
अहो ! मूलाधारीं शिवनट महातांडव करी
नटीरूपें दावी भगवति तया लास्यकुसरी;
तिथें राहोनीयां सृजि जन, करीही तदवना,
तया अर्पी स्तुत्यंजलि नटनटीरूप मिथुना　२६
किरीटाची शोभा तव कवण वर्णील ? जननि !
तया माणिक्यांच्या स्थलि विलसती दिव्य तरणी;
तयाच्या कांतीनें रुचिर विधुचें खंड दिसतें
विलोकोनी भासे विमलतर देवेंद्रधनु तें　२७
जगन्माते अंबे ! बहल मृदुल स्निग्ध रुचिर
असा त्वत्केशांचा निचय हरु अज्ञानतिमिर;
सुगंधाच्या लोभें यदुपरि सदा कल्पसुमनें
जयाच्या साम्यातें धरिति नवनीलोत्पलवनें　२८
तुझ्या सीमंतांत प्रचुरतर सिंदूर भरला
नवा बालार्काचा किरणचि मनालागि गमला;

---

१ आज्ञाचक्रांतील योगस्थिति यांत वर्णिली आहे. २ कोट्यावधि चंद्र सूर्य ३ सूर्य ४ विपुल ५ तुळतुळीत ६ कलाप भार कृष्ण केशपाश ७ अज्ञान तिमिर हरा यामध्यें भासमान विरोध आहे ८ ज्या केशपाशावर. ९ ज्या केशपाशाच्या १० केश-वेश, भांग यांत भांगांतील सिंदूरावर बालसूर्याच्या किरणाची संभावना केली आहे व काळ्याभोर केशकलापकांतिसमूहानें त्यास पकडून बंदींत टाकलें की काय अशी कल्पना केली आहे. याच्या पुढील श्लोकांतील कल्पनाही अशीच सुंदर आहे.

सुकेशांचे कांतिव्रज भंवति त्याच्या बिलसती
तयांनीं तो बंदीकृत जणुं असें सुज्ञ वदती.
मुखाचें सौंदर्य क्षितिधरसुते दाटुनि तया
नसे कोठें मार्ग त्वरित निघण्याला ह्मणुनियां
असे भांगाचा हा नहर रचिला कीं भगवति
करो तो लीलेनें कुशलमय ही सर्व जगती २९

जयाच्यीं भोंतालीं कुटिलकचवृंद भ्रमरसें
सुगंधी ऐसें त्वद्वदन नलिनालागुनि हंसे,
तशी दंतांचीही धवल रुचि जी केसरचि ते
मदें वेडे होतीं स्मरमंथननेत्रभ्रमर ते ३०

किरीटाचे ठायीं विमल विधुचें खंड विलसे
तुझें देवी भालस्थल मज दुजें तें गमतसे;
जंई सांमुख्यानें दृढ उभंययोग स्फुट घडे
तंई तो पूर्णेंदू सुघटित जनीं दृष्टिस पडे ३१

तव भ्रूवल्ली या कुटिल मदनाचें धनु, तशी
गमे दृष्टी मौर्वी अतिरुचिर कृष्णभ्रमरसी;
दिसेना दोहींचा, हिमनगसुते! भाग मधला
अपर्णे! हस्ताग्रीं मुठित मदनें कीं धरियला ३२

शिवे! सैव्यें नेत्रें दिन रविमयें निर्मिसि जनीं
दुज्या चंद्रात्म्यानें, जननि! सृजिसी तेविं रजनी;

१ ज्या वदनाच्या. २ शिवाचे नेत्र हेच भ्रमर. ३ समोरासमोर. ४ किरीटविधु व भालस्थ विधु यांचा योग. ५ डावा. ६ सूर्यरूप. 'सव्यें रविमयें नेत्रें निर्मिसी असा अन्वय ७ चंद्ररूप नेत्रानें.

तसें निर्मी नेत्र[1] स्फुटें अरुण संध्येस तिसरें
सुवर्णाच्या पद्मापरि विलसतें जें[2] [3]रुचिभरें ३३

विशाला[4], [5]कल्याणी स्फुट[6]रुचि, अयोध्या सलिल[7]जीं,
कृपाधाराधारा[8], प्रथित मधुरा[9], भोग[10]वति जी;
[11]अवंती दृष्टी हे तव अवनि[12]सौभाग्यजयिनी
गुणांनीं स्वीयांनीं बहुनगरनामां धरि जनीं ३४

कवींद्रांचे स्तोत्रस्तबक[13]मधु ज्यामाजि भरलें
अशा कर्णद्वंद्वीं नयनम[14]धुपप्रेम जडलें;
असें पाहोनीयां नयन तिसरा भालगत तो
असूयेनें जाणो हिमनगसुते रक्त दिसतो ३५

हरीं शृंगारार्द्रा, इतरपुरुषीं कुत्सनपरा,
सरोषा गंगेशीं, शिवसुचारितीं विस्मिततरा,
[15]हरोहीनीं भीता, प्रियनिजसखींशीं सहसि[16]तीं,
दयार्द्रा त्वद्दृष्टि त्वरित पळवो दूरि दुरिता ३६

---

१ प्रसिद्ध– " तिसरें अरुण नेत्र संध्येस निर्मी " असा अन्वय. २ जें अरुण नेत्र. ३ कांतीच्या आधिक्यानें. ४ विशाला, कल्याणी, अयोध्या, धारा, मधुरा, भोगवती आणि अवंती या नांवाचीं नगरें प्राचीनकालीं प्रसिद्ध होतीं. येथें हीं पदें भगवतीच्या दृष्टीचीं विशेषणें मानून तिचें वर्णन केलें आहे. विशाला= विस्तृत ५ मंगलदायक. ६ व्यक्त कांति. ७ कमलांनीं जिंकण्याला अशक्य ८ कृपेला आधारभूत आहे प्रसार जीचा अशी. ९ सुंदर. १० उपभोगशालिनी. ११ रक्षण करणारी. १२ पृथ्वीचें सौभाग्य जिंकून टाकणारी आपल्या विशालत्वादि गुणानीं विशालादि नगरांचा एक समयावच्छेदानें गर्व हरण करणारी तू आहेस असा भाव १३ स्तुतिरूप कुसुमगुच्छां-तील रस. १४ नयन हेच भ्रमर भगवतीचे नयन आकर्ण दीर्घ होते हे यावरून ध्वनित झालें भगवतीला तिसरा नेत्र असून तो भालगत असतो व रक्तवर्ण असतो. या नेत्राच्या रक्तत्वावर या पद्याच्या उत्तरार्धांत मनोहर कल्पना केली आहे. १५ शिवा-च्या सर्पांनीं. १६ प्रफुल्लित शृंगारार्द्रा कुत्सनपरा इत्यादि पदें चतुर्थ चरणांतील दृष्टिपदाचीं विशेषणें होत.

अपर्णे ! जें तूझ्या अनवरत कर्णास भिडती,
जया पुंखा ऐसीं रुचिरतर पक्ष्में विलसती,
पुरारीचें अन्तःकरण बहु जे क्षुब्ध करिती
तुझे ऐसे नेत्र स्मरशरविलास प्रकटिती ! ३७

तुझ्या नेत्रां वर्ण स्फुट अरुण तेवीं सित असे
तृतीया नेत्राला असितपण ये कज्जलवशें,
ह्मणोनी सत्वादि प्रकृतिगुण जे तीन असती
जगत्स्रष्टे ते हे करिति बुध ऐसी अनुमिति ३८

नदी शोणों गंगों तपनतनया, यांपरि महा
धरीशी तीर्थांचा असुलभ असा संगम अहा !
जनाच्या पापौघा हरण करण्यासाठि जननि !
दयार्द्रा होवोनी अरुणधवलश्याम नयनीं ३९

अपर्णे ! कर्णाशीं तव नयन हे लग्न दिसती
ह्मणोनीयां नीरीं[9] भयचकित मत्स्यालि दडती;

---

१ जे नेत्र. २ पापण्या ३ उत्तम डोळ्यामध्यें पांढरा तांबडा काळा या रंगांचें मिश्रण असते भगवतीचे डोळे तसेच होते सत्वादि गुणांचे रंग हेच आहेत. भगवतीच्या कटाक्षापासून जगदुत्पत्ति आहे म्हणूनच वरील रंगांच्या मिषानें सत्वादि गुण जगत्स्रष्टे आहेत असे विद्वान् मानितात. ४ शोणभद्र नद हा तांबडा आहे. ५ भागीरथी ही श्वेतवर्ण आहे. ६ यमुना ही कृष्णवर्ण आहे भगवतीच्या नेत्राच्या ठिकाणीं अरुण, धवल, व श्याम हे वर्ण संमीलित झाले होते त्यावर कवी कल्पना करतो कीं हे जगज्जननि जनांचीं पापें हरण करण्याकरितां शोणादि नद्यांचा पृथ्वीवर कधीं दृष्टीस न पडणारा असा संगम तूं आपल्या नेत्रांच्या ठिकाणीं धारण करीत आहेस कीं काय असा भास होतो. ७ अरुण धवल श्यामनयनी तीर्थांचा असुलभ संगम धरिशी इत्यादि अन्वय. ८ कानाशीं लागतात चुगलखोर आहेत (आकर्ण आहेत असा ध्वन्यर्थ.) ९ पाण्यांत. १० मत्स्यसमूह डोळ्यांनीं आपल्या विरुद्ध कानाकडे तक्रार केली आहे अशा भीतीनें मासे पाण्यांत दडून राहतात असा अर्थ. डोळे व मासे यांच्यांतील स्पर्धेचें कारण उघड आहे.

उषःकालीं श्रीही त्यजि कुवलयों रात्रि परते,
पहा ऐसें लोकीं अतिशय खलाला मन भितें ! ४०

तुझ्या नेत्रोन्मेषें सकलजगदुत्पत्ति जननि !
तसें नाशा पावे सकलहि तुझ्या नेत्रमिलनीं;
असा हा सिद्धान्त प्रथित ह्मणुनी काय सदये !
निमेष त्यागीशी ! सृजुनि जगतां, शैलतनये ! ४१

विशाला त्वद्दृष्टि स्फुटनलिनतुल्यों विलसते
तिनें दूरस्थाही मज निरखि दीना गिरिसुते !
तयानें मी होई कुशल, न तुला हानि घडती
महालीं रानींही किरण विधुचे तुल्य पडती. ४२

तुझ्या बाळ्या दोन्ही विधुशकलशा वक्र दिसती
स्मराच्या शर्वाणी ! जन धनुकल्या त्या समजती;
अपांगांच्या योगें सशर गमती त्या भगवती
हराच्याही चित्ता उपजविति त्या शीघ्र विकृती ४३

वचें वाग्देवींचीं सरस अमृताहूनि असती
तयांतें ऐकोनी शिर तुकविशी जैं भगवती;
तईं होई मंजु स्वन मणिगणांचाँ श्रुतिंतल्या
गमे तें चित्ताला प्रतिवचन शद्वा परिशिल्यों ४४

---

१ लक्ष्मी. २ चंद्रविकासी कमल लक्ष्मीला आपल्या सौंदर्याचा मोठा गर्व पण ती देखील तुझे नेत्र कानाशीं लागलेले पाहून भ्याली व दिवसा इकडे तिकडे कोठें तरी कालक्रमणा करून रात्रीं कुवलयांत दडी मारूं लागली असा अर्थ कुवलय रात्रीं प्रफुल्लित असतें या कवीसंप्रदायाकडे येथें लक्ष्य आहे प्रतिस्पर्ध्यापासून पीडा न व्हावी ह्मणून दुबळा मनुष्य निर्भय स्थानीं लपतो तद्वत भगवतीच्या नेत्राला भिऊन मासे पाण्यांत व लक्ष्मी कुवलयांत दडली. ३ देव निर्निमिष असतात या प्रसिद्धीकडे येथें लक्ष्य आहे ४ उमललेलें. ५ कमल. ६ दूरस्थाही मज निरखी असा अन्वय. ७ कानांतील रत्नभूषणांचा. ८ उत्तर ९ सरस्वतीच्या कानावर आलेल्या शद्वांना.

फलें तींही पक्कें जरि धरिल ती विद्रुमलतां
तुझ्या रक्तोष्ठांशीं धरिल तरि किंचित् सदृशता;
न बिंबें[2] तत्स्पर्धा[3] करु शकति अत्यल्पहि अहा
फला लाली आली जनि अरुणरंगें तव पहा ! ४५

त्वदास्येन्दुज्योत्स्नात्मक रुचिर हास्या पिउनियां
चकोरांच्या चंचू बहुत जड झाल्या ह्मणुनियां
रुची येण्यासाठीं विधुकरचि कंजीकें[5] गणुनी
पिती स्वच्छंदानें विपुलतर ते कीं प्रतिदिनीं ! ४६

जंई वाणी[6] वीणेवरि शिवगुणां गाय बसुनी
तिची मोदें श्लाघा, जननि ! करिशी साधुवचैंनीं,
तुझा कर्णी तेव्हां स्वरमधुरिमा ती परिसुनी
स्ववीणेला दावी, मनिं विरमुनीयां, गवसणी[8] ! ४७

जिलों[9] हस्तें स्पर्शी गिरिजनक सप्रेमहृदयें
त्वरेनें चुंबाया अधर, करि शंभू वरि जेये,
मुंखादर्शाची जी स्मरहरकरग्राह्यहि मुंठी[11]
कशी गे वर्णावी तव अनुपमा ती हनुवटी ! ४८

---

१ पोंवळ्यांची वेल. २ तोंडलीं. ३ ओठांचा बरोबरी अनाहत चक्रस्थ भगवतीचें रूप अरुण आहे भगवतीच्या अरुण वर्णानें फलवर्गाला लाली आली आहे. ४ तुझ्या मुखचंद्राची जी कांती तद्रूप. ५ कांजी विधुकिरणापेक्षां तुझें हास्य अधिक मधुर आहे असा भाव अतिशय गोड पदार्थाची मिठी लवकर बसते ती बसू नये ह्मणून आंबट तिखट खारट असें व्यंजन पदार्थ तोंडीं लावण्याच्या परिपाठाकडे कवीची नजर आहे. ६ सरस्वती. ७ शाबास शाबास अशा शद्वांनीं. ८ आपली वीणा गुंडाळून ठेवते. ९ ज्या हनुवटीला. १० मुखरूप आरशाची शंकरानें हातात धरण्याला [illegible]. ११ आरशाची मूठ.

भुजांनीं आलिंगी पति ह्मणुनि रोमांचित, उमे,
तुझी ग्रीवा ऐशी सुखकमलनालासम गमे;
स्वभावानें स्वच्छा, मृगमदवशें होय मलिना,
तुझा मुक्ताहार प्रकटवि मृणालीविलसना ४९

गळां मांगल्याचें त्रिगुणयुत जें सूत्र धरिती
तया ऐशा रेखा तव जननि ! कंठीं विलसती
गती ज्या ग्रामांच्या विदित असती गायनविदीं
तयांच्या मर्यादा जणु असति या कल्पिति सुधी ५०

नखांच्या लालीनें नवकमलकांतीस हसती
अशा वानूं हस्तां वद तव कसें गे भगवति !
कदाचित् तत्साम्या, गिरिशदयिते ! अंबुज धरी
तया लागे लक्ष्मीचरणतललाक्षारस तरी ५१

पिती ज्यांतें स्कंदें द्विपवदनें तद्बंधुंहि सदा
असे, आई ; माझ्या हरुत तव वक्षोज विपदा;
तैयांतें पाहोनी गजमुख मनीं शंकुनि अति
स्वकुंभातें स्पर्शे ! हंसवि पितरांही सुतकृती ५२

---

१ नीलकमलांची शोभा मोत्यांच्या हारावर कंठानुलिप्त कस्तूरीची प्रभा पडल्यामुळें त्याला श्यामता आली असा भाव. २ जलरेखांवर संगीत प्रसिद्ध ग्रामांच्या मर्यादांची येथें संभावना केली आहे. ३ ज्या स्तनातें. ४ कार्तिकस्वामी. ५ गजानन. ६ स्कंदाचा भाऊ. असे तव वक्षोज (स्तन) विपदा हरुत इत्यादि अन्वय. ७ वक्षोजातें गजमुख तयांतें पाहोनी मनीं अति शंकुनि स्वकुंभातें स्पर्शे असा अन्वय. मातृस्तन पाहिले कीं त्याला आपल्या गंडस्थळाची आठवण होई आणि ते हे नव्हत ना ? अशा शंकेनें आपल्या गंडस्थलांना हात लावी गणपतीचा वेडेपणा पाहून उमामहेश्वरांना हांसें कोसळे.

गजाख्यों[1] दैत्याला तव पति वधी, मौक्तिकफळें
तयाच्या कुंभींची[2] मिळवि अति शौर्यें सुविमळें.
तयांचा जो हार स्फुट धवल हा कंठि वसतो
गमे तो त्वत्कीर्तिप्रसर तव रंगें अरुण तो. ५३

असे जन्माचार्चा कृश ! परि कुचांचा भर पडे !
तुझा त्याच्या खालीं जननि ! दुबळा मध्यै[3] चिरडे !
तयाचें व्हावें गे ! अवन मनि हा हेतु धरुनी
तया बांधी जाणों मदन रुचिरा तीन वैलिनी[4] ! ५४

हिमें नाशा पावे कमल, रजनीमाजि सुकते,
श्रियेचें[5] आवासस्थलचि[6] जनि तें होय नुसतें;
तुझ्या पादद्वंद्वा हिमगिरिहि सौख्यप्रद असे,
पडे रात्री[7] तेव्हां रुचि[8] अधिक त्याला चढतसे, ५५

तुझें लाक्षारंगें[9] अरुणतम अत्यंत रुचिर,
नमीं मी तें पादद्वय, भगवती ! जोडुनि कर
तयाच्या आघातास्तव[10] मदनशत्रूहि शिव तो
अशोकाची ईर्ष्या सतत हृदयामाजि धरितो ! ५६

जगन्माते ! गोत्रस्खलनें[11] पतिचें होय तुझिया
तई तूं वाग्बाणीं प्रहरिशि तयालागि सदया;

---

१ गज नांवाच्या २ गंडस्थळांतील. ३ कटिप्रदेश ४ वळ्या रोमावली. ५ लक्ष्मीचें. ६ राहण्याचें ठिकाण ७ रात्र होई ८ प्रकाश. ९ लाखेचा रस. १० ताडण अशोकाला तरुणींनी पादप्रहार केला म्हणजे त्याला बहर येतो अशी कवीची समजूत आहे. पार्वतीच्या चरणकमलांचा प्रहार अशोकाला मिळे म्हणून शिवाला त्याच्याविषयीं स्पर्धा होई. ११ नांव चुकणें पार्वतीला हाक मारायाला जाई तों भलतीचेंच नांव शिवाच्या मुखांत येई सदया तूं असा अन्वय.

'भली केली,' ऐसें, स्मरुनि मनीं तो रोषें पहिला,
वदे नूपूरांच्या मुखरणमिषें मन्मथ तिला ! ५७
किती त्वत्पादाब्जें शुभद सुकुमार ! क्षितितलीं
तयां कूर्मीपृष्ठोपरि ह्मणति हे गोष्टि न भली;
त्रिवाहीं पाषाणीं कठिनतमिं गंगाधर तयां
करीं स्थापी, हेंही अनुचितचि कीं होय सदयां ५८
स्वयें मंजीराच्याँ मधुरवमिषानें शिकविती
कसें चालावें हें, तव मृदुपदाब्जें भगवति !
तयांची सच्छिक्षा ग्रहण करण्यासाठिंच गमे
सदा राहे उत्कंठित सदनहंसावलि उमे ! ५९
दरिद्रां श्री देते, अभिलषितें सौंदर्यभरही,
दिसे नामी कल्पद्रुमकुसुमगुच्छापरिसही,
अशा त्वत्पादाब्जीं गिरिवरसुते ! ईश-रमणि !
रमो माझा जीवभ्रमर, गति त्या अन्य न जनीं ६०
कचीं कौटिल्यातें धरि, सरळता मंद हसितीं,
मृदुत्वातें गात्रीं, स्तनिं बहुत काठिन्य धरितीं,
अती सूक्ष्मामध्यें, जगदवनकार्यी सकरुणा,
अशी शैवी[12] शक्ती[13] निरुपम असे एक अरुणा ! ६१
शिवाच्या तूं अन्तःपुरिं वससि तत्पट्टमहिषी,
तुझी पादार्चाही चलमतिनरा होइल कशी ?

---

१ खाशी केली. २ शिवानें आपल्याला जाळल्याचा राग ३ ध्वनीच्या रूपानें. नूपुर=तोरड्या तो पहिला रोष मनीं स्मरूनी मन्मथ नूपूरांच्या मुखरणमिषें पार्वतीला भली केली ऐसें वदे असा अन्वय. ४ पादकमलांना. ५ कासवीच्या पाठीसारखें. ६ दयावंताला ७ नूपूरें. ८ गोड. ९ उत्तम शिकवण. १० पाळलेले हंस. ११ इष्ट. १२ शिवप्रिये १३ चिच्छक्ति.

तुझ्या द्वारोपांतीं विधिहरिमुखें[1] श्रेष्ठ वसती
तयांना आठीही परम तिथल्या सिद्धि[2] मिळती ६२
तुझ्या मंचा माचे विधिमुखें[3] उभे चार सुभट
तसा शंभु स्वच्छ स्फुट विलसतो प्रच्छदपट[4];
त्वदीया देहाची अतिअरुण कांती पसरते
शरीरी[5] शृंगार प्रकट जणुं होई, गिरिसुते! ६३
करंडा पाचूचा विधुसि मुखवासार्थ गणुनी
कलंका कस्तूरी समजुनि, तयामाजि भरुनी
कळा खोळा, त्यातें मनिं गणुनि कर्पूरशकलें
भरी त्या माझारीं विधि निजकरें तीं सुविमलें!
तयांतोनी घेसी प्रतिदिवसिं एकैक शकला
अमेपर्यंतें[6] तो हळुहळु रिता होय सगळा
पुन्हां पूर्वी ऐशीं धवल शकलें त्यांमधि भरी
असें ब्रह्मा माते! तव सतत सेवेस्तव करी. ६४
जिचा तेजोराशी सकलहि करी व्याप्त जगती
महासिद्धी जीची दिनरजनिं सेवाहि करिती
न नाशातें पावे ह्मणुनि जिस नित्याचि ह्मणती
अशा तूतें कोणी निजमनि अभेदेंचि भजती ६५
शिवाची संपत्ती अपरिमितही तुच्छ गमते
अशी शक्ती ज्ञानेंकरुनि सहजीं त्यांस मिळते;
महासंवर्ताग्नी[7] सकलभुवना जाळि सहसा
गमे त्या तो अर्चा[8]समयिं भजका कापुर जसा ६६

---

१ ब्रम्हा विष्णु वगैरे. २ अणिमा गरिमा वगैरे. ३ ब्रम्हदेव विष्णु रुद्र व ईश्वर असे चौघे ४ मायारूप अस्तरण. ५ मूर्तिमान. ६ अमावास्येपर्यंत या पद्यांतील कल्पना फार सुंदर आहे ७ प्रलय ८ पूजा.

असे ती वाग्देवी[1] द्रुहिणगृहिणी, विष्णुदयिता
रमा, भूतेशाची निगम[2]विहिता शैलदुहिता;
महामाये! तुर्ये[3]! परमफलदे[4]! तूं भ्रमविशी
जगत् सारें; आहे तुजसि पदवी ब्रह्ममहिषी ६७

तुझें कोणी प्रेमें भजक नर जो, पार्वति! करी
तयालागी वाणी[5] तसिच कमला सत्वरिं वरी;
रतीचेंही मोही मन अपुलिया सुंदरपणें
चिरंजीवी होतो जगतिं मग त्या कांहीं न उणें. ६८

प्रपंचींचे त्याचे सकलहि पहा पाश तुटती,
तशा मिथ्याज्ञानप्रभव[6] अखिल भ्रान्ति फिटती;
परब्रह्मानंदग्रहणिं मति त्याची उपरमे,
अशी त्वद्भक्ताची स्थिति दिसतसे शेवटिं उमे! ६९

शिवे, नित्यस्मेरे[7], निरवधिगुणे[8], नीतिनिपुणे,
निराबाधज्ञाने[9], नियमिपरचित्तैकसदने[10],
विधिस्तोमातीते[11], निखिलनिगमान्तस्तुतपदे[12],
निरातंके[13], नित्ये, परिस मम ही संस्तुतिपदें. ७०

प्रदीपज्योतींनीं दिनमणिसि नीरांजन[14] जसें
सुधांशू[15]लागोनी तदुपलजलीं पूजन जसें,
समुद्राची त्याच्या सलिलनिवहें तृप्तिहि जशी
तुझी त्वद्वाणीनें क्षितिधरसुते! ही स्तुति तशी. ७१

---

१ सरस्वती. २ वेद. ३ चौथी ४ मोक्ष ५ सरस्वती ६ अज्ञानापासून उत्पन्न झालेल्या. ७ सतत प्रसन्न आहे मुख जिचें. ८ अमर्यादगुणा. ९ अखंडज्ञाना. १० योगीजनांचा केवळ आश्रय. ११ शास्त्रविधींच्या मर्यादेपलिकडील. १२ सर्व उपनिषदांनी स्ताविले आहेत चरण जीचे. १३ दुःखरहिता आनंदस्वरूपा. श्लोकांत याच पदांचीं संबोधनें असून तीं भगवतीपर आहेत. १४ ओवाळणें. १५ चंद्र.

भीतीनें हें सकलहि जयां विश्व अत्यन्त कांपे,
तेजस्वी तो **दशमुख** करी राज्य तेथें प्रतापें. ६

तेथें सद्मे उभवुनि शिरें भेदिती मेघमाला,
रत्नच्छाया पसरुनि निशाकाळिं नाशी तमाला;
झाला जीची वितत परिखा सर्वतां अंबुराशी.
भीतिग्रस्तां नच तिजकडे पाहवे निर्जरांशीं. ७

तेथें मोठें उपवन असे, नाम त्याचें **अशोक**,
जेथें नाना तरु विलसती आम्र जंबू अशोक;
आनंदानें विचरति सुरश्रेष्ठ तेथें अशोक,
जें पाहोनी सुख बहु वरी लोक सारा सशोक. ८

मालाकार द्रुमकुलसमारोप–विज्ञान–शाली,
लावी नाना सुरतरुलता कौशलें आलवालीं;
जागोजागीं कुसुमनमिता शोभती रम्य हारी,
ऐकूं येई विहगरवही त्यांमधें चित्त--हारी. ९

कोठें कोठें कुरबळ तरू शोभती कोरकांनीं,
कोठें कोठें विकच दिसती रम्य मंदार रानीं;
खेळे कोठें अभिनवरजोरंजिता भृंगमाला,
भक्षी कोठें सरस--मधुरा हंसराजी मृणालां. १०

कारंजांचे उडुनि अभिता तापहारी तुषार,
कामज्वाला विकलित जनां सौख्य देती अपार;
जागोजागीं विलसति लता कुंज जे देति तोष,
प्रायां तेथें क्रमण करिती कामिसार्थ प्रदोष. ११

आलिंगोनी प्रिय तरुवरा गाढ शाखाकरांनीं,
कामार्तस्त्रीपरि नवलता दाविती भाव रानीं;

पुष्पांमध्यें मधुप करिती मंजु गुंजारवातें,
वाटे तेणें जणुं पतिसवें मांडिती त्या कथातें. १२

लंकानाथ प्रणयचतुरा घेउनी दिव्य योषा,
रत्युत्साहें मुदित दवडी कौमुदीवत्प्रदोषा;
सेवी त्याला विनत सुमनश्चाप तेथें सदैव,
होती दास त्वरित सुरही तुष्ट होतांच दैव. १३

युद्धामध्यें करुनि पुरती दुर्दशा निर्जरांची,
लंकानाथें सकळ हरिली संपदा सत्य त्यांची;
तेव्हां त्यानें सुरविपिनही आणिलें काय खालीं,
भूभागीं ही असुल सुषुमा नातरी केंवि आली ? १४

त्या आरामीं विकसति सदा दिव्य जे पारिजात,
ते सोडोनी भ्रमरतति न स्वल्पही दूर जात;
प्राशोनीयां मधु परभृता कूजती रक्तकंठी,
हंसश्रेणी जलदसमयीं काल तेथेंच कंठी. १५

पूर्णत्वानें तिमिरनिकर व्यापि दिग्भाग सारा,
सृष्टीचा हा नयनविषयातीत होई पसारा;
झाली एक प्रहर रजनी सुप्त सारे निवान्त,
शान्तीदेवी प्रभुसम जगीं राज्य भोगी नितान्त. १६

तेजोराशी विझवुनि बळें तारकादीप पूर्ण,
झांकोनीया सकल धरणी कृष्णवस्त्रांहिं तूर्ण;
दुष्कर्माची प्रथम जननी, नेसुनी कृष्ण शाल,
आनंदानें अदय रजनी नाच नाचे कराल. १७

संचाराया नृपपथिं सुखें तस्करां हाच काल,
प्राणाघातें अदय करिती सर्वतां भूमि लाल;

काव्यरत्नावलि.

अंक ११ वा.

जाँनकी–प्रमाथ.

इंद्रजित् रणांत पतन पावल्यावर रावण फारच हताश झाला; व त्यानें आपले बांधव अहिमहि यांस साहाय्यास बोलविलें. अहिमहि हे कपटकलाप्रवीण होते. एके रात्रीं भूमीमध्यें विवर कोरून त्या विवरामधून रामलक्ष्मणाचा मंचक घेऊन ते महिकावती नगरीस निघून गेले. प्रातःकालीं त्याच विवरद्वारें हनुमान् सुग्रीव वगैरे वानरवीर यांच्या शोधाकरितां तिकडेच चालते झाले. इकडे वानरासह राम लक्ष्मण रणांत पतन पावलें असें वर्तमान लंकेंत पसरलें, यामुळें जिकडे तिकडे विजयोत्सव चालू झाले. सायंकालीं ही बातमी त्रिजटेकडून--जानकीस समजली. तेव्हां तिनें अतिशय शोक केला. व सहगमन करण्याला तयार झाली. इतक्यांत कामानें अंध होऊन व मदिरा–प्राशन करून जानकीचें पातिव्रत्य भ्रष्ट करण्याकरितां रावण अशोक वनांत प्राप्त झाला. त्यानें प्रथम जानकीची बरीच विनवणी करून पाहिली. पण तिनें रागानें त्याचा धिःकार करितांच तो तिजवर बलात्कार करण्याला उद्युक्त झाला. इतक्यांत अहिमहीचा संहार करून राम लक्ष्मण सुवेलाचलास प्राप्त झाले. व त्यांनीं लंकेवर हल्ला केला. कपिवीर अशोक वनांत शिरून तेथेंही त्यांनीं आक्रान्त केला हें वर्तमान समजतांच रावण भिऊन जानकीला टाकून लंकेंत पळून गेला. हा प्रसंग पुढील कवितेंत वर्णिला आहे.

---

* या अंकांत जानकीचा शोक व तीचा सहगमनाची तयारी इतका भाग आलेला आहे. पुढील अंकांत राहिलेला सर्व भाग येऊन हें काव्य समाप्त होईल.

मंदाक्रान्तावृत्त.

जागोजागीं उठुनि लहरी पर्वताकार घोर
कल्लोळानें बधिर करुनी अष्ट दिङ्नाग थोर;
चंडाघातें अनुदिनिं जिचा भेदिती दीर्घ शाल
ऐशी **लंका** परम विलसे अब्धिमध्यें विशाल. १

पाहोनी जो अमरगणही होय साश्चर्य फार,
धैर्योत्साह प्रकट करितो वानरांचा अपार;
भेदी मध्यें जलनिधिस जो **राम**–सत्कीर्ति–केतु,
तेथोनी तो दिसत **मलया**रण्यपर्यन्त सेतु. २

" दंडायातें खल **दशमुखा** घेउनी सैन्यभार,
माझा स्वामी उदधि तरुनी केंवि जाईल पार "
चिन्ता ऐशी पडुनि हृदयीं नागराजां प्रभूत,
जाणों झाला जलनिधिवरी काय तो मार्गभूत. ३

" जामाताच्या अगणित बळें पूर्ण जेव्हां भरेल,
भाराक्रान्ता जलनिधिजळीं केंवि **लंका** तरेल;
कन्या माझी प्रियकर जळीं मग्न होईल हा ! ते "
चिन्तोनी यापरि धरि तिला श्याम भू काय हातें ! ४

गोविप्रांचा अविरत छळ क्रूरतेनें करोनी,
तैशा साऱ्या अमरवनिता सुंदरा भ्रष्टवोनी,
जें जें दुष्टाधम **दशमुखें** जोडिलें सर्वकाळ,
त्या पापाचा निचय न घनीभूत तो कां विशाल ? ५

संपत्तीचें भवन, वसुधासार–सर्वस्वभूत,
सौंदर्यानें अमरपुरितें लाजवी ती प्रभूत;

साध्वीरत्नां करिति कुमती भ्रष्टही याच कालीं,
जागोजागीं असुरपरिषत् वारुणी--सक्त झाली. १८

आरामस्था नयनसुभगा शोभली पर्णशाला,
तेथें नाना वनतरुलता लागुनी कुंज झाला;
चेतोहारी अभिमुख तिच्या एक शोभे अशोक,
त्याच्याखालीं बसुनि करिते **जानकी** तीव्र शोक. १९

श्रीरामाचा प्रियतम सुहृत्, बंधु जो **रावणाचा**,
चातुर्याचा अनुपम निधी सद्गुणाधार साचा;
त्याची कन्या बहुगुणवती प्राणभूता सतीतें,
आपत्कालीं मधुरवचनीं देतसे धीर तीतें २०

होई वल्ली तिमिरनिकरप्लुष्ट हेमन्त--कालीं,
सीतादेवी विरहसमयीं तत्समा सत्य झाली;
चिन्तायोगें झुरुनिझुरुनी होय ती शुष्क बाला,
झाली लुप्ता द्युति मुखगता प्राणही कंठिं आला. २१

दुःखावेगें अविरत सती गाळि बाष्पांबु--धारा,
झाला नेत्रें पुसुनिपुसुनी आर्द्र वस्त्रान्त सारा;
शोभे पूर्वी अधर सतिचा पक्वबिंबापरी, तो
शोकोद्रेकें अहह ! अधुना कृष्णता आदरीतो. २२

वीतच्छाया कृशतनुलता जाहली फार देवी,
प्रातःकालीं नभि शशिकला पांडुरा सत्य जेंवी;
श्रीरामाची अभिमत खरी मुद्रिका जी प्रभूता,
हा हा ! आतां धरि मणगटीं प्रत्यभिज्ञानभूता. २३

शोकावेगें प्रकट वदली " दुष्ट मी काय बाई !
सोडोनीयां मजशि अधम प्राण हा जात नाहीं !

एकाएकीं जरि मम शिरीं होय आघात घोर,
झालें नाहीं विकल लव मी निर्घृणा हाय थोर ! २४

दुर्वार्ता ही परिसुनि अशी दुष्ट रामाहि पूर्ण,
वज्राघातें अभिनव लता तेंवि होईल चूर्ण;
अव्यापन्ना सहन करि ही यातना मी विलोकीं,
नाहीं नाहीं कठिण हृदया मादृशी सत्य लोकीं. २५

सोसोनीयां विविध विपदा पाळि मातें सदाही,
माझ्यापेक्षां प्रियतम जगीं अन्य ज्याला न कांहीं !
या प्राणाचा अधिपति जगन्नाथ तो नष्ट झाला,
हा हा ! कैसा अधम मम हा देह नाहीं गळाला ! २६

होता माझा विरह, सजला प्राण टाकावयाला,
रानोरानीं भटकत फिरे शुद्ध वेडाच झाला !
सीता ! **सीता** ! ह्मणुनि कवळी वृक्षवल्लीशिला जो.
तत्प्रेमातें स्मरुनि कपटी प्राण हा कां न लाजो ? २७

हंसीसंगें मृदुल पुलिनीं मांडितां रम्य केली,
क्रीडेमध्यें जरि कधितरी अल्पही वेळ गेली;
होऊनी जो विकल हृदयीं येइ शोधावयाला,
हा हा ! माझें हृदय न फुटे तो जरी नष्ट झाला ! २८

चालोनीयां निबिड विपिनीं मी यदा फार भागें,
पाहे तेव्हां सदय नयनीं नाथ सोत्कंठ मागें;
होई मार्गश्रम सकळही शीघ्र तेव्हां निरस्त,
हा हा ! आतां वदनशशि तो पावला पूर्ण अस्त. २९

धैर्योत्साहें उदकिं रचिला सेतु मोठा प्रचंड,
युद्धामध्यें असुर वधिले प्राणनाथा ! उदंड;

माझ्यासाठीं समर करुनी पावलां हाय अन्त
हा हा ! केली प्रकट लघुता राहुनी मी जिवन्त ३०

घाल्यानें हें हृदय घडिलें सत्य माझें शिलांनीं,
किंवा त्यानें दृढ जखडुनी बांधिलें शृंखलांनीं;
किंवा कोणी तनुस शिविलें वज्रसारां गुणांहीं,
झालें नाहीं म्हणुनि शतधा भिन्न हें जाण बाई ! ३१

पूर्णत्वानें निरसति तृषाखेद जो पाहताच,
होई नित्य प्रणयसलिलें जीविताधार साच;
वेळोवेळीं निजकलरवें घालवी ताप दूर,
दुर्दैवें तो अवचित अहा ! आटला प्रेमपूर ! ३२

वर्षोनीयां अविरत--सुधासार दे जीवनातें,
ज्योत्स्नाधारा पसरुनि करी नित्य नेत्रोत्सवातें;
आलिंगोनी स्वकरिं शमवी या चकोरीस हाय !
दुर्दैवाभ्रें अहह ! हरिला चंद्र तो पूर्ण काय ! ३३

अर्धांगी ही करि तनुलता, प्रेम ठेवी प्रभूत,
झाला इतें चिरसमय जो जीविताधारभूत;
छायेखालीं अनुदिनिं वसे ज्याचिया ही सुखानें,
हा हा हा ! तो तरुवर जळे वक्रकालानलानें. ३४

आपद्दावानल पसरुनी देहवल्लीस जाळी,
वर्षोनीयां अविरतदयानीरधारा सुकाळीं;
संतापातें शमवुनि तिला जीववी पुष्टिदानें,
हा केला तो स्मृतिगत कसा मेघ झंझानिलानें ! ३५

माझ्यासंगे अहह ! विधवा ही जयश्रीहि झाली,
सच्छीलातें पुरि अवदशा आजपासून आली;

चारित्र्याचा अचल ढळला हा अकस्मात् खराच,
झाला आतां अहह विफलालोक हा लोक साच. ३६

युद्धामध्यें शिरुनि सहसा चापमात्रद्वितीय,
धैर्योत्साह प्रकट करि जो सर्वथा अद्वितीय;
वीरश्रीचा अभिनव खरा कान्त कामाभिराम,
हाहा ! झाला स्मृतिगत कसा सद्गुणाधार **राम** ! ३७

संघातानें उठति परिता वन्हि जेथें कराल,
हुंकारानें असुर भरिती आसमंतात् निराळ;
वीरश्रेष्ठां गिळुनि उडवी काल जेथें अनर्थ,
संचारावा रणशिरिं अशा एकला तो समर्थ. ३८

जेव्हां घोर प्रलय करि तो वीर्यशाली रणांत,
संत्रासानें असुर दडती पर्वतांच्या गुहांत;
जिंकी त्याला क्षितितळिं असा वीर कोणीहि नाहीं,
हा हा ! कैसा प्रियतम रणीं मारिला दुर्जनाहीं ! ३९

हा हा ! रानीं मृगपति कसा जिंकिला शूकरांनीं !
मडूकांनीं सुरगज बळें बांधिला केसरांनीं !
आवेशानें मशक जमुनी मेरु संचूर्ण केला,
खद्योतांनीं निज बिळसितें भानु तो झांकियेला ! ४०

दुर्वृत्तांनीं कपट करुनी येउनी रात्रिं गुप्त,
एकाएकीं समरपटु तो बद्ध केला प्रसुप्त;
जाती कैसे निकट खल हे नातरी पापराशी
स्पर्शे कैसा तृणनिचय तो दीप्त वैश्वानरांशीं ! ४१

सांगें सांगें प्रियसखि ! खरा काय वृत्तान्त झाला ?
हा हा हा ! तो मज़शिं अथवा बाइ आतां कशाला !

चित्तीं ज्या ज्या अमित धरिल्या आजपर्यन्त आशा,
दुर्दैवानें अहह ! सकला पावल्या त्या विनाशा ! ४२

"केव्हां आतां युगशतसमा काळरात्री सरेल !
केव्हां भास्वान् सुखकरकरीं सर्व पृथ्वी भरेल ?
चिन्तायोगें विकल नलिनी यापरी लोटि काल
हा हा ! ग्रासी असुर उदयोद्युक्त सूर्या कराल. ४३

हा हा ! झाले मम शिशुपणापासुनी वक्र दैव,
दुःखांमध्यें मज बहुपरी लोटितें तें सदैव;
जेथें तेथें खल रिपुपरीं लागलें पाठिं माझ्या,
भंगी आशा सकल धरिल्या बाइ चित्तीं सदा ज्या. ४४

सोडोनीयां स्वजन अवघे सेविलें काननातें,
चौदा वर्षें विजन विपिनीं भोगिलें आपदांतें;
आतां येथें मरणसम मी भोगितें यातना ही,
हा हा ! बाई मज शिशुपणापासुनी सौख्य नाहीं. ४५

केलें आहे निरतिशय मीं पूर्वजन्मीं महाघ,
त्यायोगानें सतत मज हा जाळि आपन्निदाघ;
गेला गेला ह्मणुनि हृदयांनद तो प्राणनाथ
हा हा ! झालें अवचित जगत्स्वामिनी मी अनाथ ! ४६

भो प्राणेशा ! सकल भुवनाधार ! भो आर्यपुत्र !
गेलां कां हो, त्यजुनि मजला एकलीला, अमुत्र ?
वाहे रात्रंदिन रघुवरा ! आपला प्रेमपूर
एकाएकीं त्यजुनि मजला केंवि गेलांत दूर ? ४७

जातां तूह्मी क्षणभरि मला सोडुनी दूर कोठें,
दुःखावेगें विकल हृदय भ्रान्त तें होय मोठें;

आतां कैसें मरणशरणा टाकुनी या जनातें
गेलां तूह्मी प्रियपति असें हाय एकान्तता ते. ४८

रानामध्यें फिरुनि जरि मी अल्पही होय खिन्न,
दु:खानें तें ह्रदय शतधा आपलें होत भिन्न;
दु:खामध्यें निरवधि जरी जीव हा मग्न झाला,
धाऊनीयां झडकरि अहा कां न आलां दयाला! ४९

युष्मत्स्नेहा खचित नव्हती नाथ सीमाच कांहीं,
नाहीं नाहीं मजपरि तुह्मीं पूजिली **अंबिका** ही;
आलां जेव्हां वनिं मज तदा वल्कलें नेसवीलीं
वेळोवेळीं सुरभि सुमनोभूषणें लेववीलीं ५०

माझ्यासाठीं जलनिधिवरी बांधिला सेतु थोर,
युद्धांमध्यें अतुल कृतिनें मारिले दैत्य घोर;
दुर्दैवानें विफल अवघा आपुला यत्न झाला,
एकाएकीं अहह! समरीं आपणां मृत्यु आला. ५१

केले पूर्वी उपवनिं महाभाग! जे जे विलास,
ते ते आतां स्मरति मजला सर्वही आसपास;
पूर्वीचें तें चरित दिसतें सर्व डोळ्यांसमोर,
त्यायोगानें अहह! ह्रदया होतसे शोक थोर! ५२

घालोनीयां वनिं निजकरीं शस्यनीवार मोदें,
प्राणेशा! मी मृगखगतती पाळिल्या ज्या विनोदें;
त्यांच्यासंगें बहु करितसें केलि मी एककालीं,
नाथा! तेणें मम तनुलता श्रान्त अत्यन्त झाली. ५३

गोदातीरीं उपवनिं लताकुंज जो रम्य आहे,
त्याच्यांमध्यें अभिनव शिलापट्ट तो शोभताहे;

जाऊनी मी विकल पडलें त्यावरी संभ्रमानें,
आली तेव्हां प्रियतम मला गाढ निद्रा श्रमानें. ५४

आलां तूह्मी हुडकित मला तेधवां त्याचं जागीं,
एकाएकीं दचकुनि मनीं होय मी शीघ्र जागी;
पाहोनीया क्षितितलिं तशी सुप्त मी दीनवाणी,
दुःखावेगें प्रकट वदलां यापरी दीनवाणी. ५५

स्त्रीजातीची निरुपम जगीं होय जी ईश्वरीच,
दुर्दैवानें अहह ! निजली आज ती भूवरीच;
ज्या देवीनें कुसुमशयनीं लोळतां त्रस्त व्हावें,
रानामध्यें क्षितिवरि तिनें काय आतां पडावें ! ५६

रम्योद्यानीं श्रमविगलिता होय जी चालतांना,
हा हा ! आतां भ्रमुनि विपिनीं सोशितें कष्ट नाना;
झाली ईची तनु कृशतमा कंदमूलादिकांहीं,
देवातेंही नियति न चुके हाय ! सर्वंकषा ही. ५७

केव्हां आतां सकलवसुधा-स्वामिनी होउनीया,
सौंदर्यानें ललितललना--दर्प संहारुनीया;
घालोनीया सुखकर गळां चारु पुष्पोपहार,
माझ्यासंगें करिशिल सखे ! तल्पकीं तूं विहार ! ५८

झंझावातें नयनसुभगा मेघमाळा समस्ता
झाली तैशी अहह ! अपुली सर्व आशा निरस्ता;
एकाएकीं नियति विषमा दुस्तर आड आली,
हा हा ! आतां प्रियपति चिता आमुचा तल्प झाली ! ५९

स्वर्गा जातां पति मम न कां घेतलाही निरोप ?
आला माझा निरवधि असा काय तूह्मांस कोप !

साधूंमध्यें गुणनिधि शिरोभूत **सौमित्र** थोर
हा हा ! त्याला उगिच छळिलें बोलुनी शब्द घोर ! ६०

आह्मांसाठीं त्यजुनि नगरा, होय कान्तारवासी,
चौदा वर्षें मुनिसम वशी राहिला जो उपाशीं;
रक्षी आह्मां निशिदिनिं न घे अल्प केव्हांहि झोंप,
दुष्टेनें मीं उगिच छळिलें हाय त्याला उमोप ! ६१

त्या पापाचा उचित अधुना भोगितें दुर्विपाक,
वारंवार व्रणितहृदयां टोंचि हा नीच काक !
त्यामध्येंही प्रियतम मला सोडुनी हाय गेला !
सौभाग्याचा सुरतरु यमें निर्घृणें दग्ध केला. ६२

जे जे गर्वें उगिच छळितां सज्जनां, साधुसंतां,
बाई त्यांचें त्वरित अवघें जाय सौभाग्य अन्ता;
हें नेणोनी कठिणवचनीं पीडिलें **लक्ष्मणा**तें,
त्यायोगानें नरकसम या भोगितें यातनांतें. ६३

ज्यानें युद्धीं अमरपतिही जिंकिला स्वप्रतापें,
भीतीनें हें थरथर जया सर्वही विश्व कांपे !
ऐसाही तूं सपदि मथिला **इंद्रजित्** वीर्यशाली,
हा हा ! साधो ! तुजहि गिळिलें अन्तकानें अकालीं ! ६४

हुंकारानें बधिर करुनी अन्तकालाहि पूर्ण,
जेव्हां कोपें रणिं **रघुवरा** वेढिती दैत्य तूर्ण;
त्याकालीं तूं त्वरित समरीं धांवसी पाठिराखा,
दावाग्नीतें दहनसमयीं मातरिश्वा जसा कां ! ६५

गेला जेव्हां कपट हरिणामागुनी **राम** रानीं,
म्यां दुष्टेनें मृदुलहृदया भेदिलें वाक्शरांनीं;

त्यासाठीं कां मजवरि असा सांग तूं कोपलासी ?
टाकोनीया मज अशरणा स्वर्गलोकास जाशी ! ६६

वात्सल्याची खचित गमते मूर्त जी निम्नगाच,
ठेवी प्रेमा मजवरि सदा माउली तेंवि साच;
ती **कौसल्या** मृदुल–हृदया पुण्यधी सत्वशील,
दुर्वार्ता ही परिसुनि अहा ! काय आतां करील ? ६७

चारित्र्यानें सकलललना–रत्न–भूषा खरीच,
साक्षात् **लक्ष्मी** खचित दुसरी संचरे भूवरीच
त्या साधूची सदय जननी प्रेमवल्लीच काय,
दुःखाग्नीनें त्वरित सखि ती दग्ध होईल हाय ! ६८

झाली दग्धा विरहतपनें देहवल्ली यदा ही,
आपद्धूमें सकल भरिलें हाय दिग्भाग दाही;
एकाएकीं प्रकटुनि दयामेघ दे जीवनातें,
हा हा हा ! त्या निरखिन कधीं **अंजना**–नंदनातें. ६९

ऐकोनीया मरुनि पडती यद्बुभुःकार सारे,
ब्रह्मांडाचा निरवधि तसा गोल सारा थरारे !
युद्धामध्यें प्रलय करि जो मूर्तिमान् **रुद्र** जैसा,
क्षुद्रांनीं तो अहह ! समरीं मारिला वीर कैसा ! ७०

बाई आहे असुखमय हा सर्वथा जीवलोक,
आला त्याचा अतिशय तिरस्कार मातें विलोक;
आतां कांहीं सुगति मरणावांचुनी अन्य नाहीं,
आहे अन्तीं तुज सविनया एक विज्ञापना ही. ७१

माझ्यासाठीं दिवसरजनी फार तूं कष्ट केले,
मत्कल्याणा सदय मन हें सर्वदाही भुकेलें;

पापाचा जाब.

श्लोक.

सुखें लिहित बैसलों मनहि गर्क झालें पुरें
वरोनि अति घाणसा मल विसर्जिला पांखरें
उठे तिडिक मस्तकीं तनु सुतप्त कोपानळें
विवेकमति मावळे क्षणहि ना विचारा मिळे १

तसा उठुनि लाविलीं सकल तूर्ण वातायनें
वरी त्वरित भोंवतीं फलित जाहलें शोधणें
सुरेख चिमणी शिरा चिमुकल्या पुढें काढुनी
बघे वळुनि खालतीं मजशि घाबऱ्या लोचनीं २

करांस वर फेंकुनी उडविलें तिला तत्क्षणीं
करोनि घिरट्या फिरे भिरभिरे अति त्रासुनी
पडे पुनरपी उडे त्वरित ती प्रकाशाकडे
उडे कितिक तें ! पडे दमुनि पांखरूं बापुडें ! ३

लगेच करपंजरीं उचलिलें तिला मीं खळें
भयें धडधडा उडे शरिर तें किती कोवळें !
सरोष टक लावुनी बघत दीन मुद्रा तिची
कळोनि इतुक्यांत ये प्रियतमा मनीषा शुची ४

ह्मणे " नयन लाल कां ? बहुत कोप हा कायसा ?
" अगाइ करिं काय हें ? धरुनि काय ? पाहातसां
" कुठून इतुकी बरें कठिणता अजीं आणिली ?
" गरीब चिमणी कशी तरि इथें पडे ही बळी ५

" बघूं " ह्मणुनि हातुनी हळुंच घेतली काढुनी
" कसें हृदय हालतें लकलका " वदे भामिनी
" अगाइ किति घाबरी टकमका बघे हो कशी
" निराश, जणुं या क्षणीं मिटित नेत्र, जीवाविशीं ६

" स्वदु:ख तरि सांगण्या इजशिं काय ? वाचा गडे
" न कोप कधि चांगला सुकवि सांगती रोकडें "
हंसून उडवी वरी परि चिमू पडे भूवरी
वदे प्रियसखी तदा " मृत बरें अतां हो खरी " ७

मनीं चरकलों क्षणीं उतरली मुखाची कळा
अधोमुखि विलोकिलें विकळ पांखरूं भूतळां
ह्मणे अधम मी किती ! खळपती ! गळा दाटला
फुटे सलिल लोचनीं, शमवि सर्व कोपानळा ८

" न कोप कधि चांगला सुकवि सांगती रोकडें
" परंतु कवि–बुद्धि ही विफल शीघ्र–कोप्यापुढें
" न कोप कधि चांगला, " पुनरपी वदे टोंचुनी
ममाश्रु बघुनी प्रिया परत आंत गेली क्षणीं ९

अगा सुबक पांखरा ! दिन बरा तुला आज ना
किती अधम दुष्ट मी ! कशि विनष्ट हो धारणा
(तदा स्व–गरळाश्रु ते टपटपा गळूं लागले)
तसेंच अघ–हस्ति घे मृदुल पांखरूं चांगलें १०

बघे करुण––लोचनीं चिमणिला, बघे ती जशी
बघे चिमुकडे नको भय धरूं ह्मणे तीजशीं
हळूंच कुरवाळुनी हृदयिं घेत आल्हाद मी
कपोलिं मृदु लावुनी बहुत चुंबिली उत्तमीं ११

गृहास त्यजुनी पहा तिज करीं तसाची पळे
अधोनयनिं गांठिलें त्वरित रान तें मोकळें
कळें न अनुतापिं मी करिन काय रानींवनीं
स्व–पाप--कृति नाचते नयनिं या उभी राहुनी १२

बसे तरु--तलीं, हसे जडहि भूमि, वाटे मला
वरोनि खग निंदिती करुनिया किती कल्कला
धरून चिमणीस त्या चिवळ मी मुखा सन्मुख
वदे " चिमुकले चिमू! विनति नम्र ही आइक १३

" खराचि अपराधि हा पिडुनिया तुझा जाहला
" परांस पिडणें तरी अधम--पाप पृथ्वी--तलां
" नको करुं अतां क्षमा, नयन फोड हे चंचुनी
" नको हलवुं मान तूं, फुकट अश्रु या लोचनीं १४

" कळीव मग ना तरी खग--पती गरूडास हें
" क्षमा नचि करो! करो मज खळा जरी त्या सहे
" (उताविळ नको करूं, दम धरीं, नको फड्फडूं)
" करोनि अघ घोरसें वद बये कुठें मी दडूं? १५

" गुलाम पर–दास मी घडत पाप संसर्गि कीं
" यदन्न मुखि भक्षितो मति बने तयासारिखी
" न ती हरि–पदांबुजीं करुनि तो वदो श्रीकरा
" 'टळे भरतभूमिची अवदशा जयें तें करा १६

" 'न फक्त पिडिलें खळें निजबळेंहि गोब्राह्मण
" 'प्रजा ममहि गांजिली सकळ दुःखि पक्षी–गण
" 'हरी उतरि भूवरी झडकरी यश स्वीकरीं
" 'स्वतंत्र--सुख--संपदा पद--नता पुन्हां दे तरी' " १७

क्षमा उचित ना मला चिमुकले ! परी स्त्रीच तूं
क्षमाचि करिल्ये सदा,.मज दिसे पुरी ही छिथूं
स्वतंत्र--सुख--गीत गा सतत तूं, जरी मी रडे
कसा विसर हो तुझा मम ? परी अतां जा उडे १८

वदोन तिज चुंबुनी सहज सोडितां ती उडे
भरारि वरि मारुनी उडत जात गांवाकडे
स्वलोचन तिच्यासवें उडति सर्व पक्षी पुढें
विकार उडवी मना शरिर चाललें वांकडें १९

(पूरक.)

खजील अति दीन मी परतलों यदा मंदिरीं
दिसे नवल तों पुन्हां सुबक पांखरूं ते वरी
न हो भय ह्मणोन त्या करित मान खालीं सुखीं
पवित्र मलही अतां सतत या पडो मस्तकीं २०

सचिंत बसलों कसा मलिन जाहलें चित्त कां
वरी चिमणिनें पुरा चिवचिवाट केला निका
बघे हळुंच तों गमे " भिवबुनी मला ती वदे
"कवे ! खळमते ! कसा ? स्व--कृतिचा न तूं जाब दे २१

सत्यमित्र.

लोभी आणि मत्सरी.

श्लोक.

दारिद्र्य घोरतर वास करी गृहात
जे नित्य कष्टति निजोदरचिंतनांत

वस्त्रान्नही न कृश बाइल आणि पोरें,
आक्रंदुनी वदति ' जन्म विभो नको रे ' १
कंटाळुनीया विपदस्थितीला । संसार हो अप्रिय यन्मतीला
स्नेही असे दैवविहीन दोन । गेले वनामाजिं गृह त्यजोन २
शुद्धांतरें तापसवृत्ति सेवूं । प्रसन्न देवीस करोनि घेऊं
नेऊं स्वदारिद्र्य समूळ नाशा । अशी तयांच्या हृदयीं मनीषा ३
गेले जरी एक पथें वनांत । इच्छा वसे एकचि तन्मनांत
परी प्रसंगांत दिसोन आले । स्वभाव त्यांचे अगदीं निराळे ४
एकाचिया मानसिं **लोभ** दाट । ग्रामीं वनीं नित्य फिरे धनार्थ
छदाम लाभे जरि एक कोठें । वाटे तया तें शुभ पर्व मोठें ५
दुजा जहाला वश **मत्सराला** । झुरे सुखी पाहुनिया पराला
परोन्नती तत्हृदयीं अखंड । सले, जसा लोचनिं लोहखंड ६
असो, वनीं जाउनि पावतां ते । अत्युत्सवें चालविती तपातें
सेवोनि नाना फल मूल कंद । मुनीव्रता चालविती अखंड ७
वर्षे अशीं द्वादश कंठियेलीं । तरी न तत्बुद्धि खचून गेली
विलोकुनी निश्चल भावभक्ति । प्रसन्न झाली जगदेकशक्ति ८
ह्मणे तया काम्य जनांसि दोघां । " सांगा मनीं हेतु असेल तो गा
नेईल सिद्धीप्रति या क्षणाला । परी असे बंधन एक त्याला ९
मागेल आधीं निज वांछितातें । देईन त्याहून दुणें दुज्यातें
ठेवोनिया हें परिमाण चित्तीं । बोला सुखें आस मनीं असे ती " १०
यदा असे माय **भवानि** बोले । दोघेहि ते विस्मयमग्न झाले
मागावया कोणि धजे न आधीं । कापट्य आरंभिति अल्पबुद्धि ११
मिळेल पश्चात् द्विगुणीत दान । ह्मणोनि आधीं वदणें कदा न
केला असा निश्चय **लोभियानें** । राहे उभा स्वस्थ पहात मौनें १२
जाणोनि तत्हृद्गतभावना ही । आणावया विघ्न तिच्यांत कांहीं

आधीं पुढें होउनि **मत्सरी** तो। पहा कशी दुर्मति आदरी तो १३
प्रार्थूनिया **श्रीभुवनेश्वरीतें**। निवेदिला कुत्सित भाव तीतें
ह्मणे ' नको संततिराज्यसौख्य। अंधत्व यावो मम नेत्र एक ' १४
देवीकृपें हेतु फळासि आला। एकाक्ष तत्कालचि तो जहाला
न्यायेंचि अन्यासि दुणें मिळालें। दोन्हीहि तल्लोचन अंध झाले १५
इच्छा जशी दर्शविली स्वभक्तें। देवोनि तैसें बरदान त्यातें
केल्याविना दैन्यदवप्रशांती। अदृश्य झाली करुणार्द्रता ती १६
स्वनेत्र जावो जरि एक गेला। परी पुरा अंध दुज्यास केला
या व्रात्य कृत्यांतचि धन्य वाटे। त्या **मत्सर**ग्रासित पामरातें १७
लोभी विचारा स्वमनीं हळाळे। ' म्यां मागणें आधिच कां न केलें
आशा दुण्याची धरिली अनिष्ट। संगें तिच्या दृष्टिहि होय नष्ट ' १८
केलें तप द्वादश वर्ष रानीं। तें नाशिलें पूर्ण परस्परांनीं
आली सुधा वाहत आंगणांत। लावीयली ती फिरवोनि सत्य १९
दारिद्र्य अत्यल्प उणें न झालें। अंधत्व नेत्रांप्रती मात्र आलें
खुलें जरी ईशकृपा कवाड। तथापि येती गुण कर्म आड २०

———— बाळकृष्ण लक्ष्मण जोशी.

किरात.

श्लोक.

सेवी **किरात** भयदा वनराजि थोर.
तो ये समोर अघ घेउन काष्टभार;
घ्या ! भार घ्या ! वदत आणियला विकाया
हा जीवितार्जनिं पहा कशि लावि काया १

दुष्प्राप्य हो वसन देहभरीं जयास
कैचें उपानह तया पदिं घालण्यास

सूर्यातपें प्रखर हो वपु कृष्णवर्ण
होई तयावरि गमे विधि रुष्ट पूर्ण २

योगी पवित्र नर संसृतिमुक्त होतो
विश्वाशि जो अखिल तन्मयवृत्ति होतो
वाटे समाधिसुख एक जगांत ज्याला
तोही न वस्त्र कधि घे अपुल्या तनूला ३

आहे जगांत तरि जो वस्तीं नभांत
चाखीत जो वर सुधारस देवदत्त
विश्वंभरा निरखिलें जधिं दृष्टिपूर्ण
होई विराटपुरुषीं मग जो विलीन ४

विस्तीर्ण विश्वजलधीगत ते प्रवाह
हा केंवि मज्जत तयीं जनतासमूह
जाणे समस्त जरि सोडि न आसनाला
तोही न वस्त्र कधि घे अपुल्या तनूला ५

जो ज्ञानलब्ध नर वंद्य असा जगांत
आणीक जो फिरत गूढ वनीं **किरात**
यांनां उदासिन अशी विधि वृत्ति कां दे
दोघेहि कां सममनस्क मला कळूं दे ६

कंदाशना निरशनाहि कदा करीती
दोघांचिही दिसतसे मज एक रीती
ज्ञानें नरा अधिक काय अहो मिळालें
लाधें श्रमे बहुत तें मग व्यर्थ गेलें ७

ऐसें घडेल परि तें न कधींहि जाण
झाला प्रमाद कळला पहिला मला न

दोघेंहि भासति जरी वरुनी समान
सांगा तरी मजशिं त्यांत अधीक कोण ? ८

द्रव्या **किरात** बघुनी मनिं लुब्ध होतो
पाहून ऐहिकसुखा जगिं मोहतो तो
योगी तसा न परि, पूर्ण विरक्तजाण
त्याची असे बघ मनःस्थिति फार भिन्न ९

बाह्यावरी भुलुनियां नच विश्वसावें
हें सिद्ध यावरुनियां मनिं तूं धरावें
आहे बरी रुचिरता किति कौंडळास !
तें मानवास परि योग्य न भक्षणास. १०

———————— त्र्यंबक जयराम प्रधान.

प्रियेस.

श्लोक.

आहे जोंवरि शक्य, वेचित गुलाबाचीं फुलें तूं रहा !
नित्यानन्त सुमंद काल सखये ! जातो कसा हा पहा !
जीं जीं कोमल फुल्ल आज दिसती होऊनि पुष्पें तुला
तीं तीं म्लान उद्यां बनून पडतीं, या जाणिजे हे तुला १

तेजस्वी गगनीं रवी उगवतां—आकाशिंचा दीप तो--
जों जों येउनियां नभःपथिंवरी भूमंडला दीपतो,
आकाशाङ्गण--अन्त येइ जवळीं तों तों तयाचा क्षणीं
ठाके सन्निध अस्तकालहि उभा, हें आण तूं गे मनीं. २

जाता बाल्य सरून यौवनदशा येते क्रमें मागुती
त्यावेळीं करण्यास शक्त असती जें जें स्वयें वांछिती.

तीही व्यर्थ निरुद्यमीं दवडितां अंतीं घडें वाकडें
' गेला काळ पुन्हां कदापि नच ये ' हें तत्व मानी गडे !
तेव्हां जाण अमूल्य यौवनकला आतां त्वदंगीं स्फुरे
योजी साधुनि ही सुसंधि करण्या तूं कृत्य गे ! साजरें. ३

नारायण एम् भिडे.

सोन्याचा दिवस.

श्लोक

मातिच्या मृदु--पुष्प--तुल्य, निजुनी, अंकीं वरी पाहते
हारातें, नव--पल्लवासम करें ओढूनि जें खेळते
किंवा वक्रफलासमान, वदनीं मुष्ठी सदा चोखितें
वाटे ही स्थिति दुःख देइ ह्मणुनी दुःखें रडे बाल तें १
मोठें होउनि तें जरा, वदतसे मातेस नानापरी
' मी पोषाक करूनि रम्य, निघतों बाहेर ताता--परी
आला वीट मला सदा बसुनिया माते अगे ! या घरीं
गेला उत्तम काळ जैं पसरलों मोदें त्वदंकावरी ' २
बांधी सौख्य--गृहें शिशूपणिं परी तारुण्य ये जेधवा
दुःखें तें ह्मणतें " स्वतंत्र मजला संसार येथें हवा
गेलों मीं भगिनीस घेउनि वनीं नाना फुलें वेंचण्या
गेली मत्भगिनी सुकाळ हि पळे; हें जन्मलों भोगण्या ३
" हा ! हा ! यौवन संपलें शशिमुखी कान्ताहि गेली मम
सोन्याचा, दिन पुर्वकालिं असुनी हा दुःख राशीसम "
ऐसें वृद्ध ह्मणे; मिळूनि सगळे कंटाळले जीविता
गेला काळ बरा असेंच ह्मणती ऐसें दिसे तत्वतां ४

ना. गं. लिमये.

काव्यरत्नावलि.

अंक १२ वा.

सालअखेर.

काव्यरत्नावलीची कहाणी.

आर्या.

जगदीशा वाहुनि तव पदयुगुलीं निज मनःसुमन बा हें
रसिकोपेक्षाग्राहग्रस्ता मी रक्षणार्थ तुज बाहें १
आले प्रसंग मजवरि आजवरी कितिक, परि विभो ! सदया !
हे दिवस दाविले त्वां; रक्षिल समयास अन्य का बद या ? २
एकेक वर्ष होतें मूर्छित होऊनि बंद निश्वास;
संजीविलें कृपामृतलेशें तव, मम असाच विश्वास. ३
संपादक रक्षाया झटे जिवापाड कष्ट बहु करुनी;
काय करी ? न जनाश्रय. जाय तयाचा उपाय कीं हरुनी. ४
निज जीवित जावो, परि राहो **रत्नावली**, असा त्याचा
निश्चय सिद्धिस नेई. वाली तुजवीण कोण सत्याचा ? ५
मज्जीवनार्थ त्यांचे झाले उपकार फार मजवरती;
द्रव्याचें साह्य तया व्हाया लोकाश्रयास दे भरती. ६
करितो श्रम बहुतापरि कविवर्गहि द्यावया मला पुष्टी
स्वार्थापेक्षां सोडुनि कर्तव्यावरिच देउनी दृष्टी. ७
एकोणिस वर्षें मज जपला निज बालका जशी आई;
लाभ न झाला कांहीं. त्याची मी केवि होउं उतराई ? ८

नानापरिचीं रुचिकर पक्वान्नें बनवुनी मला चारी
कविवर्यसंघ, असतां स्वोदरचिंताहि; बुडवि उपकारी. ९
ज्यांनीं पोसुनि माझी तनु जनसेवेस योग्य ही केली,
त्यांची दैना! शिवशिव!! देशांतरिं काय रसिकता गेली? १०
जे अल्प लोक माझी सेवा स्वीकारिती प्रमोदानें,
मज्जीवनपुण्य तयां लाभे; लाभे न हें महादानें. ११
कवितावधुनें केलें होतें कांहीं तरी महापाप;
" बहुजनभोग्या होशिल, " ऐसा मुनिनें दिला गमे शाप, १२
" माहाराष्ट्रीयांचें सर्वस्वचि होउनी रहाशील,
एका काळिं सवत परि भेटेल सुधारणा विषमशील, " १३
शापेंच अशा वाटे झाली कविता अनादरा पात्र;
ह्या प्रगतिकाळिं एरविं व्हावि अनास्था हिचीच कां मात्र? १४
भूषण रत्नावलि हें रम्य महाराष्ट्रवाग्वधूकंठीं
शोभावें; परि रसिकाभावें कोनांत काळ हें कंठी. १५
कविताविन्मुखवृत्ती योग्य नसे लोक हो! अशी तुमची;
कवितेनें सत्याची, नीतीची, लाविली तुह्मांस रुची. १६
कवितेनें विघ्नगिरी, दुर्जेयहि वैरिवर्ग कांपविला;
कवितेनें कष्टक्षम वपु केलें दृढ, गणीत कां पविला? १७
कवितेनें मोक्ष दिला; कवितेनें राज्यविभवही दिधलें;
शूरत्व, धैर्य देउनि; कवितेनें क्लैब्य, दैन्य, संहरिलें. १८
कवितेचा ओघ असा बांधव हो! शून्य करुं नका हा; कीं,
झांकील अवनतीला, सत्कीर्ती पोंचवील हा नाकीं. १९
इतका व्यय करितां, तरि रत्नावलि काय जड तुह्मां झाली!
धुंडावें तुह्मिच जिला; पडुनि गळां भीड ती तुह्मां घाली. २०

१ " न रत्नमन्विष्यति मृग्यतेहि तत् " कालिदास.

दूर न लोटा जन हो! पूर्वजकीर्त्ती करूं नका छिन्न;
वृक्षाविना लता तशि आश्रयहीना असें सदा खिन्न. २१
तुमच्या स्त्रीपुत्रांच्या कंठा ही शोभवील खचित पहा;
कविसृष्टी दाखवुनी चित्ता रमवील; काय लाभ न हा ? २२
अन्य ग्रंथांसंगें तुमच्या प्रिय पुस्तकालयांत हिला
जागा देउनि जागा निज कर्तव्यास; शोभवा महिला. २३
निजहित, स्वमातृभाषाहित, आहे ह्यांत; ह्मणुन ही विनती.
आश्रय द्याया करितें, बांधव हो! करुनियां तुह्मांस नती. २४
सर्वांतर्यामीं जो वसुनि सकल सृष्टिची करि पहाणी,
जनहृदयीं प्रेराया तच्चरणीं वाहिली मम **कहाणी**. २५

विहंगम.

जानकी–प्रमाथ.*

श्लोक.

हाहा! बाई **दशवदन** हा पातला पापशाली,
या दुष्टांच्या अधम कृतिची आज सीमाच झाली!
दुष्कर्मा हा तुज बहु मदोन्मत्त आतां छळील,
राखीं राखीं जपुनि सुमती! आपुलें शुद्ध शील" ८४

बोलोनीयां सुवचन असें जातसे दूर बाला,
घेऊनीयां मितपरिजनां तोंच दुर्वृत्त आला;
दुष्टात्मा तो बहुत नटला, नाटकाचार्य जेंवी!
भक्षोनीयां पिशित मदिरा दुष्ट आकंठ सेवी. ८५

---

* मागील अंकांत ह्या प्रकरणाचे ८३ श्लोक आलेले आहेत. त्या पुढचे सर्व श्लोक या अंकांत येऊन हें प्रकरण पुरें झालें आहे.

माध्वीकाचा मद चढुनियां कामसंचार झाला,
पूर्णत्वानें विमल मतिचा दीप तेव्हां विझाला;
धि:कारी जी ललित युवती कामुका निश्चयानें,
त्या नीचाचा तिजविषयिंचा काम वाढे क्रमानें ८६

होती जेथें कमलनयना भूमिकन्या उभी ती
गेला तेथें मलिनमति तो सोडुनी नाश–भीति;
आलिंगायां पसरुनि भुजा धावला पापखाणी,
कामावेशें तिजशिं वदला यापरी नीच वाणी. ८७

" हां हां कां गे! सरसि अशि तूं शीघ्र रंभोरु-! मागें ?
या दासातें अजुनि बघसी कां न गाढानुरागें ?
त्वत्प्रेमातें कमलनयने! सर्वदा हा भुकेला,
लावण्यानें अनुदिनिं तुवां आपला दास केला. ८८

येथें नाना ललित ललना सेविती नित्य मातें;
हाहा! बाले गरलसम तें वाटतें मन्मनातें;
या मच्चित्तीं सतत रमते ही तुझी चारु मूर्ति,
बाले! आतां अहह करिशी कां न मत्काम–पूर्ति? ८९

मानीं सारा वरतनु तृणप्राय हा राज्यभार,
हाहा वाटे मज तुजपुढें देहही हा असार!
त्रैलोक्याचा असुनिहि महाख्यात मी भूप थोर,
नाचे येथें सखि! शिखि जसा मेघमालेसमोर. ९०

ब्रह्मांडाचा अधिप सखि मी एकला वीर्यशाली,
मत्पादातें विनतमतिनें सेविती निर्जराली;
या देहाची करिन तुजला स्वामिनी मी सदाही,
माझ्यासंगें अमर--वनिता--सेविता स्वस्थ राहीं. ९१

नाहीं नाहीं ललित वपु हें योग्य दुःखावलीला,
भोगायातें सुभग धर्नि तें निर्मिलें कामलीला;
आनंदानें वर नृपतिनीं मूर्ध्नि ज्याला धरावें,
त्या पुष्पानें अहह ! विपिनीं सांग कां गे कुजावें ? ९२

चौदा वर्षे विजनविपिनीं सर्वथा भागलीस,
सच्चारित्र्यां अजवरि खरी पूर्ण तूं जागलीस;
युद्धामध्यें अबल तव तो कान्त नष्टासु झाला,
सेवीं आतां मुदित हृदयें सुंदरी ! या नृपाला. ९३

दुर्वृत्तात्मा स्मर विखरुनी पावकाचे तुषार,
हा हा बाले ! करि मम तनू सर्वदा तप्त फार;
लावण्याची ललित लतिका सत्य तूं सुंदरा ही,
आलिंगीं या नरतरुवरा शीघ्र शाखाकरांहीं. " ९४

त्या पाप्याची परिसुनि अशी ती गिरा दुर्विनीता,
व्याघ्री जैशी अपकृत तशी कोपली फार सीता;
अग्निज्वाला नयन वमती, रक्तिमा आदरीती,
धिःकारानें वचन वदली दुर्जना यापरी ती. ९५

" दुष्टा ! नीचा ! वदसि भलतें; दुर्जना ! होइं दूर,
पापात्मा तूं दिससि मजला, बल्गनामात्र--शूर !
साध्वीस्त्रीच्या छळक कुमती एकला तूंच मांग !
या लोकीं तूं महित करणी कोणती केलि सांग ! ९६

बोले वाणीं अशुभकर ती कैंवि जिव्हा सडे ना ?
साध्वीचें जो चरित मळवी हस्त तो कां झडे ना ?
एकाएकीं तव शिरिं खळा ! वज्रही कां पडे ना ?
पापा ! तूतें भयकर महाव्याधि कां रे जडे ना ? ९७

स्वज्ञातीची मलिनकृतिनें तूंच केलीस होळी,
हा हा! दुष्टा! दिसति समरीं तच्छिरांच्याच ओळी;
वेतालांची बहुत पिकली रक्तमांसांहि पोळी,
मेले सारे रणि तव सुहृत् घे करीं शीघ्र झोळी! ९८

श्रीरामाची गुणकुलवती होय मी सत्य देवी,
पापात्मा तूं खल मजपुढें भाससी रंक जेंवी;
गंगावासी धवल तनु जो हंस किंजल्क जेवी
त्याची दारा कधिं तरि खला? काय काकास सेवी? ९९

हा हा! झाला प्रियपति मला सोडुनी स्वर्गगामी,
टाकोनीयां विफल तनु ही भारभूता खला मी;
जातें आतां रघुपतिसवें शीघ्र आनंदधामीं,
कां सत्कर्मीं करिशि मजला विघ्न तूं दुष्ट कामी. १००

कोठें माझा रविकुलकलानाथ कामाभिराम,
सौभाग्यश्रीसदन वसुधामंडन श्रेष्ट **राम**;
कोठें दुष्टा पिशितमदिरा--सक्त तूं दुष्ट--काम,
दुष्कीर्तीचा ध्वज उभविला कृष्ण ज्यानें प्रकाम. १०१

दुर्मार्गातें अनुसरुनियां जोडिसी पाप दुष्टा,
अन्यस्त्रीतें अपहरिसि तूं दुर्जना मांस--पुष्टा;
सौभाग्यश्री ह्मणुनि तुजला सोडुनी गेलि रुष्टा,
आनंदानें वरि अवदशा राक्षसां फार तुष्टा. १०२

हा हा झाल्या सकल विधवा त्वत्स्नुषा दुष्ट काका!
दुःखावेगें गगन भरिती फोडुनी दीर्घ हांका;
कामाशा ही अजुनि शमली नाहिं दुष्टाधमा! का?
नाहीं लोकीं खचित मदनासारिखा वीर बांका. १०३

श्रीरामाची उपकृति बरी फेडिली दुष्ट सापा !
घेऊनीयां वदन अपुलें कृष्ण हो दूर पापा !
जाऊनीया गृहिं निजसुतासाठिं मांडी विलापा,
नाहीं नाहीं उचित तुजला कामलीला सुरापा." १०४

ऐकोनीया जनकतनया–वाणि मर्मच्छिदा ही,
संतापानें असुर तनुची होय अत्यन्त लाही;
संकोपानें खल करकरां दांत तो फार खाई,
कामांधातें कधिं नच रुचे सद्विचारोक्ति कांहीं. १०५

जाऊनीयां निकट मग तो बोलला दुष्ट वाणी
"दुष्टे नीचे करिन तुज मी आपुली आज राणी;
प्रेमावेशें बहु विनविलें आजपर्यन्त तूतें,
धिःकारोनी ह्मणुनि वदसी दुर्वचेंही प्रभूतें. १०६

दुर्वाचा तूं वद वद सुखें तीव्रशस्त्रासमा गे !
चावीं चावीं अधर अपुला, तेंवि दन्तांहिं रागें;
स्त्रीच्या चेष्टा विदित असती सर्वही पूर्ण मातें,
पर्वा त्याची नच लवभरी जाण लंकाधिपातें, १०७

कोपावेगें प्रथम करिती कामिनी फार ढंग,
होती अन्तीं परि बहुपरी कामलीलांत दंग;
चारित्र्याच्या बहुत वदसी गोष्टि तूंही सदा जी,
तूतें वेगें करिन वश मी हाच निर्धार आजी. १०८

जीच्यासाठीं विमल कुल मीं आपलें दूषियेलें,
धिःकारोनी स्वजन अपुले त्यापरी दूर केले;
पुत्रातेंही समरमखिं मीं होमिलें सत्य तेंवि,
आतां तीचा अधर न पितां सांग राहीन केंवि ? १०९

रानोरानीं फिरुनि फिरुनी भागला जो अपार,
युद्धा आला कपिबल सर्वें घेउनी दुर्विचार;
युद्धामध्यें अतुल कृतिनें मारिलें मींच त्यास,
बाले ! आतां धरिशि हृदयीं सांग शंका कशास ? ११०

त्वन्नाथातें मथुनि तुजला आपुली केलि दासी,
या देहाचा खचित सखि ! मी स्वामि आतां विलासी;
जाऊनीया तरि शशिमुखी ! शीघ्र अन्तःपुरांत,
होऊं आतां पिउनि मदिरा दंग लीलासुखांत. १११

त्रैलोक्याचा अधिपति असे थोर मी दैवशाली,
भाग्याची तूं ह्मणुनि तुजला वेळ ही प्राप्त झाली;
संग्रामीं मीं त्वरित मथिला विक्रमें तो भिकारी,
आतां मातें झडकरिं वरीं सोडुनी भीति सारी. ११२

बाले ! येथें अससि विपिनीं एकली तूं मृगाक्षी,
या भूपातें वरिं करुनिया कामदेवास साक्षी;
गर्वानें तूं करिशिल जरी आज धिःकार याचा.
आतां येथें उचितचि बलात्कार हा मार्ग साचा" ११३

दुर्वृत्तात्मा पसरुनि भुजा धांवला तो सकाम,
प्राशोनीया अमित मदिरा मत्त झाला निकाम;
शंका सारी त्यजुनि खल जों हात वेणीस घाली,
एकाएकीं अधम पडला, जाउनी झोंक, खालीं. ११४

कोपानें ती वचन वदली " दुष्ट तूं एक पाप
मत्ता कां रे असुहर तुला नाठवे ब्रह्मशाप ?
स्पर्शोनी ही हुतवहशिखा थोर देदीप्यमान
कामान्धा तूं जळशिल खरा आज कीटासमान. ११५

सेवोनीयां पिशितमदिरा मत्त झालास फार,
उद्दामा तूं ह्मणुनि करिशी मर्कटातुल्य चार;
होई साध्वी तव करगता काय मूढा अशानें,
चारित्र्याचें बल कधिं न तूं एकिलें काय कानें ? ११६

विद्युज्ज्वाला कडकडुनियां आदळो मस्तकीं या,
शस्त्राघातें तनु तनुलता छिन्न होवो मदीया;
ग्रासो वेगें पसरुनि मुखा कालनामा भुजंग,
सोडीं ना मी सुचरित कदा, जाण नीचा अभंग ! ११७

दुष्टा जेव्हां तव उरिं पडे घोर चंडीशचाप,
धूलीनें हें वदन भरुनी दीन झालास पाप;
लीलेनें तें उचलुनि वरी इक्षुदंडासमान,
तेव्हां तूतें शठमति ! दिलें **राघवें** प्राणदान. ११८

पूर्णत्वानें विदित असली षंढ सर्वा जनांस,
दासींनांही भिउनि बलिच्या मंदिरीं नाचलास;
श्रीरामाते बघुनि समरीं तूं पळालास भ्याडा,
नाहीं नाहीं खचित असला एकही वीर गाढा ! ११९

सामर्थ्याची उगिचचि खला मारिशी कां बढाई ?
न्यायानें तूं रिपुवरि कधीं सांग केली चढाई ?
बंधूसंगें कमलमुख तो **राम** होतां प्रसुत,
कापट्यानें अहह ! वधिले जाउनी तेथ गुप्त. १२०

दुष्टा ! नीचा ! त्वरित निघुनी जाइं येथोनि आतां,
अर्पोनीयां स्वतनु दहनीं शीघ्र भेटेन नाथा;
पापा ! तूतें खचित मम ही दुर्लभा, पुण्य-काया,
जाईं जाईं निघुनि, तव हा यत्न साराहि वायां." १२१

सार्ध्वीची ती परिसुनि गिरा बोलला दुष्ट कोपें
" औद्धात्यानें कठिण वचनें बोलणें फार सोपें;
दासी माझी असुनि कुटिले ! मांडिले फार खेळ,
जावो प्राण त्वरित तुजला भोगितों एक वेळ." १२२

बोलोनीयां कुवचन असें धाउनी पापशीलें
एकाएकीं दृढ निजकरीं देवितें आकळीलें;
कोपावेगें बहु निजमनीं होय संतप्त बाला,
छागी दीना वृककरगता ती करी काय त्याला. १२३

एकाएकीं तंव चहुंकडे घोर कल्लोळ झाला
" धावा ! धावा ! पवनसुत हा आमुचा काल आला !
जाळी सर्वा हुतवहशिखा **राम**शस्त्रोद्गता ही,
मोठे मोठे असुर समरीं मारिले वानरांहीं !" १२४

संहाराया तुजसह खला सर्वही दानवास
" आला आला रणपटु तुझा काल तो **श्रीनिवास** !
आलिंगोनी दृढ निजकरीं **राम**शक्त्यंगनास,
दुष्टा ! आतां करिं चिर रणांत:पुरीं तूं विलास !" १२५

लंकादुर्गी कपिवरचमू मांडि आकान्त घोर,
त्रासोनीयां त्वरित पळती वीरही थोर थोर;
येऊनीयां उपवनिं कपी शोधिती त्या खळाला,
सोडोनीयां जनकतनया दुष्ट तेव्हां पळाला ! १२६

आनंदानें वरतनु वदे ऐकतां ती सुवार्ता
" देवा देवा नत तव पदीं दीन मी विप्लवार्ता
ठेवोनीया मजवरि दया निस्तुला सर्व काळ
या दासीतें विषमसमयीं रक्षिले विश्वपाल १२७

हा ! हा ! झाला मम तनुवरी काय पीयूष–सेक
किंवा देहा सुखित करि हा चंद्रिकावर्ष देख
किंवा झाली **मलय**जरसालिप्त ही काय काया
दैवें आली मरणसमयीं चेतना वाचवाया १२८

सीतादेवीचरित जगतां दाखवी हेंच तत्व
प्राणान्तीही किमपि न सती आपलें सोडि सत्व
वेळोवेळीं बहुपरि जरी पीडिलें दुर्जनांहीं
चारित्र्याचें अतुल बल ती दाखवी सर्वदांही १२९

समर्पण.

राधाताई गुणगणखनी प्रेमला साधुशीला
चारित्र्यानें सुचरितवती भूषवी जी महीला
ठेवी प्रेमा मजवरि सदा जी स्वसा तेंवि फार
तत्कंठीं मी परम लघु हा अर्पितों काव्यहार १३०

समाप्त.

——— श्रीपाद नारायण मुजूमदार बी. ए.

मढचें कावळें.

श्लोक.

मढ असें स्थळ **अष्टविनायकी**
ह्मणुनि भक्तिपुरःसर जाय कीं
गणपतीचरणांबुजिं हर्षतों
असु–मना सुमनासह अर्पितों १

१ श्रीमती सौभाग्यवती राधाबाई रेडकर इंदोर.

" सुख--द, विघ्नविनाशक, मोरया !
" भव--वनानळ, मुक्ति--द मोरया !
" मति--विकाशक, मंगल ! हे अर्जी
" कवि--नती विनती पद--पंकजीं २

" रुचिर रत्न--रुची नयनीं असे
" प्रकट मूर्तिमति प्रतिभा दिसे
" तव कृपेक्षणि धन्य असों सदा
" जागिं तरी इतरीं मन ना कदा " ३

करुनि पूजन, वंदुनि मोरया
जड मनें सजलों मग जावया
बसुनि गायमुखाजवळीं परी
बघत कां ? गत--कांति गृहांतरीं ४

सरासिं नी--रस काय ? न ते बक
सभवतें नव्हतें ? तरुंचें सुख
करित मंदिरिं वैभव--शोध कां ?
मग मना गमनास्तव नोढ कां ? ५

स--मन लोचन जी हरिल्ये तरी
नवल--काक--कृती वरचेवरी
सुखि पितां शिव--पुत्र--पदांबुला
कारिति कां ? रिति काक अशी मला ६

उडुनि तीर्थ--सुकुंड--समीप ते
पिउनि गाय--मुखीं जलबिंदुते
फिरवुनी शिर चंचुकि--पाकळ्या
समज--दा मज दाविति वांकुल्या ७

" गत--युगीं मनुजांहि निजोन्नती
" करुनि जोडियली हरि--संगती
" खग--पतीहि रमे बघुनी तुह्मां
" विसुरला सुर--लाभ न दे अह्मां ८

" ह्मणुनि प्रार्थियलें गण--नायका
" त्वरित भक्तजना वरदायका
" स्तवनिं दर्शन देत, निजासुखें
" कळविलीं लविलीं पदिं मस्तकें ९

" वर वदे " मतिमंत नराहुनी
' ' करिन हो खग मत्पद--सेवनीं
' ' हित--रती कलि जैं न कळे नरा
' ' भजन--पूजन पूत--मनें करा १०

' ' त्यजुनिया नर हें वसति--स्थळ
' ' चहुदिशीं भ्रमुनी मज शोधिल
' ' जर कुणी मम मंदिरिं राहिले
' ' द्विज--पती जपतील तरी स्थलें ११

' ' कलिं नरा निज--रूप--खुणेविना
' ' जयि न दर्शन दे जड लोचना
' ' सतत मी तंव मंदिरिं राहुनी
' ' करिन वायस भक्त--मणी जनीं " १२

" ह्मणुनि काय मला बघुनी भल्या
" हिणवितां तरि दाउनि बांकुल्या
" वदति उत्तर " काव " कटु ध्वनी
" परिसुनी रुसुनी खिजलों मनीं " १३

(पूरक.)

मनुज--वायस भूवरि पुष्कळ
मुखिं असत्य कटू वच बाष्कळ
प्रभु--पदांबु पिती, करिती नती।
सकल कां ? खल--काक--कृती न ती १४

सत्यमित्र.

भावगुप्तदशक.

वि. वि. आपल्या रत्नावलींत अनेकविध पद्यरत्नें गुंफलेलीं असतात. तींत पुढील पद्येंहि गोवण्यांत यावीं. अनेकविध--पद्यरत्नांत् यांचाहि समावेश होण्यास हरकत नसावी. या सोबतचीं पद्यें मनोरंजन करणारीं असून बुद्धीला स्फूर्ति देणारीं आहेत. आतां रत्नावलींच्या वाचकांस हा कदाचित् निराळा मासला भासेल असें वाटतें. संस्कृतांत अशाप्रकारच्या काव्यास ' भावगुप्त ' असें ह्मणतात.

भावगुप्तदशकाचें कोणीं पद्यरूपानीं उत्तरें देऊन प्रकाशन केल्यास तें याच--ह्मणजे पृथ्वी--वृत्तांत बरें दिसेल. कळावें लोभ असावा. हे वि.

मुंबई--गिरगाव. } आपला.
मार्गशीर्ष व० १३ इंदुवासर. } पां. गो. शा. पारखी.

भावगुप्तदशक.

पृथ्वी--वृत्त.

समागमसुखोत्सुका रहसि[1] अच्युता सुंदरा--
कटाक्षयुत पाहुनी हसुनि तेधवां इंदिरा[2]--
" प्रिया स्वनयना मिटी झडकरीं अधीं " ती ह्मणे
किमर्थ कथिलें असें प्रियकरास सांगा तिणें ? १

१ एकांतीं. २ लक्ष्मी.

सख्यादिजन कौतुकें " जनकनंदिनी ! तूं स्वता--
रघुप्रवरपाद धू " बहुत आग्रहें सांगतां
सुरत्नवलयें तिनें मग करांतुनी काढिलीं.
किमर्थ ? मज हें वदा प्रियेपदें पुढें धूतलीं २

शिरावरि शिवें स्वयें बसविली सपत्नी असे
बघूनि गिरिजा मनीं बहुत रुष्ट ती होतसे
सरोष मग चंडिनें शिवगळा अहो चुंबिला ?
विचार करुनी वदा त्वरित हेतु याचा मला ३

नृपाल नल भूतलीं सफलकाम अर्थी सदा--
करीत असतां तसें विहितकर्म तो सर्वदा
रमापति निर्जप्रिया चपल आपणा सत्वरीं
त्यजील ह्मणुनी घडो--घडि सशंक कां हो हरी ? ४

वसंतदिनिं एकली सुमितवल्लरी--भीतरीं
भ्रमंद्भ्रमरराजिनें [11]विलसितांतरीं सुंदरी--
[12]सलील फिरतां धरीं [13]श्वसन कोंडुनी अंतरीं
विचार करुनी वदा कवण हेतु याचा तरी ? ५

निदाघदिनिं होउनी सुतनु तप्त तापें अति
तृषार्त बहु चंद्रिकासदृश [16]गांग--तोयाप्रति--
वधू त्वरित जाउनी किसलयांजली--माजि ती--
पिण्यास जल घेउनी त्यजिच शंकिता का सती ? ६

---

१ सीते. २ रामचंद्राचे पाय. ३ रत्नकंकणे. ४ पार्वती. ५ पूर्ण मनोरथ. ६ याचक. ७ विष्णु. ८ लक्ष्मी. ९ प्रफुल्लित. १० फिरणाऱ्या भ्रमरपंक्तिनें. ११ सुशोभित. १२ स्वछंद. १३ श्वास. १४ उन्हाळा. १५ तरुणी. १६ गंगोदक. १७ पल्लवासारख्या ओंजळींत

शरन्निशिं सुपूर्ण त्या विमल[1] चंद्रबिंबाकडे--
सकौतुक विलोकितां जनकनंदिनी ती--कडे[2]-
बघूनि रघुराय तद्विरहहेतु[3] आणी मनीं--
तदीय[4] नयनांस तो हळुच झाकि कां जाउनी ! ७

सुखार्थ दसरादिनीं गतघनावली[5]--निर्मळीं--
शरन्निशिं सुचंद्रिका--बिलसितांतरी एकली--
बसे विरहिणी वधू विरहतप्त ती होउनी,
सुरासुर[6] पयोधि[7] का अहि[8]नगेंद्रें[9] निंदी मनीं ? ८

प्रभातिं धुउनी बसे स्वमुख मंदिरीं सुंदरी
सख्यांसह सुदर्पणीं[10] बघुनि घालि वेणी करीं.
वरी सुबक पंजरीं शुक वदे निशागोष्टि[11]तें
तदाननिं[12] कशास ती सुमणि लाल तैं घालिते ? ९

प्रिया मुकुरमंदिरीं[13] फिरत सुंदरी एकदा
ससंभ्रम घडीघडीं बहुत शंकिता ही तदा.
त्वरें मग प्रियाकडे रुसुनि येइ बोले उणें
किमर्थ वदली तया " विफळें[14] होय माझे जिणें " १०

———— पां. गो. शा. पारखी.

---

१ निर्मल. २ तिजकडे. ३ सिताविरहाचें कारण. ४ सीतेच्या. ५ गतमेघपंक्तिमुळें निर्मल. ६ देवदैत्य. ७ समुद्र. ८ सर्प. ९ पर्वत. १० आरशांत. ११ रात्रीच्या गोष्टी. १२ त्याच्या तोडांत. १३ आरसेमहालीं. १४ निष्फल.

ईशचिंतन.

श्लोक.

भवानलें होरपळूनि गेलों । मनीं तयानें बहु खिन्न झालों
सुहृज्जनें तोषविलें मनाला । फिरावया नेउनि सागराला १
विश्रांतीस्तव बैसलों सहज त्या सिंधू--तटीं जाउनी
झाली फार कथूं चमत्कृति किती ती स्वाननें तद्दिनीं
" प्रारब्धीं नच सौख्य ज्यास मिळणें गेलाहि कोठें तरी
लाधे ना कधिं, तो तयास सुख तें हा बोल या भूवरी " २
वर्षाकाळ गतायु होउनि तदा आरंभ हस्ता करी
झंझावात सुटे समूळ तरुतें पाडी जवें भूवरी
गेल्या दाहि दिशा धुळी उडुनियां व्यापूनिया अंबरीं
क्रोधें नीरद दुंदुभि स्वन जसा गर्जोनि तैसा करी ३
झाला फार घनांधकार पथिं त्या कोणां दिसे ना कुणी
दावी भीषण रूप तें चमकुनी तैशांत सौदामिनी
वाटे संतत वारि--धार पडुनी आर्द्रत्व भू ही धरी
ती सोडूनि नभा पडेलचि गमे विद्यु--लता भूवरी ४
अशा बिकट संकटीं गवसला अभागी भला
क्षणैक बसुनी सुखा स--जन ध्यावया पावला
पलायन करी त्वरें सुहृद घेउनी संगती
न सोडि परि भोगिल्याविण तयास आपद्गती ५
अशा समयिं आश्रयास्तव तरू--तळीं बैसला
स--मूल तरु तो समीरण--जवें डुलूं लागला
भयंकर सुटे प्रभंजन धुळी उडों लागली
रज:कण शिरूनियां नयनिं दृष्टि मंदावली ६

धरूनि धृति अंतरीं व्यसनिं तेथ जों बैसला
तदा मुसल--धार तो जलद--संघ कोसाळला
धडाड बसती तशांत किति थोर गारा शिरीं
भिजोनि वसनें भरे हुडहुडी तयां अंतरीं ७

नदी नाले ओढे नृप--पथहि झाले जलमय
उभे होते तेथें कितिक पशुपक्षीहि सभय
घुमे केव्हां कानीं मधुनि मधुनी किर्र निनद
करी कोठें तेजा चमकुनिहि खद्योत विशद ८

तदा आठवी चित्ति तो ईश्वरातें । नमूनी वदे वारि या संकटातें
करूनी कृपा तू जगन्नायका रे । धरीं प्रेम पोटीं हरे ! हे मुरारे ! ! ९

शरण तुजला आहे देवा त्यजी नच पामरा
बिकट विपदा सप्रेमानें प्रभो क्षणिं संहरा
तुजविण नसे त्राता कोणी दुजा व्यसनांत रे
सदय हृदयें सौख्यागारीं मला वसवीं करें १०

अशी विनति ऐकतां प्रभुकृपा पहा जाहली
तदा जलदवृष्टिही क्षणभरांत ती लोपली
निरभ्र नभ होउनी उदित चंद्र तैं दीसला
अभागि सदनांतरीं स--जन सत्वरीं पावला ११

काष्णि.

वनदेवी.

श्लोक.

तेजोनिधी तरणि अब्धितलीं बुडाला
गेला तरी दिसत ताम्रछटा नभाला

सौभाग्ययुक्त दिसते अजुनी प्रतीची
ठेवी प्रतीति जगिं सज्जन तो कृतीची १

वेळीं अशा सुरमणीय कवी निघाला
बाहेर तुष्ट करण्या मनदेवतेला
स्फूर्ती तया अनिलमंद सुसेवनाची
चेतोहरा विधिकृती बघण्या वनाची २

होतें सुरम्य रचिलें वनदेवतांनीं
तैं मंडपा; बहुत भूषविलें लतांनीं
छाया करा कथियलें घन पादपांना
मांडीयलें बहुत थोर शिलासनानां ३

जातांच मंजुरव पादप आगतार्थ
प्रेमें करीत कविच्या जरि तो गतार्थ
आलाप सुस्वर खगीं मधु पंचमाचा
केला; न गंधहि तया धनलुब्धतेचा ४

संपूर्ण आभरणशोभितशी वनश्री
संसारतापविपदीं पिडिल्यास आश्री
जी हो तया गदयुता जशि होय वल्ली
ती पाहुनी क्षणभरी ममवृत्ति धाली ५

वाटे न संग असला कधिंही तुटावा
कीं हाच तो अखिलसृष्टिललाम ठेवा
लाभे प्रसाद घडला जनचालकाचा
येथेंच शेष बरवा ममजीविताचा ६

उत्कंठमानसचकोर मला वनेंदु
उत्फुल्ल कां न मग होइल मन्मुखेंदु

स्थाना शिला गुरुवरा बसलों करून
केलें वनें मुदित मोहरसा स्त्रवून ७

सांगें वचें मधुर सन्निध होउनी ती
तैं देवता रुचिर ती मज गोड नीती
ऐकून जीं श्रवणरंध्रि मनीं रिझालों
आभार दर्शित तिला विनयें जहालों ८

होतो वृथा नच वनीं असल्या निवास
त्या लागतें मिळविण्या बहु पात्रतेस
मायाकरीं निकट बद्ध अशा नरांनीं
वास्तव्य योग्य करणें कधिही न रानीं ९

कापट्य, दंभ, ममता वसुलोभताही
मात्सर्य, कोप रतिसौख्य मनांत वाही
ऐशा विमूढ जनिं या वनिं कां शिरावें
त्यांहीं न वास करुनी वन दूषवावें १०

स्वार्थैकदृष्टि परदारमनोगतानें
यावें न येथ कधिही सुखभावनेनें
आहे सदैव जयिं “ यूयमहं ” मनांत
त्या सौख्य होय कसलें कथ काननांत ११

पावित्र्य थोर, शुचिता पयशुभ्र, पावे
ज्यानें कुटुम्ब वसुधा मनिं हें धरावें
जो त्या सहाहि मनखड्गिं हरी रिपूंनां
तो एक मात्र यति योग्य नरेंद्र रानां १२

जा तूं अतां गृहिं सखी बघ वाट पाही
साध्वी सती विमल हा ! पिडिली गदांही

होईल मोद तिज तूं अपुल्या करांनीं
देशील औषधि जरी प्रिय फार मानी १३
त्या त्वद्रता मधुर सुंदर बालिकेला
त्यागून येथ फिरशी जन रे कशाला
हा वास योग्य न तुला चिरकाल जाण
येणें तरी क्षणभरी परतें बसून १४

— — — — त्र्यंबक जयराम प्रधान.

देशभक्ति-माहात्म्य.

श्लोक.

जी क्षुद्र आत्म विभवार्जनि दे विरक्ती
दे क्लैब्य नाशुनि महत्तम-कार्य--शक्ती
जी सर्व देश करि मुक्त, न एक व्यक्ती
ती आदि शक्तिच खरोखर देशभक्ती १
आहे इच्यावीण दुजा न परोपकार
वीते न हीं, जगिं न उच्च मनोविकार
स्वार्थोद्भवाघ-विष-वृक्ष-महा-कुठार
पावित्र्य-नीति--खनि केवळ धर्म--सार २
गेले प्रवाह विलयाप्रति जीवनाचे
नैराश्य दे स्मरण भीषण रौरवाचे !
हो काल-पाश--वश देश तथापि त्याते
देते सुधा खचित ही नव--जीवनाते !' ३
भारी असह्य कर जे जुलमी नृपाचे
होती, निदाघिं न जनांस तसे रवीचे !

त्या वारुनी शमविण्या जन--ताप--काला
ही अद्वितीय जगतीवर मेघमाला ! ४

ते श्रेष्ठ मानिति जनीं बहुधा परीस
ही श्रेष्ठ हो निजगुणें परि त्यां परीस
तो लोह हेम करि ही करि सर्व देश
अप्राप्य तो त्यजि न ही, हृदय--प्रदेश ! ५

श्री--बंधुला बघुनि हर्षित होय सिंधू
ही हो समुल्लसित पाहुनि दीन--बंधू !
तो क्षुद्र--सागर कुठें व्यवहार--वृत्ती !
कोठें उदात्तगुणमंडित देशभक्ती ! ६

लोकीं असे कवच निस्तुल देशभक्ती
भेदी जयास न कुठें अशि दुष्ट--शक्ती !
प्रत्यक्ष जें उडवि चंदन अंतकाचे !
हें शस्त्र पाहुनि अराति नितांत काचे ! ७

हो रौरवाहुनि भयंकर यातनाही !
दे सोसण्या अढळ धैर्य--बळ स्वदेहीं !
मृत्यू महोत्सव समान गणावयाही !
दिव्यौषधी जगतिं केवळ हीच पाही ! ८

——————— दत्तात्रय भिमाजी रणदिवे.

मातृभूमि.

श्लोक.

मातेच्यापरि अन्न देउनि जनां जी पोषिते सर्वदा
उत्संगावरि घेइ, देइ पय जी अन्नादि दे संपदा

'भूमी' वर्ण जिच्यापुढें असति ती माताच आहे खरी
ती वाटे प्रिय मातृभूमि मजला; राहे सदा अंतरीं १

दिंडी:--जरी जाई मम देह दूर देशीं
फिरे आत्मा तरी पुनरपी स्वदेशीं
जरी खालीं धरिली जनें मशाल
ज्योत तीची तरि वरिवरी उडेल २

समुद्र वलयांकित प्रचुर देशही पाहिले
परी न जननी मला किमपी सौख्य तें लाधलें
बघोनि शशि चक्रवाक् बहुत तृप्त होतो मनीं--
प्रमोद मज त्यापरी जननि गे तुझ्या दर्शनी ३

धेनूकडे वासरुं ओढ घेते। अत्यंत ओढी शशि सागराते
लोहास तत् चुंबक ओढितें तें। ओढी स्वभूमी, किति सांगु, माते! ४

सकल आत्म असे जगिं जेवढें
मनुज मानिति गोडचि तेवढें
नियम सृष्टिमधें जर हा दिसे
प्रिय न कां निज देश मला असे? ५

माता स्वकीय बहु बालिश बालकाला
मानी हुशार; नच टाकुनि देइ त्याला
देशांत सान असले जरी दोष कांहीं
त्यां गोड मीं करुनिया, त्यजणार नाहीं ६

याला असे खीचत कारण गूढ वाटे
देशाभिमान--सरिता कधिंही न आटे
तो वाटला सुरवरा जड देव--लोकीं
हें स्वर्ग--सौख्य ह्मणुनी पडलें स्वलोकीं!

अन्योक्तिकलाप.

दर्पण.

श्लोक.

लहान असुनी, फुटोनि जरि अर्धही जाहला
पहा मनुज--दोष अल्प जरि, **दर्पणें** दाविला
असेच बहुधा जगीं दिसति दोष जे दाविती
तशीच कुजनांसमान खलु, **दर्पणा** ! त्वत्कृति १

दिवा.

रवी गुप्त झाला, ढगीं चंद्र गेला
मिळे स्थान लोकीं पहा या तमाला
वृथा बैसले हे नभीं अंध तारे
अशा वेळि वर्चस्व **दीपा** ! तुझें रे २

चंद्र.

असोनि नभि--तारकापति, निशापती होउनी
सुधाकर, सदाशिव--प्रखर--मस्तकीं बैसुनी
जरी बससि तूं **शशे** ! चढुनि तुंग शैलावरी
असोनि जगिं थोर: डाग दिसतात तूझ्यावरी ! ! ! ३

समुद्र.

जरी सौख्यादायी बहू तूं **समुद्रा**
दिसे आज तूझी जरी शांत मुद्रा
तरी फोडिसी भूपतीच्या दळातें
करूनी महा घोर तूं वादळांतें ! ४

—— —— —— नारायण गंगाधर लिमये.